


दिवाळी विशेषांक

२०१६



# नवा वास्तुविचार

संपादक


**डॉ. विलास पवार**



प्रकाशन : ओम पब्लिकेशन®

ओम पब्लिकेशनने हा दिवाळी अंक प्रकाशक डॉ. विलास पवार यांनी, एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे . संपर्क - ०२२-२५३६ ४१४१. येथे छापून तेथेच प्रसिद्ध केला. अंकात छापलेल्या मताशी संपादक संपूर्ण सहमत असतीलच असे नाही.

Email : info@ompublication.com
Website : www.ompublication.com



# अनुक्रमणिका


## लेख


१. जगी जीवनाचे सार ! - प्रज्ञा आवटी . . . . . . . . . . ५
२. वाडा ते टॉवर - राजश्री खरे . . . . . . . . . . ७
३. वत्सल नात्याचं घरटं - चारुलता कुलकर्णी . . . . . . . . . . ११
४. गजाआउच सौंदर्य - हेमंत दिघे . . . . . . . . . . १५
५. विश्व हॉटेलाचे - कल्पना येळगावकर . . . . . . . . . . २१
६. वास्तूमध्ये देवपूजा कशी करावी - स्वप्निल वाडेकर . . . . . . . . . . २३
७. घराचे बांधकाम करताना - स्वप्निल वाडेकर . . . . . . . . . . २९
८. वास्तू आरोग्याची गुरुकिल्ली - सुनंदा शिंदे . . . . . . . . . . ३३
९. घर घेतानाचे अनुभव - विनोद बांदोडकर . . . . . . . . . . ३५
१०. माझ्या व्हयोलिनच्या शिकवण्या - मनोहर तळेकर . . . . . . . . . . ४१
११. अविस्मरणीय प्रवास - पुष्पा लंकेश्वर . . . . . . . . . . ४९


## कथा


१. योगा-योग - निलेश बामणे . . . . . . . . . . ५३
२. उंडी - वैभव जाधव . . . . . . . . . . ७७
३. व्रात्य मोबाईल - नि. श गुळवणी . . . . . . . . . . ८५
४. एका यष्टी प्रवासाची कथा - मनोहर तळेकर . . . . . . . . . . ९३
५. सिटीत असं नसतं - श्वेता कुलकर्णी . . . . . . . . . . ९९
६. सुरक्षित जपान अनुभव - नि. श. गुळवणी . . . . . . . . . . १०५
७. कहाणी त्याची त्याच्या संसाराची - हेमंत दिघे . . . . . . . . . . १११
८. मुक्काम पोस्ट अमेरिका - मिनल धामणकर . . . . . . . . . . ११५

**वास्तू टिप्स . . . . . . . . . . ११८**
**काव्यसृष्टी . . . . . . . . . . १२३**
**पाककृती . . . . . . . . . . १२६**



# संपादकीय

## मन करा रे प्रसन्न !
## वास्तू करा रे प्रसन्न !

"जो जे वांछील तो ते लाहो" त्याच प्रकारे आपण जे जे म्हणतो ते ते होऊ दे असे वास्तू म्हणते असा समज दृढआहे त्या समजामध्ये आता थोडीशी भर पडणार आहे. वास्तू विचारेल "कसा आहेस तू किंवा कशी आहेस तू" त्या वेळेला स्वत:ला चांगले ठेवण्याची सक्षम ठेवण्याची प्रत्येक व्यक्तीला आवश्यकता निर्माण होणार आहे.


वास्तू म्हणजे तरी काय? आपण राहतो ते घर, आपल कार्यस्थळ, की एक इमारतीची रचना? हा प्रश्न पडण्याचे कारण असे की, वस्तुनां मन नसले तरी अनेक मनांना एकत्र घेऊन ही वास्तू वसलेली असते त्या प्रत्येक मनांचे, मनाची स्पंदने, त्या मनांचे हुंकार, त्या मनांच्या संवेदना या सर्वांनी या वास्तूच्या संकल्पनेला पेललेलं असंत त्यामूळे मनांचा चांगलेपणा आणि प्रत्येक कृतीत मग ती स्वत:ची असो वा अन्य कोणाची त्यात जर सकारात्मता असेल तर बे-बनाव, अहंकार, ईर्षा, असुया, मत्सर या सर्वांना त्या वास्तूत आधारच सापडणार नाही. त्याचमुळे वास्तू म्हणजे कसा आहेस तू किंवा कशी आहेस तू याचे उत्तर मी सकारात्मक आहे, मी आनंदी आहे असे जर असेल तर वास्तू मधल्या प्रत्येकाचे आयुष्य सुखकारक व सुसंगत होईल हे अत्यंत गरजेच आहे. घरामध्ये वास्तूमध्ये कोणतीही रंगसंगती, कोणतेही मंत्र, तंत्र, कसलेही लोलक आणि स्फटीके यांच्याही पेक्षा आंतरिक समाधान आणि परस्पर स्नेहभाव हा त्या वास्तूमधल्या लोकांच्या मनात आनंददायी, चैतन्यदायी कारंजे फुलवल्याशिवाय राहणार नाही.

वास्तू म्हणजे सहजीवनाचा सततचा अध्याय आहे. तो प्रसन्न चित्ताने जितका चांगल्या पध्दतीने जगता येईल, फुलविता येईल तितक्या पध्दतीने तो फुलविला पाहिजे. मी आनंदी आहे, मी आनंद वाटेन, मी आनंद घेईन असा विचार प्रत्येकांने आपल्या वास्तूमध्ये फुलवला तर आनंदाची पाखरण सगळ्याच वास्तूंमध्ये पसरेल आणि पर्यायाने सगळ्या जगभरात सुध्दा पसरेल. चला तर मग सुरवात करूया आनंदाची देवाण घेवाण करायला आणि समस्त वास्तू प्रफुल्लित करुया.

दिवाळीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा !

शुभ दिपावली

With Best Compliments from



# GL CONSTRUCTIONS(P) LTD

**304, Gokul Arcade-B, Subhash Road ,**
**Near Garware, Vile Parle (E) Mum - 400 057.**
**Web : www.glconstructions.co.in**
**E-mail : glc_pvtltd@hotmail.com**

# जगी जीवनाचे सार !

**- प्रज्ञा शैलेश आवटी**

जगी जीवनाचे सार,
घ्यावे जाणुनी सत्वर,
जैसे ज्याचे कर्म तैसे,
फळ देतो रे ईश्वर

चराचर अशा या सृष्टीत ईश्वराने विचारशक्ती देऊन मानवाची निर्मिती केली. परमेश्वर म्हणजे परिपूर्ण. ज्याने मोह, माया, मद, मत्सर, क्रोध यांना जिंकलेले आहे. मानवदेह निर्माण करताना त्याने पूर्ण विचाराने त्याला घडवुन भूतलावर पाठवलेले आहे. बाल्यावस्था, तरुणपण आणि वृध्द अशा तीन फेऱ्यांतून गेल्यानंतर मृत्यू अटळ आहे.

> **“बालपणीच्या काळानंतर तो तरुणपणात पदार्पण करतो. स्वतःच्या इच्छा, आकांक्षा, स्वप्ने जी लहानपणीच्या काळात रंगवतो, नंतर ती पूर्ण करण्यासाठी तो तरुणपणी झटतच असतो.”**

जन्माला आल्यावर प्रथमतः मुलाचा हळू - हळू पूर्वजन्मीचा विसर पडून माणसे ओळखण्याची स्मृती मिळते. त्यांना सर्वांविषयी, आपल्या माणसांविषयी आपुलकी, माया, जिव्हाळा निर्माण होतो. सभोवतालच्या वातावरणानुसार ते घडत असते. याच काळात ते आपल्या इच्छा, आकांक्षा आणि ध्येयाची बीजे मनामध्ये पेरते.



लहानपण देगा
देवा, मुंगी
साखरेचा रवा।
ऐरावत हत्ती थोर, परितयासी अंकुशाचा मार।।

बालपणीच्या काळानंतर तो तरुणपणात पदार्पण करतो. स्वतःच्या इच्छा, आकांक्षा, स्वप्ने जी लहानपणीच्या काळात रंगवतो, नंतर ती पूर्ण करण्यासाठी तो तरुणपणी झटतच असतो. कालांतराने ती पूर्ण होतात. आणि तो स्वतःला संसारातील सुखी प्राणी ठरवितो.

तरुणपणात प्राप्त केलेले यश, सुख, संपत्ती जिथे संपते तेथून तो वृध्दत्वाच्या काळात पदार्पण करतो. या काळात तो काय-काय कमावले यापेक्षा आपण काय गमावले याचाच विचार जास्त करतो. त्यानंतरचं आयुष्य तो शांतपणे व्यतीत करण्याचं ठरवितो. हळू-हळू त्याची स्मरणशक्ती कमी होते आणि नंतर त्याला आपल्या माणसांचा विसर पडून त्याच्या आयुष्याची ज्योत हळू-हळू कमी होऊन विझून जाते. फरक फक्त एवढाच शिल्लक राहतो, येताना त्याचा रडका सूर सर्वांना प्रसन्न करतो, तर जाताना तो सर्वांना रडवून जातो. रिक्त हाताने येऊन त्याच हाताने परत जावे लागते. राहते ते फक्त त्याचं नाव. मानवदेह प्राप्त करून ईश्वराने आपली निर्मिती केली असेल तर वाईट गोष्टींचा त्याग करून सर्वांनी आयुष्य चांगलंच जगलं पाहिजे.

यालाच म्हणावे जीवन !

With Best Compliments from

# M/S Prime Civil Infrastructure Pvt. Ltd

203-A, Gokul Arcade, Swami Nityanand Marg,
Vile Parle (E), Mumbai - 400 057
Tel: +91 22 2824 5635/36
Tele/Fax: 2824 5638
www.primecivil.com
Email: contact@primecivil.com

# वाडा ते टॉवर

- राजश्री खरे


टॉवरच्या सातव्या मजल्याच्या छोट्याशा गॅलरीत सुन्न मनाने बसले होते. दोन-तीन वर्ष झाली येथे येऊन पण मन काही रमत नाही. निरनिराळ्या घरातल्या बालपणीच्या, तारुण्याच्या आठवणी मनात घर करत होत्या. बालपणी राहिलेल्या वाड्यापासून आजच्या या टॉवरपर्यंतचा आयुष्याचा प्रवास डोळ्यांपुढून सरकत होता.

मी लहान असताना आम्ही वाड्यात राहायचो. एकंदर सात-आठ बिऱ्हाडेच वाड्यात राहायची. पण सारी एकदिलाने, जिवाभावाने. वाडा म्हणजे एक मोठे कुटुंबच होते म्हणाना. वाड्याला एक भले मोठे अंगण. एका बाजूला मोठा हौद आणि बाजूलाच शौचालय. त्या काळी संडास टोपलीचे असायचे आणि मैला उचलायला भंगी यायचे. घरात जेमतेम उभे राहून आंघोळ करता येईल एवढीच मोरी. त्यामुळे भांडी घासणे, कपडे धुणे सारी कामे हौदावरच होत असत. इलेक्ट्रिक गॅस नव्हतेच. कोळशाच्या शेगड्या आणि चुलीचा वापर स्वयंपाकासाठी केला जायचा. पाणी तापवायला बंब असायचा. दुपारचे चार वाजले की शेगडीतल्या राखेने कंदिलाच्या काचा साफ पुसून संध्याकाळच्या दिवे लागणीची सोय करून ठेवायची. एकत्र कुटुंब पद्धती असल्यामुळे प्रत्येक घरात दोन-तीन पिढ्या आनंदाने एकत्र नांदायच्या. गणपती असो, दिवाळी असो वा उन्हाळा सगळ्यांकडची सगळी कामे एकत्रितपणे केली जायची. कोणावरही काही संकट आले, सुखदुःखाचे प्रसंग आले तरी ते वाटून घेतले जायचे. एकमेकांना आधार दिला जायचा. मुलांना खेळायला मोठे अंगण असल्यामुळे निरनिराळे खेळ खेळले जायचे. आताच्या दूरदर्शन सारखी साधने नव्हती. लंगडी, खो-खो, लपाछपी, सोनसाखळी, आबाधुबीसारखे खेळ तर खेळले जायचेच. शिवाय टिक्कर, दोरीउड्या, सागरगोटे असेही खेळ असायचे. खूप मज्जा यायची. व्यायामही व्हायचा. पतंगाच्या दिवसात मांजा करणे हेही एक काम असायचे. काच आणि सरस एकत्र कुटून दोऱ्याला लावायची म्हणजे कडक मांजा तयार व्हायचा. या मांजाने दोन-तीन पतंग सहज काटले जायचे. काटलेली पतंग पकडून उडविण्याची मजा काही औरच. भोवऱ्यांची गंमत आणखी. वेगळी भोवऱ्यांची शर्यत लावायची. ज्याचा भोवरा आधी थांबेल त्याच्या भोवऱ्याला बाकीच्या भोवऱ्यांनी मारून तो फोडून टाकायचा. कोणी किती गोट्या जिंकल्या यावर गोट्यातला तज्ज्ञ ठरविला जायचा. पतंग, भोवरा, गोट्या हे सारे खेळ साधारणपणे मुले खेळायची पण भावांच्या मध्ये आमची लुडबुड असायचीच. मे महिन्यात सावलीत पथारी पसरून पत्त्यांमधले सारे डाव खेळले जायचे. रेडीओ, दूरदर्शन नव्हतेच. मर्फीचा रेडीओसुद्धा एखाद्या श्रीमंताच्या घरीच असायचा. आमच्याजवळच राहणाऱ्या एक डॉक्टरीण बाई आमचे संस्कार वर्ग घ्यायच्या. आमच्या बाजूचेच दोन-तीन वाडे सोडून गवळीवाडा होता. तेथून आम्ही दूध आणत असू. गाय

**“सारी गंमत चाळीतच असायची. जिवाला जीव देणारी माणसे कशी असतात ते वाडा आणि चाळ संस्कृतीतच कळले.”**

व्यायली की आवर्जून चिक आणून द्यायचा. आईही गाईसाठी चरवीत ज्वारी टाकायची आणि दूधात गूळ घालून छानसा खरवस करायची. साऱ्यांचीच आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्यामुळे बिनाचप्पल शाळेत जाताना काही वाटायचे नाही. टॉवेलच्या भरलेल्या पिशवीचे दप्तर पाठीवर घेऊन जायला कोणाला लाज वाटायची नाही. स्वस्ताई तर इतकी की कधीतरी वडील एक आणा द्यायचे. त्यात ढब्बू पैशाचे चुरमुरे पायलीभर यायचे. ते १ पैशाचे शेंगदाणे, १ पैशाच्या गोळ्या घेऊन १ पैसा शिल्लक ठेवायचा. समाधानी, आनंदी जीवन होते.

गाव सोडून आम्ही मुंबईत आलो ते लांबलचक चाळीत. नळावरची भांडणे काय ते चाळीत आल्यावरच समजले. संध्याकाळी ४ ते ६ पाणी यायचे. सात बिऱ्हाडांत दोन नळ. त्यावरून दुसरे दिवशी ४ वाजेपर्यंत पुरेल एवढे पाणी भरून ठेवायचे. नंबर लावून दोन-दोन बादल्या पाणी एकेकाने भरायचे. हे नंबर सकाळपासून लावून ठेवले जायचे. लहान बादली, मोठी बादली यावरून बरेच वेळा भांडणे होत असत. कपडे धुण्यासाठीही असेच एखादे फडके टाकून नंबर लावले जायचे. कोणीतरी त्यात बदलाबदली करून आपला नंबर घुसवायचे. आणि मग भांडणे जुंपत. एरवी गळ्यात गळे घालणारी माणसे पाण्यावरून एवढी हमरातुमरीवर का येतात कळायचेच नाही. एखाद्या मुलाला परीक्षेत कमी मार्क पडले, कोणाचे प्रेमप्रकरण असेल तर साऱ्या बातम्या घरच्या आधी चाळकऱ्यांनाच माहीत व्हायच्या. एखाद्या मुलीला बघायला येणार असतील किंवा कोणाला मुलगी दाखवायला येणार असेल तर आधीच चाळीत कुजबुज सुरू व्हायची आणि मुलगा वा मुलगी यायच्या आधीच सारे गॅलरीत उभे राहायची. मुलगा-मुलगी कशी दिसतात? योग्य आहेत की नाही? कोण कोण आले? काय काय प्रश्न विचारले सारी बित्तंबातमी चाळकऱ्यांना असायची. एखादा पदार्थ केला तर चाळभर वास जायचा की निमित्त काढून चाळकऱ्यांच्या चकरा सुरू व्हायच्या. हेच शेजारी सुखदुःखातही घरच्यासारखे पाठीशी उभे राहायचे. कोणाच्या घरी आलेला पाहुणा साऱ्या चाळकऱ्यांचा पाहुणा असायचा. दिवाळीत एकत्र जमून कंदील करायचे. गणपतीची आरास करायची. चढाओढीने रांगोळ्या घालायच्या, कोणाच्या घरी कार्य असेल तर कामे वाटून घ्यायची, ही सारी गंमत चाळीतच असायची. जिवाला जीव देणारी माणसे कशी असतात ते वाडा आणि चाळ संस्कृतीतच कळले.



आमचे लग्न झाल्यावर आम्ही आलो बंद दाराच्या ब्लॉक संस्कृतीत. ब्लॉकमध्ये राहायला आलेले सर्वच वाडा वा चाळीतून आल्यामुळे सुरुवातीला वातावरण चाळींप्रमाणे मोकळे असायचे. एकमेकांशी बोलायला सारे उत्सुक असायचे. ब्लॉकची दारेही उघडी असत. होळी, गणपती, कोजागिरी सारे उत्सव होत असत. पण जसजशी वर्षे उलटत गेली, जगण्यात स्पर्धा आली. पैसा मोठा झाला तसतशी ब्लॉकची आणि मनाची दारेही बंद झाली. इतकी की आज ४०-४५ वर्षे एकत्र राहून काय-


कसे-काय एवढे बोलण्यासाठी सुद्धा कोणी तयार नसते.

हळूहळू साऱ्यांना टॉवरचे वेध लागले. ज्या घरात आयुष्याची ४० वर्षे काढली, लग्नापासून वृद्धत्वापर्यंतच्या साऱ्या आठवणी, सुखदु:खाचे क्षण जेथे घालविले ती बिल्डिंग केवळ काही लोकांच्या स्वार्थापोटी धडधाकट असूनही पाडायचे ठरले. एखाद्या वृद्धाला जसे म्हातारा झाला म्हणून वृद्धाश्रमात टाकतात तसे जुनी झाली म्हणून बिल्डिंग तोडायचे ठरले. हो-नाही करता करता पाच वर्षे बाहेर काढून आम्ही या टॉवरमध्ये राहायला आलो जेथे माणसे फक्त लिफ्टमधून अथवा कारमधून जाता-येताच दिसतात. ज्या वेळेस जुन्या बिल्डिंगसमोरुन जाताना हातोडे मारुन ती बिल्डिंग जेव्हा पाडली जात होती तेव्हा मात्र जणूकाही आपलेच हातपाय कोणी तोडत आहे असे वाटत होते. तारुण्यापासून वृद्धत्वापर्यंतच्या साऱ्या आठवणी पडणाऱ्या बिल्डिंगच्या पायदळी तुडवल्या जात होत्या. शेवटी मनाला इतक्या यातना होत होत्या की आम्ही आमचा रस्ताच बदलला. टॉवरमध्ये आल्यावर नव्याची नवलाई फारच लवकर संपली आणि रोज एक समस्या उभी राहू लागली. कधी पाणी नाही तर कधी लिफ्ट बंद. बोलायला माणूस गाठायचा म्हटले तरी सात जिने उतरावे लागतात. गॅलरीत बसून खाली बघावे तर माणसे मुंग्यांसारखी दिसतात वर बघावे तर स्वर्ग अगदी जवळ आल्यासारखे वाटते.

हे सारे अनुभवल्यावर वाटते की असं म्हणतात की घराची वास्तू तथास्तु म्हणत असते. मात्र वास्तूने चांगल्या मजबूत इमारती तोडून टॉवर बांधण्याच्या लोकांच्या विचाराला 'तथास्तु' म्हणू नये आणि परमेश्वराजवळही एवढीच विनंती की लोकांना सुबत्ता दिली तसे सद्विचार, सद्भावना, आपुलकी दे जेणेकरुन राष्ट्रीय संपत्तीची हानी अशाप्रकारे होणार नाही.




With Best Compliments from





# THANE DIST JR COLLEGE

PROF CO-OP CREDIT SOCITY LTD

C/O R.K.TALREJA COLLEGE

ULHASNAGAR - 421 003



**Chairman - Mr. B.U.Badgujar**

**Secretary - Mr. G.P.Kajarekar**

**Treasurer - Mr.phapale p.p.**

# वत्सल नात्याचं घरटं

- चारुलता कुलकर्णी

घर ते की जेथे कळ्यांना फुलावं, मुलांना खेळावं, नात्यांना रमावंसं वाटायला हवं. आकार, लांबी, रुंदी, संगमरवरी फरशी यावर घराचं सौंदर्य ठरतं, ही कल्पनाच मुळी चुकीची आहे. परवडत असेल त्याने जरुर राहावं. पण, वास्तूचा आत्मा त्या वास्तूतल्या आध्यात्मिक अधिष्ठानातच आहे. प्रत्येकाला विकासासाठी पूर्ण स्वातंत्र्य पण दुश्चारासाठी संपूर्ण मज्जाव असणारं घर... साधनेन बांधाव लागत. आर्थिक उलाढालीतून जमीन विकत घेता येईल. भिंती-छप्परही बांधता येईल. पण घर म्हणजे केवळ थकल्यावर झोपण्याची जागा नाही. घर म्हणजे वाट पाहणाऱ्या वत्सल नात्यांचं घरटं!

हे वात्सल्य, हा जिव्हाळा विकत घेता येत नाही. तो परस्परांमध्ये वेळीच निर्माण करावा लागतो. ह्यासाठीच घरात वाचन, चिंतन, निरूपण, गायन, वादन, सकीर्तन याची आवश्यकता असते. अशा वातावरणांत वास्तू प्रसन्न होते. अशी घरात नाती खुलतात. भिंती केवळ छताला आधार देत नाहीत तर नात्यांना सोबत देतात. “यशात जे हसतं आणि अपयशात जे नव्या प्रयत्नांसाठी उभारी देत, ते घर!”

घरात प्रार्थनेचा सुंगध हवा. बाजारातून आणलेलं रूम फ्रेशनर किती वेळ हवा सुंगधी ठेवणार? पण, घरातील लोक दहा मिनिटं प्रार्थनेसाठी देतील, दहा मिनिटं ध्यानासाठी देतील, जेथे आचार-सदाचार असतील, आहार सात्विक असेल, विचारांमध्ये अभिरुची असेल, त्या घरात पाऊल ठेवता जाणवतं की येथे समाधान आहे. मनःशांती आहे. तर्कतीर्थ, लक्ष्मणशास्त्री जोशी यांच ग्रंथांनी सावरलेलं घर, तत्वचिंतक प्राचार्य राम शेवाळकर यांचे ग्रंथमजली घर! तर प्राचीन ग्रंथापासून आधुनिक काव्यसंग्रहापर्यंत सर्व प्रकारच्या ग्रंथांचा मंगेशकरांचं “प्रभुकुंज” मधील घर! ही घर म्हणजे ग्रंथ, कला, सरस्वती, लक्ष्मी यांचा वावर असलेली. जेथे नवनिर्मितीला सन्मान नाही ते घर नाही.

**“घर ही संकल्पना अखिल सजीवाला संजीवनी देणारी आहे. सर्व प्राणीमात्रांना आसरा देणारी, सुखावणारी! प्रत्येकाला एक छोटंस का होईना पण आपलं हक्काचं घर असावं.”**

आपल्या परंपरेत वास्तुदेवतेची प्रतिष्ठापना व अधिष्ठान ही अत्यंत अर्थपूर्ण संकल्पना आहे. ही वास्तुदेवता सतत आपल्या घरातल्या वातावरणात आशीर्वादाचा तथाऽऽस्तु! असा जप मिळत असतो असं म्हणतात. अशा घरात नाती खुलतात, भिंती केवळ छताला आधार देत नाहीत तर नात्यांना सोबत देतात.

आता फक्त चकचकीत घरांचा काळ आला आहे. गृहसजावट पाहून “व्व!” असं म्हणण्याचा काळ आला आहे. एकमेकांचा संवाद गेलेली घरं म्हणजे “समस्या शिजवत ठेवलेली प्रेशर कुकर” झाली आहेत. मुलांसाठीच अधिक वेळ घराबाहेर असणारे पालक घरात नवनव्या समस्या निर्माण करणारं वातावरण नकळत निर्माण करीत आहेत. आर्थिक समस्या सुटतं, पण संवादाच्या अभावी

नात्यांतील दुराव्यामधून मनाच्या अनेक चिंता निर्माण होतात. आई-बाबा झाल्याचा आनंद पालकपणाला भिडत नाही. वाढदिवस, बारसे, मुंज एवढेच काही कौतुक समारंभ नसतात, तर मुलांच्या प्रत्येक पावलोपावली उत्सव बहरून येतो.

घर ही संकल्पना अखिल सजीवाला संजीवनी देणारी आहे. सर्व प्राणीमात्रांना आसरा देणारी, सुखावणारी! प्रत्येकाला एक छोटंस का होईना पण आपलं हक्काचं घर असावं असं नेहमी वाटत असतं. आपलं घर इतरांपेक्षा आगळंवेगळं दिसावं असं प्रत्येकाला वाटत असतं.

आपल्या सगळ्यांचा अनुभव एखाद्या घरात गेल्यावर आपल्याला शांत वाटतं, भले ते घर अगदी साधे असेल तरी, परंतु एखाद्या घरात उंची फर्निचर, सजावट असून सुध्दा मन अशांत होते. शांत, समाधानी समंजस गृहिणीचे प्रतिबिंबच घर असते. घरासमोर साधी काढलेली रांगोळीच सकारात्मक ऊर्जा निर्माण करते. मुंबईसारख्या शहरात वास्तुशास्त्राप्रमाणे गृहरचना असलेली जागा मिळणं कठीण असते. काही वेळा घरातील अंतर्गत रचना बदलणे केवळ अशक्य असते. त्यामुळे घरातील बांधकामाची तोडफोड न करता आपापल्या घरात कसे राहावे ह्याचा विचार आपण वास्तुशास्त्राप्रमाणे करू शकतो.



घराचा आकार नेहमी चौकोनी असावा. घराचा दरवाजा शक्यतो पूर्व किंवा उत्तर दिशेस व आतमध्ये उघडणारा असावा. मुख्य दरवाजास उंबरठा असणे आवश्यक आहे. ईशान्य दिशेस पिण्याचे पाणी असावे. ह्या ठिकाणी देवघर असावे. घरातील देवघरास कळस असू नये. देवघरात एकाच देवाच्या अनेक प्रतिमा ठेवू नयेत. जुने जीर्ण झालेले फोटो, मूर्ती, पोथ्या यांचे विसर्जन करावे. देवांचे तोंड पश्चिमेकडे असावे. पूर्व दिशेस स्नानगृह किंवा हॉल असावा. हलके सामान ठेवावे. आग्नेय दिशेस स्वयंपाकघर असावे. हा आपल्या घरातील रुचकर कप्पा असतो. स्वयंपाकघर म्हणजे जादूचं घर वेगवेगळ्या रुचकर चवी आपल्याला स्वयंपाकघरात बनविता येतात. कारण “पोटविभाग सकस तर जगणं सुरस.” घराबाहेर नेहमी तुळस असावी.

नैर्ऋत्य दिशेस शयनगृह असावे. झोपताना डाव्या कुशीवर झोपावे व उठताना उजव्या कुशीवर उठावे. जीर्ण, जुन्या, नको असलेल्या वस्तू घरात ठेवू नयेत. तसेच बंद पडलेले घड्याळ व जुने कॅलेंडर घरात ठेवू नये. गळणारा नळ रिपेरिंग करून घ्यावा. आपण आपलं घर नेहमी स्वच्छ व व्यवस्थित ठेवण्याचा प्रत्न करावा. कारण “हात फिरे तिथे लक्ष्मी वसे.” घरात नेहमी शुभ बोलावे. हिंस्र श्वापदांचे फोटो घरात ठेवू नयेत. नवीन घर घेतल्यावर सुरुवातीला वास्तुशांती करून घेणे लाभदायक आहे.

आपल्या घरात येणाऱ्या प्रत्येक पाहुण्याचा आदर हा एक सजावटीचाच भाग आहे. गृहसजावट करतांना रंगसंगतीचे ज्ञान असणे अत्यंत जरुरीचे असते. काही घरात प्रचंड खर्चिक सजावट करून देखील रंगसंगतीचा अजिबात विचार केलेला नसतो. पडदे, भिंती व टाईल्स ह्यांची रंगसंगती व्यवस्थित जुळली पाहिजे. छोट्या खोलीची सजावट देखील

आकर्षक रंग व दिवे लावून करता येईल जेणेकरुन खोली लहान दिसू शकते. फिका रंग लावल्यास मोठ्या दिसतात. जास्त शोभेच्या वस्तुंनी घर भरलेलं वाटते. त्यामुळे त्याचा संग्रह करुन प्रदर्शन करणे योग्य नाही. शोभेच्या वस्तु योग्य रितीने योग्य ठिकाणी ठेवणे ही एक कलाच आहे. सुटसुटीत फर्निचर कोणालाही आवडेल.

एकंदरीत काय आपल्याकडे येणाऱ्या पाहुणेमंडळींना आपल्या घरात आल्यावर प्रसन्न, निर्मळ वाटले पाहिजे. निर्जिव वस्तू सुध्दा नुसत्या शोभा वाढविणाऱ्या नसून बोधक असायला हव्यात. जर आपण आपले घर आपल्या आवडीच्या गोष्टींनी सजवले असेल तर आपल्याला त्याची ओढलागते, आपण घरावर प्रेम करतो. घर आपल्या कुटुंबातील, घरात राहणाऱ्या माणसांचं असतं म्हणून ते सगळ्यांनी सावरायचं असतं. एकाने कुणी पसरवलं तर इतरांनी आवरायचं असतं. घराला घरपण देणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. शेवटी घरातील माणसांच्या हातात आहे, आपल्या घराला घरपण कसं देता येईल!

## वास्तू टिप्स

**हे जनावर दिसले तर होतो धन लाभ :**

- सकाळी सकाळी मोर किंवा हंस दिसणे शुभ मानले जाते.
- घरातून बाहेर निघाल्यावर गाय दिसणे शुभ. त्यातून पांढरी गाय असली तर भरपूर धनलाभ होण्याची शक्यता असते.
- स्वप्नात घुबड दिसला तर समजावे की धनलाभ होणार.
- घरात अचानक घुबड आला तर शुभ समजावे.
- स्वप्नात किंवा प्रत्यक्षात पांढरा साप दिसणे लक्ष्मीदेवीची कृपा होण्याचे संकेत आहे.
- व्यापारासंबंधी यात्रेवर जाताना उजव्या बाजूला साप, माकड, कुत्रा किंवा एखादा पक्षी दिसणे शुभ शकुन मानले जाते.

**या वाईट सवयी असल्यास रुसून बसते लक्ष्मी :**

गरुड पुराणाप्रमाणे या वाईट सवयींमुळे देवी लक्ष्मी रुसून बसते म्हणून या गोष्टी करणे टाळा आणि धनवान बना.

- घरात खरकटी भांडी पसरणे
- अन्नाचा अपमान करणे
- आई-वडिलांचा मान न ठेवणे
- स्त्रीला छळणे
- नवरा-बायकोचे भांडण
- अस्वच्छ वस्त्र धारण करणे
- सायंकाळी झोपणे

ज्या घरात स्त्रियांचा व मुलींचा सन्मान केला जातो, तिथे देवी लक्ष्मी सुखाने निवास करते आणि सर्व मनोकामना पूर्ण करते.

With Best Compliments from

# पद्मश्री अण्णासाहेब जाधव
# भारतीय समाज उन्नती मंडळ

## सेवक कल्याण सहकारी पतसंस्था मर्यादित, भिंवडी,
## विद्याश्रम, भिंवडी जि.ठाणे.



---

**संस्थाध्यक्ष**

**मार्गदर्शक व सल्लागार - विजय पां. जाधव**

**चेअरमन - व्हि.एस.पाटील**

**व्हा.चेअरमन - एम.एन.कुलकर्णी**

**सचिव - आर. एच. जाधव**

# गजाआडचं सौंदर्य

- हेमंत दिघे

खिडकीतून अंगावर आलेलं ऊन पाहून मी बिछान्यातून उठलो. घड्याळाकडे पाहिलं. सात वाजून पंचवीस मिनिटे झाली होती. बापरे ! म्हणजे उठायला उशीरच झाला होता. लवकरच सारं आटोपलं. तोच माझं लक्ष समोरच्या खिडकीत गेलं. समोरच्या खिडकीत एक तरुणी आंघोळ करून धुतले केस मोकळे सोडून खिडकीतून खाली रस्त्यावर नजर टाकून उभी होती. मी सारं जग विसरून वळताच तिचं माझ्याकडे लक्ष गेलं. अन् पाहिलं न पाहिल्यासारखं करीत ती आत निघून गेली.

मी तयार होऊन खाली आलो. आईबाबा जेवणाच्या टेबलावर सकाळच्या चहाचा स्वाद घेत होते. दोघांना 'गुडमॉर्निंग' म्हणत मीही स्थानापन्न झालो. "आज उठायला उशीरच झाला की सर्व आटोपायला झाला?" ह्या आईच्या प्रश्नाने मी किंचितसा विचारात पडलो. कारण ज्या मुलीच्या सौंदर्याकडे पहात माझी दहा मिनिटे तरी खर्ची पडली असतील ते आईला सांगावे का ह्या विचारात होतो.

"आज अगदी शांत शांतसा दिसतोय. कुठल्या विचारात गढलाय एवढा ?" आईचाच परत प्रश्न.

"कुठे काय? बाबांना डिस्टर्ब होऊ नये म्हणून मी काहीच बोलत नाहीये. मी ठीक आहे." मग लवकर चहा-बिस्किटं संपवा आणि नोकरीवर जा," आईने टेबलावरचा पसारा आवरला न् रिकाम्या कपबश्या घेऊन ती आत गेली.

मी उठलो. आईने आणून ठेवलेला लंचबॉक्स घेतला न् बाबांना 'येतो' म्हणत घराबाहेर पडलो. जरी त्या रमणीची आठवण येत होती तरी ८.४५ ची लोकल डोळ्यासमोर आल्याने स्टेशनकडे झपझप चालू लागलो. नेहमीची गाडी, नेहमीची मित्रमंडळी न् त्यांच्यासमवेत नेहमीच्या जागा व प्रवास करीत मी शिवाजी टर्मिनसला पोहोचलो.

**"चार दिवसांच्या अथक प्रयत्नाने आईची तिच्या आईशी ओळख करून घेतली. हळूहळू त्या दोघींत स्नेह वाढू लागला आणि त्यातून माहिती मिळाली. वंश, कुटुंब, मूळ मराठीच पण इंदोरसारख्या हिंदी भाषिक समाजात वाढल्याने त्यांचं मराठी हे हिंदी मिश्रित होतं."**

संध्याकाळी घरी येताना का कुणास ठाऊक पण तिची आठवण आली. खोलीचा दिवा लावला आणि सवयीप्रमाणे खिडकीत जाऊन उभा राहिलो. समोरच्या घरात अंधार होता. मात्र मी दिवा लावल्यानंतर व खिडकीत जाऊन उभा राहिल्यावर समोरचा अंधार जाऊन दिव्याने ती खोली उजळली. तीही खिडकीत येऊन उभी राहिली. तिच्या चेहेऱ्यावरलं हसू दिसेल इतपत तिचा चेहरा दिसू लागला. क्षणभर मी संभ्रमात पडलो. खरंच ती माझ्याकडे पाहून हसली असेल ? पण म्हणा समोर दुसरं होतं कोण तिच्या ? मीच होतो. मग मी तिला हात हलवून हाय म्हटलं. तिचेही ओठ हलल्यासारखे वाटले आणि तिनेही हात हलवीत 'हाय' म्हटलं असावं.

त्यानंतर आमची रोज सकाळ-संध्याकाळ नियमित नजरभेट होऊ लागली. दोन खिडक्या

गल्लीत दोन बाजूंनी. इतके दिवस दूर वाटायच्या पण आता त्या जवळ आल्यागत वाटू लागले. आम्हा दोघांचे संभाषण होत नव्हते, होऊ शकत नव्हते, मग हाताच्या, नजरेच्या व हावभावांव्दारे आम्ही एकमेकांशी बोलू लागलो.

असेच एके दिवशी खाणाखुणा चालू असतानाच माझ्या पाठीमागे आई केव्हा येऊन उभी राहिली कळलं नाही. तिने समोरच्या खिडकीतून आई मागे उभी असल्याची खूण केली व आत निघून गेली. मी मागे वळून पाहिलं. आई गालातल्या गालात हसत उभी होती. मी विरमलो. "मुलगी दिसायला चांगली आहे, नाही?" तिनं विचारलं. पण लाजेनं काहीच बोललो नाही. फक्त हळुवार हसलो. ती काय समजायचं ते समजली आणि मला आलेलं पत्र माझ्या हाती देऊन खाली गेली.

मी पत्र फोडलं. अधाश्यासारखा वाचू लागलो. अनेक वर्षे परदेशात असणाऱ्या माझ्या कॉलेजमधल्या वर्गमैत्रिणीचं होत. पत्र पूर्ण वाचून हातावेगळं करीत विचार करू लागलो. गेली काही वर्षे मी तिच्या पत्राची वा दूरध्वनीची वाट पाहात होतो. मग आपलं माझ्यावरलं प्रेम व्यक्त करताना तिनं इतका वेळ का घेतला? मी त्या पत्राकडे व समोरच्या खिडकीकडे आळीपाळीने पाहात होतो. समोरच्या खिडकीत अंधार होता तर मी लख्ख उजेडाकडे नुसता बघत होतो. काय करावं? जुन्या मैत्रिणीचं प्रेम की समोरच्या सौंदर्यवतीवरलं नुकतचं सुरु झालेलं प्रेम स्वीकारावं? रात्रभर मी वरच्या छताकडे टकमका पाहात होतो. पहाटे केव्हा झोप लागली कळलंच नाही.

सकाळची सुरुवात खिडकीतल्या रूपवतीने दर्शन देऊन केली. मीही तिच्या 'हाय'ला 'हाय' म्हणत प्रतिसाद देत आन्हिकं आटोपायची असल्याने तिला खुणेनं निरोप दिला. सारं आटोपून तयार होत खाली गेलो. जाताना हळूच समोरच्या खिडकीकडे पाहिलं. ती हास्यसुंदरी उभी होती. चहा-नाश्ता करता करता आईने बॉम्ब टाकला, 'मी आजच समोरच्या घरी जाऊन तिच्या आईला भेटणार आहे."

"अगं, पण एवढी घाई का करते आहेस? आधी तिची माहिती तर काढ." माझं बोलणं ऐकून ती म्हणाली, "आणि समज माहितीतून ती तुला योग्य नसेल तर तू तिला विसरून जाणार आहेस?" आईची व्यथा त्यातून व्यक्त होत होती. खरंच असं झालं तर आपण तिच्यापासून दूर जाऊ शकू? मी विचारात गुंतलेलो पाहताच तिने लँचबाक्स पुढे ठेवीत मला म्हटले, "बरं तो विचार नंतर करू. ऑफिसला जायला उशीर होतोय तुला."

मी उठलो आणि घराबाहेर पडलो. ऑफिसात पोहोचलो. गेले काही दिवस मी तिला बाहेर भेटण्यासाठी खुणा करुन बोलवित होतो. मात्र तिचा खुणेनं नकार येत असे. मी तिला आडून विचारायचा प्रयत्न केला पण ती का नाही म्हणते कळू शकले नाही. आणि



अशा नकाराच्या खुणा करताना आपल्यामागे कुणी नाही ना असं प्रत्येक वेळी पाहत असे. एकदा नकार देताना तिने खुणावून हसत म्हटले, "एवढी कसली घाई लागलीय. जरा थांब."

पण तिचं 'थांब' म्हणणं मला क्लेशदायक होत होतं. कारण नम्रता, माझ्या वर्गमैत्रिणीची एकापाठोपाठ 'मला भेटायला' ची पत्रे येत होती. आणि जोपर्यंत समोरच्या ललनेची भेट होऊन पुढला विचार पक्का होत नाही तोपर्यंत मी नम्रताला उत्तर देणार नव्हतो. पण मला हे समजत नव्हते, की ही अशी फक्त घरातल्या घरात राहून माझ्यापासून दूर राहून माझ्यावर प्रेम का करते? माझ्याजवळ येण्याला का घाबरते? माझ्यावरला अविश्वास? मला गुंतवून स्वतःच्या मनाची करमणूक करणे, की आईवडिलांची भीती? मी काहीच समजू शकत नव्हतो. मात्र एक होतं मी तिच्या प्रेमात आकंठ बुडालो होतो. त्यातून निघण्याचा मी विचारही करू शकत नव्हतो. मग आता नम्रताला नकार देण्यासाठी पत्र लिहायला घेऊ?

मी टेबलाच्या खणातलं पॅड बाहेर काढलं, पेन उघडलं आणि लिहावयास बसलो. माझ्या खूप खूप प्रिय आशा नम्रतेस- मी पुढे लिहू लागणार तोच मनात आलं, समजा समोरच्या सुनयनेच्या पालकांनी तिचं लग्न दुसरीकडे ठरविलं आणि मला नकार दिला तर? तीही जायची आणि



माझ्या उत्तराकडे वाट पाहत बसणारी नम्रता आपल्या घरच्या मंडळींच्या मनात असलेल्या मुलाबरोबर लग्नाला तयार व्हायची. काय करावं सुचत नव्हतं. अखेर निर्णय घेतला. आईने त्यांच्याकडे प्रत्यक्ष जाऊन ओळख करावी, वाढवावी व तिला लग्नाची मागणी घालावी. आई खरंच माझी प्रेमळ माउली तयार झाली.

चार दिवसांच्या अथक प्रयत्नाने आईची तिच्या आईशी ओळख करून घेतली. हळूहळू त्या दोघींत स्नेह वाढू लागला आणि त्यातून माहिती मिळाली. वंश, कुटुंब, मूळ मराठीच पण इंदोरसारख्या हिंदी भाषिक समाजात वाढल्याने त्यांचं मराठी हे हिंदी मिश्रित होतं. चार सहा पिढ्या त्या प्रांतात काढल्याने साहजिक त्या त्या भाषेचा संस्कृतीचा परिणाम झालेला नवरा सरकारी नोकरीत, तर बाई हिंदी भाषेच्या शिक्षिका, त्यांना दोन मुली. खिडकीतून जी माझ्यावर प्रेम करतेय ती पहिल्या बायकोची तर दुसरी शाळेत जात असलेली ह्या सावत्र आईची. दोघी बहिणींमधून विस्तव जात नव्हता.

माझी आई आमच्या प्रेमाचं फळ मला मिळवून देणार होती. तिचा माझ्या पाठीवरला अशाश्वत हात तिचे प्रयत्न यशस्वी नक्की करतील ह्यावर माझा विश्वास होता. रोज नोकरीवरून घरी आल्यावर बाबांच्या गैरहजेरीत मी तिला सारखं 'पुढे काय झालं?' असा प्रश्न करीत असे. पण हळूहळू का कुणास ठाऊक आई त्याबाबतीत उत्तर देण्याचे टाळू लागली. 'हो रे बाबा, इतकी घाई का करतोस? तुझी नोकरी कायम होऊ दे' म्हणत आमचं प्रकरण दुर्लक्षित होती. असं का करतेस, विचारलं तर म्हणायची "योग आला की सर्व एकदम तुझ्या समस्या दूर होतील."

असे दिवस जात होते. खिडकीच्या गजाआडचं हास्य तेथूनच मला आनंद देत होतं. खुणांच्या व्दारे आम्ही मूक अभिनयाने अधिकाधिक जवळ येत होतो. पण तेवढंच. मी प्रत्यक्ष त्यांच्या घरी जाणं प्रशस्त नसल्याचं सांगून आई मला त्या घराच्या प्रवेशाला दूर ठेवीत होती.

तोच मला ऑफीसकडून काही दिवस दूरच्या गावी जायची 'ऑर्डर' मिळाली. दिवस अगदी जवळचा असल्याने तयारी करण्यासाठी धावपळ करावी लागली. एकदाच मी तिला खुणेनं मी पंधरा दिवस इथे नाही असं सांगताच ती नाराज झाली होती.



मी परगावी दौऱ्यावर गेलो आणि तेथील रम्य वातावरणात रमलो व कामात दंग झालो तरी रात्री तिच्या आठवणीसाठी असायची. त्यावेळी मी भावी जीवनाच्या स्वप्नात दंग होत असे. रोज रोज ती स्वप्नात यायची, खरंच इतकी सुंदर बायको मिळाली तर माझ्यासारखा मीच नशीबवान होणार होतो. काळेभोर डोळे आणि गौर वर्ण, आपण तिचं नाव सुनयना ठेवायचं असं मनाशी ठरविलं.

पंधरा वीस दिवसांनी घरी परतलो. माझ्या खोलीत गेलो न् लक्ष त्या गजाआडकडे जाई. ती दिसत नव्हती. गावाला तर नसेल गेली? की आईच्या प्रयत्नांना अपयश येऊन तिला त्या खोलीतून दुसऱ्या खोलीत हलविलं असेल? काही का असेना. आता आपण स्वस्थ बसायचं कारण नाही. थेट तिच्या घरी जाऊन .... तोच आईचा हात माझ्या खांद्यावर आला, "बेटा, कसला विचार करतो आहेस? त्या समोरच्या मुलीचा? तिला विसरून जा. सध्या ती पोलीस कस्टडीत आहे."

"काय पोलीस कस्टडीत? ? ती का? ? ?"

"तिच्यावर खुनाचा आरोप आहे. तिने आपल्या सावत्र मामाचा खून केलाय."

"खून? पण का? ?"

"त्याने तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. त्यातून सुटका करण्यासाठी सर्वशक्ती पणाला लावून तिनं त्याचा खून केला."

ते ऐकून मी गपकन कॉटवर बसलो.

"एका अर्थी झालं ते बरं झाल" म्हणत आई परत खाली गेली.

मी विचार करू लागलो. 'आई असं कां म्हणाली?' म्हणजे तिच्यावर अतिप्रसंग करणाऱ्या मामाला मारले म्हणून की तिच्या आईने, आईला नकार दिला असेल म्हणून ती असं म्हणाली?

मला चैन पडेना. त्या दिवशी रविवार असल्याने मी घरातलं सर्व आटोपून ती ज्या पोलीस स्टेशनमध्ये होती, त्या इमारतीत शिरलो. ड्युटीवर असलेला पोलीस इन्स्पेक्टर माझ्या ओळखीचा होता. त्याला भेटलो. अथपासून इतिपर्यंत सारं सांगताच त्याने मला तिला भेटण्यास फक्त दहा मिनिटे दिली. आभार मानून मी ती होती तिथे गेलो. मला पाहताच धावतच ती गजांजवळ आली. माझे हात तिने जवळ केले आणि आसवांचा अभिषेक चालू झाला. कितीतरी वेळ तिचं रडणं थांबल्यावर मी तिला एकेक प्रश्न करू लागलो आणि ती हो किंवा नाही उत्तर न देता मानेनेच उत्तर देऊ लागली. तिच्या त्या मान हलविण्याच्या प्रक्रियेचा मला राग आला. शेवटी मी तिला चिडूनच "अशा खुणांनी माझ्याशी काय बोलतेस? देवाने तोंड दिलं आहे ना?" तसं ती परत आसवं गाळू लागली, तिनं खुणेनंच मला बोलता येत नाही असं सांगितलं. बाप रे ही मुकी आहे तर?

पण का कुणास ठाऊक तिचं मुकेपण तिच्या सुंदर डोळ्यातून बोलत होतं. त्याच वेळी मी निश्चय

केला मुकी असली म्हणून काय प्रेम करू शकत नाही ? संसार करु शकत नाही ? मनाला आनंद देऊ शकत नाही ?- पण दुसरं मन म्हणत होतं, तिने गुन्हा केला आहे. मरेपर्यंत माणसाला मारले आहे म्हणजे तिला फाशी किंवा जन्मठेप ही होणारच.

मी तिला कोणी वकील केलाय का ? विचारलं पण तिनं आपल्याला भेटायला कोणीही येत नसल्याचं खुणेनं सांगितलं. तसा मी वेळ संपल्याने तिचा निरोप घेत घरी परतत होतो. मनात विचार आला, आपल्यावर होणाऱ्या अतिप्रसंगामुळे आपण त्या सावत्र मामास ठार केले असं सांगून तिला न्याय मिळेल ? शक्यता कमी होती. कारण आईवडील विरुध्द होते.


घरी पोहोचलो. बाबांनी दार उघडले. म्हणाले, “ये बाळा. तुला आनंदाची बातमी द्यायचीय. तुझी मैत्रिण सुनेत्रा देशपांडेचे आई-वडील नुकतेच येऊन गेले. त्यांनी तुझ्याशी तिचं लग्न करण्याचं नक्की केलंय.” अहो पण बिहो पण काही नाही. तुझं तिच्यावरलं प्रेम मला ह्या पॅडवरच्या लिहिण्यावरुन कळल्याने मी त्यांना होकार दिला.

दिवसभराचा दुसरा धक्का. मी कोचावर मटकन बसलो - भविष्याचा विचार करीत !

With Best Compliments from

# गोरेगाव संदीप सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.


जयप्रकाश नगर, रोड नं.५,
गोरेगाव (पूर्व ), मुंबई - ६३
नोंदणी क्र. BOM/HSG/५७०१ सन १९७९



With Best Compliments from

# दि ठाणे को. बँक

## स्टाफ कॉ. ऑफ. क्रेडीट सोसायटी लि. ठाणे.



अध्यक्ष- श्री. ए.जी. गोंधळी
उपाध्यक्ष- श्री.एन.वी.जाधव
मान्द सचिव- श्री.सी.पी. गंद्रे
खजिनदार- श्री.एस.एस.देसले
व्यवस्थापक- श्री.एस.डब्ल्यू. मोरे

---

कांचनगंगा,४था मजला, छत्रपती शिवाजीपथ
ठाणे (प)-४०० ६०१

# विश्व हॉस्टेलचे

- कल्पना येळगावकर

रात्रीची वेळ. एकजण खूप आजारी आणि भोवताली जमलेल्या प्रत्येकीच्या डोळ्यात आत्मीयता, भिती, काळजी, प्रेम आणि बरंच काही दवाखान्यात न्यायची वेळ येते. गाडी दारात येऊन उभी रहाते. दोघीजणी तिच्याबरोबर जायला तयार होतात. उरलेल्या सगळ्याजणी पटकन लागणाऱ्या वस्तूंची जमवाजमाव करू लागतात. थैला भरला जातो. कुणाचीतरी पर्स काढून त्यात हाताला येतील तेवढे पैसे भरले जातात. कुणाचातरी स्वेटर, कुणाचातरी स्कार्फ, पाण्याची बाटली, कुणाचं नेमकं काय दिलं जातंय याची कुणालाच तमा नाही. गाडी हलताना प्रत्येकीच्या डोळयात आपुलकीचं सांगणं "काळजी घ्या, नीट या." निरोप देताना हालणारे हात फक्त, त्या काळोखात दूरवर दिसत राहतात आणि गाडी पुढे रस्ता कापत असते...

**"रूमपार्टनरपासून ते रेक्टरपर्यंत आणि पाण्यापासून ते मेसच्या जेवणापर्यंत प्रत्येक ठिकाणी जुळवून घ्यायला लागतं. ही तडजोडीची भावना आयुष्यभर साथ करते. होस्टेलमध्ये समस्या (Problems) सगळ्यांनाच निर्माण होत असतात"**

कुठल्याही नाटकात, सिनेमात किंवा कांदबरील शोभेल असा हा प्रसंग ! पण हे आहे एका लेडीज होस्टेलचं आणि थोड्याफार फरकानं सर्वच मुलामुलींच्या होस्टेलचं चित्र !

'होस्टेल' म्हटलं की आपल्याकडे कपाळावर चार आठ्या पडतात. घरातून बाहेर पडायच्या अगोदरच homesick झाल्यासारखं वाटतं. सगळ्यांना जवळपास नकोसं वाटणारं हे ठिकाण ! पण खरंतर घराचं महत्त्व जाणवून देणारी, नात्यांचं आयुष्यातलं स्थान पटवून देणारी, तडजोडीची भावना रुजवणारी आणि सर्वात महत्त्वाचं "माणूस हा सामाजिक प्राणी आहे म्हणून तो समूहात राहतो" याची प्रचिती देणारी ही एक उदात्त संस्था आहे असं म्हटलं तर फारसं वावगं ठरणार नाही.

आपल्याकडे अजूनही मुलांनी घराबाहेर पडणं ही संकल्पना मनापासून आवडत नाही. नाइलाजास्तव ती बाहेर पडताना हे वेगळं पण आयुष्याचं मर्म कळण्यासाठी घराचे उंबरठे ओलांडून जगाच्या पसाऱ्यात पाऊल ठेवलंच पाहिजे, हा विचार फारसा पटत नाही. होस्टेलमध्ये राहायचं म्हणजे घरापासून किती लांब! असाच सगळ्यांचा रोख असतो. पण घर आणि होस्टेल यातलं हे अंतरच नात्यांमधलं अंतर कमी करत जाते आणि आपल्या माणसांना भेटण्याची ओढलावून जातं. होस्टेलमध्ये राहणारे आपण काही एकटे नसतो. एकाच वेळी शेकडोजण आपल्यासारखीच आपल्याच वयाची मंडळी घर सोडून आलेली असताना 'घरापासून लांब' हाच धागा सगळ्यांना दुवा बनून राहतो. प्रत्येकाचा स्वभाव वेगळा, कौटुंबिक वातावरण वेगळं, संस्कार वेगळे, ध्येय वेगळं आणि तरीही सगळेजणं एकाच छपराखाली राहतात या कल्पनेनंच किती मन भारावून जातं.

आपल्या माणसांपासून लांब राहिल्यावरच

आपलं आपण सावरायचं कळतं, नाहीतर आयुष्यभर आपण पसरायचं आणि दुसऱ्यांनी आवरायचं हीच वृत्ती अंगात भिनून जाते. आपल्या आयुष्याचे आपणच शिल्पकार असतो आणि त्यासाठी निर्णय आपणच घ्यायचे असतात हे उमजतं होस्टेलमध्ये आल्यावर. अर्थात त्यासाठी पालकांनीही मुलांना तेवढ्या समंजसपणे आणि स्वेच्छेने होस्टेलमध्ये पा



ठवण्यासाठी तयार व्हायला पाहिजे. त्यांनी मनात एकच भावना ठेवावी.

"निळ्याभोर आकाशाची स्वप्नं पाहण्यासाठी
प्रत्येकाच्या मनात स्वतंत्र रात्र जगू द्यावी,
स्वप्नाप्रत पोचवण्यासाठी त्या
प्रत्येकाला स्वतंत्र वाट चालू द्यावी!"

रूमपार्टनरपासून ते रेक्टरपर्यंत आणि पाण्यापासून ते मेसच्या जेवणापर्यंत प्रत्येक ठिकाणी जुळवून घ्यायला लागतं. ही तडजोडीची भावना आयुष्यभर साथ करते. होस्टेलमध्ये समस्या (Problems) सगळ्यांनाच निर्माण होत असतात पण प्रत्येकजण त्यांना वेगवेगळ्या पध्दतीनं प्रतिसाद देतो. हे सगळं आपण स्विकारु तसं आपल्या मनाला भावत जातं. आनंदानं स्विकारलं सारं तर मग घराच्या उंबरठ्याबाहेर पडताना ओल्या होणाऱ्या पापण्या होस्टेलचा उंबरठा ओलांडताना आसवात भिजून जातात.

होस्टेलमध्ये प्रत्येकाला दुसऱ्याचं सुख-दुःख आपलंच वाटतं, कुणाचंतरी यश साजरे करताना आनंदात बुडून गेलेलं होस्टेल कुणाच्यातरी दुःखात तेवढंच गलबलून जातं. ही नाती फक्त मैत्री, प्रेम, ओळख अशी नसतात. त्यांच्यात निर्माण होतो - Survival of the fittest, या सिध्दंतानुसार होस्टेलमध्ये एक वर्षतरी काढलेली व्यक्ती कुठल्याही परिस्थितीतील संकटामध्ये तरून जाण्याचं सामर्त्य असणारी असते.

शेवटी एक विचार प्रत्येकानंच करायला हवा की आपल्याला हवं ते शिक्षण मिळवण्यासाठी, हवी ती नोकरी मिळवण्यासाठी घर सोडावं लागणार आहेच तर कपाळावर आठ्या पाडून काय उपयोग? शेवटी आयुष्याचं अंतिम सत्य समाधान, यश आणि कर्तव्यपूर्ती एवढचं असतं. त्यासाठी होस्टेलला जाताना मुलांनी मनात एकच म्हणावं.......

"धुंडाळतो मी नवीन वाटा
ध्येयाप्रत पोचण्यासाठी,
हे नवीन जग होईल माझे
आहे फक्त माझ्यासाठी !"

# वास्तूमध्ये देवपूजा कशी करावी ?

- स्वप्निल वाडेकर

चार्तुर्मास आरोग्य हितकर या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी मी एक सत्रात उपस्थित होतो. चातुर्मास म्हणजे काय? हा का पाळावा? या चार महिन्यांत केले, कोणते पदार्थ टाळावे व ते का टाळावे चातुर्मास म्हणजे काय? हा का पाळावा? या चार महिन्यांत केले, कोणते पदार्थ टाळावे चातुर्मास पाळल्यामुळे आरोग्यास कोणते फायदे मिळतात. असे अनेक प्रश्न मला या दरम्यान विचारण्यात आले. त्या सगळ्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिल्यानंतर माझ्या लक्षात आले. समोर बसलेला श्रोता वर्ग हा ४० वयोगटाच्या आतील होता. सण, वार कसे असतात, त्यांचा खरंच काही उपयोग असतो का, असे कुतूहल त्यांच्या मनात होते. आपले सण, वार, व्रत-वैकल्य आपल्या मानसिक आरोग्यास, मनःशांतीसाठी हितकर असतातच पण त्याहीपेक्षा जास्त, आरोग्यास, प्रकृतिस्वास्थ्यास उपयोगी असतात हे जाणून घेतल्यावर त्यांचा या धार्मिक बाबींकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलल्यासारखा वाटला.

**“समई, निरंजन, पणती हे तीनही वेगवेगळे प्रकार आहेत. शास्त्रामध्ये कशात काय घालायचे हे सांगितले आहेच पण आजकाल देवदास दिव्याची खूप फॅशन आहे. देवदास दिव्यामध्ये फक्त तेल घालावे.”**

चर्चासत्राच्या शेवटी खूप जणांनी मला दैनंदिन पुजेविषयी प्रश्न केले. खूपजणांनी इच्छा असूनही ते दैनंदिन पूजा करू शकत नव्हते. दोन कारण यासाठी अडचणीची ठरायची : १) नोकरी अस्थिर कार्यालयीन कामकाज व व्यवसाय यांच्यात जाणारा खुपसा वेळ. २) देवा बद्दलची भीती.

पहिली अडचण स्वाभाविक होती. दिवसागणिक बदलत राहणाऱ्या कामाच्या वेळा, व्यवसाय, नोकरी यातले ताणतणाव घरी यायला कामावर जायला लागणारा वेळ यामुळे २० तासांपैकी खूप कमी तास प्रत्येक जोडप्यांच्या हातात येतात त्यातूनही पूजा करण्यासाठी वेळ मिळू शकतो. पण येथे आड येते देवाबाबतची भीती. आता देवाबाबतचे अज्ञानच भीतीचे मूळ कारण बनत प्रत्येक देवीची फूल, पान, वेगवेगळी त्यांचे नैवेद्य वेगळे, त्यांचे मंत्र, जप वेगळे त्यांच्या उपासनांचे दिवस वेगळे तर काही देवतांचे उपवासही वेगळे-वेगळे असतात. त्यामुळे त्या अज्ञानापोटी घरात देवाचे फोटो, मूर्ती आणल्या जात नाहीत आणि देवघरात घंटा, शंख, सिंगटे, सहाण, निरांजन, समई इत्यादी सामान असल्याशिवाय देवांची स्थापना करता येत नाही आणि करायची झालीच तर त्यांची उंची त्यांचे प्रमाण, त्यांचा आकार याबाबत सर्वत्र इतके बोलले जाते की, संपूर्णतः गोंधळल्यासारखे होते.

या दोन गोष्टींपैकी पहिली तर ज्याच्या त्याच्या हातात आहे. मनापासून जर दैनंदिन देवपूजा करायची असेल तर मार्ग हा कसाही मिळत जातो. देवपूजा करण्याइतपत वेळ निश्चित मिळू शकतो आणि राहिली देवीदेवतांची माहिती व पूजेविषयीची माहिती, तर ती आपण आता पाहू.

**देवपूजेचे साधारण ३ प्रमुख प्रकार आहेत.**

१) नित्यपूजा २) नैमित्तिक पूजा ३) मानस पूजा

१) दररोज मंत्रोप्चाराने षोडशोपचाराने करावयाच्या पूजेस नित्यपूजा म्हणतात. धर्मशास्त्राप्रमाणे प्रत्येक घरात देवघर असणे अनिवार्य आहे. सुसंस्कृत, सभ्य घराचे ते एक लक्षण मानले जाते. नित्यपूजा ही त्या घरातील मोठ्या व्यक्तीने अथवा कुटुंबप्रमुखाने करावी, असा नियम आहे. स्त्रियांनी पूजेची तयारी करून द्यावी पण हा समज पूर्वीच्या काळीच अस्तित्वात होता. स्त्री-पुरुष दोघांपैकी कुणीही पूजा केली तर चालते. पंचोपचार वा षोडशोपचार नित्य पूजेत जमतातच अस काही नाही. नुसती आंघोळ घालून पुसून हळद-कुंकू वाहून असल्यास फुले वाहून केलेली पूजा ही नित्यपूजेत ग्राह्य धरली जाते.



२) कुळधर्म, कुळाचार, सण-वार, व्रतवैकल्य, चार्तुमास या विशिष्ट प्रसंगी जी पूजा केली जाते तिला नैमित्तिक पूजा म्हटले जाते . नवरात्र, गणपती-गौरी, संक्रांत, चैत्रगौर इत्यादी पूजा याच प्रकारात मोडतात बऱ्याच वेळा नैमित्तीक पूजा ही षोडशोपचोर करण्यात येते.

३) मानसपूजा : पंचोपचार, षोडशोपचार यांनी न करता वा कोणत्याही पूजेतील वस्तूंचा सहभाग न घेता करता येणाऱ्या पूजेला मानसपूजा म्हणतात. या पूजेतील प्रमुख अडचण म्हणजे एकाग्रता. मानस पूजेमध्ये आपल्याला पूजा करायची आहे त्या देवतेची मूर्ती डोळ्यांसमोर आणावी लागते. त्यानंतर केवळ कल्पनेने त्या देवतेची पंचोपचारे वा षोडशोपचारे पूजा करावी. ही काल्पनिक वाटली तरी मनापासून केलेली असल्यास श्रेयस्कर ठरते.

**पूजेतील/देवघरातील वस्तू**

१) घंटा : चांदीची अथवा तांब्याची घंटा चांगली, वजनाने हलकी, एकसंध व पकडू इतपत मोठी असावी.

२) समई, निरांजन, पणती- तेलामध्ये दोरा, कापसाची लांबसर वात करून ती एक तोंड असलेल्या भांड्यात लावल्यास तिला पणती म्हणतात. दिवाळीमध्ये लावल्या जाणाऱ्या पणत्या शक्यतो देवघरात लावताना दिसत नाहीत. देवघराच्या बाहेर व तेही दक्षिण या दिशेस पणत्या यमासाठी लावल्या जातात.

३) साजूक तूपामध्ये वाती गोठवून त्या पात्रात लावल्या जातात. त्यांना निरंजन म्हणतात. निरंजनामध्ये केवळ साजूक तूप घालणे ग्राह्य ठरते. निरंजनात तेल घालू नये. अथवा तेल आणि तूप एकत्र करू नये.

४) समारंभाच्या वेळी, उद्घाटनाच्या वेळी ५,६,११ इतक्या वाती घेऊन केवळ तेलात लावण्यात येणाऱ्या दिव्यांना समई म्हणतात.

समई, निरंजन, पणती हे तीनही वेगवेगळे प्रकार आहेत. शास्त्रामध्ये कशात काय घालायचे हे

सांगितले आहेच पण आजकाल देवदास दिव्याची खूप फॅशन आहे. देवदास दिव्यामध्ये फक्त तेल घालावे.

**शंख-** उजवा शंख, डावा शंख व बोलणारा शंख असे शंखाचे ३ प्रकार आहेत. मध्यम आकाराचा शंख देवघरात चालतो. फक्त शो पीस म्हणून आणलेला फॅशनेबल शंख देवघरात वापरू नये व देवघरातील शंख नंतर इतर कामासाठी ठेवून त्यात सतत पाणी घालून ठेवावे. शंखातील हे पाणी पवित्र मानले जाते.

**षोडशोपचार पूजा :** आवाहन, आसन, पाद्य, अर्ध्य, आचमनीय, स्नान, वस्त्र, यज्ञोपवीत, पुष्प, गंध, धूप, दीप, नैवेद्य, प्रदक्षिणा, मंत्रपुष्पांजली ह्याव्दारे षोडशोपचाराने पूजा केली जाते.

**मंत्रोपचार पूजा :** गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य याव्दारे केली जाते.

**पंचामृत :** गायीचे दूध, तूप, मध, साखर, दही एकत्र केल्यास पंचामृत तयार होते.

**पंचनद्या :** सरस्वती, नर्मदा, गंगा, यमुना, गोदावरी या पाच प्रमुख नद्या व त्यांचे पाणी.

विविध देवतांना आवडणारी पाने, फुले, नैवेद्य, सूक्त, वस्त्र, मंत्र, फुले.

**१) श्रीशंकर महादेव :** रुई, पांढरी कण्हेर, धोत्रा, आंब्याचा मोहोर, निळे कमळ, पाने, बेल, शमीची पाने.

वस्त्र :श्वेत (पांढरे).

नैवेद्य : दही भात

सूक्त : रुद्र, महिम्न मंत्र : ॐ नमः शिवाय, श्री शंकराय नमः

**२) श्रीविष्णू :** पारिजातक, केवडा, मोगरा, चाफा, गुलाब, बकुळ.

पाने : तुळस, तुळसमंजिरी, कुंद

वस्त्र : पिवळे

नैवेद्य : दूध भात

सूक्त : विष्णूसूक्त मंत्र ॐविष्णवे नमः

**३) श्री गणेश :** तांबडे कमळ, लाल जास्वंद, मंदारपुष्पे, शमी.

पाने : दूर्वा, शमी

वस्त्र : तांबडे, नैवेद्य : मोदक

सूक्त : अर्थवशीर्ष, गणेश वंदन मंत्र - श्रीगणेशाय नमः

**४) श्रीदेवी :** मोगरा, कमळ, जाई, केवडा, तगर, कण्हेर, कमळ.

पाने : पंचपल्लव,

वस्त्र : लाल, नैवेद्य : सांजा / उपमा

सूक्त : श्रीसूक्त, लक्ष्मी सूक्त मंत्र

**सर्व मंगल्य मांगल्ये, शिवे सर्वार्थ साधिके**
**शरण्येः त्र्यंबके गौरी नारायणी नमास्तुते**

**राशीप्रमाणे इष्ट देवता :**

१) श्रीगणपती, दत्त २) वृषभ - बालाजी, लक्ष्मी, देवी ३) मिथुन - विष्णू, विठ्ठल. ४) कर्क - श्रीशंकर ५)सिंह - श्री राम ६) कन्या - विष्णू, नवनाथ ७) तूळ - श्रीदेवी ८) वृश्चिक- श्रीगणपती, देवी ९) धनु- श्रीस्वामी, दत्त १०) मकर- श्रीशंकर, देवी ११) कुंभ- श्री देवी १२) मीन - श्री दत्त

याशिवाय आपल्या आराध्यदेवतेचे व कुलदेवतेचे स्मरण करणे आवश्यक असते.

**पूजेची काही सूत्रे :**

१) देवीची मूर्ती तळहाताएवढी म्हणजे एक वितीपेक्षा मोठी नसावी.
२) देवाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करणे आवश्यक असते.
३) शोभेच्या देवमूर्ती देवघरात पूजेस घेऊ नयेत.
४) पूजेत असलेल्या मूर्ती बाहेर सजविण्यासाठी वापरू नयेत.
५) देवांचे फोटो चालतात पण त्यांची प्राणप्रतिष्ठा

करता येत नाही.

६) कोणत्याही देवतेचा चेहरा दक्षिणेस करू नये.

७) तसेच दोन देव समोरासमोर ठेवू नयेत.

८) घरातील देवघर बंदिस्त असू नये, त्याला कळसही करू नये.

९) देवघर हवेशीर व मोठे असावे.

१०) तीर्थस्थानावरून आणलेल्या मूर्त्या पूजेत ठेवण्यास हरकत नाही. पण त्या जास्त वाढवू नयेत.

११) एकाच घरात दोन वेगळी देवघरे करू नयेत.

१२) एकाच घरात शंकराची २ पिंडी, दोन नंदी, २ शंख, गणपती, तीन देव्या पूजू नये.

१३) लग्नात सून अन्नपूर्णा व बाळकृष्ण घेऊन येते. देवघरात त्यांची पूजा केल्यास चालते.

१४) २ शाळीग्राम पुजू नयेत.

१५) देवपूजेपूर्वी कपाळास तिलक लावावा. भस्म लावल्याशिवाय व रुद्राक्ष धारण केल्याशिवाय पूजा करू नये.

१६) स्त्रियांनी शाळीग्रामची, बाणलिंगाची पूजा करू नये. यावर अक्षता वाहू नये.

१७) देवाचे आसन आपल्या आसनापेक्षा वरती असावे.

१८) बसून पूजा करत असल्यास, आपले आसन दुसऱ्यास देऊ नये.

१९) जप, मंत्र, स्त्रोत्र, एकाच ठरलेल्या वेळी, ठरलेल्या आसनावर करावे.

२०) देवाच्या उजव्या बाजूस तूपाचा व डाव्या बाजूस तेलाचा दिवा लावावा.

२१) शंख - घंटेशिवाय पूजा करू नये.

२२) निरांजनात तेल, तूप एकत्र करू नये.

२३) समईतील वाती विषम (१,३,५,६) असाव्यात सम (२,४,६,८) असू नयेत.

२४) उजव्या बाजूस घंटा व डाव्या बाजूस शंख ठेवावा.

२५) शंख आडणीवर ठेवावा. त्यात पाणी असू द्यावे.

२६) एकाच काडीने ३ दिवे लावू नयेत.

२७) फुंक मारून दिवा विझवू नये.

२८) दिव्याची वात हाताने सारू नये.

२९) दिव्याची वात कधीही दक्षिणेकडे करू नये.

३०) दिवा लावल्यावर त्याच्या १-२ मिनिटे एकाग्र होऊन पाहावे.

३१) देवाला धूप दाखवताना तो हाताने सारू नये. पंख्याने सारावा.

३२) देवपूजेत शिळी पाने,फुले वर्ज्य आहेत. फ्रिजमध्ये ठेवलेली चालतात.

३३) द्वादशीस तुळस तोडू नये. रविवारी दूर्वा तोडू नये.

३४) इतरांकडून मागून आणलेली फुले, पाने, फळे देवास अर्पण करू नये.

३५) स्त्रियांनी तुळस तोडू नये.

३६) देवीस केवडा, जाई, तांबडी फुले प्रिय आहेत. पण देवीला गुलाब व शमी पत्रे वाहू नये.

३७) गणपतीला दूर्वा, जास्वंद, गुलाब प्रिय आहेत. पण तुळस वाहू नये.

३८) एका देवाला वाहिलेली फुले, पाने दुसऱ्या देवाला वाहू नयेत.

३९) कोणत्याही कळ्या वाहू नयेत.

४०) शंकरास पांढरे तांदूळ व इतर देवांना कुंकू मिश्रित वाहाव्यात.

४१) अनामिकेने गंध लावावे, इतर बोटे निषिध्द आहेत.

४२) कांदा-लसूण उग्र असल्याने नैवेद्यामध्ये निषिद्ध आहेत.

४३) शंकरास दहीभात, गणपतीला मोदक, देवीस श्रीखंड व सांजा प्रिय आहे.


४४) उष्टे खरकटे अन्न देवास प्रसाद म्हणून ठेवू नये.

४५) नैवेद्य दाखवल्यावर थोडा वेळ तसाच ठेवावा.

४६) जप मनात करावा. स्तोत्र मोठ्याने म्हणावी.
४७) प्रत्येकाने आपापली जपमाळ स्वतंत्र ठेवावी, इतरांस देऊ नये.
४८) अर्थ कळल्याशिवाय कशाचेही वाचन करू नये.
४९) देवीची पूजा दुपारपर्यंत करावी. संध्याकाळी करू नये.
५०) शक्यतो एकच वेळ ठेवावी.
५१) संकल्प सोडल्याशिवाय कोणतेही कार्य करु नये.
५२) पूजेत नियमितता पाळावी.

देवपूजा करण्यामुळे परमेश्वराच्या जवळ जाता येते. मंद उदबत्तीचा सुंगध वातावरण प्रसन्न करतोच पण सुंगध, सोनेरी, प्रकाशाची निरंजन वातावरण प्रसन्न करतेच पण श्लोक, घंटानाद, स्तोत्र पठणाने वातावरण पवित्र होते.

धावपळीच्या दिवसात मनःशांतीसाठी आपण विविध पर्याय शोधतो. संकटाच्या वेळी देवाला साकडे घालण्यापेक्षा दररोज त्याच्याजवळ राहिल्यास एक शांतता मिळते. विभक्त कुटुंब पध्दतीमुळे घरातील मोठ्यांचा वावर कमी झाला आहे. नित्य देवपूजा घरात मोकळेपणा व भरलेपणा आणते. बहुंताश वेळा शारीरिक आरोग्य हे मानसिक आरोग्यावर अवलंबून असते. पूजा केल्यामुळे सैरभैर मनाला शांतता मिळते. मन एकाग्र होते. शरीराला चैतन्य मिळते व आयुष्याला आलेल्या मरगळीपासून सुटका होते. आणि अशा चैतन्यमय पवित्र घरात आजारपण फिरकण्याची शक्यताच नसते. फक्त मनापासून पूजा करु तर पाहा.


With Best Compliments from


M.I. Construction
(santacruz west)
Govt.Registered Contractors
Specialist in R.C.C. Building works
Prop. - Jayed Badgujar

With Best Compliments from

# WOOD MALL

Furniture ideas from the world

Opp. Raheja Garden, Near Tip Top Plazz,
L. B. S. Marg, Thane (w.)
Tel. : 022- 25838800/11/22
Fax :25838833
Website : www.woodmall.in
Email : Info@woodmall.in



With Best Compliments from

# Wood Plaza



Jangid Heights, Near Cine Wonder,
G. B. Road, Thane (W).
Tel.: 022 - 25840061 / 62
Fax : 25840063
Email : info@woodplaza.in
Wedsite : www.woodplaza.in

# घराचे बांधकाम करताना...

- स्वप्निल वाडेकर

**असावा सुंदर चॉकलेटचा बंगला,**
**सोनेरी चंदेरी चमचमता चांगला.**

लहान मुलांचं एक आवडतं गाणं. मुलांचं विश्व किती इवलंसं असतं. अगदी ओंजळीएवढपण त्या विश्वातही ती किती रमलेली असतात. त्यांच्या स्वप्नातही ते असाच सुंदरसा. त्यांना हवाहवासा वाटणारा बंगला उभारत असतात. हेच स्वप्न मनात जपत मुलं लहानाची मोठी होतात. आपापल्यापरीने मेहनत करतात आणि एक दिवस त्यांचे घराचे स्वप्न पूर्णत्वाला नेतात. हा बंगला किंवा घर चॉकलेटचा नसतो तर हा बंगला असतो विटा, सिमेंटचा आणि त्यापेक्षाही आपुलकीचा.

**“वैशाख, श्रावण, फाल्गुन हे तीन महिने घराचे बांदकाम करण्यास अत्यंत शुभ मानले जातात. श्रावण महिन्यात घराचे बांधकाम सुरू केल्यास पशुसंपत्ती व दुग्ध संपत्तीत वाढहोते. फाल्गुन महिन्यात घराचं बांधकाम सुरू केल्यास त्या घराला विपुल संतती लाभते. अशा घरातील संतती दीर्घायु होते.”**

मग अशा या हक्काच्या, स्वतःच्या घराची सुरुवात होते तेव्हा खूप एक्साइटमेंट असते. रो हाऊस, फ्लॅट, बंगला किंवा अगदी डुप्लेक्स घर जेव्हा आपल्या डोळ्यांसमोर बांधायला तयार होतं तेव्हा तर त्या उत्सुकतेचं रूपांतर टेन्शनमध्ये होतं. घर व्यवस्थित पुर्ण होईल ना? वेळेवर व जागच्या जागी काम होतील ना? ही टेन्शन्स तर वर्षभरासाठी आपल्या सोबतीलाच येतात. हल्लीच्या पिढीला नोकरी व्यवसायावर खूप जास्त लक्ष केंद्रीत करावं लागतं. पतिपत्नी दोघांचा वेळ जास्त करून कामावरच जातो. अशा वेळेस हा जास्तीचा तणाव न पेलणारा असतो. मग लहानपणापासूनचे गोड स्वप्न हळूहळू कटू वाटू लागते.

अशा वेळेस वास्तुशास्त्राची थोडीशी मदत घेतल्यास यातील ८० ते ९० टक्के समस्या सहजरीत्या दूर होतात आणि हा भार अलगदपणे कमी झाल्याने नवीन घराबाबत तुम्ही जास्त जोशात विचार करु शकता.

काही महत्त्वाच्या वास्तू टिप्स आपण पाहू. त्या अंमलात आणल्यास जमेल तेवढाच व पटेल तेवढाच प्रयत्न करा.

**घराचे बांधकाम सुरू करण्यास शुभ महिने :**

वैशाख, श्रावण, फाल्गुन हे तीन महिने घराचे बांदकाम करण्यास अत्यंत शुभ मानले जातात. श्रावण महिन्यात घराचे बांधकाम सुरू केल्यास पशुसंपत्ती व दुग्ध संपत्तीत वाढहोते. फाल्गुन महिन्यात घराचं बांधकाम सुरू केल्यास त्या घराला विपुल संतती लाभते. अशा घरातील संतती दीर्घायु होते.

या तीन महिन्यांव्यतिरिक्त इतर ९ महिन्यांत घराच्या बांधकामास शक्यतो सुरुवात करू नये. या महिन्यात (चैत्र, ज्येष्ठ, आषाढ, भाद्रपद, आश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष व पौष महिन्यांत) घराच्या बांधकामाचा शुभारंभ केल्यास त्या घरात वित्तहानी होते. आजारपण वाढते व नातेसंबंधात दुरावा निर्माण

होतो.

माघ महिन्यात माघी गणपतीच्या आशीर्वादानेही नव्या बांधकामाला सुरुवात करता येते. बांधकाम सुरू करण्यासाठी उत्तम काळ सूर्य उत्तरायण असून शुक्ल पक्ष त्या काळात आल्यास बांधकाम तातडीने सुरु करावे.

**वास्तूमधील खोल्या व त्यांची दिशा :**

देवघर ईशान्य, स्वयंपाकघर आग्नेय, तिजोरी नैर्ऋत्य, बेडरूम नैर्ऋत्य, तुळस उत्तरपूर्व, स्टडी रूम पूर्व, बाथरूम पूर्व, डायनिंगरूम पश्चिम, साठवण वायव्य, शौचालय दक्षिण, महत्त्वाचे पेपर्स ईशान्य, चपला स्टँड आग्नेय (इतर शुभ दिशा) जीम पूर्व, स्विमींग पूल उत्तर, पार्किंग वायव्य.

ग्रहांप्रमाणे खोल्यांच्या दिशा :

पूर्व - वंशवृद्धी, संतती सुख व दीर्घायु
पश्चिम - यश, प्रसिद्धी व नावलौकिक
उत्तर – धान्य संपत्ती
दक्षिण – अल्पायुषी, शीघ्रकोपी
आग्नेय - क्रोध, मत्सर व उष्णता विकार
वायव्य – गैरसमज, शत्रुवृद्धी
नैर्ऋत्य – असुरी व मृत्तात्मे
ईशान्य – पवित्र व मानसिक आरोग्य



**बांधकाम क्षेत्रात करावयाच्या गोष्टी ...**

बांधकामाच्या दोन्ही बाजूना केळीची झाडं लावावी. जागा नसल्यास कोणत्याही कोपऱ्यात लावावी. त्याच बरोबर बांधकामाच्या चारही बाजूस चार तुळशी लावाव्यात. ८ दिवस त्यांची प्रगती पहावी व मगच बांधकाम सुरु करावे.

जागा जास्त खोलवर खोदावी. मानवी, पशु अवयव सापडल्यास ती जागा निषिद्ध मानावी. जागेमध्ये पाणी भरावे ते वाहते झाल्यास जागा निषिध्द समजावी.

रात्री जागेमध्ये साधे २ मोती ठेवावे. सकाळी ते सापडल्यास वास्तु शुद्ध समजावी.

बांधकाम जर एकमजली असेल तर वास्तूचा पाया पकडून त्याचे शास्त्र पहावे.

तिसऱ्या मजल्यावर जर इमारत असेल तर प्रत्येक मजल्याचे स्वतंत्र शास्त्र मांडावे.

वास्तूची सुरुवात नातवाला आजोबांच्या मांडीवर देऊन त्यांच्याकडून पूजा करुन मग करावी.

वैशाख, श्रावण, मार्गशीर्ष हे तीन महिने वास्तुशांती व गृहप्रवेशासाठी उत्तम आहेत. या महिन्यात मघा, पुष्य, आश्विन, रेवती, स्वाती, उत्तरा व रोहिणी या उत्तम मुहूर्तावर वास्तुशांत करावी.

वास्तुशांत पूर्व दिशेला सकाळच्या प्रहरात करावी.

वास्तुशांत झाल्यानंतर स्त्रियांनी घागर भरुन ती घेऊन पतीसह घराला एक प्रदक्षिणा मारावी.

वास्तुशांत करण्याआधी नंतर वेळेनुसार पुण्याहवाचन व गणेशहवन करुन घ्यावे. निदान नवग्रह शांती तरी करावी.

वास्तुशांतीला वाद होतील असं काही करू नये. वादाचे विषय त्या दिवशी तरी करू नयेत.

गृहप्रवेश केल्यानंतर कुलदेवतेला नैवेद्य दाखवावा.

गृहप्रवेश वास्तुशांत झाल्यावर वास्तुपुरुषास नैवेद्य दाखवावा.

राहत्या घरात वास्तुशांत करायची असल्यास ते घर एक दिवस बंद ठेवावे.

मूळ नक्षत्र असणाऱ्या व्यक्तिंनी घरात उदकशांत / मार्कंडेयपूजन करू घ्यावे.

घरात सर्वप्रथम देवांची स्थापना करावी. नंतर घरात विळी, पाटा-वरवंटा, गहू व माठ आणावा.


वास्तुशांत प्रवेश - हवन - वाचन या धार्मिक कार्यात वस्त्रालंकाराची विशेष, दखल असते. स्त्रियांच्या नाकात नथ व पुरुषांच्या डोक्यावर टोपी-फेटा असणे अत्यंत शुभ असते.

घराच्या बाहेर चारीही दिशांना कुंकवाचे स्वस्तिक काढावे.

फेंगशुई आणि वास्तुशास्त्र यांना एकत्र केले जाते तसे अजिबात करू नये. ही दोन्ही शास्त्र खूप भिन्न आहेत. ती एकाच घरात नाही बसू शकत.

घर बांधणं प्रत्येकाची हौस असते. सध्या ही हौस काही लाखांची झाली आहे. या लाखांच्या हौसेसाठी या लहानशा सूचना. त्या फक्त एकदाच अवलंबून बघा आणि आपल्या आयुष्याला सुखी बनवा...

With Best Compliments from



Venkatesh Construction

(Andheri East)
govt.Registered Contractors,

Prop. - Venkatesh Bammankatti

With Best Compliments from

**AE INFRAPROJECTS PVT. LTD.**


**Govt. Civil Contractors**

**Water Supply Management & Projects**

(Construction, Management & Commissioning)

**Civil & Infrastructure Projects**

**Building Construction**



**Rajesh Barot**

Email : ambika.ent@gmail.com

rajeshbarot1964@gmail.com

A-6, Om Satyapushpa CHS Ltd., Opp. Saraswati English School,
Panchpakhadi, Thane (West) - 400602.

# वास्तू आरोग्याची गुरुकिल्ली

- सुनंदा शिंदे

आपल्या भारतीय संस्कृतीत प्राचीन काळापासून वास्तुविचार प्रचलित आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत मानवी गरजा आहेत. मनुष्यप्राणी जसजसा विकसित होत गेला तस तसा त्याने निवारा शोधला. अर्थातच तो 'सुरक्षित' असाच विचार करुन.

चौसष्ट कलांमध्ये 'वास्तुकला' ही महत्त्वाची आहे. विश्वकर्म्यापासून त्याची सुरुवात होते. त्या काळी अनेक वास्तुविशारद तज्ज्ञ होते. देवादिकांनी जसा वास्तूचा विचार केला तसाच मनुष्यप्राण्यानेही वास्तूचा विचार केला. सुरुवातीला अनुभवाप्रमाणे त्याने वास्तुरचना केली. त्यानंतर मात्र ज्ञानाचा जसा विस्फोट होत गेला तसतसा त्यात बदलही होत गेला. पर्णकुटीपासून महालापर्यंतचा प्रवास तसा अद्भुत आहे.

आजचा नवा वास्तुविचार त्याच्याशी मिळताजुळता आहे. पूर्वी प्रत्येक गोष्टीचे महत्त्व धार्मिक अधिष्ठानावर आधारित होते. आज त्याच विचाराला विज्ञानाची जोड मिळाली आहे. यात हवा, उजेड, पाणी, आजूबाजूचा परिसर यांचा प्रामुख्याने विचार केलेला आहे. वास्तूमध्ये सूर्योदयाची किरणे घरात पडावीत म्हणून पूर्वामुखी घर असावे. हवा खेळती राहावी म्हणून घराच्या चोहोबाजूस बाग-बगिचा, परस, अंगण याचा विचार केला, त्यामुळे आरोग्य निरोगी राहणार हाच अर्थ त्यात अभिप्रेत आहे. स्वयंपाकघर कसे असावे. कोणत्या विचाराने

**"घराचे रक्षण करणाऱ्या उंबऱ्याला पाय लावू नये. घरात स्वच्छता ठेवून लक्ष्मीचे प्रतीक असलेल्या केरसुणीला पाय लागू नये असे ठेवावे."**

प्रेरित होऊन स्वयंपाक करावा अर्थात कुटुंबाबद्दलचे प्रेम हीच भावना त्यात असते. त्यामुळे कुटुंबातील सदस्यांचे एकमेकांविषयीचे प्रेम वृध्दिंगत होते. एकमेकांच्या आवडी-निवडी जपण्याचा प्रयत्न होतो. त्यातूनच पाककला विकसित झाली. सकस व चौरस आहारामुळे मनुष्य निरोगी राहतो.

घरातील सर्वांनी एकत्र बसावे. गप्पागोष्टी कराव्यात. विचारांची देवाण-घेवाण व्हावी म्हणून माजघर, सदर, हॉल यांची रचना झाली. दिवसभर कष्ट, मेहनत किंवा कुवतीनुसार, योग्तेनुसार काम करून पुरेशी विश्रांती व्हावी म्हणून शयनगृह कसे असावे याचा विचार झाला. दक्षिण-उत्तर, पूर्व-पश्चिम अशी झोपण्याची स्थिती असावी. प्रातःकाळी उठल्या-उठल्या तुळशीचे, सूर्याचे दर्शन व्हावे अशी कल्पकता करून ऑक्सिजन, 'ड'




जीवनसत्व सकाळी-सकाळी मिळाल्यावर दिवसभर उत्साह राहणारच.

घराचे रक्षण करणाऱ्या उंबऱ्याला पाय लावू नये. घरात स्वच्छता ठेवून लक्ष्मीचे प्रतीक असलेल्या केरसुणीला पाय लागू नये असे ठेवावे. वास्तुदेवता सतत 'तथास्तु' म्हणत असते, म्हणून चांगलेच (शुभ) बोलावे. शुभ काम करताना कोणत्या दिशेस तोंड करावे, देवघर कोठे असावे अशा अनेक बारीकसारीक गोष्टींचा विचार या वास्तुशास्त्रात केलेला आहे. त्याचे आपण पालनही करतो. कारण लहानपणापासून या संस्काराचे महत्त्व आपल्या वडीलधाऱ्यांनी आपल्या मनावर बिंबवलेले आहे.

आज मात्र वास्तुशास्त्राचा जास्त बोलबाला झाला आहे. खरेतर सर्वच गोष्टींचा प्रचार आणि प्रसार याची प्रसिध्दी जास्त होत असते. त्याची कारणे ही तशीच आहेत. विज्ञानाचा विस्फोट, प्रसारमाध्यमे यांचा यात फार मोठा वाटा आहे. फक्त यातील काही गोष्टींचा अतिरेक टाळला तर सर्वजण योग्य पध्दतीने वास्तुशास्त्राचा वापर करून आपले आरोग्य चांगले ठेवू शकतात. मनाचा सकारात्मक विचारच प्रत्येकाचे आरोग्य चांगले ठेवू शकतो.

आजचा वास्तुविशारद वास्तुशास्त्राचा अभ्यास करुन गृहरचना करतो आहे ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळे पूर्वीच्या लोकांचे विचार म्हणजे 'काहीतरीच!'असे म्हणून चांगल्या गोष्टींना धुडकावणारी नवी पिढी 'वास्तुविचार' या नवप्रणालीचा आवर्जून स्वीकार करतेय हे स्वागतार्हच आहे.

With Best Compliments from



OM SIDDHI CONSTRUCTION

# घर घेतानाचे अनुभव

- विनोद बांदोडकर

मुंबईसारख्या शहरामध्ये मध्यमवर्गीय माणसांना सध्याच्या परिस्थितीमध्ये घर घेणे अशक्य म्हणण्यापेक्षा फारच कठीण आहे. ज्यांच्या वडीलोपार्जित जागा किंवा जमीन असल्याशिवाय ती विकून किंवा, वारसाहक्कातून आलेल्या पैशातूनच मुंबईसारख्या शहरामध्ये चांगली जागा घेणे शक्य होऊ शकते, अथवा मुंबईतील घर विकून त्याच पैशातून उपनगरामध्ये मोठी जागा घेऊन आपण आपले घराचे स्वप्न साकार करू शकतो. तीन भाऊ असतील तर पुन्हा त्याची वाटणी वगैरे हा प्रश्न आलाच.

आमची पण मुंबईत सांताक्रुझ येथे जागा होती. आम्ही तिघे भाऊ. दोन बहिणी लग्न होऊन आपापल्या संसारात रमल्या होत्या. बैठ्या खोलीत त्या तिघांचे संसार कसे नांदू शकतील ह्या विचाराने मी निर्णय घेतला. माझा पण चांगला जॉब होता, पगार पण चांगला होता, नोकरीसाठी ठाण्याला जावं लागायचं. रोजचा ट्रेनचा प्रवास २ तासांचा. आपण जागा बघावी ती पण ठाण्यामध्येच कारण तेथून कंपनीपण जवळ, येण्याजाण्याचा त्रास पण कमी होईल. साधारण १९९२ सालची गोष्ट, माझ्याबरोबर काम करणारा त्यांनीपण ठाण्यातच जागा बुक केली, ती पाहण्यासाठी मी गेलो आणि त्याच वेळी मनात पक्क केलं की आपण देखील इथेच फ्लॅट घ्यायचा.

कंपनीमधला एक कामगार जो फावल्या वेळेत इस्टेट एजंटची कामे करायचा. त्याच्या ओळखीने त्यांनी मला कळवा, ठाणे परिसरात एक ब्लॉक दाखवला. फ्लॅट माझ्या बजेटमध्ये बसणारा होता. समोर मेन रोड व पाठीमागे मोकळी जागा खाडी, समोर सह्याद्रीचे उंच पहाड, नयनरम्य दृश्य, खिडकीतून बाहेर बघितलं की एकदम प्रसन्न वाटे, तिन्ही बाजूने खिडक्या असल्यामुळे हवा व प्रकाश भरपूर, बघताक्षणी तो फ्लॅट मला पसंत पडला. त्यांनी मला त्या बिल्डरकडे नेले, टोकन मनी घेऊन येण्यास सांगितले. माझ्या जीवनामध्ये आलेला हा पहिला एजंट त्यांची फी २% असते हे मला त्यावेळीच कळाल. टोकन मनी देऊन बिल्डरने माझ्याबरोबर करार करून घेतला. स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन फी, गृहकर्ज इत्यादींसाठी लागणारी कागदपत्रे त्या बिल्डरच्या माणसांनी रीतसर भरुन, कर्ज वगैरे बिल्डरनेच करून दिले. त्यासाठी मला कसलाही त्रास झाला नाही. साधारण जानेवारी १९९३ मध्ये मला फ्लॅटचा ताबा दिला. आपले स्वतःचे घर याचा मला एवढा आनंद झाला की मला शब्दात सांगता येणार नाही, पण त्याचबरोबर आईला वाटणार दुखः, काळजी मला स्पष्ट दिसत होती. तिला आपल्या दोन मुलींची काळजी होती. माझ्या पाठच्या बहिणींचं कसं होणार, त्यांची लग्नकार्य वगैरे! याची तिला जास्त काळजी वाटत असावी. कारण त्यांच्या लग्नाची

**“आपल्याला जीवनामध्ये चांगल्या कामासाठी वेळ यावी लागते हेच खरे! खरेतर आता मी फ्लॅट विकण्याचा विचार मनातून काढून टाकला. “जो हो रहा वह अच्छे के लिये हो रहा है” असे म्हणत ”**

जबाबदारी माझ्यावरच होती. त्यांना स्थळ बघण्याचं काम चालूच होते. आईला मी एक आश्वासन दिल होतं की काही झालं तरी दोघींची लग्न झाल्याशिवाय मी हे घर सोडणार नाही. देवाच्या कृपेने त्याच वर्षी मोठ्या बहिणीला स्थळ आलं व लग्न होऊन ती पण आपल्या संसारात रमून गेली. दुसऱ्या बहिणीला पण स्थळ येऊ लागली होती. त्याच दरम्यान मला पण एक स्थळ आले. तोपर्यंत माझे पण वय ३२ वर्षांपर्यंत झाले होते. ज्या दिवशी माझा साखरपुडा झाला त्याचवेळी मी सांगून टाकले की धाकटीचे लग्न झाल्यावरच आपण आपल्या नवीन घरात जाऊ. ही त्याची आठवण मला कधीतरी करून देत असते. "साखरपुड्याच्या दिवशी तुम्ही माझ्याबरोबर काय बोलत होता, आठवतंय काय?" असो. पण देवाच्या कृपेने माझं लग्न झाल्यावर सहा महिन्यांच्या आतच दुसऱ्या बहिणीला देखील स्थळ आले मग तिचा साखरपुडा व लग्नकार्य व्यवस्थित पार पडले, तेव्हाच मी मोकळा श्वास सोडला. या दरम्यान दोन वर्षे आम्ही जुन्याच घरात काढली, घर पण लहान असल्यामुळे अडचण तर होतीच. आईची देखील आता काळजी मिटल्यामुळे ती देखील समाधानी होती. माझ्या पत्नीला देखील आई, भावजय, नणंदा, दीर यांचे स्वभाव कसे असतात. त्यांच्याबरोबर कसे खेळीमेळीने, मिळून मिसळून राहावे याचा पण अनुभव आला. आपण आता वेगळे होणार याचं दुःख कोणाला होऊ नये असे मला वाटत होते. सगळ्यांच्या सहमतीने आम्ही वेगळा संसार थाटायचा विचार केला आणि एक चांगला मुहूर्त बघून आम्ही वेगळे झालो. तो दिवस मला अजूनही स्मरणात आहे. आईला देखील



थोड्या दिवसांसाठी आमच्याबरोबर घेऊन गेलो. नवीन जागेमध्ये मला करमत नसे. पुन्हा पुन्हा मी माझ्या जुन्या घरी जात असे. साधारण दोन वर्षे असे चालले होते. मनाची तयारी होत नव्हती. नवीन शेजारी, नवीन माणसं सर्वच नवीन व चाळीमध्ये राहण्याची सवय असल्यामुळे चाळ संस्कृती आणि फ्लॅट संस्कृती यातला फरक मला वेळोवेळी जाणवत होता. चाळीमध्ये आमच्या घराचे दरवाजे नेहमी उघडे असायचे. पण फ्लॅटमध्ये नेमके उलट. दरवाजे नेहमीच बंद. चाळ सिस्टममध्ये आजूबाजूला लोकांच गॉसिपींग, शेजाऱ्यांची येजा, एकमेकांच्या सुखदुःखामध्ये सामील होणे, प्रत्येकाची खबर प्रत्येकाला असायची, तसे फ्लॅट सिस्टीममध्ये ती उणीव भासत होती. कोणी कोणाला विचारत नव्हते. शेजारी कोण राहतो याची माहितीदेखील मिळत नसे कारण नेहमी दरवाजे बंदच, हे मनाला कोठेतरी खटकत होते. काही दिवसांनी त्याची पण सवय होत गेली. प्राणीसृष्टीत मनुष्य हा एकमेव असेल जो कधीच समाधानी नसतो. जी गोष्ट, ज्याचा तो ध्यास करतो ती गोष्ट त्याला मिळाल्यानंतर त्याचा आनंद त्याला थोड्या दिवसांपुरताच असतो. नवीन नोकरी, नवीन जागा, नवीन व्यवसाय, नवीनच झालेले लग्न कालांतराने त्याचे नावीण्य ओसरून जाते. त्यातला ताजेपणा निवळून गेल्यावर, त्याला त्यात रस वाटत नाही. तो आणखी काहीतरी नवीन करण्याची उमेद बाळगू लागतो. त्याच्या आशा आणखी वृद्धिंगत होतात. लाखाचे दहा लाख कसे होतील असे त्याला वाटू

लागते. मृत्यूच्या शेवटच्या घटकेपर्यंत त्याच्या आशा काही कमी होत नाहीत, हे एक सत्य आहे आणि ते सर्वांनाच मान्य करावे लागेल. दोनचाकी वाहन चालवणारा आपल्याकडे चारचाकी वाहन कधी येईल या आशेवर जगतो किंवा त्यासाठी वाटचाल करतो. सिंगल रूममध्ये राहणारा, टू रूम किचन कधी मिळेल या आशेवर जगत असतो.

या सगळ्या गोष्टीतून मी काही वेगळी नव्हतो, चवथ्या मजल्यावरचा फ्लॅट म्हटलं तर नातेवाईक नाक मुरडायचे, कोण ते चार जिने चढणार? चवथ्या मजल्यावर राहणाऱ्या पुरुषालाच जास्त त्रास होत असतो. कारण घरातील माचीसपेटी संपली असली तरी एका काडीसाठी चार माळे चढणे व उतरणे क्रमप्राप्त होते. पावसामध्ये वर टेरेस असल्यामुळे सिलिंगमधुन पाणी पाझरणे असे प्रकार पण होतात. कन्स्ट्रक्शन नवीन असे पर्यंत काही कळत नाही पण दोन तीन वर्षांनी सिलींग मधुन पाण्याची गळती सुरु होते म्हटले हे काही खरे नाही. फ्लॅट सोडलेला परवडला. पुन्हा एजंट हा आलाच! जसे लग्न लावण्यासाठी भटजीची गरज असते तशी फ्लॅटची खरेदी-विक्री करताना एजंटची गरज भासते. चवथ्या मजल्यावरील फ्लॅट विकला जाणे तसे फारच कठीण, मुलगी सुंदर असेल, गोरीपान असेल तर तिचे लग्न जुळवायला आईवडीलांना जास्त चपला झिजवाव्या लागत नाहीत. तसेच मला फ्लॅट विकताना फारच वाईट अनुभव आले. फ्लॅट घेताना तसा मला काही अनुभव नसल्यामुळे पुढे अशी वेळ येईल असे वाटले नव्हते. लोकांना फ्लॅट पसंत पडायचा पण खाली उतरल्यावर पुन्हा मतपरिवर्तन व्हायचे. "चार माळे बापरे! आमच्या घरी म्हातारी आई आहे, ती कशी माळे चढणार" वगैरे! अशी अनेक कारणे सांगून फ्लॅट घेणे टाळायचे. नवीन फ्लॅट घ्यायचा म्हणजे हा फ्लॅट विकून, त्यात कर्ज वगैरे काढून घेणेच शक्य होते. खालच्या माळ्यावरील फ्लॅट विकण्यास जेवढा त्रास होत नसतो व त्यांना किंमतही चांगली मिळते. तसे टॉपच्या फ्लॅटच्या बाबतीत होत नाही. "अनुभवाने माणूस शहाणा होतो" हेच मला जाणवायला लागले. कमी किमतीला काढल्याशिवाय काही गत्यंतर नव्हते. "गरजवंताला अक्कल नसते" याचा पुरेपूर अनुभव मला त्यावेळी आला. फ्लॅट गरजवंत असल्याशिवाय कोणी घेतला नसता असं एकंदरीत कळून चुकले, असे करता करता पाच वर्षे निघून गेली त्या दरम्यान जागेच्या किमतीतही वाढझाली, त्याचाही मला फायदा झाला.

योग असल्याशिवाय गोष्टी घडून येत नसतात, प्रत्येक गोष्टीला वेळ यावी लागते हेच खरे. इतकी लोक फ्लॅट बघून गेले होते की मला वाटला आता हा फ्लॅट विकणे कठीण आहे. माझी आशा मावळली होती आणि अचानक एके दिवशी एका एजंटचा फोन आला. "एक पार्टी मुंबईहून फ्लॅट बघण्यास येणार आहे, तुम्हांला वेळ आहे का?" रविवारी सुट्टी असल्यामुळे मी त्यांना "हो" म्हणालो. मुंबईत घरे छोटी असल्यामुळे जेव्हा त्यापेक्षा कमी किमतीत मोठी जागा बघून मनुष्य हरपून जातो. (माझंही असच झाल होते, जेव्हा मी ही जागा पसंत केली होती तेव्हा) रविवार उजाडला साधारण १०-११ च्या सुमारास पार्टी आपल्या मिसेस व मुलांना घेऊन आली. त्यांना जागा पसंत पडली. लगेच त्यांनी टोकन मनी द्यायचे कबूल केले. मला मी स्वप्नात असल्यासारखे वाटू लागले. ही व्यक्ती फ्लॅट घेणार का? टोकन घेऊ का नको? एकदा टोकन घेतलं की, व्यवहार पक्का, लगेच निर्णय घेणे कठीण होत होते, आत जाऊन पत्नीला विचारले, "अग काय करू? तिचाही होकार होताच, तरीही देवाचे नाव घेऊन टोकन मनी स्वीकारले. बाकीची रक्कम लोन घेऊन ते पूर्ण करणार होते. महिन्याभरात आपण व्यवहार पूर्ण करू" असे मी त्यांना सांगितले.

नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्ने! असाच

मला अनुभव त्यावेळी आला. महिना झाल्यावर माझा फ्लॅट घेणाऱ्या व्यक्तीला विचारले पुढे काय? तर म्हणाले लोनसाठी उशीर होईल. कधी होईल बघूया, कागदपत्रे, स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन इत्यादी सर्व झाले होते, त्यामुळे मी दुसरीकडे हालचाल करू शकत नव्हतो. पेपर सर्व त्यांच्याच ताब्यात होते. पुन्हा पंधरा दिवसांनी विचारले तर पुन्हा तेच उत्तर असे करता करता आणखी काही दिवस निघून गेले. ज्याच्याकडून मी फ्लॅट घेणार होतो ते देखील पैशासाठी घाई करू लागले. कारण त्यांनी देखील माझ्यावर विश्वास ठेवून त्यांना पाहिजे असलेला फ्लॅट बुक केला होता. आता काय करायचे ऐवढा मनस्ताप मला त्यावेळी झाला की रात्रीची झोप लागणे कठीण झाले. झक मारली आणि या फंदात पडलो असे झाले.

शेवटी त्या माणसाचे कर्जाचे काम काही झाले नाही. त्याचा पगार ६०००/- रुपये आणि त्याला पाहिजे होते ५ लाख रुपये. कोणती बँक त्याला एवढे कर्ज देईल? शेवटी कोणतीही बँक हा विचार करणारच की याचा इन्कम किती आणि हा कर्जाचे हप्ते फेडणार कसे? त्यांनी अनेक बँकांत कर्जासाठी प्रयत्न केले शेवटी त्याचे कर्जाचे स्वप्न धुळीस मिळाले. त्यांना मी म्हटलं सर्व सोडून द्या! मला माझा फ्लॅट काही विकायचा नाही. माझी सर्व कागदपत्रे मला परत कर. स्टॅम्पड्युटी, रजिस्ट्रेशन जे काही केले आहे ते रिव्हर्स कर आणि तू दिलेले टोकन परत घेऊन जा. तसे त्यांनी केले. मी देखील माणुसकीच्या दृष्टीकोनातून त्याचे टोकन त्याला परत देऊन टाकले. त्यामुळे नवीन फ्लॅट घेण्याचे माझेही स्वप्न धुळीला मिळाले. कारण या पैशात आणखी रक्कम भर घालून मी नवीन फ्लॅट घेणार होतो.

ज्याच्याकडून मी फ्लॅट विकत घेणार होतो तो पण आता घाई करायला लागला, त्याला मी टोकन मनी देऊन बसलो होतो. त्याचा फ्लॅट एवढा हवेशीर होता की कोणालाही पसंत पडणारा होता. ती व्यक्ती गुजराती होती. व्यवहाराला पक्की, त्या माणसाला मी सांगितले "आपको कोई दुसरा गिऱ्हाईक मिलता होगा तो आप फ्लॅट बेचदो" आणि लगेच तिसऱ्या दिवशी माझ्यापेक्षा जास्त रक्कम देणारी व्यक्ती त्यांना मिळाली व त्या माणसाने तो फ्लॅट विकून टाकला. असो! मी दिलेले टोकन मनी पण कटकट न करता मला परत केले.

आपल्याला जीवनामध्ये चांगल्या कामासाठी वेळ यावी लागते हेच खरे! खरेतर आता मी फ्लॅट विकण्याचा विचार मनातून काढून टाकला. "जो हो रहा वह अच्छे के लिये हो रहा है" असे म्हणत आपल्या रोजच्या कामात व्यस्त राहिलो.

बरोबर एक वर्षानंतर पुन्हा अशीच संधी आली. मुंबई, काळाचौकी येथे राहणारे एक मध्यमवर्गीय कुटुंल चांगल्या नोकरीला असणारे त्यांना इन्व्हेस्टमेंट म्हणून जागा पाहिजे होती. ते रूम पाहण्यासाठी आले, त्यांना जागा पसंत. पडली टोकन मनी दिले. एक महिन्यातच त्याचे लोन पास झाले व त्यांनी माझ्या रूमचे सर्व आर्थिक व्यवहार वेळेत पूर्ण केले. पूर्ण रक्कम हातात पडल्यानंतर मी पुन्हा सावधानतेने मला जशी जागा पाहिजे होती तशी जागा शोधण्यास सुरुवात केली. रूम घेणाऱ्यांना देखील ताबडतोब रूमचा ताबा नको होता. त्यामुळे त्याच रूममध्ये आम्ही ३-४ महिने भाडेतत्त्वावर राहण्यास त्यांनी आम्हांला मुभा दिली. काही केल्या मला माझ्या पसंतीचा फ्लॅट काही सापडत नव्हता. मग आता सर्व कुटुंब घेऊन जाणार कोठे, हा प्रश्न सतावत होता. म्हटलं पुन्हा तीच चूक करायची नाही, चांगला रूम मिळेपर्यंत आपण काही दिवस कोठे तरी भाडेतत्त्वावर राहू, पत्नीला देखील ही गोष्ट पटली व तिने संमती दिली. चार महिन्यांनी ज्याचा रूम होता, त्यांच्या ताब्यात रूम दिला व आम्ही भाडे तत्त्वावर (लिव्ह

ॲन्ड लायसन्स) (११ महिन्यांच्या करारावर) रूम घेतली.

ही गोष्ट साधारण जून २००५ सालची. ग्राऊंड फ्लोअरचा ५८० चौरस फुटांचा वन बेड, किचन, हॉल असलेली जागा बघितली. पत्नीला पण ती रूम पसंत पडली. टोकन मनी पण दिले, बाकीची रक्कम देण्याचा कालावधी ठरला. ब्लॅक मनी अगोदर व राहिलेली सर्व व्हाईट रक्कमही लोन घेऊन पूर्ण होणार होती. पावसाची सुरुवात पण त्याच दरम्यान झाल्यामुळे व्यवहार मंद गतीने चालत होता. फ्लॅट विकणाऱ्याला पण घाई नव्हती व मलाही. २५ जुलै २००५ ला जो पाऊस झाला त्यामुळे माझे डोळे खाडकन उघडले, त्याचे कारण असे की सर्व मुंबई-ठाणे परिसरात पहिल्या मजल्यापर्यंत पाणी साचले, एवढे मोठे ते संकट होते की काही विचारू नका, मी जो फ्लॅट बुक केला होता त्या ग्राऊंड फ्लोअरच्या रूममध्ये कंबरभर पाणी साठले होते. व्यवहार अजून पूर्ण व्हायचा होता. पावसाचा जोर कमी झाला असला तरी मनावरचा ताण काही कमी होत नव्हता, असाच पाऊस पुन्हा झाला तर? अशीच परिस्थिती पुन्हा उद्भवली तर ? मनात अनेक शंकांचे थैमान चालू होते. मनात विचार केला असा फ्लॅट घेण्यापेक्षा न घेतलेला बरा. पुढे जाऊन तो फ्लॅट विकायचा झाला तरी किंमत मिळणार नव्हती. सारासार विचार करून ठरवलं की हा फ्लॅट घ्यायचा नाही, त्याला पूर्णविराम दिलेलाच बरा.

दुसऱ्याच दिवशी लगेच त्या व्यक्तीला फोन करून निरोप दिला. ते गृहस्थ त्या फ्लॅटमध्ये राहत नसत. फ्लॅट रिकामाच होता. त्या फ्लॅटमालकाना बोलावून त्यांनी आपला फ्लॅट उघडला. संपूर्ण भिंती ओल्या झाल्या होत्या. तसेच पूर्ण फ्लॅट चिखल-मातीने भरला होता. संपूर्ण फर्निचर पाण्याने ओले झाले होते. त्यांना मी म्हटलं हा असा फ्लॅट मी कसा घेऊ? त्याला पण माझं म्हणण पटलं. त्यांनी मी दिलेली टोकन मनी परत देण्याचे कबूल केले. मी पुन्हा अडचणीत आलो असतो. माझे दैव बलवत्तर म्हणून की काय व्यवहार पूर्ण होण्यास विलंब होत होता.

आता मला कुठल्याही प्रकारची रिस्क घ्यायची नव्हती. असाच एक फ्लॅट एका एजंटच्या मार्फत दाखवण्यात आला कमी बजेट, मोठा रूम साधारण ८०० चौ. फुटांचा, दुसरा मजला, पूर्व-पश्चिम दिशेला असणारा रिसेलचा रूम मला दाखविण्यात आला, तो फ्लॅट विकत घेण्यास कोणी तयार नसे, कारण पण तसेच होते. माझा वास्तूशास्त्राचा थोडा अभ्यास असल्यामुळे, मी जेव्हा आजुबाजूला चौकशी केली तेव्हा अस कळल की त्या जागेचा जो मूळ मालक जो बिल्डरचा पार्टनर होता त्याची त्याच फ्लॅटमध्ये हत्या झाली होती आणि त्या मालकाला मूलबाळ काही नव्हतं. वास्तू दूषित असा हा फ्लॅट होता. मी एका ज्योतीषा जवळ याबाबत चौकशी केली असता ते म्हणाले "त्यात काय झाले? तुम्हांला मूलं आहेत ना?" पण मन काही धजत नव्हतं. शेवटी तोही फ्लॅट घेण्याचा विचार मनातून काढून टाकला.

अशा अनेक गोष्टी ज्या वर वर सोप्या वाटतात पण त्यात उडी घेतल्यावर त्या गोष्टींचा चांगला-वाईट अनुभव येतो व अनुभवातूनच माणूस शहाणा होतो.

काही महिन्यांनी मला हवा तसा योग जुळून आला आणि मला हवी असल्याप्रमाणे जागा मिळाली. चौथा मजला असला तरी लिफ्ट होती, वास्तुशास्त्राप्रमाणे सर्व ॲरेजमेंट होती, पार्किंगसाठी जागा, शाळा, मार्केट व स्टेशन जवळ होते. समोर ऐसपैस जागा तसेच मुलांसाठी छोटे गार्डन देखील होते आणि मुख्य म्हणजे माझ्या बजेटमध्ये बसणारा टीएमसी प्लॅनप्रमाणे पास झालेला असा हा रिसेलचा फ्लॅट मला मिळून गेला.

जागा देताना आणि घेताना दोन्ही ठिकाणी योग जुळून यावा लागतो हेच खरं.

With Best Compliments from

# *Vaishnav Construction*

## DEVELOPERS & CONTRACTORS

**(Govt. Reg.)**

## Vinod Patil

Shop No. 4, Dev Niwas, Gr. Floor,
Near Canara Bank, Kolshet Road, Thane (W).
Email : vaishnavonstrution22@gmail.com

# माझ्या व्हयोलिनच्या शिकवण्या

- मनोहर तळेकर

एक प्रख्यात गवईबुवा गाण्याच्या शिकवण्या घेत असत. त्या कशा चालत त्यांचे अनेक गमतीदार किस्से आहेत. बुवांना श्रीमंत सरलाबाईंची शिकवणी मिळाली. उंची साडी आणि भरपूर सुवर्णालंकार हातात, गळ्यात घालून त्या शिकवणीस बुवांपुढे बसायच्या (पण एक स्वर- अलंकार त्यांच्या गळ्यावर चढले तर शपथ - हे बुवांच्या शब्दात ). ताल पकडण्याची हीच बोंब.

एकदां नेहमीप्रमाणे बुवा सरलाबाईंच्या शिकवणीस गेले.

"बाई आजारी आहेत" त्यांच्या नवऱ्याने सांगितले.

बुवा परत जायला निघाले.

"बुवा थांबा-आज सरलाबाईऐवजी त्यांची बहीण विमलाबाई बसेल."

**"पुष्कळ वेळा मनात येत - - माणसं गप्पा मारणे, दूरदर्शनच्या रटाळ मालिका पाहणे इ. मध्ये वेळ घालवतात. मग शिकत असलेल्या कुठल्याही कलेसाठी अर्धा तास काढू शकणार नाहीत का?"**

(पैसे मोजतोय् म्हणजे शिकवणी झालीच पाहिजे.)

"ठीक आहे."

बुवांनी विमलाबाईंची शिकवणी घेतली.

तिसरे दिवशी - -

"बुवा - विमलाबाई बाहेर गेल्या आहेत पण शांताबाई बसेल."

- शांताबाईची शिकवणी झाली.

चौथ्या दिवशी बुवा आले. घरी बायका कुणीच नव्हत्या.

नवरा एकटाच होता.

"बुवा आता तुम्ही जा. उद्या कोण असेल तर बघू."

बुवा म्हणाले "अहो समोर तुमची कुत्री बांधलीय, तिला बसवा की. कुत्रीलासुध्दा शिकवतो मी."

ह्या बुवांएवढा काही मी मोठा नाही. संगीत क्षेत्रात काही वर्षे व्हायोलिन मार्गाने लुडबुड करतोय एवढंच.

बरीच वर्षे माझी स्वतःची शिकवणी चालली होती. म्हणजे मी गुरुकडे शिकायला जात असे. हे सगळं मी मध्यमवर्गीय असल्यामुळे आधी संसार मग सूरसंसार हे ओघानं आलंच.

आमच्या कार्यालयात फक्त 'कार्यालय' शब्दातील 'लय' सोडली तर सर्व बोरुबहाद्दर संगीतातले औरंगजेबच होते. पण कसं काय कोणास ठाऊक मशीन प्लँटमधला फोरमन पवार मधल्या सुट्टीत माझ्याकडे आला आणि बराच वेळ बसून गेला.

आजूबाजूस संशयाने सर्व सहकारी बंधूभगिनी हे पाहत होतेच.

"पवार कशाला रे आला होता?"

"अरे विचारू नकोस. पवारची मुलगी संयोगिता - - तिला व्हायोलिन शिकायचय्."

"अरे वा! तळ्या लकी आहेस हं तू."

'हे लकी म्हणजे चांगली विद्यार्थिनी लाभली म्हणून नसून एका तरुण चिकण्या पोरीची शिकवणी'

हा त्यांच्या हेव्याचा भाग होता. आपल्याला व्हायोलिन येत नाही याच त्यांना दु;ख झालं म्हणजे त्यांना ही शिकवणी गटवता आली असती. हे सर्व पाहून माझ्याही मनाच्या तारा झंकारल्या.

सूर कुठे कसे पोचतात ते पाहा.
घरी आल्यावर बायकोस सांगितले.

"व्हायोलिन शिकवणी आलीय्. आमच्या प्लँट फोरमनची मुलगी आहे. तिची जागा लहान आहे म्हणून आपल्या घरी येऊन ती शिकणार.

"मग घ्या शिकवणी. माझा विश्वास आहे तुमच्यावर आणि माझ लक्ष असणारच की तुमच्यावर."

बायकोच्या दुजोऱ्यामुळे मला उत्साह आला. ही संयोगिता माझी पहिली शिष्या.



व्हायोलिन कस धरावं पासून ती माझ्याकडे लग्न ठरेपर्यंत शिकली. मग संसारसूर लावण्यासाठी आशीर्वाद मागून गेली.

"सर सासरी आवड आहे संगीताची. मी व्हायोलिन चालू ठेवणार आहे" संयोगिता सांगायची. पण बाळराजाचं आगमन झाल्यावर माझी शिकवणी तिच्या कपाटात पडून आहे.

पुष्कळ वेळा मनात येतं - माणसं गप्पा मारणे, दूरदर्शनच्या रटाळ मालिका पाहणे इ. मध्ये वेळ घालवतात. मग शिकत असलेल्या कुठल्याही कलेसाठी अर्धा तास काढू शकणार नाहीत का? बस स्टॉपवर बस येईपर्यंतच्या १५-२० मिनिटांत गीतेचा रोज एक श्लोक वाचणे - अस करत संपूर्ण गीता आदरणीय कलावती कै. सुहासिनी मुळगावकरानी पाठ केली होती.

संयोगिताची शिकवणी मला वेगळ्या दृष्टीने शकुनी ठरली. तिची शिकवणी सुरू करण्यापूर्वी मी कसला कोणास व्हायोलिन शिकवू शकणार? मी स्वतः अजून विद्यार्थी आहे : अशा न्यूनगंडाने पछाडलेला; ही देखणी पोरगी कशाकरिता येते अशा सख्ख्या शेजाऱ्यांच्या संशयी नजरा. त्यामुळे 'मला जमणार नाही' असं संयोगिताला सांगून मोकळं व्हावसं वाटायचं.

पण बायकोनं "एकदा अनुभव घ्या शिकवण्याचा" असा धीर आणि बिनशर्त पाठिंबा दिला होता.

त्यानंतर पुढची १०-१५ वर्षे पन्नासएक शिष्य, शिष्या या गुरूला वंदन करून गेले. त्या शिष्य स्मरणाने खूप छान वेळ जातो फक्त पंधरा मिनिटांपासून सतत ४-५ वर्षे टिकलेले विद्यार्थी लाभले.

एक विद्यार्थी सोनार होता. एक दिवस आला; म्हणाला,

"बुवा कसं काय कुणास ठाऊक पण आमच्याकडे पूर्वीपासून एक जुनं व्हायोलिन आहे.परवा माळा झाडताना मला सापडलं. मला शिकवाल?"

म्हणजे नाल सापडला म्हणून घोडा घेण्याचा प्रकार.

ते व्हायोलिन घेऊन दुसऱ्याच दिवशी तो आला. वापरात नसल्यामुळे, तारा, खुंट्या, बो इ. ची थोडी दुरुस्ती हवी होती. पण व्हायोलिन खरोखरच अप्रतिम इटालियन होतं.

अगदी पध्दतशीरपणे त्याने पिशवीतून नारळ, पेढे पुडा काढला. पेढे आणि माझी फी माझ्या पायाशी

ठेवली. कुंकू लावून मला नमस्कार केला.

शिकवणी सुरू झाली. व्हायोलिन कसा धरायचा; त्यावरून 'बो' कसा फिरवायचा सर्व सांगू लागलो. त्याच्या 'बो'च्या वाकड्या वळणास तारांच्या सरळ मार्गावर आणेपर्यंत पंधरा मिनिटे गेली आणि एकाएकी तो उठला.

"काय झाले रे ?"

"बुवा आठवण झाली. एका गिऱ्हाईकाची बांगड्यांची ऑर्डर पोचवायचीय् आधीच उशीर झालाय्. उद्या येतो ना. हे व्हायोलिन इथेच राहू दे आज."

त्याचा उद्या अजून उजाडतोय्. मी फोन करायचो. अरे तुला जमत नाहीय् शिकवणीचं तर ठीक आहे पण तुझं व्हायोलिन तरी घेऊन जा. मग तो येतो म्हणायचा. बऱ्याच वर्षांनी तो आला. व्हायोलिन घेऊन गेला.

एक इंजिनियर साहेब आले. शिकवणी सुरू झाली. यात सूर-तालापेक्षा गणित-भूमिती चर्चाच घडायची.

"बुवा तुम्ही, 'बो' सरळ फिरवा म्हणता म्हणजे नाईनटी डिग्री कोन तारांशी होणार - बरोबर ना ?"

बुवा तारा ॲड्जस्टमेंटसाठी पेग्जना (खुंट्या) किती टर्नस् द्यायचे ?

"बो" नाईन्टी डिग्री फिरल्यावर तो सांगायचाः

"बो" च्या लोअर एडपासून त्याच्या अप्पर पॉईंटपर्यंत

हा "बो" चा प्रवास म्हणजे विमानाच टेक् ऑफ् वाटतं बुवा."

"खरच- म्हणून तर' बो" फिरण्याच्या क्रियेला आम्ही 'बोइंग' म्हणतो.

"बुवा ह्या व्हायोलिनची लांबी किती असते हो ? त्यांची उंची आणि रुंदी किती असावी ते सगळ साऊंड टेक्नॉलॉजीवर आधारित असणार."

"फळीचा थिकनेस (जाडी) किती मायक्रो थाऊ असतो हो ?" असे त्याचे एका तासात किती प्रश्न. अधूनमधून सा रे ग असं सूरदर्शन होईल एवढा सराव व्हायचा.

व्हायोलिनचं लाकूड कुठल्या झाडाचं असतं. पॉलिश वेगळे असतं काय ? असले प्रश्न सोडवताना, कसं बसावं, सूर कसा लावायचा, बो किती वजनाने फिरवायचा असे सांगीतिक प्रश्न बाजूला पडायचे.

काही महिन्यांत त्याची बदली झाली आणि मी सुटलो.

काही मुलं व्हायोलिनची एखादी मैफिल ऐकून किंवा सिनेमातले गाणे डोक्यात ठेवून यायची.

"सर व्हायोलिन शिकायचयं."

"वा !"

ते सखी तोरे बिन जिया तडपाये हे अमक्या पिक्चरमधलं सध्या हीट सॉंग आहे. व्हायोलिनवर किती दिवसात बसवून द्याल ?

मी त्याचा हात हातात घेतला. म्हटलं, "तुझी बोटं छान लांबसडक आहेत. ते तू नक्की वाजवशील. फक्त दोन-तीन वर्षे रोज दोन-तीन तास रियाझ कर."

"बरं विचार करतो," म्हणत तो सटकला.

तो अजून विचार करतोय.

अहो साधं बी.ए. व्हायला १७-१८ वर्षे (पहिलीपासून) लागतात. ही पण विद्या आहे. १७-१८ महिने तरी द्या की.

एक बाई त्यांचे १३-१४ वर्षांच्या मुलीला घेऊन आल्या.

"नमस्कार, मी मिसेस जाधव. माझ्या मुलीला व्हायोलिन शिकायचयं. तुमच्या फीचा काही प्रश्न नाही हो. रग्गड पैसा तिच्या बापाकडे. तुम्ही चांगलं शिकवता असं ऐकलं."

"पण माणसं साफ हवीत. म्हणजे तुमच्याबद्दल तोही प्रश्न नाही. पण मनातलं मोकळेपणाने बोलते. हल्ली तरूण मुलींना कुठे पाठवायचं म्हणजे जरा ........ नाही का ?"

"ठीक आहे. माझ्याबद्दल तुमची खात्री असेल तर बिनधास्त पाठवा तिला."

ती मुलगी अजून येतेय. माझ्यापेक्षा सत्शील गुरू जाधवांना मिळाला असावा.

खरं म्हणजे त्या मुलीपेक्षा बाईच कामांधाची शिकार व्हाव्या अशा रूपवान होत्या.

एक बाई सांगत आल्या ----- "बुवा आमच्या आशाला व्हायोलिन शिकायचंय, शिकवाल ?"

"वेलकम." मी.

"त्याचं कायं आहे - आमच्या सोसायटीत तिची मैत्रीण रेश्मा सतार शिकतेय कुणाकडेतरी. रेश्मा म्हणायला आशाची मैत्रीण, पण किनई सतत आतून आशाच्या हुशारीवर जळत असते. मी आशाला म्हटलं समोर ते कोण व्हायोलिनवाले गृहस्थ राहतात त्यांना आजच जाऊन विचारते."

"हरकत नाही. आशाला घेऊन या तुम्ही."

पुढे कळलं रेश्मा मे महिना सुट्टीत सतारीस गवसणी घालून मामाच्या गावाला गेली. त्यामुळे आशाने व्हायोलिन शिकण्याचा प्रश्न आपोआप मिटला. एक युवक आला. शिकवणीची वेळ, माझी फी इ. सर्व निश्चित झालं.

मी त्याला म्हटलं, "सुरुवातीस मी माझे व्हायोलिन इथे शिकायला देतो. थोडंसं वाजवायला आल्यावर ४-५ महिन्यांत विकत घे."

"सर किती पडताता व्हायोलिनला."

"इंडियनला तीन हजार रुपये पडतात."

"बाऽपरे एवढे? अहो सध्या मी एका फॅक्टरीत स्टायपेंडवर आहे."

मी चिडलो.

"तू असं कर, तू फ्लुट शीक. एकदम स्वस्त. दोनशे रुपयांत मिळतं."

गंमत म्हणजे तो आनंदला.

"हं. ही छान आयडिया दिलीत. पत्ता द्या फ्लुट मास्तरांचा आणि दुकानाचा."

मी कपाळाला हात लावला. एखादं वाद्य आवडलं म्हणून ते वाद्य माणूस शिकतो असं मला तोपर्यंत वाटत होतं. दुसरा एक दोन महिने माझ्याकडे शिकत असलेला तरूण मुलगा त्याला एक साक्षात्कार झाला आणि त्याने व्हायोलिन शिकणे सोडले. त्याचा खुलासा त्याने केला - तो आता कीबोर्ड शिकतोय. सर व्हायोलिन वाजवायला दोन हात लागतात. कीबोर्ड कसा भाताविरहित पेटीच. डाव्या हाताने चिवड्याची फक्की तोंडात टाकत उजव्या हाताने गाणं वाजवता येतं.

माझी ही पण व्हायोलिन शिकवणी गेली. एक शिष्य वर्षभर टिकला. बऱ्यापैकी वाजवू लागला आणि एकाएकी न कळवता लापता. थोडे दिवस वाट पाहून मी त्याचा नाद सोडून दिला. अचानक त्याच्या



गैरहजेरीचं रहस्य कळलं. त्याचे एक नातेवाईक माझ्या ओळखीचे.

मंडईत भेटले. ते विचारू लागले, "अवीला म्हणे तुम्ही फार छळत होता ?"

"कसं कायं ?"

तो तक्रार करत होता. "गुरूजी १०-१५ स्वरांचा तुकडा देतात आणि तोच तोच तासभर वाजवायला सांगतात. याला काय अर्थ आहे ? तेच तेच घासत बसायचं ? शीः कंटाळा येतो. नकोच ते. त्यापेक्षा पेटी बरी. बोटं ठेवून भाता मारला की वाजते."
एक रिटायर्ड गृहस्थ आले. त्यांच्या हातात व्हायोलिनही होते. सुंदर मेन्टेन केलेले. तांबूस रंगाचं जर्मन स्टँड व्हायोलिन. माझ्याकडेही तसं नव्हतं.

"आधी व्हायोलिन वाजवत होता तुम्ही ?" मी विचारले.

"छे.छे. मी व्हायोलिन पाहिलं सुद्धा नव्हतं यापूर्वी."

माझा प्रश्नार्थक चेहरा पाहून त्यांनी खुलासा केला.

"आमचे आप्पा-बायकोच्या नात्यातले, नुकतेच वारले. त्यांचे हे व्हायोलिन घेऊन आलो. तिथल्या चार दिवस मुक्कामात मला एक कल्पना सुचली-तुमच्या जवळच राहतो मी. गेल्या महिन्यापासून रिटायर्ड. पोरं फॉरिनला. आता वेळ घालवायला करायचं काय ? ठरवलं-उगीच बायकोच्या मागे भुणभुण लावण्यापेक्षा व्हायोलिन शिकण्यात वेळ घालवावा."

"उत्तम. छान कल्पना आहे तुमची. गोड आहे हे वाद्यं. अवश्य शिकवीन मी."

शिकवणी सुरू झाली. व्हायोलिन घेऊन यायचे.

आल्यावर - आज हवा छान पडलीय नाही ? काल सचिनची बॅटिंग पाहिली की नाही ? ........

अशा असांगीतिक, अवांतर गप्पा.

"हो. पाहिली की."

बुवा आज येता येता तुमचं ऐकलं. काय वाजवत होता ?

"अहो तो केदार राग छेडत होतो थोडेसे सूर."

"केदार कठीण आहे का हो ?"

"छे. हो. शिकल्यावर काहीच कठीण नाही."

"बुवा आपल्या संगीतात किती राग आहेत हो ?"

"खूप आहेत."

"खूप म्हणजे किती असतील ?"

"तसे कुणी मोजले नाहीत. पण असतील चार-पाचशे."

"बुवा, हेच ..... हेच आपल्या लोकांचं चुकतं. नीट डेटा ठेवत नाहीत."

रागाला राग का म्हणायचं ? तुमचा आवडता राग कोणता ?

मालकंस गोड की चंद्रकंस ? असे अनेक प्रश्न तो ह्या गुरूला घालायचा.

मागे तो माझा इंजिनियर शिष्य गेल्यावर व्हायोलिनची लांबी रुंदी, बायकोची शिलाई टेप घेऊन मोजून तसं पत्रही त्याच्या बदलीच्या ठिकाणी पाठविलं होतं. आता ह्या रिटायर्ड बळवंतरावासाठी किती पुस्तकांचा अभ्यास करू ?

हा रिटायर्ड बाळू पूर्वी एका मोठ्या कंपनीत ऑडिट इन्स्पेक्टर होता. त्यामुळे एखाद्या रागात अमूक स्वर वर्ज्य आहेत सांगितल्यावर, का ? कुठे गेले ते असा हिशेब मागेल ही भीती. पण तेवढी वेळ आली नाही.

एक दिवस त्याने घरी चहापानास बोलावले व पुण्यास स्थाईक होणार. तिथे कोणी व्हायोलिन शिक्षक मिळतो का पाहणार सांगितले.

तो भावी शिक्षक बिच्चारा. शिक्षकाची परीक्षा घेणारे विद्यार्थीपण माझ्या पटावर आहेत.

"गुरुजी तुम्हांला गर्जा महाराष्ट्र माझा हे गाणं वाजवायला येतं काय ?"

"का रे ?"

"मला शाळेच्या गॅदरिंगमध्ये हे गाणं गोडबोले बाईंनी वाजवायला सांगितलंय. तीन दिवसांनी गॅदरिंग आहे."

"आता मी त्याचा शिक्षक कितीही चांगला वादक असलो तरी ते गाणं पाच दहा वेळा ऐकावं लागतं. त्याचं नोटेशन काढून तबलजीला बोलावून तालात बसवावं लागतं. पण मी हे त्याला सांगून काय समजणार ?"

सुदैवाने मला त्या गाण्याची चाल व बरंचसं ते गाणं येत होतं. त्याला सोपं नोटेशन म्हणजे स्वर काढून दिले व ह्या वर्षी तबल्याशिवाय वाजव. चांगलं वाजवशील, असं सांगून सोडवणूक करून घेतली.

दुसऱ्या एका विद्यार्थ्याचा किस्सा एकदमच अनोखा आहे.

पाच-सहा महिने नियमितपणे येणारा हा कॉलेज युवक.

एकदा पलट्यांचा सराव चालू असताना तो एकाएकी थांबला.

व म्हणाला - "सर मला आत्ता माझ्या लहानपणची गोष्ट आठवली. सांगू ?"

"सांग बाबा" (काय करणार ?)

"माझी आई आंघोळीस जाताना सांगायची. पाळण्यातली बेबी जर उठली तर झोका दे. दादा ना तिचा तू ?"

बेबी हमखास उठायची. भोकाड पसरायची. शंभर झोके दिले तरी परत झोपायची नाही. इतकी हट्टी - तुमचे पलटे शंभर वेळा वाजवले तरी हातात बसत नाहीत.

......

बायकांची जात महाहिशेबी. एक बाई माझ्याकडे व्हायोलिन शिकू लागली. पहिले २-३ महिने आठवड्यातून दोन दिवस शिकवणीची ठरल्याप्रमाणे फी दिली. त्यानंतर -

"सर एक विनंती आहे."

"बोला."

"माझी तासाभराची शिकवणी असते ना - त्यात काही वेळा तुमचा मोबाईल वाजतो. माझाही वाजतो. कधी मध्येच कुणीतरी येतं. कधी वहिनी आतून काही विचारायला येतात. त्यामुळे एक तास पूर्ण भरत नाही."

"बरं मग म्हणणं काय तुमचं ?"

"मी आठवड्यात दोनऐवजी तीन दिवस येत जाईन. त्याच फीमध्ये. चालेल ना ?"

"मॅडम आपण एका तासात किती ताना वाजल्या त्यावर हिशेब ठेवू या."- मी.

बाई काही बोलल्या नाहीत. माझा उपहास त्यांना समजला की त्यांनी न समजल्याचे वेड पांघरले. ती संगीत सरस्वतीच जाणे.

त्या उलट एक बँक कर्मचारी यायचा.

"सर मागल्या महिन्यात मी फी द्यायला विसरलोय असं वाटतं. तुम्हांला आठवतं का ?"

"मलाही आठवत नाहीय. मी काही डायरीत टिपून ठेवत नाही."

"राहिली असली तर राहू दे."

"असं कसं सर ?"

घेऊन टाका ह्या महिन्याची आणि मागल्या महिन्याची फी. संगीत कलेची सेवा आहे ही. त्यात काटेकोरपणा नको.

किती अनुभव सांगू ? पन्नास शिकवण्या आल्या आणि गेल्या. कला शिकावी. त्यातला आनंद घ्यावा ह्या हेतूपेक्षा कुठल्यातरी असांगीतिक कारणातून सुटका म्हणून व्हायोलिन शिकवणी हा मंडळींचा अव्यापारेषु व्यापार आणि त्यातूनच अशा

चमत्कारिक किश्शांची निर्मिती होते. पन्नास जणांच्या शंभर तऱ्हा.

एक वडील त्यांच्या पंधरा वर्षांच्या किंचित मतिमंद मुलास घेऊन आले. म्हणाले,

"माझा मुलगा जातायेता तुमचं व्हायोलिन ऐकतो. मला व्हायोलिन शिकायचंय हट्ट धरून बसलाय."

"अरे मग येऊ दे की त्याला."

तो यायला लागला. बोटं व्हायोलिनवर कशी ठेवायची, बो कसा फिरवायचा ते तो लवकर शिकला. मग सारेगमपधनीसां मी थांब म्हणेपर्यंत वाजवायचं त्याला सांगितलं. आश्चर्य म्हणजे तो न कंटाळता, न थांबता पंधरा मिनिटे तो हे सप्तक वाजवायचा. मग पलटे दिले. तेही न थकता वाजवायचा. त्यामुळे सूर हातात बसले. मतिमंद असला तरी संगीतात त्याला बऱ्यापैकी गती होती. त्याच्या वडिलांना मी हे सांगितले. तेही खूश झाले.



पण एक दिवस त्यांचा अनपेक्षित फोन आला.

"सर, उद्यापासून तो नाही येणार."

"का हो ?"

तो म्हणतो - सर मला मारतात. मी नाही जाणार त्यांच्याकडे.

" बाऽपरे ! असं कसं मी मारेन त्याला ?"

"सर माझा विश्वास आहे हो तुमच्यावर. पण काहीही कारण नसताना एखादी गोष्ट त्याच्या मनाने घेतली की कुणाच्या बापाला तो ऐकणार नाही." त्यांनी फोन ठेवला. त्यानंतर थोड्याशा ओळखीतून एक ५०-५५ वर्षांच्या बाई व्हायोलिन शिकायला आल्या. सुशिक्षित आणि सुधारक कुटुंबातल्या.

मी विचारलं - "का हो तुम्हांला व्हायोलिनच का शिकावंस वाटलं ?"

"अहो मी शाळेत असताना पाटील मास्तरांकडे २-३ वर्षे व्हायोलिन शिकत होते. पुढे शाळाकॉलेजचा अभ्यास, लग्न, संसार यात ते सुटलं ते सुटलं. आता मी या साऱ्यांतून मोकळी झालेय. मिस्टरही वारले. मुलगी सासरी नांदतेय. दोन्ही मुलांना चांगल्या नोकऱ्या आहेत. ती माझी थट्टा करतात."आई कुठलं तरी महिला मंडळ किंवा रटाळ दूरदर्शन मालिकांमध्ये वेळ घालविण्यापेक्षा त्या व्हायोलिन मास्तरकडे जाऊन बस. त्यालाही चार पैसे मिळतील. मग मलाही ऊर्मी आली आणि आले."

"बरं केलंत. मलाही चार पैसे हवेच आहेत." मी उपहासाने म्हणालो. शिकवणी सुरु झाली.

पाच सहा वेळा त्या आल्या. एकदा स्वर लावताना त्या खूप हसत होत्या.

"का हो हसू येतंय तुम्हांला ?"

मला किनई माझ्या मोठ्या मुलाच्या जोकची आठवण झाली. मी काल घरी प्रॅक्टीस करत होते. मुलाने विचारले, "आई, तुझा मास्तर खाटिक आहे काय? कोंबड्या चिरल्यासारखा तुझ्या व्हायोलिनमधून आवाज येतो. तो खाटिक असंच शिकवतो काय ?"

बाईंना कुठे काय बोलावं याचा पोच नव्हता. त्यांच्या गळ्यावरून सुरा फिरवावा असं क्षणभर वाटलं.

काही महिन्यांनी त्यांची मुलगी बाळंतपणास आली आणि माझी सुटका झाली. पहिलटकरणीच्या कौतुकापोटी त्यांना कोंबड्या चिरायला वेळ नव्हता.

लोक म्हणतात, व्हायोलिन शिकायला, वाजवायला फार कठीण असतं.

ह्या लोकांनी कधीही व्हायोलिन हातात धरलेलं नसतं. मग शिकणं तर दूरच. पण विधाने ठोकत जायचं.

तसं सर्वच कठीण असतं.

नित्य पद्धतशीर सराव केला तर वादनतंत्र लवकर आत्मसात होतं व चांगलं वादन होऊ शकतं.

छोटी छोटी मुले ऑर्केस्ट्रात किती छान सुरेल वाजवतात.

पण एखादा १०-१५ वर्षे सुद्धा रखडतो. कारण शिक्षकाच्या सूचनांचे नीट पालन करत नाही. शिकवणीस येतो-जातो व वर वर्णिलेल्या फालतुगिरीत वेळ जातो. अशा कलाकारांनी, विद्यार्थ्यांनी माझी वरीलप्रमाणे वागण्याने वादनापेक्षा खूप करमणूक केली.

नुकतीच माझ्या होऊ घातलेल्या तरुण शिष्याने मारलेली सिक्सर माझी टोपी उडवून गेली ती शेवटची.

"नमस्कार सर." - तरूण.

"नमस्कार." - मी.

"आपण व्हायोलिनबुवा ना ?"

"हो.हो. या."

"व्हायोलिन शिकायचंय."

"शिकवीन की. बसा. माझं नाव कुणी सुचविलं ?"

"बुवा-स्टेशनजवळ तुमच्यापेक्षा चांगले व्हायोलिनवादक आहेत. पण स्टेशन खूप लांब आहे आणि माझं घर तुमच्या क्लासजवळ आहे. मग आई म्हणाली, मग तू ह्या जवळच्या बुवांकडे जा. सुरुवातच आहे ना तुझी. मग कुणीही चालेल तुला. उगीच लांब कुठे धडपडत जातोस पावसापाण्यात."

मी गारठलोच. काय दुनिया आहे ? कुणीही येऊन खुद्द कलाकाराच्या, गुरूच्या घरी येऊन अशी दिवसाढवळ्या अब्रू लुटावी ?

मला अंतर्ज्ञान झालं. आता हा अव्यापारेषु व्यापार आणि असले चमत्कारिक अनुभव घेणे पुरे.

तो गेल्यावर मी बाहेर पाटी लावली.

१व्हायोलिन शिकवण्या बंद करतोय. पण गाण्यांचा स्टॉक असेपर्यंत सवलतीच्या दरात ती बसवून देऊ, ताना पलट्यांसह. एका महिन्यात वाजण्याची गॅरंटी. बरोबर मित्र, भाऊ, बहीण, कुत्रा, कुत्री आणल्यास, विशेष सवलत मिळेल. त्वरा करा. त्वरा करा."

## जोक्स

**पाणी**



**मुलगा :** बाबा १ ग्लास पाणी द्या ना ?
**बाप :** स्वतः उठून घे...
**मुलगा :** प्लीज द्या ना बाबा..
**बाप :** आता थोबाडीत मारीन तुझ्या !
**मुलगा :** थोबाडीत मारायला याल तेव्हा येताना पाणी आणा.

**झाड**



एक गाढव झाडावर चढते. झाडावर आधीपासूनच हत्ती बसलेला असतो.
**हत्ती :** तू झाडावर काय करतोयस ?
**गाढव :** सफरचंद खायला आलोय.
**हत्ती :** अरे गाढवा, हे तर आंब्याचे झाड आहे.
**गाढव :** मी सफरचंद सोबत घेऊन आलोय.

# अविस्मरणीय प्रवास

- पुष्पा लंकेश्वर

प्रवास करायला सर्वांना आवडतो. लहान-थोरांना, श्रीमंत-गरिबांना, आदिवासी जाति-जमातींना प्रवास हा सर्वांना या ना त्या कारणास्तव करावा लागतो. प्रवासाचे कारणे मात्र वेगवेगळी आहेत. सामान्य कुटुंबातील लोकांना नेहमी वाटते की, आपण प्रेक्षणीय स्थळी जावे व डोळ्यांचे पारणे फिटेपर्यंत प्रवास करावा. आपल्या छोट्या मुलांना प्रवासातून नवीन गोष्टींचे ज्ञान मिळवून देण्याचा प्रयत्न करावा असा प्रत्येक पालकाचा अट्टाहास असतो. हे साध्य करण्यासाठी त्यांना कठीण समस्यांना सामोरे जावे लागते. सामान्य कुटुंबातील लहानग्यांना वाटतं शाळेच्या ट्रिपमध्ये जावे. खूप धम्माल करावी. निसर्गदृश्य पहावे. खूप आनंदी व्हावे. अर्थात त्यांच्या मम्मी-पप्पांनाही वाटत असते की वेगवेगळ्या प्रसिध्द प्रदेशांना आपल्या मुलांनी भेटी देऊन नवीन गोष्टींचे ज्ञान मिळवावे. पण आर्थिक विवंचनेमुळे त्यांना हा प्रवास नशिबी नसतो.

**"प्रवास हा सुरक्षिततेचा असो की असुरक्षिततेचा याची पर्वा आता कोणास नाही. वेळेत इच्छित ठिकाणी पोहचायचे एवढेच ठाऊक म्हणूनच तर आज तरुणाईच्या जीविताचा प्रवास अत्यंत धोकादायक झाला आहे."**

प्रवास हा शब्द उच्चारताच अशाच एके काळच्या माझ्या प्रवासातल्या आठवणींना आज उजाळा मिळाला. माझा हा प्रवास होता छोटाच पण झाला मात्र अविस्मरणीय. मी, माझी आई, माझी २ वर्षीय मुलगी व १२ वर्षांचा माझा भाऊ आम्ही चौघे कुर्डुवाडी ते बॉम्बेसेंट्रर हा प्रवास करण्यासाठी कुर्डुवाडी स्टेशनवर आलो. हा आमचा प्रवास होता आईच्या औषधोपचारासाठी जे.जे. हॉस्पिटलला जाण्याचा अर्थात खूप महत्त्वाचा होता. प्रवासात दोन मुले व प्रवासाची माहिती नसलेली आई यांची जबाबदारी घेऊन रात्री प्रवास करणे टेन्शनचे वाटू लागले. माझे पती मात्र मला वारंवार निर्भिड प्रवास करण्याची सूचना देत होते. प्रवासात न घाबरता बिनधास्त प्रवास करण्याचे धाडस निर्माण केले. आम्ही स्टेशनमध्ये गाडी येण्याची वाट पाहत बसलो.

ठीक ८ वाजता सोलापूर ते बॉम्बे सेंटर अशी रेल्वे आली. त्यासरशी गाडीत जागा मिळवण्यासाठी माझे पती सरसावले. जागा योग्य ठिकाणी व योग्य डब्यात मिळविण्यासाठी त्यांचा आटापिटा सुरू झाला. प्रत्येक डबे शोधले. शेवटी एक डबा थोडा रिकामा वाटला पण त्यातील प्रवासी दरवाजा उघडायला तयार होईनात. थोडं जरी मनाविरुध्द झालं तरी खूप चिडणारे माझे पती पुढे झाले व आतील लोकांना ओरडले. दार उघडता की, पोलीसांना बोलावू. इतक्यात एकाने खिडकीतून हात बाहेर काढला. ती संधी साधून यांनी त्या व्यक्तीचा हात बाहेर खेचला व दार उघडण्यास दरडावले. ती व्यक्ती घाबरली व त्याने दार उघडले. आम्हाला कसेबसे आत पोहचवले. पण आमचे दुर्दैव असे की त्या डब्यात बसण्याची व्यवस्था नव्हती व तो डबा पोस्टाचा असल्याने तो पुण्यात बदलणारा होता. आता आम्हाला याच डब्यातून प्रवास करण्यावाचून गत्यंतर

नव्हते. सर्व पॅसेंजर अक्षरशः उभे राहूनच गोल रिंगण करून प्रवास करत होते. आम्हीही त्या रिंगणात सामील झालो. इकडून तिकडून लोकांची धक्का-बुक्की सहन करत प्रवास सुरू झाला. कुर्डुवाडी स्टेशन सोडताना यांनी मला अनेक धीराच्या गोष्टी सांगितल्या व आमचा प्रवास धाकधुकीतच पुढे सुरु झाला. गाडीतील दृश्य म्हणजे डब्यात सोलापूरहून बसलेले लोक अतिशय आडदांड स्वभावाचे होते. यांच्याबद्दल बराच वेळ अद्वातद्वा बोलत होते पण आम्ही आपले चिडीचूप राहून त्यांचे बोलणे हया कानाने ऐकून त्या कानाने सोडून देत होतो. असा हा प्रवास मी प्रथमच करत होते.

देवावर हवाला ठेवून प्रवास चालू होता. आई एकतर मनोरुग्ण होती. मुलगा (भाऊ) फारसा प्रवास करणारा नव्हता. मुलगी तर लहानच होती. कुर्डुवाडी सोडण्याआधी यांनी सांगितले होते की ठीक ४ वाजता पुण्यात पोहचाल तेथे उतरुन नंतर दुसरी पॅसेंजर गाडी येईल त्यातून प्रवास करावा लागेल.



एकदाचे पुणे आले पण रात्रीची वेळ. फलाटावर पूर्णपणे शांतता अशा अवस्थेत आम्ही पुणे स्टेशनवर उतरलो. आता बॉम्बेला जाणारी गाडी ठीक ५ वाजता येण्याचे समजले, मी ऑफिसमध्ये गेले तेथे चौकशी केली असता तेथील ऑफीसर म्हणाले, “आता १ तासाने बॉम्बे पॅसेंजर येईल, तिकीटचेकरला हेच टिकीट दाखवा व पुढील प्रवास करा. सर्व काही व्यवस्थित होईल.” ह्या ऑफीसरने दिलेल्या धीरामुळे बरेच टेन्शन कमी झाले. माझा भाऊ मात्र फार बोअर झाला होता. तो मला म्हणाला, “ताई मी येथून जवळच ससून हॉस्पिटलला मामांकडे जाऊ का?” त्याला कसेबसे समजावले व आम्हाला तुला सोडून कसे जाता येईल? एवढ्यात गाडी आली. आम्ही चौघेही लेडीज डब्यात शिरलो. येथेही आमचे नशीब आडवे आले. तिकीटचेकर आले व म्हणाले, “या मुलाला या डब्यात प्रवेश मिळणार नाही.” झाले पुन्हा आम्हाला विवंचना सुरुच. मग आम्ही सर्वच खाली उतरून दुसऱ्या जनरल डब्यात बसलो. जागा मात्र नव्हतीच. कसेबसे उभे राहून प्रवास सुरू झाला. अशा अनपेक्षित समस्या निर्माण झाल्या की आपण म्हणतो, ‘आज कोठे दिवस उगवला होता व कोणाचे अपशकुनी तोंड सकाळी पाहिले बरे,’ असो. “आलिया भोगासी असावे सादर” असे म्हणतात तद्वत आम्ही बॉम्बे सेंटरची वाट पाहू लागलो. ठीक ९ वाजता आम्ही आमच्या इच्छित स्टेशनवर उतरलो. सकाळची वेळ मुंबईच्या धकाधकीच्या जीवनाचे दर्शन झाले. जो तो आपल्या करियरच्या ओढीने भारावून धावत सुटला होता. प्लॅटफॉर्मवर अनेक विक्रेते आपआपल्या वस्तूबद्दल ओरडून सांगत होते. आमचे लक्ष फक्त टॅक्सी मिळवून घर कधी गाठतो याकडे लागले होते. आमचा प्रवास हा अतिशय टेन्शनमध्ये झाल्याने चेहऱ्यावर खूपच मलूल भाव उमटले होते. कपड्यांची, केसांची खूपच दुरवस्था झाली होती. एकंदर आम्ही अगदीच विद्रूप दिसत असू अशा भयानक स्थितीत आम्ही घरी पोहचलो. घरातील सर्वांना खूपच वाईट वाटले. सर्वांनी धीराचे शब्द देऊन आमचे यथोचित स्वागत केले. स्नानादी विधी आटोपला तेव्हा कुठे आम्हांला बरे

वाटले.

आमच्या या छोट्याशा प्रवासाने आम्हांला एवढे जीवघेणे झाले तर मग आजकालच्या तरुण मुलामुलींना तर परदेशात कामानिमित्त जावे लागते त्यांच्या प्रवासाचे अनेक अजब अनुभव त्यांना येतच असतील, नाही का? आजकाल तर रेल्वेच्या प्रवासातल्या अनेक दुर्घटना, लुटालूट तरुणींवर होणारे अत्याचार, जागा मिळवताना स्त्रियांचे होणारे हाल, प्रसंगी मृत्यदेखील होतात. पूर्वीपासून लोक म्हणत एस.टी.चा प्रवास फारच सुखकर पण आता तोही चालक-वाहकाच्या लापरवाहीमुळे जीवितहानीस किंवा दरीत कोसळून मृत्य होण्यास कारण झाला आहे. एस.टी., रेल्वे, विमान या प्रवासांची आता गणतीच राहिली नाही. आता तर अंतराळात प्रवास होऊ लागला आहे आणि त्याही स्त्रिया येथे पोहचू लागल्या आहेत.

प्रवास हा सुरक्षिततेचा असो की असुरक्षिततेचा याची पर्वा आता कोणास नाही. वेळेत इच्छित ठिकाणी पोहचायचे एवढेच ठाऊक म्हणूनच तर आज तरुणाईच्या जीविताचा प्रवास अत्यंत धोकादायक झाला आहे. दररोज आपल्या अवतीभोवती व पेपर्समध्ये वाचावयास मिळते बाईकवरून जाताना, कारमधून जाताना अनेकांचे मृत्यू झाल्याच्या बातम्या कळतात. ज्यांच्याकडे स्वतःची वाहने आहेत ते केव्हाही कधीही प्रवासासाठी बाहेर पडतात. वेळेचे भान ते बाळगत नाहीत. ज्यांना अपरिहार्य कारणास्तव प्रवास करायचा त्यांना दुसऱ्यांचे वाहन घेऊन जावे लागते. त्यावेळी जो वाहक असतो त्याला सर्व वाहनाविषयी माहिती असेल की नाही याची शहानिशा होणे गरजेचे आहे. पूर्वी प्रवास बैलगाड्यांचा असायचा पण तो अगदी सीमित अंतरापर्यंतचाच होता. आदिवासी जाती व जमातीचे लोक पायी किंवा घोड्यांवर प्रवास करायचे. पोटाची खळगी भरण्यासाठीचा त्यांचा हा प्रवास म्हणजे दऱ्याखोऱ्यातून खडतरपणे अहोरात्र असायचा. एखादा गावाच्या गावकुसाला आपली पाल ठोकायची, सकाळी उठून गावात आपल्याजवळची औषधी वनस्पती विकायची किंवा डोंबाऱ्याचा खेळ दाखवून मिळेल तेवढा पैका घेऊन पुढील गावी प्रवास करायचा असे अनेकांचे अनेकविध प्रवास माझ्या अनुभूतीत आहेत.

कोणीतरी प्रवासाविषयी सुवचन सांगितले आहे की, 'केल्याने देशाटन ज्ञानभांडार भरते काठोकाठ'. तेव्हा ज्ञानात भर पडण्यासाठी व देशादेशीचे रितीरिवाज व संस्कृती जवळून पहावयाची असेल तर देशाटन करायलाच हवे असे माझे मत आहे. आता आम्ही कुटुंबीयांनी ठरवले आहे की, थायलंडचा प्रवास करून तेथील प्रेक्षणीय स्थळांना भेट देऊन बुध्दतत्त्व जाणून घेण्याचा मानस कितपत साध्य होईल ते प्रवासानेच सिध्द होईल.

ॐ

## जोक्स

### झाड बोलू लागले तर...

**नितेश :** अरे सतीश, हे आंब्याचे झाड बोलू लागले तर काय मज्जा येईल ना !

**मितेश :** मजाच येईल ! कारण, ते बोलू लागल्यावर प्रथम तुला सांगेल, की मी वडाचे झाड आहे.

### फोन

**सोन्या :** बाबा, पक्याच्या वडिलांचा फोन होता. ते म्हणाले, "तुम्ही माझा गृहपाठ लिहून पूर्ण केला की वही त्यांच्याकडे पाठवा!"



With Best Compliments from

# K. E. Infrastructure Pvt. Ltd.



**Mr. Chandrakant Kherade**
**Managing Director**

5, Siddarth Tower, Kopri Colony, Pai Road, Thane (W) 400 601.
Email : keinfrastructure&yahoo.com

# योगा-योग

- निलेश बामणे

विजय त्याच्या लॅपटॉपवर काहीतरी टाईप करण्यात व्यस्त होता, इतक्यात दरवाजा हळूच आत ढकलत प्रतिभा गोड आवाजात म्हणाली, 'मे आय कम इन सर !' तिचा गोड आवाज ऐकून विजयने लॅपटॉपमध्ये खुपसलेले आपले डोके वर काढले आणि डोळे वर करून प्रतिभाकडे पाहत म्हणाला, प्लीज कम इन ! प्रतिभा त्याच्या टेबलाजवळ येताच त्याला म्हणाली, 'बाहेर तुमचे बाबा आलेत तुम्हाला भेटायला! ' ते ऐकताच चेहरा निर्विकार करून विजय प्रतिभाला म्हणाला, ''त्यांना बाहेरच थांबव, माझं काम आटोपलं की तुला सांगतो मग पाठव त्यांना आत.'' त्यावर प्रतिभा आश्चर्याने म्हणाली, ''पण सर ते तुमचे बाबा आहेत ? '' त्यावर विजय किंचित रागावून तिला म्हणाला, ''तुला सांगितलं तेवढ कर. ते येथे त्यांच्या मुलाला भेटायला नाही आलेत. ते भेटायला आलेत उद्योगपती विजय मराठेला, तू जा आणि त्यांना काही चहापाणी हवं काय ते विचार आणि मी फोन केला की त्यांना आत पाठव ! '' त्यावर प्रतिभा ओके सर ! म्हणत दरवाजा ओढून घेत बाहेर गेली. बाहेर चारही बाजूला नजर फिरवून सोफ्यावर शांत बसलेले विजयच्या बाबांच्या जवळ जात प्रतिभा म्हणाली, ''बाबा सर जरा कामात आहेत. थोड्या वेळाने काम आटोपलं की तुम्हाला भेटतील. तोपर्यंत तुम्ही काय घेणार चहा-कॉफी ? '' त्यावर विजयचे बाबा चहा म्हणताच प्रतिभाने मनिषाला हाक मारली आणि बाबांसाठी चहा आणि नाष्टा आणायला सांगितला. प्रतिभा फोन जवळच सोफ्यावर बाबांपासून काही अंतरावर बसली, काही तरी बोलावं म्हणून बाबा प्रतिभाला म्हणाले, ''मुली तुझं नाव काय ? '' त्यावर ''प्रतिभा'' गोड आवाजात प्रतिभा म्हणाल्यावर बाबा म्हणाले, प्रतिभा छान नाव आहे. येथे किती वर्षे काम करतेयस ? त्यावर प्रतिभा म्हणाली, गेली चार वर्षे ! ''तुझे साहेब फार रागवत नाहीत ना ? '' त्यावर प्रतिभाने मानेनेच नकार दिल्यावर म्हणजे रागावतात, साक्षात जमदग्नीचा अवतार आहे तो. बरीच वर्षे प्रत्यक्ष भेटला नाही म्हणून भेटायला आलो तर तो आता इतका मोठा झालाय की प्रत्यक्ष जन्मदात्या बापालाही भेटण्यासाठी वाट पाहायला लावतोय. ते गालात गोड हसत म्हणाले. त्यावर प्रतिभा काहीतरी बोलणार इतक्यात मनिषा चहा- नाश्ता घेऊन आली आणि समोरच्या टेबलाव ठेवून चटकन निघून गेली. प्रतिभाने स्वतः चहाचा कप बाबांच्या हातात दिल्यावर त्यांनी प्रतिभालाही चहा घेण्याची विनंती केली. चहा पिता पिता समोरच्या भिंतीवरील काचेच्या कपाटातील शेकडो पुस्तके पाहात बाबा प्रतिभाला म्हणाले, ''ही पुस्तके कोण वाचतो ? '' त्यावर प्रतिभा म्हणाली,

**"मला दारू पिण्याचा मोह कधीच झाला नाही. कारण मी माझ्या मोहावर विजय मिळवला आहे. मोह नष्ट होणे हेच गीतेचे फळ आहे. आणि ते मला प्राप्त झालेले आहे."**

''सर वाचतात कधी- कधी संदर्भासाठी.'' त्यावर बाबा म्हणाले, ''विजय उद्योगपती नसता झाला तर या पुस्तकात त्याचीही दहा – बारा पुस्तके नक्की असती.'' त्यावर प्रतिभा ती कशी ? म्हणताच बाबा आश्चर्याने म्हणाले, ''म्हणजे तुला माहीत नाही का ? तुझा जमदग्नी असणारा बॉस चांगला कवी, लेखकही आहे ते ? '' कित्येक दिवाळी अंकात त्याचे लेख, कथा आणि कविता प्रकाशित झालेल्या आहेत. मी त्याला त्याचे लिखाण थांबवून इतर उद्योग करायला सांगितले म्हणून त्याचा माझ्यावर राग आहे. उद्योगपती म्हणून तो यशस्वी होणार याची मला खात्री होती. कारण माझ्यासोबत त्याने अनेक छोटे-मोठे उद्योग केले होते ज्यात कधीच आम्हांला तोटा झालेला नव्हता पण त्याने लेखक आणि कवी होण्याचं मनावर घेतलं आणि त्याचे भिकेचे डोहाळे सुरू झाले. माझा राजासारखा राहणारा मुलगा कंगाल माणसासारखं जीवन जगू लागला. मला ते पाहावलं नाही. कारण मला त्याला फक्त आणि फक्त राजासारखं जगताना पाहायचं होत जस आता जगतोय ! तो लेखक म्हणूनही यशस्वी झालाच असता पण कदाचित आज त्याच्याकडे जे काही आहे ते नसतं. मी त्याला साहित्यापासून दूर केला आणि तो सर्वांपासून दूर झाला अगदी जवळच्या माणसांपासूनही. पूर्वीही दिवस-रात्र खपायचा आणि आजही दिवस-रात्र खपतोय. फक्त पूर्वी त्याला त्या खपण्यातून आनंद मिळायचा जो आता मिळत नाही. आता मिळतोय तो फक्त पैसा ! इतकं सगळं मिळवूनही तो सुखी-समाधानी नाही. प्रतिभा, तुला काय वाटत ? तुझे सर लग्न करतील की नाही ? त्यावर प्रतिभा किंचित संकोचून म्हणाली, ''त्यावर मी भाष्य नाही करू शकत. कारण आमच्यात खाजगी विषयावर अजिबातच बोलणं होत नाही आणि सरांना ते आवडतही नाही.'' तू का नाही अजून लग्न केलसं ? त्यावर प्रतिभा म्हणाली, ''माझ्या विधवा आईची आणि माझ्या तीन लहान बहिणींची जबाबदारी आहे माझ्यावर त्या जोपर्यंत मार्गी लागत नाहीत तोपर्यंत मी लग्नाचा विचार नाही करू शकत.'' त्यावर बाबा म्हणाले, ''ती स्वयंपाकीण काय तिच नाव हां मनिषा तिला यापूर्वीही कोठेतरी पाहिल्यासारखं वाटतयं.'' तुम्ही दोघी दिवसभर त्याच्यासोबत असता, पण रात्रीच्या जेवणाचं वगैरे काय करतो. त्यावर प्रतिभा म्हणाली, ''सर सहसा बाहेरच काही खात नाहीत. मनिषा त्यांचा रात्रीचा स्वयंपाकही बनवून जाते.'' अग! पण तुझ्या सरांना आपली माणसे सोडून असं एकाकी राहण्याची काही गरज आहे का ? लग्न कर सांगतो तर तेही ऐकत नाही, म्हणतो मला लग्न करून देशाच्या लोकसंख्येत भर घालायची नाही. मला सांग त्याच्या एक-दोन पोरांनी असा देशाच्या लोकसंख्येत काय फरक पडणार आहे ? त्यावर प्रतिभा म्हणाली, ''माफ करा बाबा, पण तुमच्या या मताशी मी सहमत नाही. सरांसारखा जर प्रत्येकाने देशाचा, देशाच्या लोकसंख्येचा विचार केला असता तर आज आपला भारत देश प्रगत राष्ट्र असता. माझ्या बाबांनी नाही का मुलाच्या हव्यासापोटी आम्हा चार मुलींना जन्म दिला आणि स्वतः गेले वर माझ्या स्वप्नांची राखरांगोळी करून. त्यावर थोडा वेळ विचार करून बाबा म्हणाले, ''तू म्हणतेयस त्यात तथ्य आहे. विजयने नुसतं लग्न केलं आणि मुलांना जन्माला नाही घातलं तरी चालेल मला.'' त्यावर प्रतिभा काही तरी बोलणार इतक्यात फोन खणखणला. विजयने फोनवर प्रतिभाला बाबांना आत पाठवायला सांगितले आणि ते आत असेपर्यंत आत आणखी कोणाला न पाठविण्याची सूचनाही दिली.

प्रतिभा बाबांना सरांनी तुम्हांला आत बोलावलयं म्हणताच बाबा विजयच्या कॅबिनच्या दिशने गेले. विजय त्यांची वाट पाहात दारातच उभा होता. ते दारात पोहचताच त्यांना खुर्चीत बसायला सांगितले. ते बसल्यावर तो त्याच्या खुर्चीत बसला. विजयच्या कॅबिनमध्येही बरीच पुस्तके होती. काही प्रमाणपत्रे आणि स्मृतीचिन्हेही होती. पण ती सारी उद्योगाशी संबंधित होती. विजयला साहित्यीक म्हणून मिळालेल्या प्रमाणपत्रांचा आणि स्मृती चिन्हांचा त्यात समावेश नव्हता. ते पाहून बाबा विजयला म्हणाले, तुझ्या कवितांना आणि कथांना मिळालेली प्रमाणपत्रे आणि स्मृतीचिन्हे येथे दिसत नाहीत. त्यावर विजय किंचित रागातच म्हणाला, ''हे ऑफीस विजय मराठे नावाच्या साहित्यीकाच नाही, तर विजय मराठे या उद्योगपतीच आहे.'' माझ्यातील साहित्यीक त्या दिवशीच मेला ज्या दिवशी मी मनाशी फक्त आणि फक्त रोजच्या तुमच्या टोमण्याला वैतागून उद्योजक होण्याचा निर्णय घेतला. म्हणजे माझ्यावरचा तुझा राग अजून शांत झालेला नाही. त्यावर विजय म्हणाला, ''नाही तो कधीच शांत होणार नाही, मला स्वतःसाठी नाही तर समाजासाठी, देशासाठी जगायचं होतं. काही तरी भरीव कार्य करायचं होतं. पण तुम्ही माझी किंमत पैशात केलीत. तेव्हा माझा नाईलाज झाला एक बेवडा आणि एक लेखक यांचीही तुलना होऊ शकते हे तुमच्यामुळेच मला कळलं आणि त्याक्षणी मी पैशाने माझी किंमत वाढविण्याचा निर्णय घेतला. आता कशाला रडताय तुमचं स्वप्न पूर्ण झाल ना ? माझ्या स्वप्नांची राखरांगोळी झाली म्हणून काय झालं ?'' त्यावर बाबा विजयला म्हणाले, ''माझा तुझ्या स्वप्नांना कधीच विरोध नव्हता. पण सध्याच्या स्वार्थी जगात पैशाअभावी तुझ्यावर कोणते संकट ओढवू नये असं मला वाटतं होत. आज तू जितका श्रीमंत झाला आहेस तितका श्रीमंत तू व्हावास हे मला अपेक्षित नव्हतं.



पहिला तू लिखाणाच्या मागे वेडा झाला होतास आता पैशाच्या मागे वेडा झालेला आहेस. मला जे अपेक्षित होत ते झालेलं नाही. तू संसारात रमावंस असं मला वाटत होत. पण तू कालही संन्याशी होतास आणि आजही संन्याशीच आहेस.'' बाबांचे बोलणे मध्येच थांबवत विजय म्हणाला, ''ते जाऊदे ! आज तुम्ही मला भेटायला येथे का आलात ? जे काही होतं ते फोनवरच बोलायचं ना. उगाच तसदी कशाला घ्यायची.'' त्यावर बाबा म्हणाले, ''येथे जवळच एक काम होते. म्हटल तुझं ऑफीस येथून जवळच आहे तर भेटूनच जाऊया. पत्ता नव्हता माझ्याकडे म्हणून अजयला फोन केला. त्याने दिला फोनवरच. आता रमेशकडे जाणार आहे. तेथून कविताकडेही जाणार आहे. बरेच दिवस झाले विशालला पाहिले नाही आणि आता त्याचा वाढदिवसही जवळ आला आहे ना ? तुझी आई तुझी सारखी आठवण काढत असते. एकदा वेळ काढून गावी येऊन तिला प्रत्यक्ष भेटून जा! त्यावर विजय म्हणाला, ''आता काय प्रत्यक्ष भेटायचं, रोजच तर आम्ही पाहतो एकमेकांना फोनवर.'' त्यावर बाबा म्हणाले, ''हो ! या फोनमुळे

माणसे जवळ आली पण त्यांची मने मात्र लांब गेली... आता मला खरंच वाटतयं तू लेखक होतास तेच बरं होत. निदान तेव्हा तू मनाने विचार करायचास. पण आता तू डोक्याने विचार करतोस आणि तुझ्या खर्च होणाऱ्या मिनिटांचा पैशात हिशोब ठेवतोस. बाप म्हणून तुला काही सांगण्याचा अधिकार मला आहे की नाही मला माहीत नाही. तरीही ऐक, आता एकदातरी मागे वळून बघ माझ्यासाठी नाही, तुझ्या आनंदासाठी... चल मी निघतो कधी जमलं आणि गावी येणार असशील तर कळव. आता सरळ रमेशकडे जाणार आहे आणि चार-पाच दिवसांनी गावी जायच म्हणतोयं.'' त्यावर विजय म्हणाला, ''थांबा. मी प्रतिभाला सांगतो ड्रायव्हर सोडेल तुम्हाला गाडीने अजयच्या घरी...'' त्याने तेथूनच प्रतिभाला फोन करून सांगितले. प्रतिभा थोड्या वेळाने आत येऊन म्हणाली, ''गाडी तयार आहे.'' बाबा प्रतिभासोबत बाहेर गेले. वाटेत ते प्रतिभाला म्हणाले, ''तुझा साहेब कधी आम्हांला भेटायला गावी आलाच तर तूही ये त्याच्यासोबत शक्य झालं तर.'' त्यावर मानेनेच होकार देत प्रतिभा गोड हसली. बाबा निघून गेल्यावर प्रतिभा विजयच्या कॅबीनमधे गेली आणि विजयला म्हणाली, ''बाबा गेले हा ड्रायव्हरसोबत. सर तुमचे बाबा फारच गोड आहेत. '' त्यावर विजय म्हणाला, हो जगासाठी ते गोडच आहेत पण माझ्यासाठी मात्र ते कडू कारलं आहेत. माझं सार आयुष्य कडू करून सोडणार. त्यावर प्रतिभा म्हणाली, ''सर आज तुम्हाला काय कमी आहे म्हणून तुम्ही त्यांच्यावर रागावलात.'' त्यावर विजय म्हणाला, ''प्रतिभा ते तुला नाही कळणार...'' त्यावर प्रतिभा किंचित उत्साहात म्हणाली, ''सर... बाबा म्हणत होते की, तुम्ही पूर्वी लेख, कथा आणि कविताही लिहायचात. माझा तर माझ्या कानांवर विश्वास बसला नाही. तुमच्यासारखा जमद...सॉरी रागीट माणूस कविताही लिहू शकतो, हे मला तर अजूनही खरं वाटत नाही.'' ते ऐकुन विजयने आपल्या समोरच्या टेबलाच्या खणात हात टाकला आणि एक पुस्तक बाहेर काढलं आणि ते प्रतिभाच्या हातात दिले. प्रतिभाने ते पुस्तक आश्चर्याने पाहिले तर तो एक कवितासंग्रह होता. त्या कवितासंग्रहाचे नाव होते 'प्रतिभा' आणि त्या पुस्तकाचा कवी होता विजय मराठे. ते पुस्तक पाहात प्रतिभा म्हणाली, ''मी हा कवितासंग्रह घरी घेऊन जाऊ का ? '' त्यावर विजय म्हणाला, ''हो तुलाच वाचण्यासाठी दिलायं. तुला खरं वाटत नाही ना की मी कविताही लिहू शकतो हे ! '' ''पण सर ही प्रतिभा कोण आहे ?'' त्यावर विजय म्हणाला, फालतू प्रश्न विचारू नकोस, पण एक लक्षात ठेव तुझं नाव फक्त प्रतिभा होत म्हणून मी तुला माझ्याकडे कामाला ठेवलं. नाहीतर कदाचित ठेवलंही नसत. त्यावर प्रतिभा काहीच न बोलता रागाने निघून गेल्यावर मनिषा विजयच्या कॅबीनमध्ये चहा आणि नाष्टा घेऊन आली असता, विजयने तिच्याकडे तिच्या मुलांची चौकशी केली आणि प्रतिभा गेली का घरी म्हणून चौकशी केली त्यावर मनिषा म्हणाली, ''प्रतिभा आताच गेली. जरा रागात दिसत होती. तू काही म्हणालास का साहेबा तिला ?'' त्यावर विजय म्हणाला छे! ग! माझा कवितासंग्रह तिला वाचायला दिला. त्यावरच 'प्रतिभा' नाव पाहून मला प्रश्न विचारला, तर मी तिला म्हणालो तुझं नाव प्रतिभा आहे म्हणूनच मी तुला कामाला ठेवलं त्याचा राग आला असेल कदाचित. तसंही मी ठरवूनही तिच्यावर रागावू शकत नाही. कारण ती फारच गोड आहे कवितासारखी ! ती फारच साधी-भोळी आहे, तिच्या

बोलण्यात जराही कृत्रिमता जाणवत नाही, तिच्या मनात जे असते तेच तिच्या चेहऱ्यावर दिसतं. तिचा चेहरा वाचायला फारच सोप्पा आहे. अशा माणसांचा काही लोक गैरफायदा उचलतात. ती आपल्या कामाशी अत्यंत प्रामाणिक आहे. त्या व्यतिरीक्त ती बाकीच्या गोष्टीत कधीच नाक खुपसत नाही. चार वर्षात तिला तू येथे स्वयंपाकीण म्हणून काम करतेस हे माहीत आहे. पण तू माझी मैत्रीण आहेस हे अजूनही माहीत नाही. माझ्या खाजगी आयुष्याबद्दल ती कधीच काही जाणून घेण्याचा प्रयत्न करत नाही आणि स्वतःच्या खाजगी आयुष्याबद्दल कधीच काही सांगत नाही. आज बाबा अचानक आले आणि तिच्या डोक्यात नको नको ते भरून गेले. त्यांनी तुला ओळखलं नाही ना ? त्यावर मनिषा म्हणाली, ''ओळखलं असतं पण मीच त्यांच्यासमोर फार काळ उभी राहीलेच नाही. उगाच तुझ्या लग्नाची जबाबदारी ते माझ्या खांदयावर टाकायचे!'' त्यावर विजय म्हणाला, ''ते ही खरं आहे, बाबांना वाटतं की मी आता बदललोय. माझ्यातला माणूस हरवून बसलोय ? '' त्यावर मनिषा म्हणाली, ''मला तसं नाही वाटत. कारण मी न मागताही तू मला कितीतरी मदत केली आहेस. इतकेच काय आपल्या कंपनीतही तू कित्येकांना न सांगता न मागता मदत केली आहेस. प्रतिभालाही तू किती सांभाळून घेतोस. तिच्या चुका तू स्वतः सुधारल्यास. पण तिला कधी एका शब्दाने बोलला नाहीस. पण आता प्रतिभा कामात फारच तरबेज झाली. तुझ्या गैरहजेरीत पण ती सारं सांभाळते.'' त्यावर विजय म्हणाला, मी मुद्दामच बाबांना येथे थांबायला सांगितलं नाही. कारण त्यांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे नाहीत माझ्याकडे. म्हणूनच इतके वर्षे मी त्यांना प्रत्यक्ष भेटण्याचेही टाळत होतो. मला जे जे मिळवायचं होतं ते सारं मी मिळवलं. पण आता या साऱ्यातही माझं मन रमेनासं झालयं. मी आता इतका मोठा झालोय की आता मला मनात असूनही लहानही होता येत नाही. तुझ्या मनातील माझी प्रतिमा आणि प्रतिभाच्या मनातील माझी प्रतिमा यात कमालीचं अंतर आहे. तू माझ्यातील कवीला भेटली. जो सतत कशाच्यातरी, कोणाच्यातरी प्रेमात पडत होता आणि प्रतिभा माझ्यातील उद्योगपतीला भेटली आहे जो सतत पैशाच्या जोरावर काहीतरी मिळविण्यात गुंग असतो. तुझ्या नजरेत मी रसिक, तर प्रतिभाच्या नजरेत अरसिक आणि रुक्ष आहे. ते जाऊदे, रात्री जेवणात काय केलं आहेस ? त्यावर मनिषा म्हणाली, ''भेंड्याचे भरीत केले आहे तुझ्या आवडीचे.'' त्यावर विजय म्हणाला, ''तू जर मला पुन्हा भेटली नसतीस तर माझं काय झाल असतं त्या देवालाच ठाऊक. माझं ऑफीस घरातच आहे म्हणून बर... नाहीतर मला असं हवं तेंव्हा हव ते खायला प्यायला मिळालं असत का ? '' बरं ! आता उशिर झालायं तू घरी जा. नाहीतर तुझा नवरा आणि सासू माझ्या



नावाने बोंबा मारायचे. त्यावर गोड हसून मनिषा निघून गेल्यावर विजय आपल्या कॅबीनमधून बाहेर पडला आणि ताजातवाना होऊन हॉलमध्ये टी.व्ही समोर जाऊन बसला. त्याच्या आवडती मालिका पाहात. विजय मालिका फक्त एकटा असताना पाहातो. कारण कोणी त्याच्यावर हसू नये म्हणून त्याचं हे गुपित फक्त घराच्या पहारेदाराला आणि ड्रायव्हरला माहीत होत. कारण ते दोघेच तर त्याचे रात्रीचे सोबती होते. रात्री ड्रायव्हर आणि पहारेकरी त्याच्या हॉलमध्येच झोपत असत. त्या तिघांनी मिळून बऱ्याच पाटर्या झोडल्या होत्या. घरातल्या घरात पण कोरड्या, ओल्या नाहीत. कधी-कधी त्यांच्या जोडीला विजयचे काही मित्रही असत. त्यांच्या बायका माहेरी गेल्या की. रात्री उशिरा जेवून विजय त्याच्या बेडरूममधे झोपायला जात असे. विजयच्या बेडरूममधे जाण्याची परवानगी फक्त मनिषालाच होती. त्याच्या बेडरूमच्या भिंती सकाळी बाबांनी चौकशी केलेल्या प्रमाणपत्रांनी आणि स्मृतीचिन्हांनी भरलेली होती. त्याने आतापर्यंत लिहिलेल्या कविता, लेख आणि कथांची कात्रणे तिथे फ्रेम करून लावलेली होती. त्याची प्रकाशित पुस्तके तिथे व्यवस्थित मांडलेली होती. साहित्यीक म्हणून त्याने इतर मोठ-मोठ्या साहित्यीकांसोबत काढलेली छायाचित्रे छान फ्रेम करून लावलेली होती. मागील कित्येक वर्षात विजयने एक शब्दही लिहिला नव्हता. पण त्याने त्याचे वाचन मात्र थांबविले नव्हते. कित्येकदा तर तो वेड्यासारखे स्वतःचेच साहित्य पुन्हा पुन्हा वाचत बसत असे. वाचनाशिवाय तर तो जगण्याची कल्पनाच करू शकत नव्हता. त्याच्या बाबांच्या घरात विजयच्या साहित्याला हक्काची जागा नव्हती. ती जागा मिळविण्यासाठी विजयने त्याच्या आयुष्यातील कित्येक वर्षांची किंमत मोजली होती. आज विजयला पैशामुळे मान-सन्मान मिळत होता. पण विजयला साहित्यीक म्हणून मिळणारा मान-सन्मान हवा होता. पण तरीही साहित्याला पूर्णपणे वाहिलेल्या साहित्यीकांच्या कामी येत होता याचा फार आनंद होत होता. आता विजय टी.व्ही. वर त्याच्या आवडीच्या मालिका निवांत पाहू शकत होता. पण पूर्वी त्याच्या बाबांना आवडत नाहीत म्हणून त्यांना मालिका पाहाता येत नसत. खरं म्हणजे एखादी मालिका लिहिण्याचे त्याचे स्वप्न होतं, पण ते अपूर्णच राहिलं. विजयच्या मनात त्याच्या बाबांबद्दल प्रचंड तिरस्कार होता. कारण त्यांनी जाणतेअजाणतेपणी त्याच्या अनेक स्वप्नांना सुरुंग लावला होता आणि काही स्वप्नांना विजयने स्वतः आपल्या कुटुंबाच्या सुरक्षित भविष्यासाठी सुरुंग लावून घेतला होता. आता विजयच्या बाबांना विजयच्या एकाकी जगण्याची काळजी वाटत होती. पण हे एकाकी जीवन जगणं हेच तर विजयचं स्वप्न होत. आता तो एका अलिशान शांत घरात एकटाच राहात होता. हेच तर त्याच्या स्वप्नातील घर होतं. प्रत्येकाला आपल्या मनाप्रमाणे जगता यायला हवं. त्याला जे वाटेल ते त्याला करता यायला हवं, आपल्या आयुष्याचा चांगला-वाईट प्रत्येक निर्णय स्वतः घ्यायला हवा. स्वतंत्र्य देशात खऱ्या अर्थाने प्रत्येकाला स्वतंत्रपणे जगता यायला हवे. म्हणूनच प्राणी पक्षी पाळणारी लोकं विजयच्या डोक्यात जातात. इतकेच नव्हे तर माणसाने माणसांना स्वतःत गुंतवून ठेवणेही त्याला आवडत नाही. हेच कारण होतं ज्यामुळे विजय लग्न करणं टाळत होता. त्याला कोणावरही कोणतचं नातं लादायच नव्हतं. मनिषाही फक्त गरज म्हणून त्याच्याकडे काम करत नव्हती, तर तीही कधीकाळी त्याच्यावर मनापासून प्रेम करत होती. ती जर अशिक्षीत नसती तर कदाचित

ती विजयच्या प्रेयसीची जागा घेऊही शकली असती. त्याच्या आयुष्यात आलेली प्रत्येक स्त्री त्याच्या प्रेमात पडलीच होती. पण विजय नेहमीच जाणुनबुजून त्यांच्याकडे दुर्लक्ष करत आला. विजयला कधीच सुंदर दिसणारी रेखीव वगैरे प्रेयसी नकोच होती. त्याला त्याच्यावर नव्हे तर त्याच्या साहित्यावर प्रेम करणारी प्रेयसी हवी होती.

एके दिवशी प्रतिभा विजयच्या कॅबीनमध्ये आल्यावर आज त्याचा मुड चांगला आहे पाहून म्हणाली, ''सर ! तुमच्या कविता फारच सुंदर आहेत. माझ्या तिन्ही बहिणींना फारच आवडल्या. '' तिन्ही बहिणींना हा उल्लेख ऐकताच विजयने कान टवकारले. काय तिन्ही बहिणींना, म्हणजे तुला तीन बहिणी आहेत ? कधी म्हणाली नाहीस. त्यावर प्रतिभा म्हणाली, ''नाही ते सांगण्याची कधी वेळच आली नाही. मग ! उगाच तुम्हाला सांगण्याचं काही कारणचं नव्हतं ना ? '' त्यावर आणखी कोण कोण आहे तुझ्या घरी ? त्यावर प्रतिभा म्हणाली, ''मी, माझी आई आणि माझ्या तीन लहान बहिणी.'' तुझे वडिल, ते वारले पाच वर्षापूर्वी मग कुटुंबाची सारी जबाबदारी कोण सांभाळतो ? त्यावर प्रतिभा म्हणाली, ''मीच सांभाळते. आई आणि बहिणीही त्यांच्या परीने हातभार लावतात त्यांना जमेल तसा. एकदा का माझ्या बहिणी मार्गी लागल्या की मोकळी ! '' त्यावर विजय म्हणाला, ''या भ्रमात राहू नकोस ! या सगळ्यात तुझं आयुष्य संपेल. पण तू त्यातून मोकळी होणार नाहीस आणि तू ज्यांच्यासाठी इतका त्याग केलास तेच तुला प्रश्न विचारतील तुला इतका त्याग कोणी करायला सांगितला ? तुझ्या जीवावर तुझ्या बहिणी त्यांच्या आवडत्या पुरुषाचा हात पकडून जेव्हा निघून जातील, तव्हा तुझी आईच तुला म्हणेल तू ही एखाद्याचा हात धरून जायचं होत ना तुला कोणी अडवलं होतं ? तेव्हा तू स्वतःच्या मुर्खपणाला दोष देशील माझ्यासारखा. मी माझ्या कुटुंबासाठी माझ्या प्रत्येक सुखाचा त्याग केला आणि एका क्षणाला तो माझा मुर्खपणा होता हे माझ्या लक्षात आले. तेव्हा मी माझी स्वप्ने, माझ्या आवडी सारे गुंडाळून हा आजचा उद्योजक विजय मराठे जन्माला घातला ज्याला तू जमद्ग्नी म्हणतेस! '' त्यावर प्रतिभा म्हणाली, ''पण सर तुम्ही तुमच्या कर्तव्यात कसूर केली नाहीत ना ? मी ही करणार नाही. मग त्याचे परिणाम काही ही होवोत. बरं ! '' सर, तुमच्या आज चार मिटींग आहेत. त्यावर विजय म्हणाला, ''आजच्या मिटींग संपवून मी माघारी येईपर्यंत तू ऑफीसमध्येच थांब. मला तुझ्याशी महत्वाच्या विषयावर चर्चा करायचेय. संध्याकाळी विजयला यायला तासभर उशीरच झाला. प्रतिभा त्याची वाट पाहात विजयच्या कॅबीनमध्येच काम करत बसली होती. विजयही घाईघाईत कॅबीनमध्ये आला. प्रतिभाशी जुजबी चर्चा केल्यावर, मनिषाला चहा-नाश्ता आणायला सांगितलं. मनिषा नाश्ता घेऊन आल्यावर विजयने तिलाही घरी जायला सांगितले आणि प्रतिभासह चहा पिता-पिता प्रतिभाला म्हणाला, ''आज घरी जायला उशीर झाला तर आई काळजी करेल ना ? '' त्यावर प्रतिभा म्हणाला। ''नाही करणार. मी मघाशीच फोन करून सांगितलं की मला यायला उशीर होईल म्हणून.'' थोड्या वेळाने प्रतिभा जायला निघताच विजय तिला म्हणाला, ''प्रतिभा थांब. मी सोडतो तुला गाडीने. मी तिकडेच चाललोय. त्यावर प्रतिभा म्हणाली नको सर मी जाईन रिक्षाने उगाच तुम्हाला त्रास कशाला ? '' त्यावर विजय म्हणाला, ''मला कसला त्रास. मला तुला उचलून थोडीच घ्यायचयं ! '' विजयचे हे शब्द ऐकून

प्रतिभा किंचित बावरलीच. पण तिने स्वतःला सावरलं. गाडीत प्रवासात प्रतिभा आणि विजय एकमेकांशी अवक्षरही बोलले नाहीत. ड्रायव्हरला प्रतिभाचं घर माहित होतं. त्यामुळे त्याने प्रतिभाच्या घराजवळच काही अंतरावर गाडी थांबवली. प्रतिभा गाडीतून उतारल्यावर विजयही गाडीतून खाली उतरला. सहज औपचारीकता म्हणून ती विजयला म्हणाली, ''सर ! या ना घरी !'' प्रतिभाचे हे वाक्य ऐकताच विजय तिच्यासोबत खरंच निघाल्यावर मात्र प्रतिभाला फक्त भोवळ येण्याचीच बाकी होती. कारण विजयसारखा माणूस तिच्यासोबत तिच्या घरी यायला तयार होईल हे तिला अपेक्षितच नव्हते. आता विजयसोबत चालताना प्रतिभा देवाकडे एकच प्रार्थना करत होती की घरी सर्व ठीक-ठाक असावं. बहुदा ते नसणारच याची प्रतिभाला खात्री होती. प्रतिभा विजयसह तिच्या घराच्या दाराजवळ येताच आतून तिच्या बहिणीचे प्रेमळ भांडणाचे आवाज येत होते. प्रतिभाने दरवाजा ठोठावला असता, प्रतिभाच्या सर्वात लहान बहिणीने दरवाजा उघडला. प्रतिभासोबत सुटाबुटातला पुरुष पाहून क्षणभर ती दचकली. त्यांना दारात पाहाताच प्रतिभाच्या इतर दोन्ही बहिणींनी



पटापट घरातील अस्ताव्यस्त पडलेल्या सामानाची आवराआवर करायला घेतली. विजयकडे पाहात प्रतिभा म्हणाली, ''सर ! या ना आत !'' प्रतिभाने विजयसोबत तिच्या आईची आणि बहिणींची ओळख करून दिली. विजयने त्या घरात चोहीकडे एक नजर फिरवली आणि समोरच्या खुर्चीवर जाऊन बसला. प्रतिभाची आई विजयसाठी फ्रीजमधील पाणी घेऊन आली. विजय त्यांना म्हणाला, ''मी फ्रीजचं पाणी पित नाही. मला साध पाणी आणा आणि सर चहा कॉफी काय घेणार या प्रतिभाच्या बहिणीच्या प्रश्नाला विजय म्हणाली, ''कोरी चहा बनवं आलं घालून !'' प्रतिभाची लहान बहीण एका बाजुला बसून एका पुस्तकात पाहून एक चित्र काढण्याचा असफल प्रयत्न करत होती. ते पाहून विजय म्हणाला, ''मी काढू का ? '' त्यावर त्याला नाही कसं बोलणार म्हणून प्रतिभाच्या बहिणीने तिची वही त्याच्या हातात दिली. पण विजय ते चित्र काढू शकेल अशी तिला खात्री वाटत नव्हती. पण सराईत चित्रकारासारखे काही मिनिटांत विजयने ते चित्र रेखाटल्यावर प्रतिभानेही तोंडात बोटे घातली. चहा पिता-पिता विजयने प्रतिभाच्या आईला प्रश्न केला, ''आई जेवणात काय केलयं ? त्यावर प्रतिभाची आई म्हणाली, ''भेंड्याचे भरीत आणि पोळ्या केल्या आहेत.'' त्यावर विजय म्हणाला, ''भेंड्याचे भरीत मला फार आवडते. एका पोळी सोबत थोडं आणता का प्लीज ! '' ते ऐकताच प्रतिभाची आई भेंड्याचें भरीत आणि पोळ्या घेऊन आल्यावर विजयने ते चवीने खाल्ले. निघता-निघता विजय प्रतिभाच्या आईला म्हणाला, ''सॉरी हां आई, मी न सांगता अचानक आलो. माझ्यामुळे तुम्हाला उगाच त्रास झाला असेल.'' त्यावर प्रतिभाची आई म्हणाली, ''त्रास कसला ? अहो ! तुमचंच घर आहे

असं समजा आणि कधीही आलात तरी चालेल ! '' निघताना ''येतो मी ! '' हे विजयचे शब्द प्रतिभाच्या हृदयाला भिडले. विजय निघून गेल्यावर प्रतिभाच्या जीवात जीव आला. नाहीतर तिचा जीव टांगणीला लागला होता. प्रतिभाने तिला आलेला घाम फुसून विजयसाठी आणलेली थंड पाण्याची बाटली पिऊन रिकामी केली. प्रतिभाची आई प्रतिभाला म्हणाली, ''हे काय ? प्रतिभा, तू उगाचच तुझ्या सरांना जमदग्नी म्हणत असतेस. ते किती साधे–सरळ, संस्कारी आणि दिसायलाही गोड आहेत. '' त्यावर प्रतिभा तिच्या आईला म्हणाली, ''तू एका भेटीत त्यांना काय ओळखणारं ? आमचे सर म्हणजे कोणालाही न उलगडलेलं एक कोडं आहेत. ते अजून त्यांच्या बाबांनाही कळले नाहीत तर तुला काय कळणार ? त्यांच्यासोबत चार वर्षे मी काम करतेय पण त्यांचे काही गुण मला आज कळत आहेत. त्यारात्री झोपताना कधी नव्हे तो प्रतिभा विजयबद्द्ल वेगळा विचार करू लागली होती. विजयचा ती नव्याने विचार करत होती. विजय नावाचा कोणी अनोळखी पुरुष अचानक आपल्या आयुष्यात आल्याचा तिला भास होत होता. अचानक विजयच्या ती प्रेमात पडतेय की काय असं तिला वाटू लागल होतं. विजय तिला आता एक बॉस म्हणून नाही पण एक पुरुष म्हणून आवडू लागला होता. रात्रभर विजयच्या अनपेक्षित वागण्याबद्दल आणि त्याच्याबद्दल विचार करून प्रतिभाला जागरण झालं. त्यामुळे तिला ऑफिसात यायला किंचित उशीरच झाला. पण विजय कॅबीनमध्ये नाही हे पाहून तिचा जीव भांड्यात पडला. तिने ड्रायव्हरला विजयबद्दल विचारल्यावर तो तिला म्हणाला, आज मनिषा आली नाही. त्यामुळे सर स्वतःच त्यांचा नाश्ता तयार करत आहेत. ते ऐकून प्रतिभाला धक्काच बसला. उत्सुकता म्हणून कधी नव्हे ते प्रतिभा स्वयंपाकघरात गेली. तर विजयने कांदापोहे तयार केले होते. प्रतिभाने मागूनच प्रश्न केला, ''काही मदत करू का सर ? '' त्यावर विजय तिला म्हणाला, ''आता फक्त खायला मदत कर.'' प्रतिभाने कांदापोहे प्लेटमध्ये काढले आणि विजयच्या आग्रहाखातर एक प्लेट हातात घेतली तर कांदापोहे अप्रतिम झाले होते. ते खाता-खाता तिने प्रश्न केला, ''आज मनिषा आली नाही का ? '' त्यावर विजय म्हणाला, ''तिचा फोन आला होता. तिची तब्बेत बरी नाही.'' मी म्हणालो, आराम कर दोन-चार दिवस!'' त्यावर प्रतिभा म्हणाली, ''सर मग तुमचं रात्रीचं जेवण! '' त्यावर विजय म्हणाला, ''तू काळजी करू नकोस. मला सारा स्वयंपाक करता येतो. पोळ्याही लाटता येता.'' त्यावर प्रतिभा म्हणाली, ''आता मला हे कांदापोहे खाऊन खात्री पटलेय की तुम्ही उत्तम स्वयंपाकीही आहात. पण मनिषा येत नाही तोवर मीच पाहात जाईन तुमच्या नाश्ताचं आणि जेवणाचं ! '' त्यावर विजय म्हणाला, ''ठीक आहे. तशीही आता मला स्वयंपाक करायची सवय राहिलेली नाही. पूर्वी आई आजारी पडल्यावर, आई नोकरी करत असताना, नाईलाज म्हणून स्वयंपाक करायला शिकलो होतो. पुढे तो बऱ्याचदा कामाला आला. आमचे बाबाही उत्तम स्वयंपाकी आहेत. पण त्यांना सारे भारी पदार्थच बनवता येतात.'' त्याचे हे बोलणे ऐकताना प्रतिभा स्वतःशीच विचार करत होती, एखादा पुरुष इतका सर्वगुणसंपन्न कसा असू शकतो आणि असं असताना कोणी स्त्री त्यांच्या प्रेमात पडली नसेल ही शक्यता कमीच आहे, मला नेहमीच जाणवत, आमच्या कार्यालयात त्यांना भेटायला येणाऱ्या बायकांच्या नजरेत त्यांच्याबद्दल विचित्र भावना दिसतात. त्यात

त्यांची काही चूक आहे असं नाही म्हणता येणार. सरांनी स्वतःच्या शरीराकडे दुर्लक्ष केलेले नाही. नियमित व्यायाम, चालणे चुकत नाही. खाण्यावरही त्यांचे नियंत्रण आहे. दिसतातही एखाद्या नायकासारखे. आई म्हणते त्यात तथ्य आहे. कोणीही पाहताक्षणी प्रेमात पडावं असेच सर आहेत. मग ! इतक्या वर्षात मला त्यांच्याबद्दल कसं काहीच वाटलं नाही. खरं म्हणजे मी आतापर्यंत त्यांच्याकडे कधी या दृष्टीने पाहिलेच नव्हते. स्वयंपाकघरातील सारे आटपून दिवसभर ऑफीसमधील कामे करून संध्याकाळी विजयसाठी रात्रीचा स्वयंपाक तयार करून प्रतिभा जायला निघाली तेव्हा विजयने तिच्या हातात एक चॉकलेटचा डबा दिला आणि म्हणाला, 'काल मी तुझ्या घरी अचानक आलो. त्यामुळे काही सोबत आणता आले नव्हते. हा चॉकलेटचा डबा तुझ्या बहिणींसाठी. तुझी लहान बहीण फारच गोड आहे. मी विचारलं सांग तिला." प्रतिभा निघून गेल्यावर विजयने रात्री प्रतिभाने तयार केलेल्या स्वयंपाकावर ताव मारला आणि स्वतःशीच म्हणाला, "पोरगी भारी आहे! दुसऱ्याच दिवशी प्रतिभा जरा लवकरच ऑफीसात आली आणि विजयसाठी चहा नाश्ता तयार करून त्याची वाट पाहत उभी होती. विजय त्याच्या खोलीतून तयार होऊन बाहेर आला. तो बोलण्यापूर्वीच प्रतिभा म्हणाली, "सर मी लवकर आले आणि तुमच्यासाठी नाश्ता तयार केला." चहा पिता पिता विजयने प्रतिभाला प्रश्न केला, "चॉकलेट आवडले का छोटीला ? त्यावर प्रतिभा म्हणाली, "हो खूपच आवडले. तिने तुमचे आभार मानलेत आणि हे गुलाबाचे फूल तुम्हाला भेट म्हणून दयायला सांगितले आहे, ते गुलाबाचे फूल प्रतिभा विजयच्या हातात देत असताना दोघांच्याही हृदयात एक विचित्र हालचाल होत होती. दोघांच्याही हृदयाची स्पंदने अचानक वाढली होती. विजयने ते गुलाब जवळच असणाऱ्या फ्लॉवरपॉटमध्ये ठेवले आणि दोघेही कामाला लागले. विजयने यापूर्वी कधीच प्रतिभाकडे त्या नजरेने पाहिले नव्हते. पण आज का कोण जाणे विजयला प्रतिभाकडे आणि प्रतिभाला विजयकडे चोरून पाहावेसे वाटत होते. पण प्रतिभाच्या मनात अचानक विचार आला, सर अविवाहीत आहेत. त्यांचा भूतकाळ पाहता ते फारच रसिक असावेत तेव्हा त्यांच्या आयुष्यात कोणी आली नसेल ही शक्यता कमी आहे. जर सरांना लग्न करायचेच नसेल तर मी उगाच त्यांच्यात न गुंतलेलेच बरे ! उगाच नंतर मलाच त्याचा त्रास होईल. थोड्या वेळाने विजय प्रतिभाला म्हणाला, "चल आपल्याला मनिषाच्या घरी जायचयं. तिला पाहायला. तिची तब्बेत बरी नव्हती ना ? पाहू आता कशी आहे ते ? फोनवर ती बरी आहे म्हणाली. पण प्रत्यक्ष जाऊन पाहिलेली बरी !" ते ऐकून प्रतिभाला आश्चर्य वाटलं, हा इतका मोठा माणूस आपल्याकडे स्वयंपाकीण म्हणून काम करणाऱ्या एका सामान्य बाईची इतकी काळजी का करतोय ? पण त्याबद्दल विजयला स्पष्ट विचारण्याची हिंमत प्रतिभात नव्हती. विजय प्रतिभासह मनिषाच्या घरी पोहोचला. मनिषाच्या घरची सध्याची परिस्थिती फार वाईट नव्हती. पण चांगली म्हणता येईल अशीही नव्हती. प्रतिभासह विजयला दारात पाहाताच प्रतिभा बिछान्यावर उठून बसली. मनिषाची मुले बाजूला खेळत होती. आत जाताच विजयने त्यांच्या हातात मिठाईचा पुडा दिला आणि मनिषाच्या सासूची चौकशी केली. मनिषाची सासू चहापाणी घेऊन आली. विजयने मनिषाच्या तब्बेतीची चौकशी केली. मनिषाचा नवरा घरी नव्हता. विजय मनिषाला म्हणाला, "पूर्ण बरी झाल्याखेरीज कामाला येऊ नकोस आणि औषधपाणी

वेळेवर घेत जा!” आणि त्याने मनिषाच्या हातात एक पैशाचे पॉकीट दिले. “हे कशाला?” असे मनिषा म्हणताच, “ठेव. गरज पडलीच तर ?” मी तुझ्या नवऱ्याशीही फोनवर बोलतो. विजय मनिषासोबत बोलतच होता. इतक्यात मनिषाचा मावसभाऊ रमेश प्रतिभाच्या तब्बेतीची चौकशी करायला तेथे आला. तो बऱ्यापैकी उच्चशिक्षीत दिसत होता. त्याला दारात पाहात विजय उठला आणि दारात जाऊन त्याला मिठीत घेतले त्याने प्रतिभाशी त्याची ओळख करून देत म्हणाला, “हा रमेश! मनिषाचा मावस भाऊ आणि माझा शालेय मित्रही !” त्यानंतर त्यांच्यात गप्पा सुरु झाल्या. ज्या थांबतच नव्हत्या. इतक्या उत्साहाने गप्पा मारताना प्रतिभाने विजयला यापूर्वी कधीच पाहिले नव्हते. बोलता बोलता रमेश मध्येच विजयला म्हणाला, “आता तू मोठा माणूस झाला आहेस, तुला नुसतं भेटायला यायचं म्हटलं तरी विचार करावा लागतो.” त्यावर विजय त्याला म्हणाला, “तुझ्यासाठी माझ्या हृदयाचे दारही सदैव उघडे असतात. तिथे तू इतर दारांचं काय घेऊन बसलास ? मग आमची बहिणाबाई घेते ना तुमची काळजी व्यवस्थित?” त्यावर विजय त्याला म्हणाला, “माझी काळजी घेऊन घेऊनच बिचारी आजारी पडली वाटत ? ती होती म्हणून मी जगलो. नाहीतर माझे काय झाले असते त्या पांडुरंगालाच ठाऊक?” इतक्यात विजयचा मोबाईल वाजला, विजय मनिषा आणि रमेशला म्हणाला, “रमेश, मी निघतो आता एक दिवस भेटू आपण निवांत. मला तुझ्यासोबत खूप गप्पा मारायच्या आहेत आणि हो मनिषा तब्बेतीची काळजी घे. माझी काळजी करू नकोस. आता प्रतिभा सांभाळतेयं माझं जेवणखाणं तुझ्या गैरहजेरीत.” प्रतिभाला तिच्या घरी सोडून एका मिटींगला जायचे आहे. प्रतिभा विजयसोबत निघाली खरी, पण मनिषा विजयच्या जीवलग मित्राची बहिण आहे. तरीच मी विचार वाकरता होतो विजयासारख्या माणसाला एका स्वयंपाक करणाऱ्या बाईची इतकी काळजी का असावी ? गाडीत प्रतिभा विजयच्या शेजारीच बसली होती. ती काही बोलण्यापूर्वीच विजय प्रतिभाला म्हणाला, “आज मनिषा आपल्याकडे स्वयंपाकीण म्हणून काम करत असली तरी ती फक्त माझ्या मित्राची बहिण नाहीतर माझीही चांगली मैत्रीण आहे. तिच्या नवऱ्याचा आर्थिक भार कमी व्हावा म्हणून ती नोकरीच्या शोधात होती. तिच्यासाठी रमेशने माझ्याकडे शब्द टाकला म्हणून मी तिला हे काम करशील का ? म्हणून विचारणा केली असता, फक्त गरज म्हणून नाही तर माझ्यावरील प्रेमापोटी ती हे



काम करायला तयार झाली. तिच्यामुळेच मला स्वतःला कामात झोकून देणे शक्य झाले. माझी तब्बेत तिनेच सांभाळली. तिचे उपकार आहेत माझ्यावर, जे मी कधीच विसरणार नाही. तिच्या उपकाराची परतफेड मी या जन्मात करू शकणार नाही. त्यानंतर प्रतिभाशी बोलायला काही शिल्लकच राहिले नाही. विजय प्रतिभाला तिच्या घराजवळ सोडून पुढे मिटींगला निघून गेला. त्यानंतर एके दिवशी मनिषाने प्रतिभा कामावर आली असता निरोप दिला की तुला साहेबांनी त्यांच्या खोलीत बोलावले आहे. त्यावर प्रतिभाने मनिषाला प्रश्न केला, "सर तुझे मित्र आहेत. मग तू त्यांना साहेब का म्हणतेस ?" त्यावर मनिषा म्हणाली, "मी त्याला आता साहेब म्हणत नाही. पूर्वीपासूनच साहेब म्हणते. तुम्हाला नाही कळणार ! तुम्ही जा. साहेबांना भेटा. ते तुमची वाट पाहात असतील. तोपर्यंत मी आता चहा नाश्ता घेऊन येते." प्रतिभा आज पहिल्यांदाच विजयच्या खोलीत जात होती. प्रतिभाने विजयच्या खोलीचे दार ठोठावले. विजयने दार उघडच आहे ये आत असे म्हणताच, प्रतिभाने आत पाऊल ठेवताच तिने समोर पाहिले तर ती भिंत पुस्तकांनी भरलेली होती, एका भिंतीवर कित्येक प्रमाणपत्रे आणि सन्मानपत्रे फ्रेम करून लावलेली होती. त्याखाली विजयने मोठ-मोठया साहित्यिकांसोबत काढलेली छायाचित्रे आणि त्याला त्याच्या साहित्यसेवेसाठी मिळालेली स्मृतीचिन्हे व्यवस्थित लावलेली होती. ती खोली म्हणजे विजय किती मोठा साहित्यीकही आहे याची साक्षीदार होती. विजय एका खुर्चीवर बसून पाय समोरच्या छोट्या टेबलावर ठेऊन बसला होता आणि आपल्या मांडीवर ठेवलेल्या लॅपटॉपवर काहीतरी टाईप करत होता. विजयची प्रतिभाकडे पाठ असल्यामुळे तो काहीतरी मराठीत टाईप करतोय हे प्रतिभाला स्पष्ट दिसले. प्रतिभा त्याच्या जवळ येऊन त्याला म्हणाली, "सर मला येथे का बोलावलंत ?" "हो ! बस सांगतो." प्रतिभा त्याच्या समोरच्या खुर्चीत बसली. आणि स्वतःशीच विचार करू लागली, सर जर उद्योगपती नसते झाले तरी एक मोठे लेखक नक्कीच झाले असते. विजयने दहा पुस्तके लिहिली आहेत. हे प्रतिभाला नव्यानेच कळले होते. विजयच्या शेकडो कथा, कविता आणि वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या लेखांची ती खोली साक्षीदार होती. त्याला साहित्यासाठी मिळालेले मानसन्मान त्या खोलीत बंदिस्त होते. त्याने काढलेली चित्रे, त्याने स्वतःच्या हाताने हस्तकलेतून तयार केलेल्या वस्तू, हे सारं तो किती रसिक आहे याच्या साक्षीदार होत्या. इतक्यात मनिषा चहा नाश्ता घेऊन आत आली. मनिषा रोज विजयसोबतच नाश्ता करते हे प्रतिभाला नव्याने कळले. चहा पिता-पिता विजय मनिषाला म्हणाला, "तुझ्या हातावरची मेहंदी छान आहे. कोणी काढली?" त्यावर मनिषा म्हणाली, "कविताने ! छान काढली आहे ना ? तुच तर शिकवलीस ना तिला मेहंदी काढायला. पण आता मेहंदी काढण्यात तिचा कोणी हात धरू शकत नाही हां ! तुला आठवतं तू कित्येकदा माझ्या आणि कविताच्या हातावर मेहांदी काढली होतीस ?" त्यावर विजय म्हणाला, "ते मी विसरणे शक्य तरी आहे का ? " हे सारं ऐकून न राहून प्रतिभाने मनिषाला प्रश्न केलाच, ही कविता कोण ? त्यावर मनिषा म्हणाली, "तुम्हाला माहीत नाही, अहो ! सरांची लहान बहीण माझी सर्वात आवडती मैत्रीण ! आमच्या शेजारच्या इमारतीतच राहते. सर तिला प्रेमाने बेबी म्हणतात. तिने सरांच्या मनाविरुद्ध प्रेमविवाह केला आणि सर तिच्यावर

रागावले. तेव्हापासून ते तिच्याशी कामापुरतचं बोलतात. त्यादिवशी तुम्ही माझ्या घरी आलात आणि तिच्याकडे गेला नाहीत याचा तिला खूप राग आलाय. तसं ती स्पष्ट बोलली नाही पण मला जाणवलं. कारण कविता फारच गोड आहे, पाहताक्षणी कोणीही तिच्या प्रेमात पडावं, इतकी. ती साहेबांना भेटायला येथे कधीच येत नाही. पण साहेबांची माझ्याकडे सतत चौकशी करत असते. उद्या तिच्या मुलाचा विशालचा वाढदिवस आहे. साहेबा, तुझ्या लक्षात आहे ना ?" खरं म्हणजे विजयच्या लक्षात नव्हतं. पण मनिषामुळे त्याला हे कळले होते. मनिषालाही त्याला अशा काही गोष्टींची स्वतःहून आठवण करून द्यायची सवयच झाली होती. विजय मनिषाला म्हणाली, "उद्या तू लवकर जा आणि जाताना विशालसाठी माझे गिफ्ट घेऊन जा !" मनिषा निघून गेल्यावर विजय प्रतिभाला म्हणाला, "माझ्या या खोलीत फक्त मनिषाला प्रवेश होता आणि आता तुला ! तुला वाचनाची आवड आहे, तुझी मराठीही उत्तम आहे तुला संगणकावर मराठी टायपिंगही करता येते. तू हा लॅपटॉप तुझ्याकडेच ठेव. यापुढे मी लिहलेले लेख तुला सवड भेटेल तेव्हा तू लॅपटॉपमध्ये टाईप करून ठेवत जा ! मी तुला त्याचे वेगळे पैसे देईन." त्यावर प्रतिभा म्हणाली, "त्याचे जर तुम्ही मला वेगळे पैसे देणार असाल तर हे काम मी करणार नाही." विजयने बरं म्हणून एक वही आणि तो लॅपटॉप तिच्या हातात दिला. त्याच्या दुसऱ्या दिवशी मनिषा घरी जायला निघाली असता विजय तिला म्हणाला, "तू प्रतिभालाही सोबत घेऊन जा. विशालच्या वाढदिवसाला ती माझ्यावतीने त्याला शुभेच्छा देईल आणि तिची कविताशी ओळखही होईल आणि ती त्या दिवसाबद्दल माझ्यावतीने तिची माफीही मागेल." त्याने प्रतिभाला, चालेल ना ? म्हणताच प्रतिभाने आनंदाने होकार दिला. मनिषा प्रतिभासह कविताच्या घरी गेली असता, प्रतिभा मागे असल्यामुळे कविताला दिसली नाही. तिने मनिषाचे आलिंगन देऊन स्वागत केले आणि तिला आत बोलावले. त्यावर मनिषाने प्रतिभा मॅडम, या ना म्हणताच कविताचे लक्ष प्रतिभाकडे गेले आणि तिला पाहताच तिला भयंकर आनंद झाला. तिने धावत जाऊन प्रतिभाला आपल्या मिठीत भरून घेतले आणि प्रश्न केला, "अग, प्रतिभा तू कशी काय येथे ?" त्यावर मनिषा म्हणाली, "तू ओळखतेस यांना ?" त्यावर कविता म्हणाली, "अग, ओळखतेस म्हणजे काय, आम्ही शाळा कॉलेजात एकत्रच होतो शिकायला. पण मधल्या काही वर्षात आमची भेटच झाली नाही." त्यावर मनिषा म्हणाली, "अग, ही गेली चार वर्षे विजयच्याच ऑफीसमध्ये काम करतेयं." त्यानंतर प्रतिभा आणि कविताच्या गप्पा रंगल्या, ज्यात विजय कोठेच नव्हता. प्रतिभा आता कविताच्या घरातीलच झाली होती. इतक्यात विजयचे बाबा तेथे आल्यावर त्यांनी प्रतिभाला पाहिले आणि त्यांना फार आनंद झाला. कविताने बाबांशी प्रतिभा आणि मनिषाची ओळख करून दिल्यावर बाबा मनिषावर किंचित रागावले आणि म्हणाले, "मी विजयच्या ऑफीसमध्ये गेलो तेव्हा ही मनिषा मला टाळण्यासाठी समोर थांबलीच नाही. तिला वाटलं, मी तिला ओळखलच नाही." त्यावर मनिषा सॉरी म्हणताच बाबा म्हणाले, "अग, मी काही तुझ्यावर रागावलो नाही. मला समजू शकत तू असं का केलंस ते." पण प्रतिभा, त्याने त्याच्याऐवजी तुला पाठवलं हे बरं केलं. निदान त्यामुळे तुझी आणि कविताची भेट तरी झाली. नाहीतर तू विजयकडे कामाला आहेस हे तिला कधी कळलंच नसतं. तुझा साहेब तसा घरातील

कोणत्या कार्यक्रमाला उपस्थित नसतोच. त्यालाही आठवत नसेल त्याने हजेरी लावलेला शेवटचा घरगुती कार्यक्रम कोणता होता ? प्रतिभाने निघताना विशालच्या हातात विजयने दिलेले आणि तिने त्याच्यासाठी घेतले गिफ्ट दिले. विजयने दिलेला विडिओ गेम पाहताच विशालला भयंकर आनंद झाला आणि तो प्रतिभाला मिठी मारत उत्साहाने म्हणाला, "मामी, मामाला थॅंक यू सांग." त्यावर कविता, 'अरे, तिला मामी काय म्हणतोयस ?" त्यावर विशाल म्हणाला, "सॉरी. मामी तोंडात बसलयं ना म्हणून बोलून गेलो." कविताने प्रतिभा निघता-निघता तिच्या आईची आणि बहिणींची चोकशी केली. कविता शाळेत असताना प्रतिभाच्या घरी जात असे. तिने प्रतिभाकडे तिच्या घरच्यांसाठी केक आणि चॉकलेट एका पिशवीत भरून दिले. कविता प्रतिभाला म्हणाली, "आता तू माझी मैत्रीण म्हणून मला कधीही माझ्या घरी भेटायला येऊ शकतेस आणि मी उद्याच तुला तुझ्या ऑफीसमध्ये तुझी मैत्रीण म्हणून भेटायला येते." त्याच्या दुसऱ्याच दिवशी कविता विजयच्या ऑफीसमधे टपकली. ती विजयच्या केबिनमधे जाऊन त्याला केक देत म्हणाली, "मी तुला नाही, प्रतिभाला भेटायला आले होते. ती माझी शाळेतील मैत्रीण आहे. तुला आठवतं, मी शाळेत असताना तू क्लास सुटल्यावर मला घ्यायला यायचास, तेव्हा मी तिच्याशी तुझी ओळख करून दिली होती." त्यावर विजय काही बोलण्यापूर्वीच कविता तरातरा निघून गेल्यावर विजय केक खाता-खाता स्वतःशीच काही तरी विचार करु लागला. थोड्या वेळाने विजयने प्रतिभाला त्याच्या केबीनमधे बोलावून घेतले आणि विचारले की कविता तुझी वर्गमैत्रीण आहे ? त्यावर प्रतिभा म्हणाली, "हो ! काय योगायोग आहे बघा ना ! आम्ही शाळेत असताना तुम्ही कविताला लिहून दिलेले निबंध आणि कविता आम्ही कॉपी करायचो. त्यावरून घडलेले किस्से आठवून मला आजही हसू येत आहे. आणि आताही तुम्ही मला तेच काम दिलेत. तुम्ही लिहिलेले कॉपी मारण्याचे काम फक्त संगणकावर!" विजय ठीक आहे. तू जा. म्हणताच जाताना प्रतिभा स्वतःशीच म्हणाली, तुम्हाला कसं सांगू, तेव्हा कविता सोबत तुम्हाला पाहताच मी तुमच्या प्रेमात पडले होते. पण तेव्हा तुम्ही किती गोड लाडू होतात आणि आता कडू कारलं झाला आहात. प्रतिभा निघून गेल्यावर विजय स्वतःशीच म्हणाला, ही तिच प्रतिभा आहे, जिला पाहताक्षणी मी तिच्या प्रेमात पडलो होतो आणि प्रतिभा हे नाव माझ्या हृद्यावर कायमचं कोरलं गेलं होतं. आज कित्येक वर्षानंतर विजय मनापासून



हसत होता. खरं तर त्याला नाचावसं वाटत होतं. पण आता ते त्याला शोभणारं नव्हतं. विजयने प्रतिभाला पुन्हा बोलावले आणि विचारले, कविताने ऑफीसमधे सर्वांना केक वाटला का ? त्यावर प्रतिभा हो ! म्हणताच विजय तिला म्हणाला, "आज दुपारनंतर ऑफीसमध्ये सर्वांच्या आवडीचं असं काहीतरी छानसं खायला मागवं. विजयला आनंदात पाहून प्रतिभालाही आनंद झाला. जाता जाता प्रतिभा मनिषाला म्हणाली, "आज सर खूप आनंदात आहेत." त्यावर मनिषा म्हणाली, "हा आनंद कविताला भेटल्याचा आहे. सरांचा कवितावर भयंकर जीव आहे. तिच्यासाठी ते काहीही करायला तयार असत. तिच्यासाठी त्यांनी खूप स्वप्ने पाहीली होती. पण कविताने प्रेमविवाह केला आणि सर दुखावले. कोणी कोणाचेच समजून घेतले नाही. पण आज कविताने स्वतःहून एक पाऊल पुढे टाकले आणि सरांना आनंद झाला." त्यावर प्रतिभा म्हणाली, "सर, इतक्या छान प्रेमकथा लिहितात आणि त्यांचा बहिणीच्या प्रेमाला विरोध होता ?" त्यावर मनिषा म्हणाली, "त्यांचा त्यांच्या प्रेमाला विरोध नव्हता. पण तिने लग्नासाठी जी घाई केली. त्याला विरोध होता. नाहीतर सरांनी मनात आणलं असतं तर त्यांचा विवाह होऊच दिला नसता. त्यांनी तिच्यासाठी जी स्वप्ने पाहिली होती, ती तुटल्याचा अधिक त्रास झाला. आता देवाच्या कृपेने ती सुखी झाली पण नसती, तर सरांनी नक्कीच तिला मदत केलीच असती. सर त्यांच्या घरापासून त्या घरातील माणसांपासून दूर राहतात. पण त्यांची नजर गरुडासारखी आपल्या घरावर असते. तुला माहीत नसेल कदाचित सरांनी खूप गरिबीत दिवस काढले. पण त्या गरिबीची झळ त्यांनी आपल्या भावंडांना कधीही जाणवू दिली नाही. कविता तर एखादया राजकुमारीचं जीवन जगत आली. लग्न होईपर्यंत तिने कधी साधा गॅसही पेटवलेला नव्हता. सरांनी नंतर आपलं लेखक होण्याचं स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्यांना कोणाचीच साथ लाभली नाही. कारण त्यांनी नेहमी राजासारखं जीवन जगावं असंच साऱ्यांना वाटत होतं. त्यातून एका क्षणाला सरांनी पुन्हा पैशाच्या दिशेने धाव घेतली. पण यावेळी ही धाव इतकी मोठी होती की त्यासाठी त्यांनी त्यांच्या कुटुंबालाही मागे सोडले आणि आता एका शापित राजकुमाराचं जीवन या घरात जगत आहेत. ज्या घरात जगातील सारी सुखे असतानाही ते सुखी नाहीत, आनंदी नाहीत. सतत एक मुखवटा चेहऱ्यावर चढवून वावरत असतात." हे सारं ऐकुन प्रतिभा स्वतःशीच म्हणाली, "काही दिवसांपूर्वी विजय मला फार मोठा वाटत होता. पण तो आजही सामान्यच होता. आपला भुतकाळ त्याला जमिनीवरुन हलूच देत नव्हता. फक्त त्याची नजर आकाशाकडे असते. मी एक क्षणभर का होईना विजयच्या प्रेमात पडले होते, याचा मला आज अभिमान वाटतो. अशा माणसाची सेवा करण्यात सारं आयुष्य जरी कामी आलं तरी बेहत्तर !" त्या दिवशी घरी गेल्यावर जेवून प्रतिभा टी.व्ही पाहात असताना प्रतिभाचा फोन खणखणला. त्यावरील नंबर पाहून प्रतिभाला सुखद धक्का बसला. तो विजयचा नंबर होता. प्रतिभाने फोन उचलताच विजय म्हणाला, "सॉरी मी इतक्या रात्री फोन केला. उद्या आपल्याला एका मिटींगसाठी बाहेर जायचे आहे. तू सकाळी आठ वाजता तयार रहा ! मी तुला सकाळी पिकअप करेन." सकाळी प्रतिभा तयार होऊन बसली होती. इतक्यात विजय तिच्या घरी आला. त्याने तिच्या आईशी घाईघाईतच जुजबी चर्चा केली आणि ते निघाले. गाडीजवळ येताच प्रतिभाच्या लक्षात आले की आज ड्रायव्हर

सोबत नव्हता. ते पाहून प्रतिभाने विजयला प्रश्न केला, "आज ड्रायव्हर नाही ?" त्यावर विजय म्हणाला, 'नाही, आज तो सुट्टीवर आहे. घाबरू नकोस. मी गाडी बरी चालवतो." त्यावर प्रतिभा म्हणाली, "तुम्ही सोबत असताना मी कशाला घाबरु ? " प्रतिभा गाडीत विजयच्या बाजुला जरा सावरूनच बसली. गाडी सुरु झाल्यावर काहीतरी बोलावं म्हणून विजय म्हणाला, 'कविताने काही फोन वगैरे केलेला की नाही ?" त्यावर प्रतिभा म्हणाली, "हल्ली रोजच संध्याकाळी फोन करते. आम्ही खूप गप्पा मारतो." "काय गप्पा मारता ?" त्यावर प्रतिभा म्हणाली, "त्या गप्पा तुम्हाला सांगण्यासारख्या नाहीत." मुंबईच्या बाहेर गेल्यावर बारीक पाऊस सुरु झाला. विजयने लहान मुलासारखा गाडीची काच खाली करून तो हातावर झेलला. थोड्या अंतरावर एक मक्याची भाजलेली कणसे विकणारा दिसताच विजयने त्याच्याजवळ गाडी थांबवली आणि चार-पाच मक्याची भाजलेली कणसे विकत घेतली आणि थोडावेळ गाडी बाजुला लावून त्यातील एक कणीस प्रतिभाच्या हातात देत एक कणीस स्वतः खाऊन संपविला आणि गाडी सुरु केली. प्रतिभा तिचा कणीस सावकाश खात होती. ते पाहून विजय प्रतिभाला म्हणाला, "तुम्हा बायकांना रस्त्यावरची एकच वस्तू खायला आवडते." कोणती? या प्रतिभाच्या प्रश्नाला उत्तर देत विजय म्हणाला, पाणीपुरी. ते त्या देवालाच ठाऊक ! त्यावर प्रतिभा म्हणाली, मलाही आवडते पण का ते मलाही माहीत नाही. त्यानंतर विजय विनोदाने म्हणाला, मला वाटतं पाणीपुरी खाणं हा बायकांमधे पसरलेला संसर्गजन्य रोग आहे. त्यावर प्रतिभा हसल्यावर तिच्याकडे पाहात विजय म्हणाला, "प्रतिभा तू हसल्यावर गोड दिसतेस. पण त्याहीपेक्षा तू हसल्यावर तुझ्या गालाला पडणाऱ्या सुंदर खळ्या अप्रतिम दिसतात. ते ऐकून प्रतिभा किंचित लाजली. मागच्या चार वर्षात विजयला प्रतिभाच्या खळ्या कधीच दिसल्या नव्हत्या. म्हणजे त्याने त्या पाहिलेल्या नव्हत्या. प्रवासात प्रतिभाच्या एक गोष्ट लक्षात आली की विजय रस्त्यात जेव्हा जेव्हा मंदीर दिसायचं तेव्हा पाया पडायचा. ते पाहून प्रतिभा मनात म्हणाली, "सर बाकी कोणाच्या बापाला घाबरत नाहीत. पण देवाला घाबरतात वाटतं." न राहून प्रतिभाने विजयला प्रश्न केलाच, "की सर तुमची देवावर फार श्रद्धा आहे वाटत?" त्यावर विजय म्हणाला, "माझी देवावर श्रद्धा आहे की नाही मला माहीत नाही. पण देवाची माझ्यावर कृपा आहे याची आता मला खात्री पटलेली आहे." त्यावर प्रतिभा म्हणाली, "मलाही आता तसंच वाटू लागलं आहे. बघा ना ! कविता तुमची बहीण आहे हे कळल्यावर मला किती गोष्टी नव्याने कळल्या नाहीतर मी तर तुम्हाला जमदग्नीच समजत होते." त्यावर विजय हसून म्हणाला, "मी जमदग्नी आहेच. पण जमदग्नीच्या वाटेला कोणी स्त्री गेल्याचे माझ्या वाचनात आले नाही. विश्वामित्रांची तपस्या मात्र मेनकेने भंग केली होती. माझ्यातील जमदग्नीचा आता विश्वामित्र झाला नाही म्हणजे मिळवली." त्यावर प्रतिभा मनातल्या मनात म्हणाली, "तुम्ही विश्वामित्र झालात तर मी मेनका व्हायला तयारच आहे." मिटींग आटपून माघारी येताना प्रतिभा आणि विजय एका हॉटेलात जेवायला थांबले. जेवणाची ऑर्डर देताना विजयने स्वतःसाठी शाकाहारी आणि प्रतिभासाठी मांसाहारी जेवण मागविले. ते पाहून प्रतिभा म्हणाली, 'सर तुम्ही शाकाहारी कधी झालात?" कविता तर म्हणायची, "तुम्ही तर संण्डे हो या मंण्डे रोज खाये अंण्डे होतात." त्यावर विजय

म्हणाला, "मी दहा वर्षापूर्वीच शाकाहारी झालोय पण मांसाहारी लोकांसोबत जेवायला मला काही अडचण वाटत नाही." मग ! सर दारू पिणाऱ्यांसोबत थंडा प्यायलाही तुम्हाला अडचण वाटत नसेल ना ? प्रतिभाचा हा प्रश्न थोडा खोचक होता पण तो काळजीतून निर्माण झालेला होता. त्यावर विजय म्हणाला, "हो ! माझ्या मित्रांसोबत कित्येकदा बारमध्ये बसून मी थंडा प्यायलोय. पण म्हणून मला दारू पिण्याचा मोह कधीच झाला नाही. कारण मी माझ्या मोहावर विजय मिळविला आहे. मोह नष्ट होणे हेच गीतेचे फळ आहे आणि ते मला प्राप्त झालेले आहे." पण सर तुम्हाला मांसाहारी बायको भेटली तर ? त्यावर विजय म्हणाला, "मी अजून तरी लग्न न करण्यावर ठाम आहे. पण माझा विचार बदललाच तर तिच्या मांसाहारी असण्याने मला काही फरक पडत नाही. आमच्या घरात मी आणि माझे बाबा फक्त शाकाहारी आहोत. बाकी सारेच मांसाहारी आणि तसंही एका घरात दोन शेळ्या बऱ्या नाहीत एक तरी वाघ असायलाच हवा !" त्यावर प्रतिभाही विनोदाने म्हणाली, "सर ! तुम्ही स्वतःला शेळी म्हणतायं !" त्यावर दोघेही मनमुराद हसले. सर तुम्ही इतर पुरुषांपेक्षा वेगळे आहात. तुम्हाला तुमच्या या वेगळेपणाचं कौतुक नाही का वाटतं ? त्यावर विजय म्हणाला, प्रतिभा, आता मला तुझं कौतुक वाटतं. त्यावर विजय प्रतिभाला म्हणाला, "आता मला तुझं कौतुक वाटतयं तू माझी मुलाखत घेतेयसं." त्यावर प्रतिभा गप्प बसल्यावर विजय म्हणाला, "अगं ! मी गंमत करत होतो, मी वेगळा आहे, हे खरं आहे. पण मी तसा ठरवून झालो नाही. परिस्थितीने मला तसं घडवलंय. आज तुला माझे जे गुण वाटतायंत, त्यातील काही गुण माझी गरज होते. मला कधीच कळलं होतं, माझा जन्म सर्वसामान्य माणसासारखं जीवन जगण्यासाठी झालेला नाही. कारण माझ्या आयुष्यात सर्वसामान्य माणसांच्या आयुष्यात घडतात तश्या घटना घडत नाहीत. माझ्या आयुष्यात घडलेली लहानात लहान घटनाही काही कारणाने घडली होती. मला समाजात राहूनच समाजासाठी काही करायचं नसतं ना तर मी संन्याशी झालो असतो." जेवण झाल्यावर विजयने प्रतिभासाठी आईस्क्रीम आणि स्वतःसाठी चहा मागविला. त्यावर प्रतिभा त्याला म्हणाली, "सर तुमचा चहाचा मोह काही सुटला नाही. कविता म्हणायचा। तुम्हाला रात्री बारा वाजता चहा दिला तरी तुम्ही पिता." त्यावर विजय म्हणाला, "हे खरं आहे. हा एकच मोह मला सोडता आला नाही." "सर, तुम्ही लग्न का केल नाहीत ?" प्रतिभाचा आणखी एक प्रश्न. त्यावर विजय म्हणाला, "माझ्या स्वप्नातील प्रतिभा प्रत्यक्षात नव्ह्ती ना भेटली." "म्हणजे आता भेटली का ?" दुसरा प्रश्न. विजय म्हणाला, 'हो ! म्हणजे आता तिचा चेहरा हळूहळू माझ्या डोळ्यांसमोर स्पष्ट होतोय." "सर इतक्या वर्षात खरंच कोणी स्त्री तुमच्या आयुष्यात कधी आलीच नाही ? " त्यावर विजय तिला म्हणाला, "मी कविताचा दादा आहे हे समजल्यापासून तू जरा जास्तच बोलायला लागलेस असं नाही का वाटत तुला ?" तू हे विसरू नकोस मी तुझ्या मैत्रीणीचा भाऊ असलो तरी तुझा आजही बॉसच आहे. त्यावर प्रतिभा सॉरी बोलून गप्प बसली. तिचं घर जवळ येईपर्यंत काहीच बोलली नाही विजयही काहीच बोलला नाही फक्त गाडी चालवताना चोरुन तिचा रागावलेला चेहरा पाहात होता. गाडी थांबताच प्रतिभा गाडीतून उतरली आणि तिच्या घराच्या दिशेने चालू लागली. विजयही तिच्या सोबतच चालत होता. त्याने

सोबत आणलेल्या खायच्या वस्तू घेतल्या होत्या. प्रतिभाच्या घरी गेल्यावर प्रतिभाच्या आईने त्याला जेवायचा आग्रह केला. विजयने तो आग्रह मोडला नाही. प्रतिभाच्या लहान बहिणीसोबत त्याच्या गप्पा रंगल्या. इतर दोन बहिणींची, त्यांच्या अभ्यासाची त्याने चौकशी केली. त्यांना सोबत आणलेल्या खायच्या वस्तू दिल्या. जेवण झाल्यावर थोडा वेळ प्रतिभाच्या आईशी गप्पा मारताना त्याने त्यांना काही समस्या आहेत का हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. प्रतिभाच्या घरात तो असा काही मिसळला होता की जणू तो त्या घराचाच एक भाग असावा. विजय निघताना प्रतिभा त्याला सोडायला गाडीजवळ गेली असता विजय तिला म्हणाला, "तू रागावल्यावरही छानच दिसतेस." त्यावरही प्रतिभा काहीच बोलली नाही. रात्री झोपण्यापूर्वी प्रतिभा आईला म्हणाली, "आई तुला ती माझी वर्गमैत्रीण आठवते, आपला घरी यायची ती कविता मराठे." त्यावर आई म्हणाली, "अग, कविताला कोण विसरेल ? किती गोड होती ती राजकुमारीसारखी." त्यावर प्रतिभा म्हणाली, "अग, ती आमच्या सरांची बहीण आहे. तिचं लग्न ही झालयं आणि तिला विशाल नावाचा एक मुलगाही आहे. तुला सांगेन सांगेन म्हणाली आणि गडबडीत राहूनच गेलं. त्यादिवशी मी केक आणला होता तो त्याच्याच बर्थडेचा होता. कवितालाही तुला भेटायचं आहे. ती एक दिवस आपल्या घरी येणार आहे तुला भेटायला. मी तिला तुझ्याशी फोनवर बोलतेस का ? म्हणून विचारल तर ती म्हणाली, नको मी प्रत्यक्ष भेटूनच बोलेन." रात्री प्रतिभा झोपण्याच्या तयारीत असताना तिला विजयचा फोन आला. तो तिला गुड नाईट म्हणाला आणि त्याने तिच्या स्वयंपाकाची स्तुतीही केली. प्रतिभाने विजयचा आवाज आपल्या कानात साठवून घेतला. त्या रात्री त्याला आठवून आठवून ती स्वतःशीच हसत होती. कविताच्या निबंधात त्याने लिहिलेल्या कविताही तिला आठवू लागल्या होत्या आणि पहिल्यांदा शाळेच्या प्रांगणात झालेली त्याच्या सोबतची नजरानजरही आठवत होती.

आता विजय परत लिहू लागला होता. कित्येक वर्षानंतर त्याला एक छानसी कविता सुचली होती. त्याचे लिखाण प्रतिभा टाईप करून ठेवत होती आणि ते टाईप करताना ती नव्याने त्याच्या प्रेमात पडत होती. विजय आता तिच्यासोबत फारच मोकळेपणाने वागू लागला होता. त्यातील काही लिखाण विजयने वेगवेगळ्या वर्तमानपत्रात पाठविले होते. एक दिवस प्रतिभाला कविताचा फोन आला फोनवर ती प्रतिभाला म्हणाली, "आजच्या वर्तमानपत्रात विजयचा लेख प्रकाशित झाला आहे. त्याच्यात हा बदल कसा काय झाला ? तू तर केला नाहीस ना ? " त्यावर प्रतिभा म्हणाली, "मी फक्त टाईप केलयं." त्यावर कविता म्हणाली, "ते काही का असेना, तू त्याच्या कामी येतेयंस, तो कशासाठी का होईना तुझ्यावर अवलंबून राहू लागलायं हे उत्तम ! तू माझी मैत्रीण आहेस हे कळल्यापासून तो तुझ्याशी प्रेमाने बोलतो ना ?" मी तुझी मैत्रीण असण्याचा आणि सरांनी प्रेमात बोलण्याचा काय संबंध ? त्यावर कविता म्हणाली, 'संबंध आहे. आपण शाळेत असताना विजय मला शाळेत क्लास सुटल्यावर मला घ्यायला यायचा. एकदा मी तुझी त्याच्याशी ओळख करून दिली होती, तेव्हाच मला वाटतं, तो तुझ्या प्रेमात पडला होता. मला तेव्हाही त्याच्या डोळ्यात तुझ्याबद्दलचं प्रेम दिसलं होतं. पुढे आपले मार्ग वेगळे झाले आणि आपण लांब गेलो. त्यावर प्रतिभा म्हणाली, "कविता तू ना ! उगाचच काहीही बोलतेस !" त्यावर प्रतिभा म्हणाली,

'उगाच नाही, खोटं वाटत असेल तर विचार त्याला ? मला आवडेल तुला वहिनी म्हणायला. पण तुला माझ्यासारखी नणंद चालेल का ?" त्यावर प्रतिभा म्हणाली, "तुझ्यासारखी नणंद भेटणार असेल तर मी गाढवाशीही लग्न करायला तयार होईन." तिचं हे बोलणं मागून ऐकणारा विजय म्हणाला, "कोण गाढवाशी लग्न करतयं ?" विजयचा आवाज ऐकताच प्रतिभा किंचित बावरली आणि म्हणाली, 'सर, सॉरी. कविताचा फोन होता. अशीच थट्टा मस्करी चालू होती." "अगं, मग इतकी कशाला घाबरतेस. तू बोल तिच्याशी. बोलून झालं की माझ्या केबिनमध्ये ये ! " विजय निघून गेल्यावर प्रतिभा काही बोलण्यापूर्वीच कविता म्हणाली, विजय खरोखरंच गाढव आहे. आता मलाच काहीतरी करावं लागेल तुमच्यासाठी ! फोन ठेवल्यावर प्रतिभा स्वतःशीच म्हणाली, "कविता माझी नणंद व्हायला तयार आहे, म्हणजे अर्धी लढाई मी न लढताच जिंकले आहे. ती म्हणत होती की एकदा सरही माझ्या प्रेमात पडले होते, त्यात जर तथ्य असेल तर कदाचित माझं प्रेम यशस्वी होईल." काही दिवसांनी कविता एक दिवस अचानक विजयला भेटायला आली अणि आईची तब्बेत थोडी ठीक नाही तर मी तिला भेटायला गावी जाणार आहे. प्रतिभाला मी माझ्या सोबत घेऊन जाणार आहे.



तसं मी तिच्या आईला प्रत्यक्ष भेटून बोललेयं. तूही येणार असशील तर आमची गाडी घेऊन जाऊया!" त्यावर विजय म्हणाला, "तुझी गाडी नको. माझीच गाडी घेऊन जाऊया. ड्रायव्हरला सोबत घेतो." कविताला विजय इतक्या सहजासहजी तयार होईल हे अपेक्षित नव्हते. पण तिला खूप आनंद झाला. इतक्यात प्रतिभा आल्यावर मनिषासह त्या तिघींच्या गप्पा रंगल्या. त्यांचे चहापाणी झाले. तेव्हा पहिल्यांदा कविताने विजयचे घर आणि ऑफीस आतून बाहेरून संपूर्ण पाहिले. दुसऱ्या दिवशी विजय कविताच्या घरी गेला. बऱ्याच वर्षानंतर त्याला घरी आलेलं पाहून कविताच्या सासरच्यांना प्रचंड आनंद झाला. सर्वाधिक आनंद विशालला झाला. त्याने विशालसाठी आणलेले चॉकलेट त्याला दिले. विजयने कविताच्या घरातील साऱ्यांचीच आस्थेने चौकशी केली. चहा-नाश्ता वगैरे झाल्यावर विजय कविताला घेऊन प्रतिभाच्या घरी गेला. तेव्हा प्रतिभा तयारी करूनच बसली होती. प्रतिभाच्या आईशी थोडावेळ जुजबी बोलून ते पुढच्या प्रवासाला निघाले. वाटेत प्रतिभा आणि कविताच्या गप्पा रंगल्या. विजय मात्र फक्त त्या शांतपणे ऐकून घेत होता. कोकणात आपल्या गावातील घराजवळ पोहचेपर्यंत गाडी अनेक जागी थांबली होती. कविता तर सहलीचाच आनंद घेत

होती. कविता सोबतीला असल्यामुळे प्रतिभाचा आनंदही ओसंडून वाहात होता. तिला हसताना पाहून विजय पुन्हा पुन्हा नव्याने तिच्या प्रेमात पडत होता. कित्येक वर्षानंतर विजयलाही असं वाटत होतं की तो मोकळ्या हवेत श्वास घेतोय. नाहीतरी त्यालाही त्याच्या आयुष्यातील धावपळीचा आता कंटाळा आला होता. विजयची गाडी विजयच्या कोकणातील घराच्या दारासमोर थांबली. गाडीचा आवाज ऐकून विजयचे बाबा बाहेर आले, विजयला पाहून त्यांना प्रचंड आनंद झाला. पण त्यांनी तो चेहऱ्यावर दिसू दिला नाही. इतक्यात विजयची आईही बाहेर आल्यावर कविताने तिला मिठी मारली. विजय जवळ जाताच आईने त्याच्या चेहऱ्यावरुन प्रेमाने हात फिरवला. प्रतिभा आईच्या वाकून पाया पडताच आईने तिला सुखी रहा, असा आर्शीवाद दिला आणि तिच्या डोक्यावरुन प्रेमाने हात फिरविला. कविताने प्रतिभाशी आईची ओळख करून दिली, ही माझ्या शाळेपासूनची मैत्रीण आहे. मी शाळेत असताना बऱ्याचदा आपल्या घरी आली होती. तुला कदाचित आठवत नसेल. त्यावर आई म्हणाली, 'न आठवायला काय झालंय, ही प्रतिभा ना ! मला चांगली आठवतेयं. आपल्या घरी आल्यावर हिच तर चहा बनवायची तुमच्यासाठी. तिच्या आईलाही मी चांगली ओळखते. आमची बऱ्यापैकी मैत्री होती. प्रतिभा तुझी आई कशी आहे आणि तुझ्या तीन लहान बहिणी कशा आहेत ? तुझे बाबा गेल्याच कळ्लं पण त्यानंतर आमची कधी भेटच झाली नाही. हो ! प्रतिभाची आईही तुझी आठवण काढत होती मुंबईला आल्यावर त्या तुला भेटायला येणार आहे." कविता मध्येच म्हणाली. विजयसाठी हे सारंच अनपेक्षित होत. कविताच्या आईने पुढचा प्रश्न विचारला, "पण आता प्रतिभा तुला कोठे भेटली ? मला वाटत होतं तिचंही लग्न वगैरे झालं असेल." त्यावर कविता म्हणाली,"अग, आई प्रतिभा आता विजयच्याच ऑफीसमधे कामाला आहे म्हणून तर आमची पुन्हा भेट झाली, तुझ्या तब्बेतीची चौकशी करायला येतच होते तर तिलाही म्हटले चल माझ्या सोबत ! " त्यावर कविताची आई म्हणाली, 'बरं झालं तू तिला सोबत घेऊन आलीस. चला आता तुम्ही अंघोळ वगैरे करून घ्या !" घरात पाऊल ठेवताच विजयने आईच्या तब्बेतीची चौकशी केली असता ती म्हणाली, "आता तू आणि कविता आलात ना तुम्हांला पाहिलं आणि मी बरी झाले." विजयने तरीही बाबांना प्रश्न केला, "काय म्हणाले डॉक्टर ? " त्यावर बाबा म्हणाले, "काही खास नाही. थोडा अशक्तपणा आहे." त्यावर विजय म्हणाला, "त्यांना उद्या पुन्हा बोलवा. मला बोलायचंय त्यांच्याशी." थोडावेळ खुर्चीत शांत बसल्यावर विजय घराच्या मागील दारासमोरील मोकळ्या जागेत नारळांच्या झाडाखाली आंघोळ करायला गेला. तो आंघोळ करत असताना प्रतिभा त्याच्या पिळदार शरिराकडे चोरून पाहात असताना कविताने तिला पाहिलें आणि ती तिला म्हणाली, "माझ्या भावाला नजर लावू नकोस." त्यावर प्रतिभा म्हणाली, "मी ती मागची नारळाची झाडे पाहात होती." आंघोळ वगैरे झाल्यावर प्रतिभा आईंना कामात मदत करण्यासाठी स्वयंपाकघरात गेली असता आई तिला म्हणाली, 'प्रतिभा तू या घरात पाहुणी आहेस. तुला कामे करण्याची काही गरज नाही. येथे कामे करायला बरीच माणसे आहेत आता देवाच्या कृपेने." त्यावर प्रतिभा स्वयंपाक करणाऱ्या बाईला म्हणाली, 'मावशा। सर दुधाचा चहा पित नाहीत. त्यांना आले घातलेला कोरा चहा लागतो आणि स्वयंपाक शाकाहारी. मसाले कमी वापरा आणि शक्यतो

तळलेले पदार्थ बनवू नका त्यांच्यासाठी ! मला आणि कविताला काहीही चालेल." त्यावर आई म्हणाल्या, "प्रतिभा तुला विजयच्या बऱ्याच बारीक सारीक गोष्टी माहित आहेत. किती वर्षे त्याच्यासोबत काम करतेयस." त्यावर प्रतिभा चार वर्षे म्हणताच आई म्हणाल्या, "चार वर्षे म्हणजे तू त्याला आता आतून बाहेरून ओळखायला लागली असशील." त्यावर प्रतिभाने मानेनेच होकार देताच आई प्रतिभाला म्हणाली, "जा तू विजय आणि कवितासाठी चहा नाश्ता घेऊन जा आणि तूही त्यांच्यासोबतच घे आणि आराम कर! " प्रतिभा आणि विजय थकल्यामुळे आराम करत असताना कविता मात्र पडवीतील झोपाळ्यावर बसून झोके घेत टी.व्हीवर चित्रपट पाहत होती. तिला निवांत बसलेलं पाहून आईही तिच्या शेजारी बसली आणि कविताला म्हणाली, "तुला काय तुझ्या दादाच्या लग्नाची काळजी वगैरे आहे की नाही ?" त्यावर कविता गालात गोड हसून म्हणाली, "आई, तुला काय वाटलं, मी एवढी धावपळ करून तुझ्या तब्बेतीची चौकशी करायला आले आणि यायचंच असत तर माझ्या नवऱ्याला घेऊन नसते का आले ? मी इकडे तुला तुझ्या होणाऱ्या सुनेचं मुखदर्शन देण्यासाठी घेऊन आलेय. मला खात्री होती तिला पाहिलं की तू ठणठणीत होशील." त्यावर आई खरंच की काय ? म्हणून त्यांनी देवाचे आभार मानले आणि पुढचे प्रश्न. विजय म्हणाला का तुला काही तसं तुझं प्रतिभाशी बोलणं झालं का ?" त्यावर कविता म्हणाली, 'किती प्रश्न विचारशील अजून तसं काही बोलणं झालं नाही. पण दोघांच्याही डोळ्यात मला ते दिसतयं. आता आम्ही चार-पाच दिवस आहोत ना इकडे तोपर्यंत मी त्यांचा निकाल लावेनच. तू खात्री बाळग. जाताना मी तुला एक आनंदाची बातमी देऊनच जाईन पण त्यासाठी मला थोडी तुझीही मदत लागेल." थोड्या वेळाने कविता विजयला म्हणाली, "विजय जरा बाजारात जाऊन माझ्यासाठी थोडे सामान घेऊन ये. प्रतिभाला सोबत घेऊन जा. त्यानिमित्ताने आपला गावही ती जवळून पाहील. मी आले असते पण मला कंटाळा आलायं. मी आईजवळच थांबते." विजय प्रतिभासह चालतच बाजाराच्या दिशेने निघाला. चालता चालता प्रतिभा विजयला म्हणाली, "सर ! तुम्ही गाडी का घेतली नाहीत ?" त्यावर विजय म्हणाला, "तुला चालायचा कंटाळा आलाय का ?" त्यावर छे हो ! 'तुम्हाला चालायची सवय नाही ना ?" त्यावर विजय म्हणाला, "मी काही पायाला मेहंदी लावून जन्माला आलो नव्हतो." त्यानंतर नेहमीसारखी प्रतिभा गप्प झाल्यावर विजय म्हणाला, "अगं मी विनोद केला." त्यावर प्रतिभा म्हणाली, "सर तुम्ही विनोद कधी करता आणि गंभीर कधी असता तेच काही कळत नाही." त्यावर विजय म्हणाला, "कळेल हळूहळू !" चालता-चालता रस्त्यापासून थोड्या अंतरावर आत विजयला गावचे देऊळ नजरेस पडताच तो प्रतिभासह देवळात गेला आणि देवाचं दर्शन झाल्यावर विजय देवळातील गुरवाच्या पाया पडला म्हणून प्रतिभाही पाया पडल्यावर त्याने सौभाग्यवती भवः असा आर्शीवाद दिला. प्रतिभा किचिंत ओशाळली. पण काहीच बोलली नाही. त्यावर विजयनेही काही प्रतिक्रिया दिली नाही. चालत चालत गावं पाहत ते दोघे गावच्या बाजारात पोहोचले. प्रतिभाने कवितासाठी बरेच सामान खरेदी केले. सामान बरेच आहे हे पाहून विजयने ड्रायव्हरला फोन करून बाजारात बोलावले आणि सामान गाडीत ठेऊन त्याला जायला सांगितले. त्यावर प्रतिभा स्वतःशीच म्हणाली, "काय विचित्र माणूस आहे. सामान गाडीतून पाठवलं आणि आता

स्वतः चालत जाणार !" प्रतिभकडे पाहत विजय म्हणाला, "तू हाच विचार करतेयस ना ? काय विचित्र माणूस आहे. सामान गाडीतून पाठवलं आणि स्वतः चालत जाणार." त्यावर प्रतिभच्या चेहऱ्यावरील बदलेले रंग पाहून विजय म्हणाला, "प्रतिभा तू विसरतेस की मी एक लेखक आहे. लोकांचे चेहरे मला वाचता येतात." त्यावर प्रतिबा मनात म्हणाली, "मग, तुम्हाला हेही कळले असते की मी तुमच्या प्रेमात पडलेय?" चालता-चालता विजय प्रतिभाला म्हणाला, "लग्नाबाबत तुझे काय विचार आहेत ? त्यावर किंचित सावरत प्रतिभा म्हणाली, "मी माझ्या आईच्या आणि बहिणींच्या भविष्याबाबत निश्चिंत झाल्याखेरीज लग्न नाही करणार आणि करायचं झालचं तर माझ्या घरच्यांची जबाबदारी मलाच उचलण्याची परवानगी त्याने मला द्यायला हवी." त्यावर विजय तिला म्हणाला, 'समजा तू कोणाच्यातरी प्रेमात पडलीस आणि तो तुझ्या घरच्यांची जबाबदारी उचलण्यास नकार देत असेल तर तू काय करशील?" त्यावर प्रतिभा म्हणाली, "मी अशा कोणाच्या प्रेमात पडणारच नाही आणि पडलेच तर मी माझ्या प्रेमाचा त्याग करेन. मला माझ्या कुटुंबापेक्षा महत्वाचं कोणीच नाही." त्यावर विजय म्हणाला, "हे सारं तू भावनेच्या भरात बोलतेसं. वास्तवात असा विचार मुर्खपणा ठरतो. तो मुर्खपणा तू करू नकोस असं मला वाटत. माझा एक मित्र आहे. त्याच्याशी मी बोललोय. तो तुझ्यासोबत लग्न करायला तयार आहे. तो बऱ्यापैकी श्रीमंत आहे. तुझ्या घरच्यांची जबाबदारी तो अगदी सहज उचलू शकेल. तुझा होकार असेल तर मी त्याच्याशी पुढचं बोलतो ?" विजयचे हे बोलणं ऐकून प्रतिभाच्या कोमल हृदयाला असंख्य तडा गेला, ती स्वतःशीच म्हणाली, "म्हणजे सरांना माझ्याविषयी काहीच वाटत नाही, मी उगाच त्यांच्या प्रेमात वाहत चालले होते." प्रतिभा स्वतःला सावरत विजयला म्हणाली, "नको सर मी माझ्या कुटुंबाची काळजी घ्यायला समर्थ आहे. त्यासाठी मला कोणाच्या उपकाराची गरज नाही." त्यानंतर त्यांच्यात काहीच संवाद झाला नाही. ते माघारी येताच प्रतिभाचा पडलेला चेहरा पाहून कविताने तिला त्याचे कारण विचारले असता ती म्हणाली, "तुझ्या दादाने माझ्या लग्नासाठी त्यांच्या मित्राचं स्थळ सुचवलयं." त्यावर प्रतिभा जोरजोरात हसायला लागल्यावर प्रतिभा तिला म्हणाली, "इकडे माझा जीव जातोय आणि तू हसतेयसं?" त्यावर कविता हसत-हसतच तिला म्हणाली, "असं होयं, मग काळजी करू नकोस. मी माझ्या दादाला चांगलंच ओळखते. तो कोणाचं लग्न वगैरे जुळविण्याच्या भानगडीत कधीच पडत नाही. मुळात त्याला ते आवडतचं नाही. मला वाटत त्याने नथीतून तीर चालवला असेल आणि त्या तीराने तू घायाळ झालीस." ते ऐकून प्रतिभाच्या जीवात जीव आला खरा, पण तरीही ती किंचित अस्वस्थच होती. रात्री जेवताना विजयची आई प्रतिभाच्या हाताला चव आहे हां, आजची खीर तिनेच बनवली आहे, जीभेवर गोडवा आहे, संस्कारी आणि मनमिळावू आणि प्रेमळ तर आहेच. त्यामुळे ज्या घरात सून म्हणून जाईल त्या घराचा स्वर्ग करेल. त्यावर विजयचे बाबा सहज म्हणाले, "स्वर्गच करायचा तर आपल्याच घराचा करा ना ?" ते ऐकुन प्रतिभाला ठसका लागला. विजयने तिच्याकडे पाण्याचा ग्लास पुढे केला आणि बाबांना म्हणाला, "तुम्हाला या घराचा स्वर्ग करायची जरा जास्तच घाई आहे." त्यावर बाबा काहीच बोलले नाहीत. कविताही काहीच बोलली नाही. दुसऱ्या दिवशी कविताचा हातावर मेहंदी काढण्याचा कार्यक्रम ठरला

होता. प्रतिभाने कविताच्या दोन हातांवर आणि प्रतिभाच्या एका हातावर कविताने मेहंदी काढल्यावर प्रतिभाच्या एका हातावर मेहंदी कोणी काढायचा हा प्रश्न होता. त्यावर आईला विचारले असता, "आई म्हणाली मी बाई नाही काढणार ! विजय काढेल त्याला येते काढता. लहानपणी तोच कविताच्या हातावर मेहंदी काढायचा." प्रतिभा विजयजवळ गेली आणि त्याला मेंहंदीचा कोन देत हात पुढे केला असता विजयने पहिल्यांदा तिचा हात आपल्या हातात घेतला. विजयच्या हाताचा स्पर्श पहिल्यांदा अनुभवताना प्रतिभाच्या मनात असंख्य फुलपाखरे उडू लागली होती. विजयने तिचा हात अत्यंत हळुवारपणे आपल्या हातात घेतला होता आणि तो तिच्या हातावर मेहंदी काढू लागला. मेंहदी काढून झाल्यावर ती विजयला गालात खळी काढत गोड हसत किंचित लाजत थॅन्क यू म्हणताच कविता म्हणाली, "दादा आता सवय करुन घे मेहंदी काढायची. बायकोच्या हातावर मेहंदी काढणारा नवरा नशिबानेच मिळतो. त्यामुळे तुझी बायको काय तुला सोडणार नाही. दुसऱ्या सकाळी प्रतिभा विजयला चहा देताना किंचित ओशाळत होती. ते पाहून विजय तिला म्हणाला, "प्रतिभा बस माझ्यासमोर. मला तुझ्याशी थोडी चर्चा करायचेय." प्रतिभा बसली असता विजय तिला म्हणाला, सॉरी मी तुला बाजारातून येताना जे काही माझ्या मित्राबद्दल बोललो ते असंच बोललो. माझा असा कोणीही मित्र वगैरे नाही फक्त मला लग्नाबाबत तुझे विचार जाणून घ्यायचे होते ! त्यावर प्रतिभाने पाणावलेल्या डोळ्यांनी का ? असा प्रश्न विचारताच मागून कविता म्हणाली, "का म्हणजे काय त्याला तुझ्याशी लग्न करायचयं, काय दादा बरोबर ना ?" त्यावर विजय अनपेक्षितपणे हो ! म्हटल्यावर प्रतिभासह घरातील सारेच आवाक झाले. प्रतिभा जागेवरुन उठून सरळ आतल्या खोलीत गेल्यावर कविताही तिच्यामागोमाग आतल्या खोलीत गेली असता प्रतिभाने कविताला आपल्या मिठीत भरून घेतली. प्रतिभाचे डोळे अश्रूनी भरले होते. प्रतिभाचे पाणावले डोळे पुसत कविता म्हणाली, "आज मी खूप आनंदी आहे. आज माझंच नाही तर माझ्या आई-वडिलांचंही एक स्वप्न पूर्ण झाले फक्त तुझ्यामुळे." त्यावर प्रतिभा म्हणाली, "कविता तुझ्यासारखी मैत्रीण भाग्यानेच मिळते." त्यावर प्रतिभा हसून म्हणाली, "आता मी तुझी नणंद होणार आहे म्हटल." विजयने आपल्या प्रेमाची कबुली दिल्यामुळे विजय आणि प्रतिभाचे नाते अचानक बदलले होते. गावातील टेकडीवरच्या शंकराच्या देवळात विजय प्रतिभा, कविता, आई-बाबांसह गेला असता थोडा एकांत मिळताच प्रतिभाला म्हणाला, "प्रतिभा मी तुझ्यासोबत लग्न करण्याचा निर्णय तुझ्यावर उपकार करण्यासाठी, तु माझ्या बहिणीची मैत्रीण आहेस म्हणून, आई-बाबांना सून म्हणून आवडलीस म्हणून घेतलेला नाही. माझं तुझ्यावर मनापासून प्रेम आहे, म्हणून घेतला आहे. मी जेव्हा तू शाळेत असताना तुला पहिल्यांदा पाहिले होते तेंव्हाच मी तुझ्या प्रेमात पडलो होतो. माझा कवितासंग्रह प्रतिभा मी तुलाच डोळ्यासमोर ठेऊन लिहला होता, मी तुझ्या प्रेमात पडलो होतो. तेव्हा मी कोणीच नव्हतो. पण आजही माझे तुझ्यावरील प्रेम यत्किंचितही आटलेले नव्हते. मला कधी स्वप्नातही वाटले नव्हते की तू कधी माझ्या आयुष्यात येशीलही. माझा योगायोगांवर विश्वास नव्हता पण आता विश्वास बसू लागला आहे, योगायोगाने आपल्या आयुष्यात अनेक घटना क्रमाक्रमाने घडत गेल्या आणि आपण एकमेकांच्या जवळ येण्याचा अवघड मार्ग सोप्पा होत गेला. तू

माझ्या आयुष्यात पुन्हा येताच माझ्यातील लेखक कवी मला पुन्हा गवसला. माझ्यातील हरवलेला माणूस आणि कलाकारही पुन्हा जागा झाला, मी पुन्हा माझ्या कुटुंबाच्या जवळ गेलो. तू माझ्या जगण्याला खरा अर्थ दिलास. त्यावर प्रतिभा विजयचा हात हातात घेत त्याला म्हणाली, “मीही तुमच्या आजच्या रुपाच्या प्रेमात पडले नाही. तुमच्या आणि तुमच्या कवितांच्या प्रेमात मी शाळेत असतानाच पडले होते. म्हणूनच मी कित्येकदा तुमच्या घराची वारीही केली होती. पण योगायोगानेच तेव्हा काहीच जमलें नाही. नंतर सारंच बदलत गेलं. तुमची आठवण किंचित मागे पडली. ज्या दिवशी कवितामुळे तुमची ओळख पटली त्या रात्री मी क्षणभरही झोपले नाही. त्या दिवशी पहिल्यांदा माझा योगायोगांवर आणि प्रेमावरही विश्वास बसला. माझ्या आयुष्यात घडलेल्या साऱ्या चांगल्या-वाईट घटनांचा संबंध योगायोगाने आपली जी भेट होणार होती तिच्याशी जोडलेला होता. त्यावर विजय म्हणाला, ’मी आतापर्यंत माझ्या आयुष्यात घडलेल्या घटनांसाठी इतरांना दोष देत होतो पण आता मला कळतय तो माझा मुर्खपणा होता. आपल्या आयुष्यात घडणाऱ्या साऱ्या घटना एखाद्या चित्रपटात पूर्वनियोजित असल्यासारख्या घडत होत्या. मी तर म्हणेन या विश्वात असलेली कोणतीतरी अज्ञात शक्तीच ते घडवून आणत होती. आपण मात्र त्याला आज योगायोग म्हणतोय इतकंच.” विजयने गप्पा मारत चालताना एक हात प्रतिभाच्या कंबरेभोवती टाकला होता आणि प्रतिभा त्याच्या खांद्यावर डोकं टाकून निश्चिंतपणे सावकाश चालत होती. त्यांच्या भविष्याच्या दिशेने. पण अजूनही त्यांच्या आयुष्यातील योगायोग संपलेले नव्हते. विजय आणि प्रतिभाचं प्रेम यशस्वी होणं, त्यांचं एकमेकांशी लग्न होण हा एका योगायोगाचा शेवट होता. पण तेथूनच सुरु होणार होता आणखी एक योगायोग....



# उंडी

- वैभव जाधव

दिवसभराची भटकंती करून जनावरं घराकडे परतत होती. सूर्यास्ताचा तांबूस रंग गोठणीवर मोत्यांसारखा पसरला होता. गुराखी जनावरांच्या मागून हुंदडत चालले होते. मधेच हुर्र्र्र्र... हुर्रे असा आवाज करीत जात होते. तो आवाज ऐकून जनावरं शेपट्या वर करून पळत होती. घरी जाण्याची घाई सर्वांनाच होती. पण उंडीचा पाय मात्र निघत नव्हता. दहा वर्षाची उंडी आपल्या म्हशींच्या मागुन गुमान चालली होती. मधेच ती मागे वळून पहायची. तिची अस्मानी म्हैस हरवली होती. बराच वेळ शोधूनही तिला ती सापडली नव्हती. कुठे गेली असेल? उंडीच्या मनात कालवाकालव चालली होती. तिचे पाय घराकडे जायला तयार नव्हते. कुठल्या तोंडाने ती घराकडे जाणार होती. शिवाय अस्मानी तिची लाडकी म्हैस. विष्णूभाऊंचा चेहरा तिला एखाद्या मारकुट्या म्हशीसारखा दिसू लागला होता. घरी गेल्यावर ते आपली पाद्यपूजा घलणार हे तिनं गृहीत धरलं होतं. उंडी विष्णूभाऊंकडे म्हशी राखायचं काम करत होती. तिचे आई-वडील तिच्या लहानपणीच वारले होते. ते निवर्तल्यानंतर सावकाराचं कर्ज फेडण्यासाठी तिच्या घराची निलामी झाली होती. विष्णूभाऊंनी उंडीला दत्तक घेतलं होतं. त्याहीपेक्षा विष्णूभाऊंना आयती घरगडी मिळाली होती. आणि त्याचा आनंद त्यांच्या सुरकुत्या पडलेल्या चेहऱ्यावरही लपत नव्हता. आज विष्णूभाऊंची स्वारी नारायणरावांसोबत मिटक्या मारत पलंगावर बसली होती. "अण्णा....बाकी काही म्हणा पण तुमच्या हुशारीला काही तोड नाही!" नारायणराव विष्णूभाऊंना अण्णा म्हणत. "अहो नारायणराव, ही पिकलेली केसं काही नकली नव्हेत. धोतराचा खोचा मारत विष्णूभाऊ म्हणाले." या उपटसुंभांना मी चांगला ओळखून आहे नारायणराव, अहो हसतात असे की एक दातही दिसायचा नाही. विष्णूभाऊंच्या कोळशेताच्या बांधावर आंब्याचं एक डेरेदार झाडं होतं त्याच शेताला लागून मोऱ्यांची हद्द होती. ते झाड आपलं असल्याचं मोरेपंत गावभर सांगत होते. आमच्या शकुमावशीनं ते बांधावर लावलं हो असा पुरावाही ते त्यासोबत जोडत. मोरेपंताच्या या भटपुराणामुळे विष्णूभाऊ मात्र त्रस्त झाले होते. शेवटी विष्णूभाऊंनी गावपंचायत भरवली व ते झाड आपलंच कसं आहे हे अगदी पुराव्यानिशी सिद्ध केले. झालं मोरेपंतांचा चेहरा रागाने उसळला. हातातोंडाशी आलेला घास विष्णूभाऊंनी फस्त करून टाकला.

**"उंडीला आपण किती दूर चालत आलो हे सुद्धा माहीत नव्हतं. पावसाचा जोर मात्र आता थोडा ओसरला होता. उंडी थकून गेली होती. एवढा मुसळधार पाऊस पडूनही तिच्या पोटाची खळगी मात्र रिकामीच होती. तीच्या डोळ्यांवर अंधारी येत होती."**

वाड्याच फाटकं वाजलं. विहिरीतून रहाटानं पाणी ओढणारा बाळू जनावरं चरून आल्याची वर्दी विष्णूभाऊंना देण्यासाठी गेला. "जा जनावरं बांधुन घे पटापट आणि वैरण थोडी कमीच टाक उगाच नास

करू नको." "व्हय मालक" बाळू अदबीनं म्हणाला. बाळू फाटकापाशी आला, "काय गं उंडे अस्मानी कुठं दिसत न्हायी." उंडी गप्पचं, "अगं मी तुला इचारतोय." उंडी वाड्याच्या खांबापाशी रेलून उभी राहिली. तिच्या तोंडून एकही शब्द फुटत नव्हता. भीतभीतच ती म्हणाली, "अस्मानी हर...वली...!" अग मग तू कशी घरी परत आलीस?

विष्णूभाऊंच्या अचानक आलेल्या ह्या आवाजानं उंडी जागेवरच थरथर कापू लागली.

उनाडक्या करत राहिली असशील कुठतरी, ते काही कुणी सांगायला नको. उंडीच्या गालावरून घळाघळा अश्रू वाहू लागले.

"आता रडून काय उपयोग. ढोंगं आहेत ही सारी. आता रडून काय अस्मानी परत येणार आहे. जा आधी शोधून आणं तिला मगच घरी ये. त्याशिवाय जेवणही मिळायचं नाही.

बिचारी उंडी आल्यापावली परत रानाकडे निघाली. सकाळपासून तिच्या पोटात अन्नाचा कणही नव्हता, पण विष्णूभाऊंच्या घाऱ्या डोळ्यांना मात्र हे दिसत नव्हतं. अस्मानीवर जेवढं उंडीचं प्रेम होतं तेवढं कुणाचचं नव्हतं. कोपरानं डोळे पुसत उंडी अस्मानीला शोधायला निघाली. तहान-भूक जणू तिच्या वाट्याला कधी आलीच नाही. मिळालं तर खायचं नाहीतर उपाशी पोटी झोपून जायचं. उंडी गोठणीच्या वाटेकडे चालत निघाली होती. डोंगराच्या सावल्या लांब होत चालल्या होत्या. काळोख कधी पडेल याचा काहीच अंदाज येत नव्हता. चालता चालता उंडीला आठवलं अस्मानी या आधी जेव्हा जेव्हा हरवली होती तेव्हा ती कोंडीपाशीच सापडली होती, असं बाळूकाका म्हणाले होते. तिथेच तर गेली नसेल. उंडीच्या अंगावरून एक शहारा पायाकडे निसटला. कोंडीकडे आता जाणं शक्य नव्हतं. शिवाय ती जागाही तशी चांगली नव्हती. कोंडीकडे सहसा कुणी जात नसे. कोंडी म्हणजे निसर्गतः तयार झालेली एक विहीर. तिथे काळीमाया आहे असा गावकऱ्यांचा समज होता. उंडी क्षणभर तिथेच थांबली. काय करावे तेच तिला कळेना. अस्मानीला शोधून आणल्याशिवाय आता घरी परत जायचं नाही हे तिनं मनाशी पक्क केलं होतं. तिचे पाय आपसूकच कोंडीकडे वळले. ती झपझप पावलं टाकत कोंडीच्या दिशेनं निघाली. कोंडीची वाट तशी निर्जन वानरांची मात्र वाटेवर बडदास्त होती. हुप हुप करत ते इकडून तिकडे मिरवत होते. मधेच एका केलटिणीने उंडीकडे दात मिचकावत पहिले. उंडीला तिचा भयंकर राग आला. आपलं या जगात कुणीच नाही म्हणून आपल्याशी सगळे असे वागतात का! असा एक विचार तिच्या बालमनाला चाटून गेला. उंडी आता कोंडीपाशी येऊन पोचली. सर्वत्र शांतता पसरलेली होती. कोंडीतून चित्रविचित्र आवाज बाहेर पडत होते. आजूबाजूला पक्ष्यांचा किलकिलाट चालूच होता. वटवाघळांची एक झुंड उंडीच्या डोक्यावरून झर्रकन निघून गेली. उंडीची नजर अस्मानीला शोधीत होती. पण ती मात्र तिला कुठेच दिसत नव्हती. उंडीचा चेहरा उदासवाणा झाला होता. मनात भातीचं काहूर होतं. वानरांचा हुप हुप असा जयघोष चालूच होता. निराश होऊन उंडीने पाठ फिरवली इतक्यात तिला अस्मानीचा हंबरण्याचा आवाज ऐकू आला. जणू कितीतरी वटवाघळं त्यावेळी उडाली. तो आवाज ऐकून उंडीच्या चेहऱ्यावर उमटलेलं ते हसू शब्दांमध्ये टिपणं शक्यच नव्हतं. अस्मानी सापडली. उंडीनं धावत जाऊन तिची गळाभेट घेतली. तिचे मुके घेतले. आपले सावळ्या रंगाचे मऊ गाल अस्मानीच्या थरथरणाऱ्या पाठीवर टेकवले. कुठं होतीस गं अस्माने.... कित्ती किती शोधलं तुला ठाऊक आहे का? तुझ्या शिवाय करमत पण न्हवत बघ मला. चल आता घरला. उंडी अस्मानीला घेऊन घराकडे निघाली. वनरांचा जयघोष आता आणखीनच वाढला

होता. उंडी अस्मानीला घेऊन गोठ्यापाशी आली. विहीरीवर जाऊन तिनं काढणाभर पाणी आणलं आणि अस्मानीला पाजलं. मग थोडं आपणही प्यायली. मग तिच्याच बाजूला पेंढ्यावर अंग टाकून झोपी गेली.

बैलगाडीच्या करकर वाजणाऱ्या आवाजाने उंडीला जाग आली. सोनूकाकांची बैलगाडी दुधाच्या बुधल्या नेण्यासाठी नेहमीप्रमाणे आली होती. उंडी गोठ्यातून डोळे चोळतच बाहेर आली. विहीरीवर जाऊन तिनं तोंड धुतलं. दुरूनच तिला गोविंद भटजी येताना दिसले. लाल रंगाचा पंचा नेसलेले गोविंद भटजी रोज सकाळी नारायणाच्या देवळात पूजेसाठी जात. त्यांच्या हातात पाण्याचा एक लोटा असे. उंडीला पाहून ते म्हणाले, "काय गं उंडे आज फुल नाही वाटतं काढलीस तुझ्या बाप्पासाठी. थांबा जरा आलेच" असं



म्हणून उंडी धावत धावत परसदारी गेली. नुकत्याच उमललेल्या जास्वंदीची, कण्हेरीची आणि सोनचाफ्याची फुलं आणून तिनं गोंविदभटजींच्या परडीत ठेवली.

"उंडे तू दिलेली फुलंच देवाला आवडतात बर कां!" गोविंदभटजी हसत हसत म्हणाले. ते ऐकून उंडीच्या चेहऱ्यावर हसू उमटले. "खरचं, होय, अगं आम्ही आणलेली फुलं कोमेजून जातात पण तू दिलेली मात्र दुसऱ्या दिवसापर्यंत टवटवीत असतात. अगदी तुझ्यासारखी." "काका...देव तुम्हाला भेटतो का हो रोज देवळात" उंडी काहीसा विचार करून म्हणाली. तिच्या ह्या प्रश्नाने गोंविदभटजी जरासे हसले व म्हणाले "होय.. भेटतो पण दिसत मात्र नाही." त्यावर उंडी म्हणाली, "काका, तुम्हांला जर देव भेटला तर यातलं एक फूल त्याच्याकडे द्या आणि त्याला म्हणा हे माझ्या आईला दे, सगळे म्हणतात ती त्याच्याकडेच आहे. गोविंदभटजीच मनं गहिवरलं ते फक्त "देईन हं बाळ" इतकच म्हणाले आणि निघून गेले.

उंडी घरात आली. विष्णूभाऊंचं स्तोत्रपठण चालू होतं. घरात नोकरांची धावपळ सूरू होती. "उंडे, अग ती केळीची पानं पुसून घे. अशी ठोंब्यासारखी काय उभी आहेस." मालकीणबाईंची ऑर्डर उंडीच्या कानावर येऊन आदळली. उंडी पानं पुसायला बसली. पानं पुसून झाल्यावर तिनं पाठीमागचा कुंड पाण्याने भरून ठेवला. मागच्या दाराची झाडलोट केली. अजून तिला चहाचा घोटही मिळाला नव्हता. इतक्यात बाळूची हाक तिच्या कानावर आली. "ये उंडे जा ही भाकर-चटणी बांधून घे फडक्यात आन हो. म्हशींवर नीट लक्ष ठेव, कळलं का?" उंडीन मान डोलावली. भाकर चटणीची वळकटी कमरेला बांधुन उंडी म्हशींना घेऊन पुन्हा रानात निघाली. तिला घरचा कंटाळा येत असे. पण रानात मात्र ती चांगली रमायची. भोळा, माधव, भिमा, शिरपू सगळे आपआपली जनावरं चरायला घेऊन यायची. उंडीला त्यांच्याबरोबर रोज खेळायला मिळायचं त्यामुळे ती रानात निघाली की आनंदात असायची. भोळा, माधव, भिमा, शिरपू तिच्या आधीच जनावरं घेऊन आली होती. उंडी त्यांना जाऊन भेटली. "ये, मी नाही राज्य घेणार ... नेहमी मीच का घ्यायचं" उंडी म्हणाली. "ये, आपलं कालच ठरलं होत उद्या जो कुणी उशिरा येईल त्याच्यावर राज्य" भोळा म्हणाला.

आता मात्र उंडीचा नाइलाज झाला. "बरं ठीक हाय, काय करायची मी थांब सांगते," भिमा उंडीला म्हणाली.

"ते बघ ते झाड दिसतंय. त्या झाडाला शिवून परत यायचं तोपर्यंत आम्ही लपून बसणार मग तू येऊन आम्हाला शोधायचं."

उंडी धावत धावत त्या झाडापाशी गेली. खेळ सुरु झाला. बिचाऱ्या उंडीची त्यांना शोधून शोधून पुरती दमछाक झाली. त्यांचे असेच आणखी काही डाव रंगले होते. वातावरणात थोडंस मळभ होतं. खाली या बालगोपाळांचा आणि आभाळात ढगांचा पाठशिवणीचा खेळ चालू होता. हळूहळू ढगांचा गडगडाट येकू येऊ लागला. तसे सगळे फेर धरून नाचू लागले. सगळेजण पावसाला बोलावू लागले. भोळा, माधव, भिमा, शिरपू आभाळाकडे हात करून "उंडी घे देवा, पाऊस दे," असं म्हणून नाचू लागले. उंडीला मात्र त्यांचा राग येऊ लागला. ती तशीच गाल फुगवून उभी राहिली. पोरं तिला पुन्हा पुन्हा हिणवू लागली. 'उंडी घे देवा पाऊस दे ... उंडी घे देवा पाऊस दे' उंडीला फारच वाईट वाटलं. माझं कुणीच नाही म्हणूनच मला सगळे देवाकडे पाठवत आहेत असं तिला राहून राहून वाटू लागलं. ती तशीच तिथून निघाली. तिच्या गालावरून घळाघळा अश्रू वाहू लागले. म्हशींना घेऊन तिने घरचा रस्ता धरला. आज तिला फारच वाईट वाटलं होतं. डोळ्यांत इतके अश्रू जमा झाले होते की समोरची वाटही तिला नीटशी दिसेना. पोरांच्या आरोळ्या अजून चालूच होत्या. "उंडी घे देवा, पाऊस दे" तिचे ते अश्रू पुसण्यासाठी खाली उतरल्या होत्या. उंडी घरापाशी आली. तिचं अंग पार भिजून गेलं होतं. पक्ष्यांनीही आडोशाचा आधार घेतला होता. पण उंडीला मात्र कुणाचाच आधार नव्हता. पावसामुळे तिचे अश्रू कुणाच्याही नजरेस पडले नव्हते. तिला आता आईची खूप आठवण येऊ लागली होती. अस्मानीजवळ बसून ती हमसून हमसून रडू लागली. पण बिचारी अस्मानी ती तरी काय करू शकणार होती. उंडीला अचानक गोविंदभटजींचे शब्द आठवले 'देव भेटतो ... पण दिसत मात्र नाही'. उंडीला आता देवाला भेटायचं होतं. त्याला खूप काही विचारायचं होतं. तिची आईसुध्दा देवापाशी जाऊन बोलायची. उंडीला सगळं आठवत होतं. बाहेर पावसाचा जोर वाढला होता. विजांचा कडकडाट चालू होता. वाड्यामागचा पाट दुथडी भरून वाहत होता. आज लवकर अंधारून आलं होतं. उंडीचं सर्वांग कुणीतरी डागणी द्यावी तसं थरथरत होतं. तिच्या येण्याजाण्याने कुणाला कधीच फरक पडला नव्हता त्यामुळे यावेळी सुद्धा तिच्याबद्दल कुणाला काही वाटण्याचे कारण नव्हते. मालकीणबाई गोधड्या शिवण्यात दंग होत्या. बाळूकाका गारठलेलं कंदील पेटवण्यात दंग होते. विष्णूभाऊंचं पोथीपुराण चालू होतं. आणि गोठ्यात जनावरांसोबत उंडीचा मुका संवाद. तिनं केसांमध्ये माळलेलं सोनचाफ्याचं फूलं केव्हाच तुटून पडलं होतं. नाही म्हणायला त्याचा देठ मात्र शिल्लक होता. वेण्याही विस्कटून गेल्या होत्या आणि अंगावरच्या कपड्यांचा भिजून चोळामोळा झाला होता. इतक्यात एक वीज कडाडली आणि उंडीच्या पोटात गोळा आला. ती थरथरतच उठली. कवाडीपाशी येऊन तिनं एक नजर बाहेर टाकली. बाहेर मीट्ट काळोख होता. त्या काळोखातून पोरांच्या आरोळ्या तिला पुन्हा पुन्हा ऐकू येत होत्या. ते सारं आठवून तिला रडू कोसळलं. पण तिनं स्वतःला सावरलं आणि त्या विधात्यालाही कल्पना नसेल, पण उंडीचा पाय त्याचवेळी वाड्याबाहेर पडला. कुठं जाणार होती ती एवढ्या रात्री. उंडी झपझप पावलं टाकत निघाली होती. पावसाचा जोर मात्र वाढतच चालला होता. काहीशा भ्रमिष्ट स्थितीत उंडी चालत होती. आपण कुठे जात आहोत तिला काहीच ठावूक नव्हतं. डोळ्यांपुढे तिला फक्त आपली आई दिसत होती. उंडी

गावाबाहेर जाणाऱ्या रस्त्याकडे निघाली होती. वाटेवर कुणीच दिसत नव्हतं. जणू जगाकडे पाठ फिरवून उंडी आपली वाट शोधायला निघाली होती. आणि तिला पायाखालची वाट दिसावी म्हणून की काय अधूनमधून विजांचा कडकडाट चालू होता. घर आता खूप दूर राहिलं होतं. उंडीला आपण किती दूर चालत आलो हे सुद्धा माहीत नव्हतं. पावसाचा जोर मात्र आता थोडा ओसरला होता. उंडी थकून गेली होती. एवढा मुसळधार पाऊस पडूनही तिच्या पोटाची खळगी मात्र रिकामीच होती. तीच्या डोळ्यांवर अंधारी येत होती. एका दगडाच्या आडोशाला जाऊन ती उभी राहीली. सर्वांगाला भेदून जाईल अशी एक वीज त्यावेळी कडाडली. पण त्या उजेडात उंडीला काहीतरी दिसलं. ती ज्या दगडाला टेकून उभी होती तो दगड नव्हताच तर ती एक भिंत होती. खडबडीत पण ओबडधोबड झालेली. पाठीमागे जीर्ण झालेले खांब आणि वर काहीसा घुमटासारखा भाग. उंडी आत शिरली 'हे कुणाचं घरं?' उंडी स्वतःशीच पुटपुटली. छपरांमधून पावसाचं पाणी ठिबकत होतं. सुकं म्हणायला आत काहीच शिल्लक नव्हतं. इतक्यात तिला आतल्या बाजूला आणखी एक भुयार दिसलं. पण तिथे मात्र मिट्ट काळोख होता. त्या भुयाराला बाहेरून लोखंडी गज होते. उंडी त्या खोलीत शिरली. नेमका तिथेच तिचा पाय कशात तरी अडकला आणि ती खाली पडली. पण तेव्हा देखील 'आई' ह्या व्यतिरिक्त तिच्या तोंडून काहीच निघाल नाही. ती पुन्हा रडू लागली. तिला आईचा मोह आवरणं कठीण झालं होतं. डोळ्यांमधून अश्रू वाहू लागले. पण त्या काळोख्या खोलीत तिचं सांत्वन करायला मात्र कुणीच नव्हतं. बाहेर पावसाचं थैमान पुन्हा सुरू झाल होतं आणि त्या अंधाऱ्या कोठडीत एक बालमन आईच्या विरहाने व्याकूळ झालं होतं.

बाहेर पक्ष्यांचा प्रातःस्वर ऐकू येत होता. काल मध्यरात्रीपर्यंत मी मी म्हणणारा पाऊस आता कुठे जाऊन दडला होता कोण जाणे. उंडीला जाग आली ती फडताळातून डोकावणाऱ्या वटवाघळांच्या आवाजाने. जणू सर्कशीत एखादा नवा प्राणी यावा तशी ती वटवाघाळं उंडीकडे आश्चर्यकारक नजरेने पहात होती. उठण्यासाठी म्हणून उंडीनं आपला डावा हात खाली टेकला, तोच तिच्या हाताला काहीतरी जाणवलं. तिन घाबरून वळून पाहिलं तर तिच्या शेजारी एक कुत्रा येऊन निजला होता. ये ... बिल्ला ... बिल्लाच तो. लहानपणी आपल्याला सोडून गेलेला बिल्ला. उंडीनं त्याला कडकडून मिठी मारली.

कुठं होतास रे बिल्ला... मी तुला किती शोधलं ठाऊक आहे का? उंडी त्याला प्रश्न विचारीत होती आणि तो शांतपणे ऐकत होता. जणू काही तो तिचा बिल्लाच होता. पण बिल्ला तर उंडी अवघ्या सहा-सात वर्षांची असतानाच मेला होता. तो मेल्यानंतर दोन दिवस तरी उंडी जेवणाला शिवली नव्हती. आईकडे तिने 'बिल्ला' असा तगादाच लावला होता. पण आईच्या मनात मात्र ह्या पोरीला कसं समजावणार हाच पेच पडला होता. गावातल्या शिरक्यांच्या पोराला बिल्ला चावला होता. वास्तविक त्या टवाळ कारट्यानंच त्याला दगड मारला होता. पण सत्य कधीच दिसत नसतं ते इथं कुठून दिसणार. झालं. दिवेलागणीला अख्खं गाव उंडीच्या घरासमोर जमलं. "इंदूताई... तुमचा कुत्रा पिसाळलाय... तुम्ही बंदोबस्त करताय की आम्ही करू?"

"नका हो अस करू, इथून पुढनाही चावायचा तो कुणाला" इंदूताई पोटतिडकीनं म्हणाल्या. थोड्याच वेळात गाव पांगलं पण त्या माऊलीच्या मनात काय आलं कुणास ठाऊक. उंदीर मारायचं विष बिल्लाच्या थाळीत तिनं टाकलं आणि ती मोठ्यानं ओरडली.

"माझ्यात नाय आता ताकद न्हायली तुला

पोसायची, माझी लाज राखायची आसल तर खा ते विष."

त्या माऊलीच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू सांडत होते. चिमुकली उंडी दाराआडून ते सारं पाहात होती. खाल्ल्या अन्नाला जागणारा बिल्ला त्या माऊलीनं वाढलेला विषाचा घासही त्यानं अमृत म्हणून तोंडाला लावला.

उंडी बाहेरच्या फरशीवर येऊन बसली. बिल्लाही तिच्या पाठोपाठ आला. उंडीनं एक नजर सभोवार फिरवली. आजूबाजूला गर्द झाडी होती. वाटांचा मागमूसही कुठे दिसत नव्हता. उंडी त्या भग्न वास्तूकडे एकटक पाहत राहिली. इतक्यात तिला काहीतरी आठवलं. होय तिला शब्द् शब्द आठवला. तिच्या तोंडून नकळत शब्द बाहेर पडले. 'हेच ते देऊळ, औदुंबराचं.' आईनं तिला सांगितलेली सगळी कथा उंडीसमोर पुन्हा जिवंत होऊन उभी राहीली. ते वाजणारे ढोलं, उडणाऱ्या पताका, तो माणसांचा गलबलाट, दुमदुमणारे आवाज. उंडीला सारं काही आठवलं. उंडीनं ते कधीच पाहिलं नव्हतं पण तिच्या आईनं तिला औदुंबराची मिरवणूक जशी सांगितली होती तशीच ती उंडीला आताही दिसत होती. त्या दिवशी प्रत्येकाच्या घरात गोडधोड शिजत होतं. बायकापोरांचा उत्साह ओसंडून वाहत होता. आईनंही त्या दिवशी नव्या पातळाची घडी मोडली होती. गाव माणसांनी फुलून गेलं होतं. औदुंबराची पालखी आज कुसपालटणीसाठी गावात येणार होती. गावागावातले सुभेदार, अंमलदार, गावकर आपल्या पुढाऱ्यांसह हजर होते. पण इतक्यात काहीसा गलबलाट झाला. बायकांनी पदर तोंडाला लावला तर अनेकांनी फेटे काढून हातात घेतले. काहीतरी विपरीत घडलं होतं. गावातल्या पाटलांभोवती सारं गाव जमा झालं होतं. 'देव चोरीला गेला' पाटील मान खाली घालून म्हणाले आणि अख्खं गाव तोंडात मारल्यासारखं पाहत राहिलं. औदुंबराची चांदीची मूर्ती चोरीला गेली. अनर्थ घडला. कुणी म्हणे देवाचा कोप झाला, तर कुणी म्हणे देवाला गावात यायचं नसेल. चर्चांना ऊत आला. हा हा म्हणता बातमी आसपासच्या गावांमध्ये पसरली.

उंडीचे वडील बल्हाळबुवा औदुंबराचे पुजारी होते. गावपंचायत भरली होती. बल्हाळबुवा मध्यभागी बसले होते. गावकऱ्यांच्या प्रश्नांना ते प्रत्युत्तर देत होते. पण गावकऱ्यांचे काही त्याने समाधान होईना. बल्हाळबुवांचा चेहरा पार उतरला होता. सारं गाव त्यांच्याकडे संशयानं पाहत होतं. इकडे इंदूताईनं घरातले सगळे देव पाण्यात नेऊन बसवले होते. "देवा गजानना सुटका कर माझ्या राजाची, मी आयुष्यभर तुझ्या पायाशी राहीनं रे!" इंदूताई देवाला साकडं घालत होती. इकडे गावकऱ्यांच्या प्रश्नांचा भाडिमार सुरूच होता. बल्हाळबुवा काकुळतीला येऊन सांगत होते -

"डोळा लागला हो माझा अचानक.... नाही समजलं.... चूक झाली. एकदा माफ करा."

पण गावकरी काही ऐकायला तयार नव्हते. एकजण म्हणाला, "बनाव आहे हा सारा... झडती घ्या घराची म्हणजे सत्य काय ते साऱ्या गावाला कळेल, काय हो बंडोपंत."

'हो...हो...." बंडोपंतांनी होला हो दिला. शेवटी सरपंच म्हणाले, 'बल्हाळबुवा, एक दिवसाची मुदत घ्या हवी तर, नाहीतर आम्हांला आमचा निर्णय घ्यावा लागेल."

गावं उठलं बल्हाळबुवांना काहीच कळेना. कितीतरी वेळ ते बैठकीवर एकटेच बसून होते. इकडे इंदूताई वाटेकडे डोळे लावून बसली होती. गाव परतत होतं, येता-जाता साऱ्यांची नजर इंदूताईंच्या घरावरून जात होती. इंदूताईंचा जीव कासावीस झाला होता. बल्हाळबुवा उठले. त्यांच्या खांद्यावरचा उपरणा खाली गळून पडला. देवळाच्या पायऱ्या उतरून ते वाटेला

लागले. काळोख पडत आला होता. पण बल्हाळबुवा अजून घरी आले नव्हते. इंदूताईंचा जीव आता घाबराघुबरा झाला होता. उंडी घरात निजली होती. इंदूताईंनी तिच्या डोक्यावरून हळुवार हात फिरवला आणि त्या घराबाहेर पडल्या. त्या जाणून होत्या आपला नवरा देऊळ सोडून कधीच कुठे जाणार नाही. त्या देवळापाशी आल्या. देवळात देव नव्हता पण सकाळी लावलेला दिवा अजूनही गाभाऱ्यात जळतच होता. इंदूताई गाभाऱ्यात शिरल्या आणि काही क्षणातच त्यांची आर्त किकाळी ऐकू आली. घुमटाच्या मध्यभागी बल्हाळबुवांचा निद्रिस्त देह लटकत होता. बल्हाळबुवांनी आपला न्याय आपणच करून घेतला होता.

उंडी भानावर आली ती बिल्लाच्या गुबगुबीत स्पर्शानं, तो तिच्या पायांमध्ये लुडबुड करीत होता. उंडीनं पाहिलं त्याच्या तोंडात सोनचाफ्यांच फूल होतं. उंडीन ते आपल्या हातात घेतलं आणि बिल्लाच्या पाठीवरून हळुवार हात फिरवला. ते फूल घेऊन उंडी गाभाऱ्यात गेली. घुमटाच्या मध्यभागी ते फूल ठेवून तिनं हात जोडले आणि ती तिथून बाहेर पडली. बिल्लाही तिच्यामागुन निघाला. देऊळ आता दूर राहिलं होतं. गावाबाहेर पोरांच्या आरोळ्या ऐकू येत होत्या -

"उंडी घे देवा, पाऊस दे... उंडी घे देवा पाऊस दे."

## जोक्स



### हॉर्न

वासू परांजपेची गाडी एकदा भर पावसात टिळक ब्रिजवर बंद पडली...

वासू खाली उतरून काय झालंय ते बघत होता...

कारण सापडत नव्हतं.


मागला गाडीवाला सतत हॉर्न वाजवीत होता.

किंबहुना तो हॉर्नवरचा हात काढतच नव्हता.

वासू शांतपणे त्याच्याजवळ गेला व भिजत भिजतच म्हणाला,

'तुम्ही बघता का गाडीला काय झालंय ते.

तेवढा वेळ मी तुमचा हॉर्न वाजवीत बसतो."



With Best Compliments from

K

# Klassic Associates

Govt.Registered Contractors

Jawahar

Specialist in Building Works.

Shop No. 1, Durga Apartment,
Near Shree Samarth Sahakari Bank Ltd.,
Wadala Pathardi Road, Ram Nagar, Nashik - 422 009.
E-mail : ka_nsk@rediffmail.com
wwww.klassicassociates.com

# व्रात्य मोबाईल

- नि. श. गुळवणी

गुणाजीचं घर मोबाईलमय झालं होतं. घरात माणसं इन-मीन-तीन. पण प्रत्येकी दोन ह्या दरानं घरात सहा मोबाईल अहोरात्र गस्त घालत असायचे. कधी, कुठे, केव्हा, कुणाचा फोन वाजेल हे सांगता येत नसे. तशात गुणाजीचं पोरगं महावात्रट. ते नेहमी साऱ्या मोबाईलशी खेळखंडोबा करताना त्याची 'कॉलर ट्यून' हमखास बदलून ठेवायचं. त्यामुळे नेहमी नक्की फोनच वाजतोय की रेडिओ, टेपरेकॉर्डर, टीव्हीसारखी तत्सम संयंत्र कोकलताहेत हेही कळायचं नाही. तशात गुणाजी एका कौटुंबिक कंपनीत कामाला असल्याने तिथं सारी मालक आणि मालकिणीची एकाधिकारशाही होती. ते दोघं चोवीस तास फोनलाच चिकटून बसल्यासारखे कधीही फोन करीत. बरं फोन बंद करण्याचीही बंदी. एकदा त्यानं तसं केलं तर मालकिणीनं त्याचा निम्मा प्रवास भत्ता काटला. शिवाय खाष्ट सासू, साक्षात चेटकीण मेव्हणी, जमदग्नी काका हेही गरीब हाडाच्या गुणाजीच्या मोबाईलवर करडी नजर ठेवून होते. बरं ह्या साऱ्यांना कुठूनही, कोणाच्याही (विशेषतः दुसऱ्यांच्या) फोनवरून फोन करायची खोड असल्याने एखादा कॉल बाहेरचा समजून न घ्यावा तरीही आफत यायची. एकदा तर तामिळ भाषेतील 'कॉलर ट्यून' ऐकून त्यानं फोन घेतला नव्हता तर लागलीच बाजूच्याच मोबाईलवर 'तुझ्या गळा माझ्या गळा...' ह्या गोड कॉलर ट्यूनवरून येत त्याच्या काकानं त्याचा फोन घेतला नाही तर गळा दाबण्याची धमकी दिली. बरं तो काकाच्या फेकलेल्या तुकड्यांवर वाढला असल्याने उलटही बोलता येत नव्हतं.

> **"गुणाजी नेहमी अवघडलेल्या अवस्थेत असतानाच त्याचा मोबाईल गाऊ लागायचा. रस्ता ओलांडताना, शिडी उतरताना, दोन्ही हातात सामान असताना, पाणीपुरी खाताना, सचिन नव्याण्णववर असताना आणि गोलंदाज धावत येताना, भाषण करताना, तिकिटाच्या रांगेतून पुढे सरकत खिडकीत हात सरकवताना"**

षड्रिपूसारखे घरातील सहा मोबाईल त्याचा एकसारखा पिच्छा पुरवीत होते. विरंगुळा मिळावा म्हणून त्यानं एके रविवारी हार्मोनियमवरील धूळ झाडली आणि छान बैठक मारली. त्यानं जेमतेम सा ऽ लावला असेल इतक्यात त्याचा मोबाईल 'सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल काय?...' हे गात थयथयाट करू लागला. फोनवर एक म्हातारी कंदी पेढ्यांच्या दराची चौकशी करीत होती. रॉंग नंबर आल्याने त्याचा जीव भांड्यात पडला. त्याचा बॉस किंवा तत्सम खाष्ट मंडळींपैकी कोणाचा फोन नसल्याने हार्मोनियम वाजवायला आज चांगला मुहूर्त असल्यासारखं त्याला वाटलं. तो जेमतेम 'म' पर्यंत पोहोचला असेल-नसेल तर दुसऱ्या मोबाईलवर सकाळी-सकाळी देवाचं नाव घ्यायच्या टायमाला 'मी एकलीच निजले, रात्रीच्या अंधारात .. ' हे वाजू लागलं. फोन त्याच्या आज्जीनं केला होता.

"गुण्या, सूनबाई सकाळी-सकाळी असली कसली घाणेरडी गाणी म्हणते रे?" पुन्हा एकदा

आज्जीबाईंना कॉलर ट्यून म्हणजे काय ? ह्या साऱ्या भानगडी समजावून देणे आलं. सगळं ऐकून शेवटी आजीबाई म्हणाल्या,

"तरी मला शंका होती. माझी सूनबाई गुणाची आहे. ती असलं काही करणार नाही. हे सगळे धंदे तुझेच असले पाहिजेत" आणि म्हातारीनं फोन आपटला.

हुश्शऽऽ म्हणत त्यानं त्याच्या हार्मोनियमकडे पाहिलं मात्र आणि लगेचंच कुठूनतरी 'मुंगळा.. मुंगळा' वाजू लागलं. नक्कीच बॉसचा असला पाहिजे. अन्यथा सकाळी-सकाळी कोण डसणार ? 'मुंगळा' शोधण्याकरिता सर्वत्र धावाधाव सुरू झाली आणि एका ड्रायव्हरमध्ये तो सापडला. तो मिस्ड कॉल होता. बॉसनं दुसऱ्या फोनवरून तंबी देण्याआधीच त्यानं मिस्ड कॉलला उलटून फोन केला. तो एक पुण्याचा प्रकाशक निघाला.



"आम्ही साहित्य निर्मितीच्या मंदिरात काम करतो म्हटलं. मुंगळे मारायची औषधं नाही बनवत. प्रथम ती कॉलर ट्यून बदला."

"होय वैद्यसाहेब" गुणाजीला आनंद झाला. त्याची कथा छापण्यासंदर्भातच फोन असणार. आजचा दिवस चांगला दिसतो. "माझी कथा... बक्षीसपात्र आहे ना ?"

"तेच सांगायला मी मिस्ड कॉल दिला होता. तुम्ही कथा स्पर्धेकरिता मूळ प्रत न पाठविता झेरॉक्स प्रत पाठवूच कशी शकता ?"

"साहेब, झेरॉक्स काय आणि मूळ प्रत काय .. कल्पना महत्त्वाच्या."

"प्रश्न तो नाही. प्रश्न तत्त्वाचा आहे. तुम्ही असं करूच कसं शकता.." आणि मग प्रकाशक वैद्यांनी पाल्हाळ लावत त्याचं बिल वाढवायला सुरुवात केली. प्रथम पारितोषिक सव्वाशे रुपयांपेक्षा अधिक फोनचं बिल होण्यापूर्वी त्यानं थोड्या चढ्या आवाजात वैद्यांचं पाल्हाळ मध्येच थांबवलं.

"माझी कथा विचारात घेऊ नका .. बस्स ?"

"तसं तुम्हांला लेखी कळवावं लागेलं."

"बरं कळवतो. अगदी स्टँप पेपरवर लिहून कळवतो." आणि त्यानं फोन लगेचच बंद केला. बरं मोबाईल रिसीव्हर आपटावा तसा रागानं आपटायचीही पंचाईत. त्याचीच लक्तरं व्हायची.

एवढ्या सगळ्या भरभक्कम फोनवरील तोफा झेलल्यानंतर त्याचा हार्मोनियम वादनाचा बेत-बुरुज धाडकन कोसळला. हार्मोनियम पुन्हा एकदा धूळ खात पडलं. ह्या सगळ्या धामधुमीत 'रघुरायाच्या नगरी जाऊन गा बाळांनो श्रीरामायण...' हे गीत श्रवणयंत्रवर पडल्याने तो सुखावला. चला मनासारखं काहीतरी घडू शकतं. नाही असं नाही. पण लागलीच त्याच्या लक्षात आलं की ते गाणं त्याचा मोबाईल गातोय आणि त्याची

तारांबळ उडाली. त्यानं धावत जाऊन फोन घेतला. पलीकडे रावण त्याची वाट पाहत होता. त्यानं तीन अंक मोजण्यापूर्वी इथून पुढे फोन न घेतल्यास अंकास एक ह्या दराने 'इन्क्रीमेंट' कमी करण्याची धमकी त्यानं दिली आणि लागलीच त्याच्या इतर मोबाईलवर फोन करून त्याच्या सूचनेची अंमलबजावणी होते काय नाही हेही पाहिलं. वेगवेगळ्या खोल्यांमध्ये ठेवलेले ते सारे मोबाईल एकापाठोपाठ एक वाजले आणि लागलीच घेताना त्याला एखाद्या ऑलिंपिकपटूसारखी धावाधाव करावी लागली.

गुणाजीनं त्याच्या मोबाईलचा इतका धसका घेतला होता की बाथरूममध्ये, झोपताना, प्राणायाम करताना आणि इतर काहीही करताना तो सदैव मोबाईल कुशीत घेऊनच वावरायचा. प्राणायाम करतांना तो हमखास वाजायचाच आणि ते काडेपेटीएवढं सयंत्र प्राणायाममधून प्राप्त झालेल्या थोड्याफार मनःशांतीलाही सुरुंग लावायचं.

हार्मोनियम पेटीबंद करीत तो बाथरूममध्ये शिरला आणि त्याचा मोबाईल भजन गाऊ लागला. विजार सावरत लगबगीने बाहेर येत त्यानं फोन घेतला.

"कुठं आहात...?" कंपनीची मालकीण कडाडली.

खरं तर त्याच पट्टीत "संडासात, हागतोय" असं त्याला म्हणायचं होतं. पण त्याची वेळ बरी नव्हती.

"मॅडम, घरीच आहे. काही काम ?"

"बाजारात जाणार असालच-" पुन्हा ती दिल्लीश्वराच्या थाटात गरजली.

"अं... होय..." त्याला कसाबसा कंठ फुटला. खरंतर त्याला कुठंही जायचं नव्हतं. मस्त रविवार होता. मॅच होती. सचिनच्या फलंदाजीचा आनंद घ्यायचा होता. पण कजाग मालकिणीपुढे नाही म्हणायची त्याची बिशाद नव्हती.

आणि मग पुढली पाच मिनिटं तिनं बाजारातून कुठून काय आणायचं हे शब्दांची मशिनगन चालविण्याच्या थाटात ऐकवलं. खरं तर त्याला कधी एकदा बाथरूममध्ये घुसतो असं झालं होतं.

गुणाजी नेहमी अवघडलेल्या अवस्थेत असतानाच त्याचा मोबाईल गाऊ लागायचा. रस्ता ओलांडताना, शिडी उतरताना, दोन्ही हातात सामान असताना, पाणीपुरी खाताना, सचिन नव्याण्णववर असताना आणि गोलंदाज धावत येताना, भाषण करताना, तिकिटाच्या रांगेतून पुढे सरकत खिडकीत हात सरकवताना आणि हमखास सुंदर स्त्रियांच्या सौंदर्याचं आकलन करीत असताना, छातीत बॉंब फुटावा तसा शर्टाच्या खिशातला मोबाईल कोकलू लागायचा. त्याला निवांतपणे बसला असताना किंवा फोनची वाट पाहताना फोन कमी यायचे. बरं अशा बाक्या प्रसंगी फोन न घ्यावा तर पगाराला कात्री लागायची भीती.

प्रणयामध्ये मग्न असताना - अर्थात पत्नीबरोबर, मोबाईलनं त्याचा प्रणयभंग केला नाही असं क्वचितच घडलं असेल. बायको ओरडायची. पण ती परवडली. फोनवर नेमकी मालकीण असेल तर मात्र कंबख्तीच. बरं प्रणयाच्या वेळी निदान 'मालवून टाक दीप...' सारखं प्रणयगीत वाजलं तरीही ठीक आहे. पण इथं तर तो 'जय जय रामकृष्णहरी...' गायचा आणि मग बायको लगबगीने उठत देवघरात शिरायची. प्रणयाची सारी नशाच उतरायची. एकदा खडूस मालकाने ऑफीसला उशिरा आल्याबद्दल त्याला केबिनमध्ये बोलावून फैलावर घेतलं आणि खिशात 'शूर आम्ही सरदार...' वाजू लागलं. जमेची बाजू इतकीच होती की मालक समोरच असल्यानं फोन न घेतल्यावर पगारवाढतरणार नव्हती. पण हाय रे दुर्दैवा ! तो फोन नेमका मालकिणीचा होता आणि

मग दोघांनी सयुक्तिकपणे फोन न घेतल्याबद्दल त्याची खरडपट्टी काढली आणि त्या शूर सरदाराची पार खांडोळी करून टाकली. त्याच्या कार्यालयातील नयनाबरोबर कधी नव्हे तो कॉफी घ्यायला कॉफी हाऊसमध्ये गेला आणि नेमकं कॉफी पिताना खिशात 'फू बाई फू, फुगडी फू...' वाजू लागलं. तो दचकला आणि त्याच्या हातातील कप लवंडला तोही नेमका नयनाच्या सुंदर पिवळ्या आखूड स्कर्टवर. तेव्हापासून नयना तो दिसला की तोंड फिरवून जाते. त्याच्या मोबाईलनं नको तेव्हा तोंड घालून त्याच्याकरिता बरेच शत्रू निर्माण करून ठेवले आहेत. तो स्मशानात तिलांजली द्यायला उभा राहिला आणि खिशात 'दिसला गं बाई दिसला.. मला बघून गालात हसला...' वाजलं आणि प्रसंग हमरी-तुमरीवर आला. एकदा तो बाळ गंगाधर टिळकांवर भाषण



द्यायला उभा राहिला आणि खिशातून नेमकं 'आरं आरं पावट्या...' वाजू लागलं. तो गोंधळला आणि गडबडीने 'मी पावटेही खाल्ले नाहीत, फोलंही काढणार नाही' हे वाक्य टिळकांच्या माथी मारून मोकळा झाला. सिनेमा पाहताना कधी नव्हे तो एका सुंदर तरुणीजवळ बसण्याचा योग आला. पडद्यावर भुताची एंट्री होणार असल्याने साऱ्यांनी श्वास रोखले होते आणि त्या भयाण वाटणाऱ्या शांततेचा भंग त्याच्या खिशातल्या मोबाईलने 'ये जवळ ये लाजू नको' हे तार स्वरात गात केला. त्या सुंदरीनं शीः बाई म्हणत जागा बदलली आणि तिच्या म्हाताऱ्या मावशीला त्याच्याजवळ बसवलं. शिवाय पत्नीसह इतरांनीही रसभंग केल्याबद्दल त्याला शिव्याशाप दिले ते वेगळेच.

त्याचा वात्रट पोरगा. घरातल्या कोणता मोबाईल कधी कोणती कॉलर ट्यून टाकून त्याच्याकरिता सुरुंग पेरून ठेवायचा हे सांगता येत नसे. मालकिणीशी बोलताना नेमकं 'सोड रं सायका, मार ती त्राटिका...' वाजायचं आणि अरिष्ट कोसळायचं. देवळात पूजेला गेला असता 'सुंदरा मनामध्ये भरली...' वाजायचं आणि मग आजूबाजूच्या सुवासिनी 'मेल्याला स्थळकाळाचंही भान नाही' असा उद्धार करायच्या. परस्त्रीबरोबर लुब्ध होत गप्पा मारायला सुरुवात केली रे केली की लगेचच एखादं शोकगीत तिथं हजेरी लावायचं आणि त्याला त्याच्या बायकोची आठवण करून द्यायचं. प्रथमच न्यायालयात साक्ष द्यायला उत्साहाने तयारी करून उभा राहिला आणि खिशात 'ए अंधा कानून है...' वाजलं. न्यायाधीशानं त्याच्यावर चांगलेच ताशेरे ओढले. त्याचा एकंदरीत अवतार पाहून कंपनीच्या वार्षिक स्नेहसंमेलनात त्याला शाहिस्तेखानाची भूमिका मिळाली आणि महाराज घाव घालणार आणि तो '"याSS अल्ला SS" म्हणून ओरडणार इतक्यात त्याचा डगला 'राया मला पावसात घेऊन चला...' गाऊ लागला. महाराज, आजूबाजूचे मावळे, खानाच्या राण्या, प्रेक्षक, पडद्यामागून प्रॉम्प्टिंग करणारे, पडदा पाडणारे आणि खुद्द खान सारेच अवाक् होऊन थिजल्यासारखे उभे राहिले. "याSS

अल्लाऽऽ” म्हणत पडद्यामागून दिग्दर्शकाने लागलीच पडदा पाडायचे आदेश दिले. मच्छी बाजारात कोळिणीकडून मासे घेताना ‘येशील राणी.. साखर चुंबन देशील’ वाजलं आणि तिनं सरळ कोयता उगारला. बरं बहिणीकरिता स्थळ पाहायला गेला. तिथं तरी नीट व्हावं... ? पण नाही. तिथं ‘कसे लागले डोहाळे...’ नेमकं वाजलं आणि हुंड्याची यादी वाचणारी वराची मंडळी बैठक मोडून निघाली. त्याचा तो अपशकुनी मोबाईल त्याची पाठ सोडायलाच तयार नव्हता. मॉडेल बदलून पाहिलं, कार्ड बदलून पाहिलं पण त्याच्या हातात येताच नेमकं विपरीत घडायचं. त्याचं नशीबच फुटकं होतं. त्यला बिच्चारा तो मोबाईल तरी काय करणार ? त्याचा तो मोबाईल त्याचा जालीम शत्रू असल्यासारखा बाथरूमपासून ते देवघरापर्यंत, सायकल प्रवासापासून ते विमान प्रवासापर्यंत, भिकाऱ्यापासून ते मंत्र्यापर्यंत (अगदी मालक-मालकिणीसकट) भाष्य करताना, स्मशानापासून ते देवळाच्या गाभाऱ्यापर्यंत त्याचा एकसारखा पिच्छा पुरवीत होता. तो त्याच्या भीतीच्या सावटाखाली रात्रंदिवस वावरत होता. अलीकडे तर मोबाईलचं गाणं वाजलं की आधी त्याच्या छातीत धडधडू लागायचं. तो घेताना त्याच्या हातांना कंप सुटायचा. पलीकडून, आजूबाजूच्या लोकांकडून शिव्याशाप मिळण्याचीच शक्यता अधिक होती. फक्त कर्ते ह्यावेळी कोण असणार आहेत हे आजूबाजूला पाहतच तो फोन घ्यायचा.

त्यानं अखेर हितचिंतकांचे सल्ले घेतले आणि तो मोबाईल एका मांत्रिकाला दाखवला. त्याच्या मोबाईलला भूताची बाधा झाल्याची शक्यता होती. मांत्रिकानं ॲडव्हान्स घेऊन मोबाईलभोवती तांदूळ मांडले. आणि बुक्का, हळद, गुलाल जे मिळेल त्याचा मोबाईलवर यथेच्छ मारा केला. त्या माऱ्यानेच मोबाईल कायमचा बंद पडून एकदाची सुटका होईल असं क्षणभर गुणाजीला वाटलं खरं पण लागलीच मोबाईलनं खाडकन त्याचे डोळे उघडले आणि तो तोऱ्यात गाऊ लागला - ‘गुमनाम है कोई... बदनाम है कोई...’ मांत्रिकानं भूत उतरल्याचं सांगत साशंकतेने वेताळाचं हाडूक फिरवून फोन परत केला खरा. पण लागलीच एका भयगीतासह प्रत्यक्ष मालकच त्या मोबाईलमध्ये अवतरला. गुणजीची पुन्हा एकदा तारांबळ उडाली. एक वेळ भूत परवडलं असतं, पण मालक नको असं त्याला वाटलं. मांत्रिकाचा फायदा न झाल्याने तो त्याच्या गुरुजींकडे परमपूज्य गोपाळराव बुरांडेकरांकडे गेला. त्यांनी मोबाईलची कुंडली मांडली आणि त्याला राहू-केतूसकट आणखी दोन-चार दशा असल्यानं शांती करण्याचा सल्ला दिला. त्यानं शांतीकरिता मोबाईल चार आश्रमातून फिरवून आणला. पण काही उपयोग झाला नाही. उलट पहिल्यापेक्षाही अधिकच चेकाळल्यासारखा त्याला वाटला. एका गोसाव्याच्या सांगण्यावरून मोबाईलला सरळ मार्गावर आणण्याकरिता व्रतही धरलं. तो अनवाणी टेकडीवरील यल्लमा देवीला निघाला. धापा टाकत टेकडीवर पोहोचला आणि लागलीच... तो ‘कोंबडी पळाली, तंगडी धरुनी...’ गाऊ लागला. पलिकडे त्याच्या बॉसदेवी अर्थात मालकीणबाई होत्या. तो यल्लमादेवीचं दर्शन न घेता तसंच टेकाडावरुन पळत मालकिणीचं काम करायला गेला.

शेवटी त्यानं वैद्यकीय सल्ला घेण्याकरिता एका डॉक्टरला गाठला. त्याच्या छातीत दुखण्याचं ते कारण ऐकून डॉक्टरही खो खो हसू लागला आणि ८०० रुपये बिलासह औषधांची भली मोठी यादी त्याच्या हातात सरकवून वर त्याला मानसोपचार तज्ज्ञाचा सल्ला घेण्याचाही सल्ला दिला. तो उठतानाच त्याचा मोबाईल ‘मार डाला...’ हे गाणं गात वाजला. डॉक्टरही डोळे फाडफाडून त्या मोबाईलकडे पाहत

राहिला.

अखेर सारे उपाय थकल्याने शेवटचा उपाय म्हणून तो मानसोपचार तज्ज्ञ संध्या नेसरीकरांकडे गेला. त्यानं त्याची सारी कर्मकहाणी त्यांना सांगितली.

"मॅडम, हे मोबाईलचं भूत माझ्य मानगुटीवरून हलत नाही होऽ. माझ्या छातीत..."

"भूत आहे हे खरं आहे" संध्या शांतपणे म्हणाली.

"आहे नाऽ" पुढे तो त्याच्या बायकोला म्हणाला, "ऐक. मी उगाच नव्हतो म्हणत, ऐक."

"भूत आहे पण ते मोबाईलचं नव्हे तर तुमच्या मनातल्या भीतीचं भूत तुमच्या मानगुटीवर बसलेलं आहे"

"अहो पण व्रात्य मोबाईल मला सारखा छळतो त्याचं काय ?"

"दोष त्याचा नाही. अहो ते एक निर्जीव खेळणं. तुम्ही सांगाल तसं वागेल. प्रथम तुम्ही तुमच्या मनातलं ते मालक, मालकीण आणि इतरांविषयीचं भीतीचं भूत पळवून लावायला हवं."

"पण ते शक्य वाटत नाही."

"ते निर्माणही तुम्हीच केलंय. तुम्ही घाबरता म्हणून ते तुम्हांला घाबरवतंय."

"अहो पण त्यांच्या मनासारखं झालं नाही तर ते नोकरीवरून हाकलतील."

"नाही हाकलणार." संध्या म्हणाली. "ते फक्त चुचकारून पाहतात. तुम्ही खरोखर कष्टाळू, मेहनती असाल तर ते तुम्हांला कधीही नोकरीवरून दूर करणार नाहीत आणि ते तितकं सोपंही नाही. कायदे नोकरदारांच्या बाजूने आहेत."

"अहो लागलीच फोन नाही घेतला तर पगारवाढथांबवतील ते."

"ते तसं काहीही करणार नाहीत. तुमच्या घाबरट, भिडस्त, भित्र्या स्वभावाचा फक्त ते फायदा घेऊ बघतात. त्यांनाही कंपनी चालवायची आहे. तेव्हा तुमच्यासारख्या इमानदार, प्रामाणिक कर्मचाऱ्यांना डावलून त्यांना ते कधीही जमणार नाही."



"मग मी काय करावं असे तुम्हांला वाटते ?"

"ताठ मानेने जगा. स्वाभिमानाने जगा. पण नम्रपणा सोडू नका. मी तुम्हांला त्याचं प्रशिक्षण देईन."

त्यानं लागलीच होकार दिला. प्रशिक्षण सुरू झालं. तिचा मानवी जीवनासंबंधीचा अभ्यास दांडगा होता. वाचनही खूप होतं. तिनं त्याला उत्तमोत्तम पुस्तकं वाचावयास दिली. मोठ्या माणसांची चरित्रं तो वाचू लागला आणि हळूहळू त्याच्या मनातील ती पोरकट भीती सरु लागली. तो जीवनाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहू लागला. कार्यालयीन जीवनाचा आणि कौटुंबिक जीवनाचा मेळ कसा घालावा हे तो शिकला. त्याला आता मोबाईल शत्रू न वाटता मित्र वाटू लागला. तो आता त्याच्यावर हुकूमत गाजवू लागला. हवं तेव्हा ते संयंत्र बंद करू

लागला. मालकिणीचा फोन आला. त्याच्या कसोटीचा क्षण आला होता. इतके दिवस परदेशी गेलेले मालक-मालकीण बाई परत आले होते.

"फोन घ्यायला इतका उशीर का ?" मुलूख मैदान गरजली.

"खरं तर मॅडम, मी आज फोन घेणारच नव्हतो. सुट्टीवर आहे ना मी."

"तुम्ही काय बोलतांय, तुमचं तुम्हांला तरी कळतं का ? शुद्धीवर आहात ना ?"

"आजपर्यंत नव्हतो. पण आता चांगलाच शुद्धीवर आलोय."

"बरं-बरं. बाजारात जा आणि चांगली मासळी घेऊन या." ती म्हणाली.

"जरूर जाईन. माझंही काम आहे. पण टॅक्सीने जाईन. त्याचं भाडं द्यावं लागेल. शिवाय आजपर्यंत सुट्टीत केलेल्या कामाचं व्हाऊचर बनवून आणतो. त्याच्यावरही सही करा. मला पैशांची गरज आहे हो ऽ"

लागलीच फोन बंद झाला. त्यानं त्याच्या मनातील भीतीवर प्रयत्नपूर्वक मात करताच त्याच्या साऱ्या समस्या चुटकीसरशी सुटू लागल्या आणि मग त्याचा तो व्रात्य मोबाईल त्याचा जिवलग मित्र बनत त्याच्याबरोबर वावरू लागला.



With Best Compliments from

# R. V. Tendulkar

Govt. Registered Contractors
Jawahar
Specialist in Asphalt Works.

# एका यष्टी प्रवासाची कथा

**- मनोहर तळेकर**

दुःख दुसऱ्याला सांगितलं की हलकं वाटतं. निम्मा दुःखभार त्याच्यावर टाकावा आणि समदुःखी समेकृत्वा आपल्या सुखदुःखात एकमेकांचे सहप्रवासी व्हावे.

प्रवासास 'यातायात' का म्हणतात त्याची ही अनुभवकथा. आमच्या अनुभवाने दुसऱ्याने शहाणे (नसल्यास) व्हावे असाही एक धावता उद्देश ह्या मागे आहे.

सांगलीहून काकांचं पत्र आणि पत्रिका आली. उषाचं (त्यांच्या कन्येचं) लग्न १५ मेस आहे. पण एक दिवस आधीपासून तू व तुझ्या बायकोनं यायचंय. वरपक्षास लगेचचा मुहूर्त हवा होता म्हणून सर्वांना मी येण्याची घाई करत आहे. काय करणार? वरास लग्नाची घाई. 'वरचढ' पक्ष पडला. त्यांच्या मागणीपुढे आपण उताणे.

**"आंघोळी झाल्यावर समोर आलेला पदार्थ पाहूनच भुकेचा चिवडा झाला. कारण साबुदाणा चिवड्याचा वास घेतल्यावर नक्की तो केव्हा बनविला ती तारीख हॉटेलवाल्यालाही सांगता आली नसती."**

बाऽपरे फक्त सहा दिवसांनी हे लग्न. पण जायलाच हवं. पत्र वाचताच बायकोने कडक उन्हात मला रेल्वे, एस.टी. आरक्षणासाठी पिटाळलं. दोन्ही ठिकाणी ३० मे पर्यंत सर्व गाडया, बसेस फुल्ल ! मे महिन्याच्या सुट्ट्या लागलेल्या. काय करावे ह्या विचारात असताना बस स्टँडवर माने आडनावाचा एक इसम देवासारखा भेटला. त्याच्याकडे नेमकी १३ मेची रात्रीची दोन आरक्षित तिकिटे होती. पण ती ठाणे-कऱ्हाडची होती. त्याला ती रद्द करायची होती. तो मला म्हणाला, "एस.टी. कार्यालयात जाऊन रद्द केली तर पैसे कापतील. पण तुम्हांला दिली तर अडल्या माणसाला तिकिटे दिल्याचं समाधान आणि मलाही तुमच्याकडून पूर्ण पैसे मिळतील."

मी विचार केला, कऱ्हाडपर्यंत तर कऱ्हाडपर्यंत, जाऊ या. पुढे कऱ्हाड-सांगली दीड-दोन तासांचा प्रवास. कऱ्हाडहून सांगलीस जायला शेकडो बसेस मिळतात. हे हज्जार वेळा मी ठाणेकरांकडून पूर्वी ऐकलं होतं.

ठाणे डेपो ऑफीसमध्ये जाऊन तिकिटे खरी आहेत ना हा संशय फेडला आणि मगच मानेला पैसे दिले. सुट्या नोटा नसल्यामुळे दोन रुपये कमी दिले एवढीच पुढील प्रवास कथेची जमेची बाजू. एरव्ही तिकीट आरक्षण प्राप्ती खुशीतून पुढे खुदखुशी करावी असं वाटण्यासारखाच प्रवास झाला.

तेरा तारीख संध्याकाळ उजाडली. मी व सौ. माननीय पु.लं.च्या कोचरेकर मास्तरांचे शिष्य - त्यामुळे अचानक अपघात झाल्यास शिट्टी, बॅग हँडल तुटल्यास दोरी, तब्येत बिघडल्यास औषधे, लग्नाचा आहेर, कपडे असे परिपूर्ण तयारीनिशी बॅगा घेऊन तासभर आधीच ठाणे बस स्टँडवर हजर झालो.

साडेसातला बस येऊन उभी राहील असं चौकशी खिडकीवर कळलं होतं.

नंतर आजूबाजूच्या परिसरातील छोट्या मोठ्या घड्याळांत दर्शविणाऱ्या वेळांची सरासरी (ॲव्हरेज) काढली. ती आठ वाजल्याचे दाखवीत

होती. काट्याचा प्रवास सुरूच होता. सव्वा आठ, साडे आठ – तसे तसे आम्ही सारे प्रवासी घडीचे पावणे आठ दिसू लागले.

एस.टी. बस आगमन सुवार्ता देणारा ध्वनिक्षेपक दिवसभराच्या ड्युटीमुळे क्षीण झाला होता



व दूरही होता. परिणामी आमच्या बसचे आगमन कळावे म्हणून प्रवास आम्ही बॅगा बायकापोरांवर सोपवून कुठलीही बस स्टँडमध्ये शिरली की आग लागल्याप्रमाणे प्रेयसीच्या मागे लागणार नाही इतक्या तातडीने त्या बसवरचे नाव गाव वाचायला पुढे जाऊ लागलो. आपल्याला वाचता येते याचा अशा वेळी केवढा आनंद होतो, नाही का ? अशी गंमत रात्रीचे नऊ वाजेपर्यंत चालली. आम्ही सारे झुंजार प्रवास इच्छुक दमलो आणि सामानाकडे लक्ष ठेवीत हल्लीचा एस.टी. चा कारभार, प्रवाशांच्या गैरसोई इ. बैठी चर्चा सुरू केली. ती हुकमी रंगावी म्हणून वाढती महागाई, पंतप्रधानांचं नेमकं कुठे चुकतं अशा विषयांचा आधार घेत शीण घालविण्याचा बौद्धिक निर्णय घेतला. शेवटी ह्या चर्चेला ब्रेक लागावा म्हणूनच की काय पण जिची घरी केवळ दहीभात खाऊन स्टँडवर येऊन दोन तास प्रतीक्षा करत होतो ती कऱ्हाड बस एकदाची धापा टाकत फक्त दोन तास उशीरा आली.

ह्या अक्षम्य उशिराबद्दल आम्ही रागाने शिरा ताणल्या पण 'बेटर लेट दॅन नेव्हर' ही गोऱ्या लोकांची म्हण आठवत पुन्हा एकदा पांढरपेशी सहनशीलता दाखवून आग विझवायला आलेल्या बंबवाल्यांच्या त्वरेने ह्या कऱ्हाड बसकडे मी, माझ्या मागे माझी सौ. तिच्यामागे श्री. व सौ. प्रवासी बंधू भगिनी त्या जीवघेण्या उकाड्यात बसच्या वेगाने धावलो.

बस प्रवेश झाल्यावर आरक्षण सीटस् क्रमांक ४३ व ४४ चा ताबा घेणे क्रमप्राप्त होते. आमच्या बेचाळीस पिढ्यांत अशी सनसनाटी सुरुवात झाली नसेल म्हणून तर ह्या प्रवासाची एवढी पूर्वरंगापासून अपूर्वाई वाटते. त्याचा उत्तररंग आता कथन करतो.

एस.टी. बसच्या सर्वात मागे उजव्या कोपऱ्यात आमचे ४३, ४४ क्रमांक होते. आमच्या ह्या आरक्षित जागा कोणीतरी आगाऊ कामाठ्यांनी व्यापल्या होत्या. त्यांना त्यांच्या 'जागा' दाखवून देणे माझे नैतिक, मानसिक, शारीरिक कर्तव्य होतं. तो अर्जंट लय भारी प्रश्न माझ्यासारखाच माझ्यापुढे उभा होता. जरास खडसावल्यावर ते 'बशे' उभे राहिले व आम्ही उभ्याचे त्या जागी बशे झालो. आम्ही (मी व सौ. तळेकर) आता कागदोपत्री श्री. सौ. माने होतो. सौ. ने अर्थात खिडकीजवळ हट्टाने जागा पटकावली. राजहट्ट, स्त्रीहट्ट, बालहट्टापुढे हटयोगी सुद्धा हटेल तेथे म्या पामराचं काय ?

आमच्या रेक्झीनच्या फाटक्या बाकड्यावर ४३, ४४, ४५, ४६, ४७ अशा पाच जणात आम्ही दोघे अधिक ३ बायका आणि त्यांची ४ पोरे अशी ९ जण बसलो तेव्हा नीट बसायला नाकी ९ आले. माझ्या उजव्या बाजूस आमची 'फुल्लराणी' आणि डाव्या बाजूस एक १५/१६ वर्षाची 'फुलराणी' किंवा कळी अशा दोन लहानमोठ्या राण्यांत ह्या गुलामाचा गोड धकाधक्कीचा प्रवास सुरू होणार होता. माझ्या मागे बसच्या बाहेर एक शिडी व आपत्कालीन दरवाजा

होता. एवढेच काय ते दुःखात सुख मी त्या घामाने निथळत्या वातावरणांत मानले. शेवटी सुख हे मानण्यावरच आहे हे मान्यवरांनाही मान्य व्हावे.

एस.टी. बस येऊन थांबलेली. आता ती कधी चालू होणार याचा वेध लागला आणि चालू झाल्यावर कऱ्हाडला ती पोचणार कधी याचा नंतर वेध लागणार होता. असेच अनेक वेध लागत लागतच माणसाचं सारं आयुष्य जातं एक दिवस. हे तत्त्वसार सांगणारं वाक्य सुचल्यामुळे मनास आनंद झाला. 'आत्ता सुटेल हो. जरा नीट बसा की.' असा वेधशाळेचा अंदाज ऐकू आला. आमची फुल्लराणी शाळेत मास्तरीण असल्यामुळे जाता जाता तिला 'वेधशाळा' म्हटलं. गोशाळेपासून वेधशाळेपर्यंत शाळा म्हटले की तिच्या विशाल हृदयात वेळेवर आशेची घंटा वाजतेच. असो.

कंडक्टरनेही घंटा दिली. ड्रायव्हर चाकावर आला. संगीत नाटक वाजवायला ऑर्गन साथीला बसावा तशी त्याने पोज (पवित्रा) घेतली. मी मनात रामरक्षा म्हटली. कारण एस.टी. बसमध्ये जिथे म्हणून जागा होती तिथे तिथे व नको तिथे प्रवासी बसले होते. उभे होते. माझ्या बाजूची ती चार धडपडणारी मुले व त्यांच्या आयांची नीट बसण्यासाठी ॲडजस्टमेंट चाललेली. आयुष्यात ॲडजस्टमेंट शिकायला लग्न किंवा एस.टी. चा प्रवास करावा हे दुसरं ज्ञानमय वाक्य सुचलं. प्रवासेन मनुजा येतसे चातुर्य फार.

हा हा म्हणता पनवेल आलं आणि गेलं. खोपोली आलं. खोपोली दरीत लुकलुकणारे दिवे म्हणजे रत्नमालाच जणू ही पण नेहमीची उपमा आठवली आणि पोटातला दहीभात संपल्याची पण जाणीव झाली. उकाड्याने तहानही लागलेली.

"गाडी पाच मिनिट थांबेल" म्हणत आधी कंडक्टर उतरला. त्याचबरोबर काही प्रवासी निसर्ग हाकेस ओ देण्यासाठी उतरले. आम्हीही उतरलो. थंड फ्रुटी पेय घेतलं आणि गरम बटाटेवडे दिसले म्हणून तेही हाणले. पण थंड फ्रुटी उष्म्यामुळे गरम झालेली आणि वडे न खपल्यामुळे गिऱ्हाईकाची वाट बघून थंड झालेले. पण एकदा पोटात गेल्यावर थंड काय अन् गरम काय असा श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या पांडूतात्यांप्रमाणे विचार केला. त्यामुळे जिवास समाधान मिळाले. तेवढाच फ्रुटफुल प्रवास.

"चला आली का सगळी?" विचारत कंडक्टरने घंटा दिली आणि पुन्हा एस.टी. चा ऑर्गन सुरु झाला. बस खोपोली घाटाला लागली आणि पुन्हा पन्वती सुरू झाली. बसला बैलगाडीची गति (लय) दिली होती. जगातल्या सगळ्या ट्रक, टँकर्स, मोटारींनी याच घाटात येऊन आमची वाट अडविण्याचा घाट घातला असावा. त्यांच्या प्रखर दिवा प्रकाशाने 'झगमगले भूवर आज' असं भासत होतं. शिंग्रोबा देवळाचा गुरव ह्या ट्रॅफिक जॅममुळे ज्याम कमाई करून होता. रहदारी नियंत्रण पोलिस हा गोंधळ फक्त बघण्याचं काम छान करत होता. वाहने चालू करण्यापेक्षा शिट्टी मारून थांबवण्यातच तो आनंद घेत होता. वाटेत नेहमीसारखे एक दोन टँकर्स उलटलेले दिसलेच. किल्ली ही हरवण्याची वस्तू त्याप्रमाणे टँकरचा जन्मही उलटण्यासाठीच असावा ! अशा चिंतन अवस्थेत जाण्याचे अनेक प्रसंग सांगली मोक्ष मिळेपर्यंत आमच्यावर आले.

आम्ही तासभर हा घाटी गोंधळ हताश होऊन पाहत अस्वस्थ चित्ते जागी खिळून होतो. दोन चार उभ्या प्रवाशांच्या आचरट गप्पा ऐकून त्यांची कानशिले फोडावीत, असा राग आला होता. खरं म्हणजे यावेळी एस.टी. पुण्यात कात्रज घाटाजवळ हवी होती. पण आमचं खोपोली घाट लढविणं चाललं होतं.

'डोळ्यांत माझ्या उतरून रात्र गेली' अशा अवस्थेत केव्हातरी डुलकी लागली.

घाट उतरुन गाडी आता मात्र पुणे रस्त्याला लागली होती, हे कळलं. रहदारी कमी वाटत होती. बसने वेग घेतला होता. बसमधला निळा दिवाही विझला. आता लोणावळ्याला प्रवासी मंडळींनी पुन्हा गरम-कम-थंड वडे, चहा फराळ व १ नंबर २ नंबर उरकलं होतं. आता ती कऱ्हाडपर्यंत झोपायला मुक्त होती. त्यांच्या घोरण्याचा सूर लागला आणि डुलक्यांचं प्रमाण वाढलं आणि अंगावर रेलण्याचे (साऊंड स्लीप यालाच म्हणतात).

माझ्या उजव्या बाजूची फुल्लराणी व डाव्या बाजूची फुलराणी माझ्या अंगावर पेंगून माना टाकू लागल्या. त्या जागेवर ठेवण्यासाठी मला अधूनमधून जागं रहावं लागत होतं. गवयाच्या कंटाळवाण्या गाण्यासारखा प्रवास चालला होता.

सकाळी सात वाजता बस कऱ्हाड थांब्याला लागली एकदाची आणि आम्ही उतरलो. पुन्हा श्री. व सौ. मान्यांचे श्री. व सौ. तळेकर झालो.

बसमधील सँडविच प्रवासाने सारा देह शिळ्या सँड्विचसारखा आंबला होता.

पण अजून कऱ्हाड-सांगली एस.टी. प्रवास ही छोट्या मुदतीची शिक्षा भोगायचीच होती. कऱ्हाड! यशवंतराव चव्हाणांच्या गांवी आलो होतो.

स्टँडबाहेरचं नुकतंच जागं होत असलेलं तृप्ती लॉज दिसलं. माझ्या मनात कल्पना आली. जाऊ सांगलीला दोन तास उशीरा. पण आधी जाऊ या तृप्ती लॉजवर. शरीर आंबलेलं. झ्याकपैकी मुखप्रक्षालन स्नानादि कर्मे उरकू. वाईच विश्रांती घेऊ. खाऊ, पिऊ अन् मग काकांच्या गावाला जाऊ या. कसं ?

सौ. ला कल्पना पटली त्याचा मला आनंद झाला. नवऱ्याची एखादी गोष्ट बायकोला पटणे कठीणच. अगदी त्या मिसेस पटेल असल्या तरी. (हे अनुभवी नवऱ्यांना पटेल). तृप्तीचा मालक थोडा अतिउत्साही दिसला. आम्हां दोघांकडे पाहून म्हणाला, "तुम्हांला एकदम पेशल रूमच देऊन टाकतो. संडास, बाथरूम, गीझर, शॉवर, आरसा, फोन, टी.व्ही. सर्व आहे. परवाच वेस्टर्न कमोडही लावलाय. पाच मिंट थांबा. ते अकरा नंबरमधलं बेण धा मिंटात रूम खाली करणार. मग मारत्या लगेच रूम साफ करून दील. तंवर बाईसायबाना बसवा सात नंबरमध्ये. तुमीबी बसा. आम्ही हनीमूनला आलोय् असं वाटलं की काय त्याला कोण जाणे. पण त्याच्या ह्या प्रेमभऱ्या स्वागतानं मलाही जरा उत्साह वाटू लागला. अंगही जरा गरम झालं. ते लक्षात आल्यावर सौभाग्यवती दूर सरकली. (इश्शऽऽ सक्काळीच काय? पुटपुटली) हातातला च्या चा कप आम्ही खाली ठेवल्यावर मालकांनी सांगली, कोल्हापूर, कऱ्हाडमध्ये परसिद्ध व्हनारी पेपर आमच्यासमोर टाकली. त्यांचा रंग, छपाईवरुन ती महिन्यापूर्वीची वाटली, पण ताजी होती.

टी.व्ही. सुरू करा की वो. मार्णिंग बातम्यात काय म्हंतोय बघू तो फो ××, समोर बसलेल्या एका म्हाताऱ्याने मालकास फर्मावले.

पांच झाली, धा झाली, पंधरा मिंट झाली पण पेशल रूम अकरामधलं बेण काही बाहेर येत नव्हतं.

"काय हो मालक किती उशीर हा?" असा मी शहरी निषेध नोंदवल्यावर मालकानी कुठली चावी फिरवली कुणास ठाऊक, पण ते बेण चटकन बाहेर आलं आणि आम्ही आत घुसलो. रूम स्वच्छ करायला मारत्या नंतर वीस मिनिटांनी आला. कऱ्हाडला पुणे-मुंबईच्या भामटेगिरीची सवय लागली असावी. कारण स्नानास पहिली बादली गरम पाणी मिळालं. नंतर गिऱ्हाईक गरम व्हावं असा थंडगार जलप्रवाह. पंखाही लहरीप्रमाणे फिरायचा. पंखा फिरतोय हे त्याच्या आवाजावरुन जाणवायचं. पंख्यापेक्षा त्याचे रेग्युलेटर बटणच जास्त वेगात फिरायचं. खिडकीतून बाहेरची हवा आली की तिने पंखा फिरेल ह्या आशेवर

गप्प बसलो.

आंघोळी झाल्यावर समोर आलेला पदार्थ पाहूनच भुकेचा चिवडा झाला. कारण साबुदाणा चिवड्याचा वास घेतल्यावर नक्की तो केव्हा बनविला ती तारीख हॉटेलवाल्यालाही सांगता आली नसती. इडली चटणी बर्फासारखी थंड आणि घट्ट. कऱ्हाडातल्या सर्वोत्तम हॉटेलातून म्हणे मारत्याने ते पदार्थ आणले होते. चहा-कॉफीने मात्र कऱ्हाडची लाज राखली. हॉटेल भाडे रु. २५ व रु. २ मारत्याला टीप देऊन तृप्तीला अखेरचा दंडवत ठोकला ते पुनश्च इथे न उतरण्याचा निश्चय करूनच. कऱ्हाड स्टॅण्डवर आलो. ८।। वाजलेले. धमाल गर्दी उसळलेली. मी चौकशी केली डेपो कंट्रोलरकडे. "कऱ्हाड-सांगली गाडी केव्हा ? "

"आज वाटेत ट्रॅफिक फार आहे आणि डायरेक् गाडी पावणे अकराशिवाय नाही."

"मग आता ?"

"वरून येणाऱ्या गाडीत बघा जागा. " त्याचं मख्ख उत्तर.

"वरून म्हणजे ?"

"माझ्या तिरडीवरून ?" तो तिरसटला.

"कुठायं तिरडी ?" मीही पेटलोच.

"अहो, वरून म्हंजे पुन्या-मंबईवरून येणाऱ्या गाडीत. शिकल्याली मानसं तुमी."

"वरून" अक्षरशः हजारो गाड्या कऱ्हाडला येत होत्या. पण त्यांत घुसणारी माणसं प्रत्येक बशी दहा हज्जार होती, उतरणारी फक्त चार-सहा असायची. ह्या हिशोबाने लग्नाला जाणारा पावणा मुलाच्या बारशापर्यंत पोचला तरी खूप.

आता काय करावे? गर्दी पांगवायला, हटवायला बरोबर माझं व्हायोलिनही घेतलं नव्हतं. बायको गाणारी, पण तिचा आवाजही नेमका आजच बसलेला. साडेनऊ वाजले तरी गाडी लापता होती. शेवटी अशीच कुठून तरी 'वरून' आलेली सांगली बस आमच्या समोरच्या फलाटाला थबकली आणि 'हरहर महादेव' थाटात सामान व बायकोसह मी त्या चक्रव्यूहाचे आत घुसलोच, तो सांगलीलाच बाहेर पडण्यासाठी. पेठ, कासेगाव, इस्लामपूर, अष्टे इ. साठी जाणारी नव्या वस्त्रातील लग्नमुंजी समारंभास जाणारी सुगंधी गर्दी होती. त्या आनंद सुगंधात ते प्रवासी गर्दी, खेचाखेची, कडक उन्हं, उभं राहून जाण्यातले कष्ट इ. विसरले होते. १० वाजता आम्ही सांगली रस्त्याला लागलो आणि उतारूंच्या हाणामाऱ्या पाहत ११।। वाजता सांगली दर्शन जाहले.

तळेकर बंधूद्वय काही कामासाठी बाहेर गेलेले. आमच्या दोन वहिन्यांनी हांसूभरे स्वागत केले. तेवढा तो "कसा झाला प्रवास" प्रश्न विचारायला नको होतं. चहा-चिवडा समोर आला. डोळ्यांतून पाणी आले. कारण आज ती वास्तूच आनंदाने हासत होती. रडत होती. चि. उषाचं अखेर जमलं होतं. उशीर झाला होता. पण नव्या आयुष्याचा उषःकाल तो सुवर्णक्षण, मंगलक्षण जवळ येत चालला होता. आम्ही पोहोचलो त्यावेळी ब्राह्मण आले होते. त्यांचं मंत्रपठण, ग्रहमुख विधी, होम चालला होता. उषाला स्वतःचं होम मिळणार होतं म्हणून. चिपळूणच्या भागवतांचं घर ती सजवणार होती. स्वतः सजणार होती. सजण स्वागताला सज्ज होत होती. उशीर झाला होता, पण वसंत फुलला होता. मे महिन्यातल्या त्या रखरखत्या उन्हांत दुपारी शरदाचं चांदणं सांडल्यासारखं वाटून मन आल्हादलं होतं. ग्रहमुख विधीचा तो दाटलेला 'धूर' आमच्या डोळ्यांतून पाणी काढत होता. पण उषाला तोच धूर 'मधुर' वाटला असेल.

खरं तर ठाणे-सांगली व्हाया कऱ्हाड लाल गाडीच्या ह्या खत्रूड एस.टी. बस प्रवासावर

लिहिण्यासारखं काय आहे? आणि आम्हीही हयू-एन-त्संग, कोलंबस, वास्को-द-गामासारखे सुरस वर्णन करणारे महान प्रवासी थोडेच आहोत ? पुढे पुष्कळ विमान प्रवास केला. पण कथा बीज बस प्रवासातच जास्त सापडतात. कारण ती धरतीवर धावत असते आणि कुठल्याही बीजाचे घट्ट नाते धरतीशीच असते ना.

विमानात पांच सीटस्वर पाचच पांडव बसतात. ऐसपैस. म्हणून मधल्या प्रवाशांच्या अंगावर रेलायचं म्हटलं तरी जमत नाही. सांगली-कोल्हापूरकडच्या 'फ' आणि 'प' ने सुरुवात होणाऱ्या दमदार शिव्या बस कंडक्टरसारख्या हवाई-सुंदरीला देता आल्या तरी ती देत नाही. कारण तिचे ओठ लिप-स्टिकने (का फेविकोलने) चिकटलेले असतात. ते उघडेपर्यंत विमानाचे दार उघडण्याची वेळ येते. फ्रुटी-बटाटेवडा विमानवाले विमानातच देतात. एकदा ते 'वर' उडालं की 'वरुन' येणारी गाडी पकडण्याची भानगड नाही महाराज, कारण सारे हवेतच असतात.

## टिप्स

**सुखी संसारासाठी काही सोपे उपाय :**

१) मुख्य दरवाजा जेवढा सुशोभित करता येईल तेवढा करावा. मुख्य दरवाजावर देवी-देवताचे फोटो लावू नयेत, फक्त शुभ चिन्ह लावावेत. उंबरा हा लाकडाचा असावा, नाहीतर मार्बलचा चालेल. मधोमध लक्ष्मीची पाऊले लावून तिची दररोज आतून पूजा करावी. तसेच घरात स्वच्छता ठेवावी. मुख्य दरवाजा पूर्ण उघडता येईल असा असावा. दरवाजामागे कॅलेंडर लावू नये तसेच कोणताही अडथळा ठेवू नये. दरवाजासमोर कोणताही अडथळा असू नये.

२) स्त्रियांनी सकाळी लवकर उठून आंघोळ करून हळद-कुंकू वाहून उंबरठ्याचे पूजन करावे. दोन रंगांची रांगोळी काढावी व नंतर तुळशीला पाणी घालून हळद-कुंकू वाहावे आणि नंतरच स्वयंपाकखोलीत जाऊन पुढच्या कामाला सुरुवात करावी. सकाळ-संध्याकाळ उंबराच्या दोन्ही बाजूला तूपाचा दिवा लावावा.

३) स्त्रियांनी सोवळं-ओवळं पाळावं. स्वयंपाक मनापासून करावा. सर्व सण पारंपरिक रित्या साजरे करावेत. किचनच्या ईशान्य कोपऱ्यात मातीचे पाण्याचे भांडे ठेवून त्याच्यातीलच पाणी प्यावे. किचनच्या बेसिनमध्ये रात्री खरकटी भांडी तशीच ठेवू नयेत.

४) पुरुषांनीच आंघोळ करून घरातील, मंदिरातील देव-देवतांची पूजा करावी. मंदिरात कुलदैवत-कुलदेवी, घंटी, गणेशमूर्ती, शंकराची पिंड, लंगडा बाळकृष्ण, शंख, आराध्यदैवत असावे. देवी, देवाचे दोन फोटो किंवा मूर्त्या असू नयेत. मंदिरात नेहमी तूपाचा किंवा तिळाच्या तेलाचा दिवा लावावा. (डाव्या बाजूस) व दोन अगरबत्ती (उजव्या बाजूस) लावाव्यात. आठवड्यातून एकदा तरी संपूर्ण घरात धूप फिरवावा.

५) घरामध्ये देवघर सोडून इतरत्र देवांचे फोटो किंवा मूर्त्या ठेवू नयेत. देवघर हे नेहमी पूर्व, ईशान्य, उत्तर दिशेतच असावे.

# सिटीत असं नसतं !

- श्रोता कुलकर्णी

रखरखत्या उन्हात ट्रक थांबवल्याचा आवाज कानी पडताच मधुरा घाईघाईनेच बाल्कनीत गेली, तर ट्रक नसून टेम्पो आहे, असे तिच्या लक्षात आले. टेम्पो म्हणजे सामान आले असणार कुणाचे तरी... जराशा उत्सुकतेनेच ती तिथेचं थांबली. कुणी फर्निचर मागवलंय की फ्रिज वगैरे ? असा विचार मनात येत असतानाच टेम्पो जरासा वळून परत थांबला आणि आतला पसारा बघताच तिच्या लक्षात आले, कोणीतरी रहायला आले! वरती दुसऱ्या मजल्यावरही एक फ्लॅट रिकामा होता, तिच्या शेजारचा फ्लॅटही दोन वर्षांपासून रिकामाच होता, मग नक्की कुठल्या फ्लॅटमध्ये ?

छान पोटभर जेवण झाले होते म्हणून तिने चांगले दोन तास ताणून द्यायचा विचार केला होता. पण आता तिची झोप कुठल्या कुठे पळून गेली. तिने ताबडतोब सबनीस काकूंना फोन केला. सबनीस काकूही तिच्या तत्परतेला दाद देत लगेचच आल्या. त्यांनी यायला आणि त्या लोकांनी शेजारीच कुलूप काढायला एकच गाठ पडली.

**“बघ ना वैजू, त्या साबळेबाईंना आपलं ज्योतीला येऊन एवढे महिने झाले. आता वर्ष होत आलं तरी बाईसाहेबांचे काम संपत नाही की सिटीत काय काय नसतं ह्याची उजळणी संपत नाही...”**

“अगं मधुरा, तुझ्या शेजारीच आलेय हो नवीन बिऱ्हाड!” सबनीस काकू तिच्या सोफ्यावर ऐसपैस बसत म्हणाल्या...

“बरंय बाई, आता नवीन मैत्रीण मिळाल्यावर आम्हाला डच्चू देणार वाटतं ? असं चालणार नाही हं बच्चू !”

“काकूऽ” मधुरादेखील पलीकडचा लोड मांडीवर घेऊन बसत म्हणाली, “नाही हं विसरणार तुम्हाला अगदी सच्चूऽ” आणि गळ्याला चिमटा घेऊ लागली.

दोघीही खळखळून हसल्या. त्यांना हास्यविनोद करायला काहीही कारण चालायचे. त्यांचा हसण्याचा आवाज वैजयंतीला ऐकू गेलाच आणि तीसुध्दा लागलीच आली...

“काय चाललेयं दोघींचं ? कुठली सिगरेट ओढताय ?” आता इथे सिगरेट म्हणजे सिकरेट हं...

“हेच की... आता काय बाई मधुराला नवीन मैत्रीण मिळणार !” सबनीस काकू वैजूला हळू आवाजात सांगू लागल्या, “आता काय आपला भाव पडणार !”

“ते काही नाही चालणार हं मधुराऽऽ” वैजूने मधुराचा कान पकडला आणि फिसकन हसली...

तिघी मग काही ना काही कारणाने सारख्या खिदळू लागल्या. त्यांच्या आवाजाने शेजारच्या घरातल्या सामान वाहकांनी त्यांच्याकडे चमत्कारिक नजरेने पाहताच त्या अजूनच खिदळल्या.

आता माडीवरच्या बर्वे आजींना राहवेना आणि त्याही लुटूलुटू पायऱ्या उतरत मधुराकडे आल्या, “काय गं चाललंय ? आणि ही कसली गडबड ?”

“आजी, मधुराच्या शेजारी राहायला येतयं कुणीतरी...” वैजूने उत्साहाने माहिती पुरवली.

“बरं झालं बाई ! घर रिकामचं होतं...” बर्वे

आजी तिच्या शेजारी मांडी ठोकून बसल्या, "पण माझ्या झोपेचं खोबरं झालं... रात्रीही डोळा लागत नाही. आता दोन मिनिटं डोळे मिटावे तर हा त्रास..."

"काय आजी, रात्री बर्वे आजोबा झोपू देत नाहीत की काय ?" वैजू हसू आवरत विचारू लागली. "की मुलगा-सून रात्री दंगा करतात ? आणि त्यांच्यासारखा दंगा तुम्हाला करता येत नाही ?"

"हो ना !" बर्वे आजी मिश्कीलपणे उत्तरल्या. "तुझं तेवढंच लक्ष असतं !" बरं मधुराऽऽ चहा टाक बाई... उरलीसुरली झोप पण जाऊ दे... तरतरी येईल जरा..."

"तरतरी ना ? म्हणजे दंगा करायला..." वैजू खट्याळपणे म्हणाली. "आजी ग्लास भरायचे का ? जास्तच तरतरी येईल..."

"अगोचर झालीय नुसती !" बर्वे आजी वैजूला धपाटा देत म्हणाल्या.

"आजी," सबनीस काकू म्हणाल्या, "शेजारीण आलीय का बघूया... मग चहा करूया



तिला पण बोलवूया..."

"बरं..." हा सल्ला सगळ्याजणींना आवडला आणि त्या तिकडे लक्ष ठेवून हसू-खिदळू लागल्या.

काही वेळातच त्यांची प्रतिक्षा फळाला आली आणि त्यांची नवी शेजारीण त्यांना दर्शन देती झाली. ठेंगणी, ठुसकी पण आकर्षक... असली तरी चेहऱ्यावर बुजरेपणा... गोंधळ तिच्या चेहऱ्यावरून लपत नव्हता... हाताशी तीन मुलं... एक मुलगी आठ वर्षांची असावी आणि दोन जुळी मुलं... तीन वर्षांची... ती तिच्या घरात शिरणार, तोच ह्या चांडाळ चौकडीने तिला हाका मारल्या. जराशी बावरूनच ती आली.

"तुम्ही राहणार ना इथे ?"

"हो..." ती म्हणाली... ती मुलंही तिला पकडूनच होती...

"मी वैजू देवरे..." वैजूने मग सगळ्यांची ओळख करून दिली. 'तुम्ही ?"

"मी ज्योती साबळे..." ती अवघडून बसत म्हणाली, "आम्ही."

"बसा हो... जाऊ नका..." मधुरा किचनमधून बाहेर येऊन म्हणाली, 'चहा घ्या. मग जा..."

"अहो नको..." ज्योती अजूनच बावचळली, "नको ना कशाला त्रास घेता ?"

"राहू दे. त्यात त्रास कसला?" सबनीस काकूच मधुराच्या वतीने म्हणाल्या, "मुलं शाळेत जात असतील ना ?"

"हो आता इथेच घ्यायची ॲडमिशन..." ज्योती संकोचत म्हणाली.

"इथे घर. अन् हे एकटे तरी किती दिवस राहणार ना ?"

"पण तुमचंच घर होतं तर एवढे दिवस का नाही आलात?" बर्वे आजींनी विचारलं, "आणि तेसुध्दा इथे नव्हते रहात?"

"आमचा भाऊ राहतात ना त्रिमूर्ती नगरमध्ये त्यांच्याकडे होते रहायला..."

"हे घर तुम्ही कुणाला राहायलाही दिले नाही ना ?" वैजूने म्हटले, "भरपूर भाडं मिळाले असते तुम्हाला आत्तापर्यंत..."

ज्योती एका मुलाला बाजूला नीट बसवत म्हणाली, "सिटीत ना काय असतं, घरं सोडत नाहीत हो भाडकरू लवकर! म्हणून मग दिलेच नाही कोणाला..."

तोवर दुसरा मुलगा चुळबूळ करू लागला म्हणून ज्योती अजूनच अवघडली. ती चटकन् उठून उभी राहिली, "निघू का मी? कामे आहेत भरपूर..."

"बसा हो, कामे होतील... आम्ही आहोत ना मदतीला..." वैजू म्हणाली, तिचं बोलून होत नाही तोवर मधुरा चहा घेऊन आलीच, "घ्याऽऽ... बर्वे आजी तुम्ही आधी..."

ज्योतीकडे पाहत असताना मधुराला कधीच संकोचाशिवाय वारवार येत नाही का ? बघू या... असा विचार करून ती परत गप्पांमध्ये रमली.

★★★

"अरे... अरे..." ज्योतीच्या रागावण्याचा आवाज आला तसे मधुरा दाराजवळ गेली, तेव्हा ज्योतीचा शुभम् घराचा दरवाजा जोरात वाजवताना दिसला.

"काय हो काय झाले ?" मधुराने विचारले.

"बघा... ना... किती आवाज करतोय, बरं नाही वाटत..." ती म्हणाली, "आता तिथल्या लहान गावातल्या सवयी सोडायला नको का ? आता इथे सिटीत राहायला आलोय तर शांतपणे वागायला हवे..."

मधुराला विचित्रच वाटले, "सिटीत म्हणजे?"

"मग काय ? कुणाचे दार उगाचच वाजवू नये, कुणाकडे गेल्यावर शांत बसावे, कुणाच्यात ढवळाढवळ करू नये..."

मधुराला ते ऐकवेना, "अहो हे तर कुठेही..."

"तसं नाही..." ज्योती त्राडाने म्हणाली, "बघा ना... ऐकतच नाही... शुभम्चे असे विचित्र तर लाभम्ची दुसरी तऱ्हा... आणि रिध्दीची वेगळीच..."

मधुराला त्यातल्या त्यातही हसू आले. शुभम्, लाभम्, रिध्दी. आता सिध्दीही व्हायला हरकत नाही... तिने हसू आवरलेच...

"चला, चहा घेऊया एकेक कप..." मधुराने म्हटले.

"नाही हो, खूप खूप कामे पडली आहेत" ज्योती म्हणाली, "भांडी, धुणं, केर, फरशी... नशीब स्वयंपाक झालाय सकाळीच... हे डबा घेऊन जातात ना..."

मथू आजी जिना उतरताना दिसताच मधुरा खळखळून हसत म्हणाली, "काय आजी ? आज कुठे ?"

"आज ना बंडगार्डनला भेटायचं ठरलंय..."

"भेटून या... येऊ का सोबत ?" मधुराने विचारले.

"नको. उगीच तू मध्ये अडचण..." आजी हसत हसत निघून गेल्या. ज्योती गोंधळून बघत राहिली.

"बंडगार्डनला म्हणजे ? आणि कुणाला भेटायचं ?"

"बंडगार्डन नावाची बाग आहे... पण आजी डॉक्टरांकडे चालल्या आहेत... त्या गंमतीत म्हणाल्या..."

ज्योतीचा चेहरा किंचित आक्रसला. तिला आवडले नसावे.

"येते मी. भरपूर कामे पडली आहेत..." ज्योतीच्या शब्दाला अशी धार होती की मधुरा निमूटपणे घरात परतली... काय करावे ?

★★★

"बघ ना वैजू, त्या साबळेबाईंना आपलं ज्योतीला येऊन एवढे महिने झाले. आता वर्ष होत आलं तरी बाईसाहेबांचे काम संपत नाही की सिटीत

काय काय नसतं ह्याची उजळणी संपत नाही...” मधुरा वैतागून सांगत होती.

“जाऊ दे गं... आपल्याला काय करायचंय!” वैजू चकलीचा फन्ना उडवत म्हणाली, “मला तर वाटतं, आपणच एकदम छोट्या छोट्या खेड्यांतून इथे आत्ताच आलोय. आणि ह्या मॅडम जन्मापासून लंडन, न्यूयॉर्कमध्ये वाढल्या आहेत आणि आपल्याला सिटीचे नीतिनियम सांगतात. आणि आपल्यासाठी म्हणून त्या अंगभर कपड्यात असतात... नाहीतर मिनीस्कर्टमध्ये नाहीतर जीन्समध्येच असणार...”

मधुराला आता फसकन हसू आले, ज्योतीला जीन्स किंवा मिनीस्कर्ट कसा दिसेल ह्या कल्पनेनेच !

“हा हा हा...” वैजू चीत्कारली..., “मधुरा, आपणच आऊटडेटेड आहोत...हा हा हा...”

“हं !” मधुरा फणकाऱ्याने म्हणाली, “आपण एव्हरग्रीन आहोत समजलं...”

दोघी एकमेकींना टाळ्या देत फिस्कारल्या...

सबनीस काकू मधुराच्या घराची बेल वाजवत होत्या, तितक्यात ज्योतीनेच दार उघडले. ती बाहेर जाण्याच्या तयारीत... काखेत शुभम्, एका हातात लाभम्, दुसऱ्या हातात रिध्दी... चेहऱ्यावरचा गोंधळ आणि सिन्सीअरपणा थापलेला...

“काय गं, कुठे निघालीस?” सबनीस काकूंनी विचारले. “अहो, नेमके तांदूळ संपलेत... आणि लागणारच ना... मग आणायला निघालेय...” ज्योतीने सबनीस काकूंकडे काय बावळटपणा आहे अशा अर्थाने बघितले.

“अगं, मग तिघातिघांना घेऊन कशाला जातेस, मी इथे मधुराकडे बसणाराय... त्यांना ठेवून जा...” सबनीस काकूंनी सुचवले.

“नको... उगाच त्रास देतील !” एखादे संकट कोसळल्यासारखे ज्योती म्हणाली. मधुराने तोवर दार उघडले.

“मग मधुरा देईल वाडगाभर तांदूळ! मुलांचे वडील आणतील येताना तांदूळ... त्यांना फोन कर...”

“नको, मधुराताईंना कशाला त्रास !”

“त्यात त्रास कसला ?” मधुरा म्हणाली.

“नाही हो. सिटीत असे नसते... मी जाऊन येते ना चटकन् !”

आता मधुरा आणि सबनीस काकूंना हसावे की रडावे कळेना...

“त्यात कसला त्रास ? मधुरा देगं वाडगभर तांदूळ!” सबनीस काकू दटावणीच्या सुरात म्हणाल्या. त्यामुळे ज्योतीला चूपचाप मधुराकडून वाडगाभर तांदूळ न्यावे लागले. आपल्या तिघा मुलांना घरात घेऊन दार लावून ज्योती नामक सुगृहिणी दिसेनाशी झाल्या झाल्या मधुरा हसू आवरत



म्हणाली, “दाने दाने पे लिखा है खानेवाला का नाम!”

“ते मरू दे... ह्या बाईसाहेब जरा हळू... आणि काय गं हे हिचं इतकं काय संकोचणं ?”

“आता सवय होईन सबनीस काकू, हे असचं आहे. आपण कुणाला मदत करायची नाही, कुणाची

मदत घ्यायची नाही...'' मधुरा म्हणाली, ''आपण कधी गेलो तर ह्यांची कामंच येतात... दुसऱ्यांची कामं मग राहिली तरी चालतील...'' मधुरा मोठ्याने सुस्कारा सोडत म्हणाली.

''जाऊ देत... दुसरा काही त्रास नाही.''

''अगं, काहीच त्रास नाहीये हे ठीक आहे पण हे वागणं म्हणजे विचित्रच. अगं. प्राण्यांनासुध्दा एकमेकांची गरज लागते, सोबत लागते... निदान कुणीतरी आपल्यापाशी आहे ही भावनाच किती दिलासादायक असते !''

''ते झालंच...''

''हे एकापरीने माणूसपणाचे लक्षण नव्हे...'' सबनीस काकू म्हणाल्या.

''मधुराऽ, ए मधुराऽऽ'' वैजू मधुराच्या घरात शिरत तिला हाक मारू लागली... तशी मधुरा घाईने स्वयंपाकघरातून बाहेर येत ओरडली,

''काय गं, काय झालं ?''

''अगं, त्या रिध्दीला ॲडमिट केलंय म्हणे...''

''काय सांगतेस ? आणि तुला कसे कळले ?'' मधुरा चकित झाली.

''ह्यांनी सकाळी ऑफिसला जाताना बघितलं, त्यांनी लगेच फोन केला. त्यांची फर्स्ट शिफ्ट आज. मग सकाळी सहाला एवढ्या लवकर इतक्या तापलेल्या मुलीला ॲडमिटच करणार ना ?''

''चल बघूया...'' मधुरा आणि ती तातडीने शेजारी गेल्या.

ज्योतीची स्वयंपाकघरात तारांबळ उडाली होती. शुभम् आणि लाभम्ने भरपूर पसारा घालून त्रास देण्याचे ठरवले असावे.

''काय हो रिध्दीला ॲडमिट केलंय ?''

''हो बघा ना, रात्रीतून भरपूर ताप आला. मग हे सकाळी लवकरच दवाखान्यात तिला घेऊन गेले. आता डबा घेऊन मी जाते...''

''धन्य ! सांगायचं नाही का ?'' मधुराला चीड आली. आपण शेजारी असून सांगितलेदेखील नाही ? ''काय करायचाय का स्वयंपाक ?''

''हो... आता करते ना... कणिकच मळायला घेत होते...''

सबनीस काकूही त्यांचा आवाज ऐकून एव्हाना आल्या, वैजू ज्योतीला म्हणाली, ''द्या, बघू कणिक... मी मळते.''

''नको... मी करते ना...'' ज्योती आढेवेढे घेत म्हणाली.

मधुरा तिच्याकडे चिडीने बघत म्हणाली, ''मी माझ्याकडच्या पोळ्या आणते... वैजू तू भाजी घेऊन ये...''

''हो. आपण पटापट आवरू आणि ज्योतीबरोबर दवाखान्यात जाऊ.'' सबनीस काकूंनी म्हटलं. ज्योतीला कोणी येऊ का विचारलेच नाही.

पटापट तिघी दहा मिनिटांत आवरून आल्या. हातात डबे.


ज्योतीच्या डोळ्यांत आता कृतज्ञतेने भाव उमटले होते.

''तुम्ही... तुम्ही...''

''राहू दे. सिटीत असं पण असतं बरं का...'' सबनीस काकू म्हणाल्या, ''चांगली माणसंदेखील असतात अन् मिळूनिसळूनही राहायचे असते.''

''काकू... थँक्स... मधुराताई...''


''राहू दे ते बाजूला... थँक्सबिंक्स... चला लवकर...'' बर्वे आजी घाईने आल्या. चौघी मिळून लाभम् शुभम्सह ज्योतीचा हात धरून म्हणाल्या, ''सिटीत असेही असते हं...''



Happy ' Diwali & Happy New Year

With Best Wishes from

# HILTON
# Developers Pvt. Ltd.



611 Neelyog Square, Ghatkopar(E),
Mumbai-400077. Mr. Hasmukhbhai M. Barvalia.

# सुरक्षित जपान अनुभव

- नि. श. गुळवणी

एखाद्या देशाचे एकंदरीत जीवनमान, दर्जा अन् संस्कृतीचं समीकरण ढोबळमानानं देशांतर्गत घडणाऱ्या गुन्हेगारीतून मांडता येईल अन् या बाबतीतही जपान आघाडीवर आहे. जपान हा जगातील सर्वांत कमी गुन्हेगारीचा देश आहे. जपानमध्ये वास्तवास आलेल्या बाहेरील परदेशीयांना त्यांच्या काही दिवसांच्या वास्तवामध्येच कळून चुकते की हा एक केवळ औद्योगिक प्रगतीचं शिखर गाठलेला देश नसून एक अत्यंत सुरक्षित अन् सुंदर देश आहे. औद्योगिक प्रगतीबरोबरच अमाप पैसा आला, तीव्र स्पर्धा आली परंतु सोबतच येऊ पाहणाऱ्या गुन्हेगारीवर अंकुश राखण्यात जपानी माणूस यशस्वी ठरला आणि म्हणूनच हे जगातील एक सर्वोत्तम राष्ट्र बनू शकलं. जपानमधील गेल्या आठ-नऊ महिन्यांच्या वास्तव्यात मी इथल्या मोकळ्या अन् सुरक्षित जीवनाचा मनसोक्त आनंद तर लुटलाच पण सोबत या गुन्हेगारीमुक्त देशाचं मूळ जाणून घेण्याचाही प्रयत्न केला आणि मला आलेल्या इथल्या काही अनुभवामधून, चिंतनातून ते इथं मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**“हातचलाखी, बनवाबनवी, फसवाफसवीची इथं साधी शंका देखील कधी मनात येत नाही. तुम्ही दुकानात माल घेऊन पैसे दिल्यानंतर तिथं इलेक्ट्रॉनिक्स फलकावर तुम्ही दिलेले पैसे, तुमचं एकूण बिल अन् उरलेली बाकी हा हिशेब तुम्हाला दाखविला जातो अन् मग तुम्हांला परत करायच्या पैशामध्ये एक नया पैशाचीही तूट कधी आढळत नाही.”**

आमच्या एका सहकाऱ्याच नवं कोरं घड्याळ कार्यालयाकडे जाताना वाटेत हरवली. कार्यालयात यावर चाललेली चर्चा ऐकून एक जपानी हसत-हसत म्हणाला, “तुमचं घड्याळ एखाद्या जपानी माणसाच्या हाती लागलं असेल तर ते तुम्हांला निश्चितच मिळेल.” आम्हला आधी दर्पोक्ती वाटली परंतु रेल्वे पोलिसांना फोन करताच वर्णन केलेलं घड्याळ काही वेळापूर्वी त्यांच्याकडे जमा झाले असून ते त्यांनी घेऊन जाण्यास सांगितले. प्रसंग तसा छोटासाच होता परंतु तो जपानी माणसांविषयीचा आदर शतगुणित करणारा ठरला.

प्रामाणिकपणा जपानी माणसाच्या नसा-नसात भरलाय. गुन्हेगारीला पहिला अटकाव हा या प्रामाणिकपणातून, सचोटीतूनच बसतो आणि याचा प्रत्यय इथं मला रोजाना येतो. मालांनी काठोकाठ भरलेल्या दुकानामध्ये एका कोपऱ्यात बिल फाडणारा बसलेला असतो. गिऱ्हाईकांनी दुकानाच्या अनेक दरवाजांमधून कोठूनही यावं, हवा तो माल उचलावा, बिल भागवून निघून जावं. इतकं ते सरळ सोपं असतं. खरंतरं कोणीही सहजच हवा तो माल उचलून बील न चुकवता अगदी सहज पसारही होऊ शकतो. कोणताही अटकाव नाही. परंतु इथं अविश्वास, लबाडी, तीळमात्रही कुठेही आढळत नाही. फसवणं इथ सहज सोपं वाटत असलं तरी कोणीही, कधीही, कोणाला फसवतोय असं चित्र इथं दूरान्वयेही नजरेस पडत नाही. कधी कधी ही सारी माणस

कशाची बनली असावीत असं वाटताना अचंबित व्हायला होतं. इथला सारा कारभार विश्वासावर, सचोटीवर चालतो. एकदा मी अन् माझी पत्नी रस्त्यानं चाललो होतो अन् रस्त्याच्या कडेला एक सुंदर, किमती बॅग पाहून थबकलो. जवळून पाहिलं तर ती बॅग साखळीनं बांधलेली नव्हती. आम्ही काही काळ दुरून निरीक्षण करीत राहिलो. येणारे–जाणारे त्या बॅगेकडे साधं ढुंकूनही पहात नव्हते. कोणी साधी त्या बॅगेची दखलही घेतली नव्हती. आम्ही तासभर फिरून पुन्हा तिथं आलो. ती बॅग तिथे तशीच होती. जागोजागी छत्र्या ठेवलेल्या असतात, सायकलींना कुलपं नसतात परंतु कोणाचं साधं तिकडे लक्षही जात नाही.

हातचलाखी, बनवाबनवी, फसवाफसवीची इथं साधी शंका देखील कधी मनात येत नाही. तुम्ही दुकानात माल घेऊन पैसे दिल्यानंतर तिथं इलेक्ट्रॉनिक्स फलकावर तुम्ही दिलेले पैसे, तुमचं एकूण बिल अन् उरलेली बाकी हा हिशेब तुम्हाला दाखविला जातो अन् मग तुम्हांला परत करायच्या पैशामध्ये एक नया पैशाचीही तूट कधी आढळत नाही. गेल्या इतक्या महिन्याच्या इथल्या वास्तवात मी कैक दुकानांच्या पायऱ्या चढलो असेन परंतु एकदाही सुट्टे पैसे नाहीत या सबबीवर मला एखादा येन कमी मिळालाय असं कधी घडलेले नाही. चार-चार वेळा तुमचे आभार मानत ते तुमचा पै न् पै चुकता करतात. पहिल्या दिवशी परत केलेली रक्कम मी मोजतोय हे पाहून माझा सहकारी फार मोठा विनोद झाल्याच्या थाटात हसला. तो म्हणाला की गेल्या दोन वर्षांत त्यानं ते कधीच केल नाही. इथ एका पोस्टात एक इसम पस्तीस येन म्हणजे वीसएक रुपये न परत घेताच बाहेर पडला. त्याला त्यांनी फोन करून त्याचे पैसे तसेच ठेवल्याचे सांगितले. पुढे आठवड्यानंतर तो पोस्टात गेला तेव्हा त्याला ते लिफाफाबंद पैसे परत केले. प्रामाणिकपणासोबतच नियमांचं कटेकोर पालन हे देखील जपानी माणसाच्या नसानसात चांगलंच मुरलंयं. तो नियमांच कधीच उल्लंघन करीत नसल्याने त्या अनुरोधाने येणारे दंड, भ्रष्टाचार, वादविवाद आदी भानगडी तुम्हाला कधी कुठे नजरेस पडणार नाहीत. नियमभंगामुळे किरकोळ अपघात अन् त्यातून वादावादी, कटकटी आणि कधीकधी मारामाऱ्यांपर्यंत प्रकरण जातात हे आपण अन्यत्र पाहतो. पण इथं तसा कोणताही अनुचित प्रकार आढळत नाही. गर्दीतही जपानी माणूस धक्कबुक्की न करता अगदी शिस्तशीरपणे, इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घेत वावरत असल्याने मुळात कुठही भांडण, शिवीगाळ आदी प्रकार औषधालाही



आढळत नाहीत. खरंतरं मुंबईपेक्षाही अधिक प्रवासी रोज टोकिओ रेल्वेतून प्रवास करीत असावेत पण मला एकदाही धक्काबुक्की, मारामारी तर दूरच राहो साधं एकमेकांकडे रागाने, तिरस्काराने, तिरक्यानें पाहिल्याचेही स्मरत नाही. एकदा इथं टोकिओत चांगलेच बर्फ पडले अन् चक्क गाड्या काही मिनिटं उशीरा धावू लागल्या. इथं ते अघटितच असंच काहीसं

होत. स्टेशनवर तोबा गर्दी झाली होती पण सर्वत्र तशीच उत्तम शिस्त दिसत होती. कोणी भांबावल्यासारखं, वैतागल्यासारखं, त्रासल्यासारखं वाटतं नव्हतं. शांतपणे कसलीही कुरबूर न करता ते सारे ओळीनं पुढच्या ट्रेनची वाट पहात थांबले होते. इतरांना ढकलून पुढे घुसण्याचा प्रयत्न असं इथं काही कधी घडत नाही. कर्णकर्कश आवाज, लाऊडस्पिकर, हॉर्नचे आवाज, आरडाओरडा, घोषणाबाजी असे सारे भावना उद्दीपि करणारे ध्वनी इथं ऐकल्याचं मला स्मरत नाही. याचा अर्थ जपानी माणूस कायमचा तोंडाला कुलूप लावून मूग गिळून गप्प बसून राहतो असा मुळीच नाही. आठवड्याच्या सुट्टी दिवशी साऱ्या बागा, प्रेक्षणीय स्थळे, रस्ते माणसांनी भरलेले असतात. कामाच्या दिवसा इतकीच वर्दळ सुट्यांच्या दिवशीही असते. गटागटाने खात-पीत फिरताना मनसोक्त गप्पा मारत फिरणारा जपानी आपल्यामुळे कोणाला किंचितही त्रास होऊ नये याची खबरदारी घेत असतो. त्याचं जीवन हे एखाद्या यंत्रमानवासारखं मुळीच नाही तर एखाद्या अत्यंत सुसंस्कृत समाजातील सुसंस्कृत माणसाला साजेल असचं नेहमी असतं. तो कधी कोणाची टर उडविताना, निंदानालस्ती करताना आढळत नाही. बऱ्याच देशांमध्ये परदेशी नागरिकांकडे बघण्याचा दृष्टीकोन थोडा वेगळा, संशयाने भरलेला असतो परंतु एक भारतीय या नात्याने मला इथं आदराचीच वागणूक मिळाली. एक सहप्रवासी, गिऱ्हाईक, सहकर्मचारी, शेजारी, मित्र अशा अनेक रूपांत मी इथं वावरलो पण सर्वत्र स्मितहास्य, आभार, आदरातिथ्य याखेरीज अन्य काहीही पहायला मिळाले नाही. बरं केवळ मी एक परदेशी या नात्याने ते माझ्याशी आपुलकीने वागत असतील असेही काही नाही. मी त्यांनाही आपापसात तितक्याच आदराने आचरण करताना नेहमीच पाहत आलो आहे.

टोकिओच्या रस्त्यावर रोज 'फॅशन शो' सुरु असतो असं म्हटलं तरी ते वावगं ठरू नये. सुट्टीदिवशी तर रस्ते वेगवेगळ्या कपड्यांमध्ये, अलंकारांमध्ये नटलेल्या स्त्री-पुरुषांनी अगदी फुलून गेलेले असतात. इथल्या ललना उत्तमोत्तम पोशाखांची स्पर्धा असल्यासारख्या झकपक कपडे अन् 'मेक अप' करून मस्त भटकत असतात. अत्यंत तोकड्या कपड्यांपासून ते थेट सर्वांगसुंदर जपानी किमोनोतील त्यांच्या आरस्पानी दर्शनाने नेत्र सुखावतात परंतु कुठेही कोणी मुलींची छेड काढतंय, गर्दीचा फायदा घेऊन धक्काबुक्की करतोय, अश्लील शेरे मारतोय अस इथं कधीही कुठंही नजरेस पडलं नाही. मध्यरात्रीही मी एकट्या-दुकट्या तरुण पोरींना बिनधास्त फिरताना पाहिलयं. स्त्रियांकरिता जगातील हा सर्वात सुरक्षित देश असावा. गर्दीच्या ठिकाणी रोखून पाहणे वगैरे तर दूरच कोणी नजर उचलून ललनांकडे तशा नजरेन पाहताना आढळत नाही. बहुतेक सारे हातातल्या मोबाईलमध्ये गढलेले असतात. अपवाद माझ्याच एका कार्यालयीन सहकाऱ्याने कार्यालयातील जपानी मुलीवर लैंगिक शेरा मारला होता तेव्हा ती भडकली होती अन् एका वृद्धाने बागेत योग लिंगसंबंधाकरिता उत्तम असल्याचा उगाचच एक हिणकस शेरा मारला होता. बाकी कधी काही मी ना ऐकलंय, ना पाहिलंय, ना वाचलंय. बलात्कारासारख्या जहाल हिंसा इथं अगदी अशक्य कोटीतील वाटतात.

भाषा माणसा-माणसांतील मधुर संबंध सांभाळते आणि जपानी भाषेचा गोडवा अवर्णनीयच. आम्हांला आमच्या कार्यालयात ती शिकवली जाते. संस्कृतनंतर मी ऐकलेली ही सर्वात मधुर भाषा. हलक्या आवाजात बोलणारे ते सारे जपानी भाषेचं माधुर्य अधिकच वाढवितात. पावलोगणिक वाकत 'सुमीमासेन', 'गोझाईमास', 'कोनिचिवा' असं

हसत आदराने ऐकविणारे ते सारे जपानी स्त्री-पुरुष पाहिले ना तरं आजूबाजूचा सुंदर देश न्याहाळताना आपण सत्ययुगात आलो आहोत की काय अशी कधी-कधी शंका येऊ लागते. खरंतरं अमृताते पैजा जिंकणाऱ्या मायमराठीत किती माधुर्य अन् सौंदर्य दडलंय, परंतु रोजच्या व्यवहारात त्याचा पुरेसा नम्रपणे वापर करण्यात आपण कुठंतरी कमी पडत असल्याने मग शिव्या, अपशब्द, असभ्यता अशा साऱ्यांचा सरळ वापर होऊ लागतो अन् मग कधी-कधी ते सारं भांडण अन् मारामाऱ्यांमध्ये रूपांतरित होतं. मी कैक जपानी गटांना चर्चा करताना ऐकलं आहे. तो मुख्यत्वे दुसऱ्यांच शांतपणे ऐकून घेतो आणि मध्येमध्ये 'हाय' म्हणजे होय वा अस्सया अर्थी उच्चारताना बोलणाऱ्याला तो त्याचे विचार ऐकतोय हे नेहमी ध्वनीत करीत राहतो. त्यांच्या चर्चा खरंच खेळीमेळीत होत राहतात. एकमेकांवर कुरघोड्या करणं वा एखाद्याला बोलूच न देणं, वादावादी असे सारे भावना भडकविणारे प्रसंग मी कधी त्यांच्या चर्चेदरम्यान पाहिले नाहीत. इथं बोलणाऱ्यापेक्षा शांतपणे ऐकणाऱ्याला अधिक संपन्न मानलं जातं. अशा प्रवृत्तीमुळेच इथं सांघिक कामे फार उत्तम पद्धतीने अन् निष्ठेने पार पाडली जातात आणि याच साऱ्या उत्तम सांघिक कामांनीच हा देश इतकी प्रगती करू शकलाय. दुदैवाने आपल्या देशात टेव्हीसारख्या प्रभावी माध्यमावर चाललेल्या बौद्धिक चर्चा ऐकून त्या साऱ्या सुशिक्षित म्हणवणाऱ्यांची कीव




येते. ते कधी कोणाचं काही ऐकूनही घेत नाहीत, इतरांना बोलू देत नाहीत आणि सारा देश सून्न होऊन जात ते चर्चा नावाचं भांडण वेळ घालविण्याकरिता मौज वा करमणूक असे पाहत राहतो. राष्ट्रीय स्तरावरील माध्यमांवर हे सारं चालतं तर मग घरोघरी, गल्लोगल्ली वेगळं चित्रं ते कोणतं असणार? समाजाचं प्रतिबिंबच शेवटी माध्यमांमध्ये उमटतं. इथं जपानी टीव्हीवर संस्कारात्मक कार्यक्रमच बहुसंख्येने पहायला मिळतात. उत्पादन, शेती, कुत्र्या-मांजरांच्या गमती-जमती, विशुद्ध करमणूक अन् संगीत हेच सारे बहुतेक वेळा पाहायला मिळतं. देशान उभं केलेलं समृद्धतेचं वैभव त्या छोट्या पडद्यावर पाहताना मन प्रसन्न होतं. थोडीबहुत हिंसा सिनेमा मध्ये पाहायला मिळते अन्य चॅनलवर नाही. बाहेर साधी धक्काबुक्की होत नाही तर टीव्हीवर कुठही अन् कसली हिंसा दाखविणार? भावना भडकविणारं असं इथं ना बाह्यजगात घडतं ना ते अकारण छोट्या पडद्यावर उमटतं.

धरणं, आंदोलन, मोर्चे, बंद, उपोषण यांतला काही मी इथं पाहिलं नाही. आता लोकशाही म्हटलं की हा सारा त्याचाच एक भाग असल्याने इथं क्वचित प्रसंगी टीव्हीवर निदर्शने चाललेली पाहिली. पण ती खरोखरच शांतीपूर्ण मार्गानेच केली जात असल्याचं सहजच लक्षात येतं. इथला प्रत्येक नागरिक त्याला आखून दिलेल्या मर्यादेतच काम करीत राहतो. मर्यादा ओलांडीत कायद्याच उल्लंघन करीत कृत्य

करणं हे इथं लांच्छनास्पद आहे. आंदोलनापोटी देशाच्या मालमत्तेचं नुकसान, जाळपोळ, हिंसा हे इथं स्वप्नात देखील शक्य वाटत नाही. जपानी माणसाचा कल सदैव उत्तमोत्तम निर्मितीकडेच असल्याचं त्याच्या एकंदरीत वर्तनातून, चाल-चलनातून सहज लक्षात येत. अशा साऱ्या सुंदर निर्मितीचा विध्वंस करण्याची कल्पनाही कधी त्यांच्या मनाला शिवली असेल असे वाटत नाही. त्यानं अपरिमित विध्वंस, हिंसा दुसऱ्या महायुद्धाच्या काळात पाहिली. अणुबॉम्बचा आघात सहन केला. सर्वत्र राखरांगोळी! अन् त्या राखेतूनच जपानी फिनिक्स पक्ष्यानं उड्डाण केलं अन् मग कधी वळून मागे नाही पाहिलं. महायुद्ध काळात अन् त्यापूर्वीही त्यानं अन्य देशात संहार घडवून आणले पण महायुद्धात त्याला त्याची जबर किंमत मोजावी लागली आणि त्यातूनच तो शहाणा झाला. हिंसेच्या मार्गाचा त्याग करताना तो प्रगतीच्या सकारात्मक मार्गावर निरंतर चालत राहिला आहे. कदाचित अणुबॉम्बचा जनमानसावर इतका जबरदस्त आघात झाला की हिंसेची कायमची किळस बसल्यासारखा तो शांततेने जगू लागला अन् इतरांनाही जगण्यास मदत करू लागला. गुन्हेगारी मुक्त, हिंसामुक्त जपान घडविण्याचा निरंतर प्रयत्न करताना आज तो जगातील सर्वाधिक सुरक्षित देश या पदावर आरुढझाला.

जपाननं सर्वप्रथम गरिबीचं उच्चाटन केलंय. कुठेही गरिबीच्या खाणाखुणा माझ्या पाहण्यात नाहीत. पराकोटीच्या विषमतेतूनच बरेचसे आपराध, चोऱ्या आदी गुन्हे घडतात. इथं सर्वत्र, सर्वदूर, सर्व स्तरांवर विकास झाला असल्याने गुन्हेगारी प्रवृत्ती तशी कमीच आढळते. खरंतर पश्चिमी देशांमध्येही असा विकास झालाय परंतु तुलनेन जपान अधिक सुरक्षित देश आहे. इथं एक भाषा, एक अन्न, वेषभूषा अन् एकंदरीत एकच जपानी संस्कृती साऱ्या माणसांना एकत्रित बांधून ठेवते. विकास खेडोपाडी पोहचल्यांच मी म्यॉ डोळा पाहील अन् त्यामुळे शहरांविरोधात खेडी उभी असल्याचं चित्र इथं नाही. पाहिलेल्या साऱ्या स्वप्नांना कसं सत्यात उतरवायच हे या कुशल जपानी माणसाकडून शिकावे. सर्वत्र उद्यान, मैदाने, उत्तम रस्ते, वाहतूक आदींची व्यवस्था करताना त्यांनी आपला माणूस निरोगी जीवन कसे जगेल इकडे अधिक लक्ष पुरविलं. इथं जाडाभरडा, रक्तदाब, मधुमेहाने पीडित माणूस सापडणे दुर्मिळ. शुद्ध स्वच्छ नद्या, प्रदूषण मुक्त शुद्ध हवा, सुंदर परिसर या साऱ्यांचा सयुक्तिक परिणाम निरोगी शरीर अन् निरोगी मन राखण्यात होतो आणि मग पर्यायाने असे निरोगी मन गुन्हे करण्यास धजत नाही.

इथं गुन्हे हे अत्यंत भयंकर मानलं जातं. गुन्हेगार समाजाच्या नजरेतून कायमचा उतरतो. कुटुंबाकरिता ती एक अत्यंत लाजिरवाणी गोष्ट ठरते. कायद्याच्या बडग्यापेक्षाही सामाजिक धाक इथं अधिक प्रभावी मानला जातो. पोलिसांना अधिक काळाकरिता रिमांडचे अधिकार, झटपट न्याय आदी कायदयाच्या तरतुदी देखील गुन्हे रोखण्यास मदत करतात परंतु गुन्हेगारी प्रवृत्तीचा अभाव हेच इथं प्रकर्षाने गुन्हे कमीत कमी करण्याचे कारण मानावे लागेल. इथं प्राथमिक शाळेतच मुलभूत नियमांचे, स्वच्छतेचे, शिस्तीचे, नम्रतेचे धडे गिरवले जातात. सापडलेली छोट्यात छोटी वस्तू वा नाणं मूल न चुकता पोलीसांच्या पोटीत टाकतात. मी छोट्यात छोट्या मुलांना मोठ्यांच अनुकरण करताना, शिस्तशीर वागताना रोज पाहतोय. शालेय अभ्यासक्रमात गिरविलेले धडे ते प्रत्यक्षात बाह्यजगातही गिरवताना दिसतात. एक अत्यंत शांत, संयमी, नम्र अन् नीटनेटका समाज आहे हा. इथं मुलं नसणारे बरेच कुत्री, मांजर पाळतात. प्राण्यांवरही या जगाचा कसा

परिणाम झालाय पाहा. इथं कुत्रीही क्वचित प्रसंगीच भुंकतात. अंगावर धावून जाणारं असं एकही कुत्र मी पाहिलं नाही. मालकांबरोबर शांतपणे पण उत्साहाने हे सारे प्राणी इतरांना मुळी सुद्धा त्रास न देता हिंडत असतात. आपल्याकडे कुत्र्या-मांजरांचं मुळीच पटत नाही पण इथं अनेक वेळा मी त्यांना एकत्र खेळताना पाहिलंय. सभोवतालच पाहून प्राणीही शिकतात याचा इथे नेहमी प्रत्यय येतो.

अहिंसा इथं व्यासपीठांवर नांदत नसून जनमानसात नांदते. संस्कारांना मोठ मानत जपानी माणसाने राष्ट्र मोठं केलं आहे. स्वतःची जबाबदारी निष्ठेने, सन्मानाने, सचोटीने पार पाडतना तो त्याची कर्तव्य चोख बजावत राहतो. इथं सारे इतरांना उपदेश करण्याच्या भानगडीत न पडता स्वतःच पालन करण्याकडे लक्ष पुरवितात. आपल चांगलं वर्तन हेच खर देशप्रेम! सरळ साध्या नियमांनी बांधलेल्या संस्कारक्षम वर्तनातून प्रत्येक जपानी माणूस त्याचं राष्ट्रप्रेम व्यक्त करत असतो. त्याकरिता त्याला हातात शस्त्र घेऊन सीमेवर लढाईला तयारीत उभे राहण्याची गरज भासत नाही. तो त्याच्या नित्याच्या व्यवहारातूनच क्षणोक्षणी त्याच राष्ट्रप्रेम व्यक्त करीत असतो आणि जपानी ते करु शकत असेल तर आपण ते मोठ्या प्रमाणात का करू शकणार नाही? निश्चित करू शकू. बस्स इतरांवर ठपका न ठेवता आपल्यापासून सुरू करताना छोट्या-छोट्या दैनंदिन व्यवहारातून उच्च भारतीय संस्कृतीच दर्शन घडविताना, नियमांच पालन करताना कर्तव्य पार पाडत राहणं आवश्यक आहे आणि तेच खरं राष्ट्रप्रेम होय. अधिकाधिक मनात ही राष्ट्रप्रेमाची ज्योत तेवत राहिली तर मग आपली भूमीही जपानप्रमाणे गुन्हेगारीमुक्त होण्याच्या दिशेने अग्रेसर होऊ शकेल.



With Best Compliments from

M/s Delta Tech

# कहाणी त्याची त्याच्या संसाराची

- हेमंत दिघे

ही एक सत्यकथा आहे. माझी नाही त्याची. तो मला सांगत असलेली, आणि मी ती लिहून तुम्हांपुढे ठेवीत असलेली त्याच्यात शब्दातली.


त्या दिवशी संध्याकाळचे ५ वाजले होते. दुपारचं निरभ्र आकाश ढगाळून आल्याने अंधारमयी वातावरण झाले होते. नेहमीसारखा नोकरीवरून परतल्याने आळसावलेलं शरीर कोचावर अक्षरशः फेकून दिलेलं. एवढ्या मोठ्या घरात माझ्याशिवाय कुणीच नव्हतं. अस्वस्थ मन म्हणत होत 'काय हे जीवन?' आता मरेपर्यंत एकाकीच रहाणार? अरे एकटा सडाफटिंग होतो त्यावेळी वाटायचं लग्न करून संसारात रमामण व्हावं. होय लग्न केलं न् स्वर्ग दोन बोटेच उंच होता. सुशील बायको न् त्यानंतर एकापाठोपाठ आमच्या संसारातील ती दोन गोड अपत्ये. प्रेमळ पत्नी जी नोकरी करून संसाराला हातभार लावीत होती. घरातले अन् दारातले व्यवहार सांभाळून दरमहा बचत करून बँक बॅलन्स वाढवीत होती. एक मुलगा व एक मुलगी समजुतदारीने वागत होती. वनरूम किचनमध्ये 'हम दो हमारे दो' चा संसार दिसामाजी फुलत होता.

**“काहीही झालं तरी मला माझा संसार पुनः उभा करायचा आहे. एकटेपणाला पार कंटाळलोय आणि म्हणूनच त्याने पत्रात लिहिलेल्या सूचनांनुसार सारी व्यवस्था करीत गेलो. दारावर आणि आत दिलेलं यंत्र बसवून घेतलं.”**

आणि एके दिवशी माझे ग्रह फिरले असावेत. एका मित्राने हे दोन बेडरूमचे घर, फ्लॅट दाखविला. आम्हां दोघांना व मुलांनाही आवडला आणि सौ. ने जमविलेलं बँक बॅलन्स शून्यावर तर आलेच पण मला बँकतून कर्जही काढावं लागलं होतं. वास्तविक तिच्या एका मैत्रिणीने घराची वास्तुरचना पाहून घेण्याची एक सूचनाही केली होती. पण काही कारणास्तव ती दुर्लक्ष गेली दिवस जात होते पण कां कुणास ठाऊक हळूहळू आम्हा दोघात वाद वाढत गेले. मुलं मोठी झाली होती म्हणून आम्ही दोनरूमच्या घरातून दोन बेडरूमध्ये आलो त्यावेळी दोघं आनंदली होती. आतां आमच्या भांडणामुळे चिडून आमच्यापासून मनाने आणि शरीरानेही दूर जाऊ लागली होती. मुलगा तर आमचं ऐकेनासा झाला आणि कॉलेजातल्या त्याच्या ग्रुपबरोबर कुठंतरी सहलीला गेला, कसा कुणास ठाऊक पण रस्त्यात मस्ती करता करता मागाहून आलेला ट्रक त्याच्या शरीरावरून गेला आणि तो मरण पावला. तरिही आमचे डोळे उघडले नाहीत. आमची भांडणं चालूच होती. मी माझ्या मुलाला सहलीला जायला परवानगी दिली म्हणून सौ. माझ्यावर राग काढू लागली तर त्याला मी परवानगी दिली नसून तुझीच त्याला फूस होती म्हणून तो मला न विचारता तुला विचारून गेला होता ही माझी ठाम समजूत मी तिच्यापुढे मांडली. तशी ती चिडली.

आम्ही आता घरात तिघे जणच होतो. पण तिघांची तोंड तीन दिशांना. दिशाहीन झालेल्या त्या फ्लॅटवर अवकळा पसरली होती. कोणी एकमेकांशी बोलेनाशी झाली होती. असं किती दिवस चालणार? अखेर मी पत्नीशी चर्चा करून घटस्फोट घेतला, मात्र

तिने कोर्टात मुलगी वयात आल्याने तिने माझ्या पतीऐवजी माझ्याबरोबरच रहाणे तिच्या दृष्टीने सोईस्कर असल्याचे सांगताच कोर्टाने तिच्याकडून निर्णय दिला आणि तेव्हापासून मी या फ्लॅटमध्ये एकटा तर त्या दोघी सौ. च्या माहेरी राहू लागल्या, मात्र अधूनमधून एखादा रविवारी माझी मुलगी मला भेटायला येऊ लागली. गेली दोन वर्षे आम्ही नवराबायकोने एकमेकांची तोंड पाहिली नाहीत. मुलगी येते आणि माझ्याकडून काही रक्कम घेऊन जाते. तिला सौ. चं पाठबळ होतं हे थोड्या दिवसानंतर कळलं. पण पोरीच्या प्रेमापोटी मीही त्याबद्दल कुठलाच आक्षेप घेतला नाही.



असाच एकदा कोचावर पडल्या पडल्या मला झोप लागली. स्वप्नात कुणीशी अज्ञात व्यक्ती माझ्याकडे येई व म्हणत असे, "तुझ्या संसाराचं वाटोळं करणाऱ्या या घरासाठी एखादा वास्तुविशारदाला भेट." मी जागा होऊन इकडे तिकडे पाहू लागलो. बाहेरचं दार बंद होतं आणि घरातही कुणीच नव्हतं. मग स्वप्नच ते म्हणत त्याकडे दुर्लक्ष करीत गेलो. पण नंतर नंतर तर रात्री दिवसा केव्हाही झोप लागली तरी तेच स्वप्न पडू लागलं.

डोळ्यासमोर आलेलं माझ्या यशस्वी-अयशस्वी संसाराचं चित्र व सतत त्रास देणारी ती व्यक्ती मी दुर्लक्षित करू शकत नव्हतो. एव्हाना बाहेर पाऊस पडू लागला होता. आता झोप झाल्याने थकवाही दूर झाला होता. सकाळी कँटीनमध्ये जेवलो पण रात्रीचं जेवण ? मी उठून स्वयंपाकखोलीत गेलो. भाताचा प्रेशर कुकर लावला आणि वांग्याबटाट्याच्या भाजीसाठी एक बटाटा व दोन वांगी धुवून चिरुन कांद्याच्या पेस्टबरोबर गॅसवर ठेवली. आता बाहेर पावसानं चांगलाच दणका दिला होता. पाऊस थांबायचा कुठला उलट वाढतच चालला होता. मी स्वयंपाक झाल्यावर जेवणासाठी हॉलमध्ये आलो. टीव्ही पहाताना जेवणाची वाईट असली तरी सवय झाली होती. जेवण होत असतानांच लाईट गेले. इन्व्हर्टर गेल्या काही महिन्यांपासून बिघाड झाल्याने बंद होता. घरभर काळोख. जेमतेम चार घास घेऊन जेवण संपविलं. उठलो न् स्वयंपाकखोलीतल्या एका कपाटातून मेणबत्त्या काढल्या. एकापाठोपाठ एकेक पेटवीत स्वयंपाकखोली, शयनगृह व हॉलमध्ये अशा लावल्या. हॉलमध्ये मेणबत्ती लावत असता दारावर टकटक् केल्याचा आवाज आला. 'कोण आहे ?' म्हणत ह्या अंधारात तर कोण आलं असावं विचार करीत दार उघडले.

एक परकीय ब्यक्ती दारात उभी होती. "माफ करा. तुम्हाला त्रास देतोय, बाहेर खूप पाऊस पडतोय. गेले दोन तास मी बाहेर उभा आहे. पण घशाला कोरड पडलीय. बाहेर एवढं पाणी असूनही पिता येत नाही. म्हणून आपलं दार वाजवलं, पाणी मिळेल ?" अंधारतली ती व्यक्ती मेणबत्तीच्या उजेडात अस्पष्ट दिसत होती. अखेर माणुसकी शिल्लक असल्याने मी त्या व्यक्तीला आत घेतलं व दार बंद

केलं. "बसा. मी आत जाऊन पाणी आणतो." म्हणत मी आत गेलो व पाणी घेऊन बाहेर आलो. तो अजूनही उभा होता. तोच लाईट आले. मी त्या गृहस्थाला म्हटले, "हे घ्या पाणी आणि आपण असे उभे का? बसून पाणी प्या." "नको. उभा ठीक आहे. कोचखुर्च्यांवर कुठेही बसलो तर त्या जागा ओल्या होणार, आता हेच पहाना, येथे उभा आहे तरी तुमचं हे पायाखालचं जाजम ओलं झालंय." असं बोलून पाणी संपवीत त्याने माझे आभार मानले.

आता उजेडात त्याची मूर्ती मी डोळ्यात साठवून ठेवीत होतो. मात्र त्याची नजर सभोवार फिरत होती. घरातल्या भिंती, दरवाजे, खिडक्या, कपाटं, टिव्हीची जागा, सोफ्याची जागा तसे इतर वस्तूही त्याच्या नजरेतून सुटत नव्हत्या. माझ्या हाती पेला देत तो म्हणाला, "तुम्हाला काही विचारलं तर राग येणार नाही ना?" माझ्या नकारार्थी मानेकडे पहात तो म्हणाला, "मी आपलं घर वास्तुशास्त्राच्या दृष्टीतून पाहिले, मला वाटतं ह्या तुमच्या घरात अशास्त्रीय गोष्टी घडल्याने तुम्हाला त्रास होत असावा, कारण ह्या घराच्या दारे-खिडक्या तर तुम्ही बदलू शकत नाही, पण घरातील रचना तर बदलता येतात. वास्तूला प्रसन्न करून घ्यायचं असेल तर हे सारं बदलावं लागेल म्हणजे तुमचा विखुरलेला संसार पुनः सुरळीत होईल." "पण मी घर बदललेलं चालेल?" "त्याची गरज नाही. मी तुम्हाला काय बदल करायचे त्या बद्दल सांगायला परत येईन. हो, सोबत काही लहानसहान यंत्रे आणीन. पैसे बरेच मोजावे लागतील, मात्र संसार सुरळीत होईल ह्याची खात्री देतो." एवढं बोलला न् तो दाराबाहेर गेला. त्यानेच दार लोटून बंद केलं. मी ह्या सर्व प्रकारात एवढा मग्न होतो की त्याचे आभार मानायचे राहून गेले.

चार-सहा दिवसांनी एक कुरियरवाला आला. त्याने एक लिफाफा आणि छोटंसं पार्सल दिलं. मी लिफाफा उघडला. त्यात त्याने मला काय काय बदल हवेत ते सर्व कळविलं होतं. सोबतचे पार्सल उघडले. बाहेरच्या दाराच्यावर लावायची वस्तू तसेच श्रीगणेश यंत्र, श्रीलक्ष्मी यंत्र, अशी काहीशी यंत्रे पाठवून त्यांची नित्यनेमाने पूजा करा असे कळविले होते. वास्तविक हा माणूस स्वतः येऊन सर्व सूचना देणार होता. पण न येता असं कुरियरतर्फे का पाठविलं? मी, जातानां त्याचे आभार मानले नाहीत म्हणून त्याला राग तर नसेल नां आला? भरपूर पैसे मोजावे लागतील म्हणाला होता. पण त्याने आपला पत्ता व्यवस्थित लिहिलेला नव्हता. कुठे आणि किती पैसे पाठवायचे काहीच कळत नव्हते.

काहीही झालं तरी मला माझा संसार पुनः उभा करायचा आहे. एकटेपणाला पार कंटाळलोय आणि म्हणूनच त्याने पत्रात लिहिलेल्या सूचनांनुसार सारी व्यवस्था करीत गेलो. दारावर आणि आत दिलेलं यंत्र बसवून घेतलं. देवघरात श्रीगणेश व श्रीलक्ष्मी यंत्रे ठेवून त्यांची पूजा नियमित करीत गेलो. तीन महिन्यांत मला त्याच्या प्रचीती यायला लागली,



माझी लेक तिच्या आईचा निरोप घेऊन आली. तिला माझ्याशिवाय करमत नव्हतं आणि माझ्याशिवाय ती कुणाचीही विचार करू शकत नव्हती. मी माझी

परिस्थिती माझ्या लेकीला सांगितली. घरातील बदललेल्या व्यवस्थेबद्दलही सांगत गेलो. मात्र त्या परपुरुषाबद्दल काहीच सांगितले नाही.

जेमतेम पंधरा दिवस गेले असतील, एक टॅक्सी दाराशी उभी राहिली. पाहिलं माझी कन्या तिच्या आई, आजी व आजोबासह टॅक्सीतून उतरले. मी आनंदाने त्याचं स्वागत केलं. पत्नीचा चेहेरा आनंदाने फुलला होता. तिने घरात येत मला मिठी मारली व रडू लागली. तिने झाल्या प्रकाराबद्दल माझी माफी मागितली. चूक दोघांची असल्याने मी तिला सांगून तिची समजूत काढली. सर्व आनंदीआनंद झाला. तोच दारात कुरियवाला लिफाफा घेऊन हजर झाला.

मी लिफाफा फोडला. त्यात लिहिलं होतं- 'वास्तुदेवाला घेरात घेऊन पाणी दिल्याबद्दल आणि त्याच्या सांगण्यानुसार घरात सर्व बदल केल्याबद्दल आणि यंत्रांची मनोभावे पूजा केल्याने तुला तुझे सुख मिळाले ह्यातच मला आनंद आहे.'

त्याने मला म्हणजे ह्या लेखकाला सारी कहाणी सांगितली आणि लिहून घेतली, पण मला एक प्रश्न पडला, मी त्याला विचारले, "ते पत्र मला दाखवशील?" त्याने होकार दिला व आत गेला. लिफाफा आणून त्याने माझ्यापुढे ठेवले. मी उघडून पाहिलं तर दोन्ही लिफाफे कोरे होतेच पण पत्रेही कोरी होती, जीर्ण झालेली ती पत्रे होती, 'वाचलं?" त्याने मला विचारले.

"अरे पत्रे कोरी आहेत. काहीच लिहिलेलं नाही." तसं त्याने माझ्या हातातून पत्रे ओढून घेतली, टरकन ती फाडली. तो त्या जीर्ण तुकड्यांकडे पाहात राहिला.

ॡ

## जोक्स

### वाहन परवाना

एक मुलगी वाहन परवाना काढायला जाते..

**ऑफिसर :** जर तुम्ही गाड़ी चालवत असाल आणि तुमच्यासमोर एक कोंबडी आणि एक म्हातारा माणूस आला तर तुम्ही काय माराल ?

**मुलगी :** Offcourse कोंबडी.

**ऑफिसर :** तुम्ही fail झालात घरी जा...

(ती घरी जाते आणि परत दुसऱ्या दिवशी लायसेंस काढायला येते. परत ऑफिसर तोच प्रश्न विचारतो. मुलगी परत तेच उत्तर देते. तिला परत नापास व्हावे लागते. ७/८ वेळा झाल्यावर...)

**ऑफिसर :** जर तुम्ही गाडी चालवत असाल आणि तुमच्या समोर एक कोंबडी आणि एक म्हातारा माणूस आला तर तुम्ही काय माराल?

**मुलगी :** Offcourse म्हातारा

**ऑफिसर :** तुम्ही fail झालात घरी जा..

(मुलगी चिडते) काय हो मी काहीही उत्तर दिले तरी.

तुम्ही मला नापासच करता...

तुम्ही सांगा बरे मग त्याच प्रश्नाचे उत्तर...

**ऑफिसर :** ब्रेक मारीन मी ब्रेक...



# मुक्काम पोस्ट अमेरिका

- मीनल धामणकर

"विनूऽऽ"

अशी रडवेल्या स्वरात आरोळी ठोकताच वैजू बाथरूमधून बाहेर आली. विनू मस्त रिक्लेनरवर बसून वाफोळलेल्या चहाचा आस्वाद घेत होता.

"काय झालं?" त्याने विचारले. वैजूच्या केसातून पाणी निथळत होतं तसं डोळ्यातूनही वाहत होत.

"डोळ्यात साबण गेला वाटतं?" मिश्कील हसत विनूने विचारले.

"नाही. अरे माझी अंगठी...." वैजूने उत्तर देण्याचा प्रयत्न केला.

"काय झालं आता, टॉयलेटमध्ये फ्लश झाली की काय?" विनूची थट्टा चालूच होती.

"काहीही काय, एवढी काय मी बावळट आहे का?" वैजूला आता राग येऊ लागला.

"बावळट नाहीयेस ग, पण तू आणि तुझी अंगठी, सारखी हरवत असते. कधी ड्रेसवर लोळत असते तर कधी उशीखाली लपते. एकदा पुस्तकात लपलेली. म्हणे वाचताना काढली आणि पुस्तक बंद करून झोपून गेले, तर एकदा फ्रिजमध्ये सापडली! उगाच नाही मी तुला वेंधळी वैजू म्हणतो!" विनूने चेष्टा आवरती घेतली.

"मी वेंधळी वैजू तर तू विसराळू विनू," अशा ठरलेल्या वैजूच्या उत्तराची अपेक्षा करत विनूने चहाचा कप खाली ठेवला. वैजू गप्प होती, तेव्हा मामला गंभीर आहे हे त्याच्या लक्षात आले व तिच्याजवळ जाऊन तो म्हणाला, "ओके सॉरी, सांग काय झाले? आता मात्र वैजूला रडू आवरेना." "अरे सकाळी आपण स्नो शोवेल करायला निघालो तेव्हा होती आणि आता नाहीये माझी अंगठी."

"एवढेच ना, मग आपण शोधू ना बाहेर जाऊन, सापडेल" तिला धीर द्यायला म्हणून तो म्हणाला.

**"वैजूला हा आश्चर्याचा सुखद धक्काच होता. लहानपणी ऐकलेल्या गोष्टीतला सोन्याची कुऱ्हाड परत करणारा लाकूडतोड्या प्रत्यक्ष आयुष्यात कधी भेटेल असे वाटले नव्हते."**

अमेरिकेत बॉस्टनजवळच्या एका गावात ते राहत होते. गेले २४ तास भरपूर बर्फ पडला होता, जवळजवळ १ फूट साचला होता. सकाळी उघडीप आली होती व सर्व मंडळी स्नो शोवेल म्हणजे स्नो साफ करायला वापरतात ती फावडी घेऊन स्नो शोवेल करायला बाहेर पडली होती. ड्राईव्ह-वे, म्हणजे गॅरेज च्या समोरचा जो रस्ता असतो, तिथला स्नो तर काढायला हवा होता कारण दुसऱ्या दिवशी कामावर जायला गाडी बाहेर काढायला लागणार होती. घरासमोरच्या रस्त्यावरचा स्नो म्युन्सिपाल्टीचे कामगार येऊन दर चार तासांनी काढतच होते. मोठे स्नो प्लाउस (मोठे ट्रक ज्याचा पुढे, मोठ्ठी फावडी लावलेली असतात, जी स्नो (बर्फ) उपसतात) छोट्या छोट्या गल्लांमध्ये घुसून स्नो उपसत होते व गल्लीच्या कडेशी रचून ठेवत होते.

विनू आणि वैजूच्या घराभोवतीपण असे ढग होते. ड्राईव्ह-वे समोरील जागा जेमतेम स्नो प्लाउ वाल्यांनी रिकामी ठेवली होती.

विनू, वैजू आणि त्यांची दहा वर्षांची कन्यका मेघना (तिच्या अमेरिकन मैत्रिणी तिला मेग म्हणायच्या) आपापली शोवेल्स घेऊन ड्राईव-वे साफ करायला बाहेर पडली.

हया भागातला हा त्यांचा दुसरा स्नो होता त्यामुळे मेग स्नोमध्ये खेळायला मिळणार म्हणून आनंदात होती. तिच्या आईबाबांना मात्र गारठ्यात बाहेर पडायला अगदी जिवावर आले होतं. कानटोपी, हातमोजे, कोटा आणि स्नो बू घालून तिघंही कामाला लागली. चार तास सहज निघून गेले तेव्हा कुठे गाडी बाहेर काढता येईल एवढा ड्राईव्ह-वे त्यांनी मोकळा केला. सणकून भूक लागली होती. त्यांनी ब्रेक घ्यायचा ठरवला. वैजू सरळ बाथरूममध्ये आंघोळीला गेली. एवढ्या थंडीतही, बर्फ उपसा केल्यामुळे ती घामाने चिंब झाली होती व आंघोळीशिवाय तिला चैन पडले नसते. आंघोळ करत असताना तिला अंगठीचा घोळ लक्षात आला आणि ती आणखी बेचैन झाली.



"मॉम रडू नकोस तू. आम्ही अंगठी शोधू." अमेरिकन उच्चारत बोलणारी मेग तिला येऊन बिलगली. त्रिकूट परत ड्राईव्ह-वेकडे वळते, अंगठीच्या शोधात! वैजूच्या डोक्यात विचारचक्र सुरु झाले. ती हिऱ्याची अंगठी होती, विनूने तिला त्यांच्या लग्नाच्या दहाव्या वाढदिवसाला दिली होती. त्याचा मागच्या बाजूला VV अशी अक्षरेहि कोरला होती. ती सारखी का हरवते, यात काही संकेत तर नाही ना? विनूला काही होणार तर नाही ना? असल्या कुशंकांनी तिचे डोके भंडावून सोडले व डोळे पाण्याने भरून आले. त्यामुळं तिला स्नोमध्ये काही दिसतच नव्हते. तेवढ्यात विनू ओरडला, "अग, हे बघ आपला मेल बॉक्स मोडला!" वैजू आणि मेग मेल बॉक्स, म्हणजे त्यांची स्वतःची पोस्टाची पेटी जी त्यांच्या ड्राईव्ह-वेच्या दुसऱ्या टोकाला उभी होती तिथे वळल्या. गेल्यावर्षी या घरात रहायला आले तेव्हा मोठ्या हौसेने Home Depot (होम डेपो) मधून काळ्या रंगाचा मेल बॉक्स, विथ white letters असा त्यांनी आणला होता. अमेरिकेत प्रत्येक घराबाहेर स्वतंत्र मेल बॉक्स असतो. बुटाच्या बॉक्सच्या आकाराचा व साधारण त्याच मापाच्या या पेटीला दरवाजा असतो पण कुलूप नसते. एका बाजूला एक झेंड्यासारखी लाल पट्टी असते. तुम्हाला जर पत्र पाठवायची असतील तर तुमची टपाल तुमच्या पेटीत ठेवायची व ती लाल पट्टी वर करून ठेवायची. पोस्टमन मग ती पत्रे घेऊन जातो व आलेली पत्रं पेटीत ठेवून जातो व पट्टी खाली करतो. ही पेटी शक्यतो ड्राईव्ह-वे जवळ एका लोखंडाच्या किंवा लाकडी खांबावर लावलेली असते.

"हे स्नो प्लाउचे काम आहे." वैजू पटकन म्हणाली. विनूलापण ते पटले. स्नो प्लाउने जेव्हा त्यांच्या घरासमोरचा बर्फ उपसला, तेव्हा मेल-बॉक्स ज्या खांबावर बसवला होता, त्याला धक्का लागून तो तुटला होता आणि मेल बॉक्स जमीनदोस्त झाला होता. आता मात्र विनूच्या पोटात गोळा आला. एक वेळ वैजूसाठी नवीन अंगठी घेणे परवडले असते पण आता हा नवीन मेल बॉक्स आणायचा, तो खाम्बासकट पुन्हा उभा करायचा, हे त्याच्या स्किल सेट्स च्या

बाहेर होते.परत एवढ्याशा कामासाठी कोणी गवंडी मिळणं ही कठीण आणि मिळाला तरी तो अवाच्या सव्वा पैसे घेणार! अंगावर शहारा आला. तो थंडीमुळे होता का या विचाराने होता हे त्याला सांगणे कठीण होते.

वैजूची कळी मात्र आता खुलली. "अरे, अपली म्युन्सिपाल्टी आपल्याला नवीन मेल बॉक्स देईल, फक्त महिन्याच्या आत तक्रार नोंदवली पाहिजे." विनूला काही कळेनासंच झालं. हे ऐकायला छान वाटत होतं पण खरं नव्हतं वाटत. वैजू सांगू लागली, "अरे लिसाने फेसबूकवर टाकलं आहे. गेल्या स्नो स्टॉर्ममध्ये त्यांचाही मेल बॉक्स असाच स्नो प्लाउ ने मोडला होता आणि म्युन्सिपाल्टीने तो बसवून दिला."

विनू : "पण पैसे घेतले असतील?" "नाही रे फुकट दिला! मी तुला लिसाचे फेस बुकवरचे पोस्ट पाठवते, त्यात तिने फोन नंबरही दिला आहे जिथे तक्रार नोंदवायची आहे तो." वैजू उत्साहाने सांगू लागली. आपण कुठेतरी उपयोगी पडतोय या भावनेने तिचे अंगठी हरवल्याचे दुःख आजूबाजूच्या बर्फासारखे वितळू लागले.

दिसऱ्याच दिवशी विनूने तक्रार नोंदवली आणि दोन दिवसांत येऊन मेल बॉक्स बसवून जाऊ असे उत्तरही त्याला मिळाले. विनूला त्यांच्या औदार्याचे आणि प्रामाणिकपणाचे कौतुक वाटले. सरकारकडून इतक्या लीलया, कसलेही दाखले न देता, कुठलेही अर्ज न करता नुकसान भरपाई मिळू शकते हे त्याला नवीन होते.

वैजूची दैनंदिन कामे नेहमीप्रमाणे चालू झाली. त्या दिवशी संध्याकाळी ती घरी आली, तेव्हा ड्राईव्ह-वेजवळ नवीन मेल बॉक्स थाटात उभा दिसला. तिचं मन उगाचच सुखावलं. विनू आणि मेग तिची वाट बघत होते. घरात पाऊल ठेवताच दोघेही ओरडले, "चल, मेल बॉक्स उद्घाटन तुझ्या हस्ते करायचं आहे."

"हा काय वेडेपणा आहे?" वैजू उद्गारली.

तिला काही बोलू न देता त्यांनी तिला मेल बॉक्सकडे खेचले.

तिने मेल बॉक्सचे दार उघडले आणि पाहते तर काय, आत तिची हिऱ्याची सुंदर अंगठी तिला दिसली!!

तिचा विश्वासच बसेना, "हे कसं काय....", तिला बोलताच येईना.

थँक्यू विनू, ती गहिवरली.

मला थँक्यू नको म्हणू जोचे आभार मान. तिच्या प्रतिक्रियेने सुखावलेला विनू म्हणाला.

"जो? हा जो कोण" वैजूने प्रश्न केला.

विनूः "मेल बॉक्स बसवायला आलेला म्युन्सिपाल्टीचा माणूस. बॉक्स बसवत असताना त्याला तुझी अंगठी मातीत सापडली आणि त्याने साळसूदपणे मला ती आणून दिली, वर सांगितले, "You should be careful with these things in the snow, people drop them while shoveling (आपल्या असल्या किमती वस्तू सांभाळा. बर्फ फावड्याने बाजूला सारताना त्यात हरवल्या तर मिळणार नाहीत.)"

वैजूला हा आश्चर्याचा सुखद धक्काच होता. लहानपणी ऐकलेल्या गोष्टीतला सोन्याची कुऱ्हाड परत करणारा लाकूडतोड्या प्रत्यक्ष आयुष्यात कधी भेटेल असे वाटले नव्हते. जोने अंगठी उचलून आपल्या खिशात टाकली असती तरी कोणाला कळले नसते. पण त्यांनी तसं केलं नव्हते. त्याला मोह झाला नसेल का? त्यावर मात करून त्याने आपलं फक्त कर्तव्य केलं होतं. निष्काम कर्मयोग यालाच म्हणतात का?

वैजूचे डोळे परत भरून आले.

जो देव तुझ कल्याण करो. जो जे वांच्छिल तो ते लाहो, असं नकळत तिच्या मनात येऊन गेलं.

# वास्तू टिप्स

- अश्विनी चव्हाण

१. काही घरांतून जमिनीला किंवा भिंतीमध्ये ओलं येत असते. याचा परिणाम घरातील सदस्यांच्या आरोग्यावर तर होतोच पण मानसिकतेवरही होत असतो.

२. आपल्या जागेतील कोणताही नळ गळत असेल आणि पाण्याचा अपव्यय होत असेल तर तो त्वरित दुरुस्त करून पाण्याची गळती थांबवावी. कारण फेंगशुईत पाणी हे धन-संपत्तीचे प्रतीक समजले जाते.

३. फेंगशुईनुसार ड्राईंगरूममध्ये प्रवेशद्वारातून आत जाताना उजव्या बाजूला कोपऱ्यात सहा छडीवाली विडचाइम लटकवणे लाभ आणि सौभाग्यसाठी चांगले समजले जाते.

४. कोयरीतील कुंकू (पिंजर) संपले म्हणजे परत भरायचे असते. ‘कुंकू संपलंय काढायला हवे, कोयरीत नाही’ असे म्हणू नये. तर कुंकू वाढलंय असं म्हणावं. कारण कुंकू म्हणजे सौभाग्य. ते कधीच संपू नये. अखंड वाढतंच जावं म्हणून म्हटलं जातं. ‘वाढलंय कुंकू काढकोयरीत.’

मंगळसूत्र तुटलं की परत ओवून किंवा सोनाराकडून जोडून आणावे लागते. ते तुटलं असं म्हणत नाहीत. कारण मंगळसूत्र म्हणजे सौभाग्याचा अलंकार. तो कधीच तुटू नये. म्हणून ‘मंगळसूत्र वाढवलंय अेवायला हवंय’ असं म्हणावं.

हातातील बांगड्यादेखील फुटल्या असे न म्हणता बांगड्या वाढवल्या आहेत, असं म्हणावं.

कुंकू, मंगळसूत्र, बांगड्या ही सौभाग्याची लेणी आहेत. ती अखंड टिकून वाढतंच जाऊ देत.

५. गुढीपाडवा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभमुहूर्ताचा दिवस असला तरी वास्तूशांतीसाठी चैत्र महिना वर्ज्य असल्याने गुढापाडवाच्या दिवशी वास्तूशांती करू नये. मात्र लौकिक गृहप्रवेश करता येईल.

६. प्लॉटची परीक्षा करण्यासाठी त्यात मोहरीचे मी टाकावे. ३-४ दिवसांत तेथे छोटी रोपे दिसू लागल्यास तो प्लॉट उत्त समजावा.

७. घर बांधताना जमीन खणताना हाडे, विटा किंवा शंख सापडल्यास जागेची शुध्दी करून घ्यावी.ॉ

८. अंगणामध्ये तुळशी वृंदावन असावे. त्ययोगे वास्तूवर ईश्वरकृपा राहते. पण तुळशी वृंदावन प्रवेशद्वारासोर असू नये, तसे असल्यास द्वारवेध हा दोष निर्माण होतो.

९. ज्या घराभोवती बोर, बाभूळ, केळ, महालुंग ही झाडे वाढतात त्या घरात प्रगती होत नाही.

१०. घराभोवती रक्तचंदन आणि गुंजेचे झाड लावल्यास घरात सकारात्मक ऊर्जा प्रवेश करते.

११. घरात आवारात नारळाचे झाड लावणे, अत्यंत शुभ मानले जाते.

१२. घरात सतत उजेड राहील याची काळजी घ्यावी. उजेड असेल तर वाईट शक्ती त्या ठिकाणी प्रवेश व वासही

करीत नाहीत.

१३. वीज पडलेल्या किंवा आग लागून नुकसान झालेल्या घरात पुन्हा रहायला जातानाही वास्तूपुरुषाची पूजा अत्यावश्यक आहे.

१४. वास्तूदोषावर उपाय म्हणून घराची तोडफोड करणे शास्त्रसंमत नाही. तोडफोड केल्याने सगळ्यात मोठा म्हणजे वास्तुभंगाचा दोष लागतो.

१५. घरासमोरील मोकळी जागा म्हणजे अंगण. अंगणात संडासमार्जन करून दरवाजासमोर रांगोळी घातल्यावर वातावरण स्वच्छ, पवित्र, प्रसन्न होते. सूर्याचे स्वागत होते. दारासमोर तुळस शोभून दिसते. तुळशी वृदांवनात राधाकृष्णाचा वास सदैव असतो.

१६. पैसे घेताना नेहमी उजव्या हाताने देण्यास सांगून आपणही उजव्या हातानेच घ्यावेत. पैसे मोजताना नोटांना थुंकी लावून मोजू नये. लक्ष्मीचा अपमान होऊन ती रुसते. पोथीची पाने, ग्रंथाची पाने बोटाला थुंकी लावून उलटू नये. ते अशुभ असते.

१७. कपाट किंवा तिजोरीवर जाळे, भंगार माल ठेवू नये.

१८. जो मळकट कपडे घालतो, दात स्वच्छ घासत नाही, जास्त जोवतो, कठोर बोलतो आणि सूर्योदय अथवा सूर्यास्तासमयी झोपतो त्याला लक्ष्मी सोडून जाते.

१९. स्वयंपाक करताना, कोणताही पदार्थ करताना त्याला लागणारे साहित्य आपणास आवडेल तसे व आवडेल तितके अवश्य घ्यावे. मात्र त्यात प्रेमाची एक चिमूट टाकायला विसरू नये.

२०. रोज रात्री दिवसातील व्यवहारांच्या नोंदी तसेच महत्त्वाच्या घटना घडल्यास त्याची डायरीत नोंद टेवावी. त्याचप्रमाणे न चुकता दिवसभरातील सकारात्मक घटना, विचार यांचे लेखन करावे. सकारात्मक दृष्टीकोन वाढीस लागण्यास फायदा होतो.

२१. बेडजवळ किंवा स्टडी टेबलसमोर आरसा लावू नयेत. कारण त्यामुळे चित्त अभ्यासात एकाग्र होत नाही.

२२. आपल्या शयनकक्षात खरकटी भांडी ठेवू नये. कारण घरातील महिलांची प्रकृती वारंवार बिघडते.

२३. जिन्याखाली झोपू नयेत, देवस्थान, कॅशबॉक्स जिन्याखाली असू नये. जिन्याखालचा भाग कोठी म्हणून उपयोगात आणावा.

२४. देवाला दाखवायचा नैवेद्य प्रथम शुध्द केला पाहिजे. यासाठी हातावर पाणी घेऊन तोंडाने गायत्री मंत्र म्हणावा व गायत्रीने अभिमंत्रित केलेले ते पाणी नैवेद्यावर शिंपडावे. नैवेद्य शुध्द नसेल तर देव तो ग्रहण करीत नाही.

२५. घराच्या समोर कारंजे असेल तर घराकडे येणाऱ्या रस्त्यामुळे तयार झालेली किंवा समोरच्या बिल्डिंगच्या टोकदार कोनांमुळे निर्माण झालेली वाईट ऊर्जा नष्ट होते व पाण्याची योजना केल्यामुळे धनभारित सूक्ष्म कणांची निर्मिती होते.

# वास्तूविषयी काही महत्त्वाच्या टिप्स

- अनुराधा जोशी

आपल्या प्रत्येकाच्या मनात आपल्या घराविषयी काही स्वप्ने असतात व ती पूर्ण करण्यासाठी प्रत्येकजण धडपडत असतो. पण बऱ्याच वेळा त्यातील काही साध्या गोष्टींकडे आपण दुर्लक्ष करतो व घर घेतो. नंतर त्या घरात गेल्यावर एकावर एक अघटित घटना घडतात. व नंतर आपल्याला त्याचा पश्चात्ताप होतो. परंतु घर घेताना साध्या, सोप्या गोष्टी लक्षात असाव्यात. जमीन घ्यायची असेल तर ती चौरस आकारात घ्यावी. (चारी बाजू सारख्या) याचा खूप फायदा होतो. आयताकृती, त्रिकोणी असा आकार जमिनीचा शक्यतो नसावा. घराचे व्दार पूर्वेकडे उघडणारे असावे. त्याने Vibrations चांगली राहतात व घरातील - ve energy निघून जाण्यास मदत होते. देवाचे मंदिर पुर्वेकडे तोंड करुनच लावावे. त्यामुळे सूर्यप्रकाश त्या घरावर व मंदिरावर पडून घरात आनंदी वातावरण राहण्यास मदत होते. घरात फार अडगळीचे सामान, नको असलेले सामान ठेवू नये. त्यामध्ये - ve energy राहतात व घरात कलह होतो. सामान तिथल्या तिथे व मोजकेच असावे. घर नेहमी स्वच्छ असावे. त्याने मन प्रसन्न राहते. समोरासमोर खिडक्या असाव्यात त्याने हवा खेळती रहाते व आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. फर्निचरचे Cover जनरली सौम्य रंगाचे असावे. (उदा. फिकट पिवळा, निळा, बदामी) Dark red कलर जनरली कव्हर म्हणून वापरु नये. त्याने ve energy टिकून रहाते. Dark मरुन कलरही तेच काम करतो. फर्निचर रोजच्या रोज पुसून घ्यावे. धूळ साचता कामा नये. घरावरून रोज हात फिरला पाहिजे. घरात काना - कोपरे कमी असावेत. (Corners) त्यामध्ये जागा वाया जाते. व त्याचा उपयोग अडगळीच्या वस्तू ठेवण्यासाठीच होतो. म्हणून कोपरे कमी असलेले घर निवडावे. सर्व खोल्यांत भरपूर सूर्यप्रकाश खेळता रहावा. तिन्ही सांजेला जेव्हा देवाजवळ दिवा लावतो, तेव्हा घंटानाद करावा. त्याने मन प्रसन्न रहाते. व Corners मध्ये घंटा वाजवून फिरवावी त्याने तिथली Vibrations + ve राहण्यास मदत होते. व त्याचा परिणाम घरातल्या लोकांवरही होतो. घराला रंग लावताना फेन्ट कलरचाच वापर करावा. त्याने घराचा उजेड वाढतो. Dark कलर लावला तर अंधार वाटतो व घरातले वातावरण Dull राहते. टॉयलेट जनरली एका कडेला असावे. त्यामध्ये -ve energy खूप असते. काही वेळेस हे Toilet घरात मध्येच असते ते चुकीचे आहे. स्वयंपाकघर आग्नेय दिशेला असावे. ते लाभदायक असते. व धूर जाण्यासाठी खिडकी असावी. म्हणजे वाईट प्रवृत्तींना तिथे थारा मिळत नाही. स्वयंपाक करताना त्या मातेचे मन प्रसन्न राहील अशीच जागा असावी. अन्न हे पूर्णब्रम्ह आहे असे म्हणतात. जर स्वयंपाकघर कोंदट व अंधारे असेल तर बाईला त्या जागेत काम करताना मन रमणार नाही. व तिचे अस्वस्थ मन स्वयंपाक करताना राहील व त्याचा ते अन्न चांगल्या Vibrations मध्ये न शिजल्यामुळे घरातल्या इतर लोकांवरही त्याचा परिणाम होईल. घरदार असंतुष्ट राहील. म्हणून खाण्याचा माणसाच्या मनावर परिणाम होतो म्हणतात ते खोटे नाही. ह्या गोष्टी घर घेताना आवर्जून बघाव्यात व नंतरच घर घ्यावे. म्हणजे ते लाभदायक ठरते. घर प्रसन्न राहिले तर त्यातील माणसे पण प्रसन्न राहतील. त्याचा प्रत्येकाच्या कार्यक्षमतेवर चांगलाच परिणाम होईल. म्हणून ह्या गोष्टी Casually न घेता Seriously घेऊन थोडाफअर अभ्यास करूनच घर घ्यावे म्हणजे त्याचा उपभोग प्रत्येकजण आनंदाने घेऊ शकतो. व प्रत्येकाचे आयुर्मान वाढण्यासही कारणीभूत ठरतो.

# मुलांच्या प्रगतीसाठी अंमलात आणा या वास्तू टिप्स

- ★ पडद्याचा रंग भिंतीच्या रंगापेक्षा गडद असायला हवा.
- ★ मुलांचा पलंग उंच नसला पाहिजे आणि झोपताना त्यांचे डोके पूर्व दिशेकडे आणि पाय पश्चिमेकडे असावेत.
- ★ पलंगाच्या उत्तर दिशेकडे टेबल-खुर्ची असावी.
- ★ अभ्यास करताना मुलांचे तोंड पूर्वेकडे आणि पाठ पश्चिमेकडे असले पाहिजे.
- ★ पलंगाच्या दक्षिण दिशेकडे आग्नेय कोनात कॉम्प्युटर ठेवला पाहिजे.
- ★ खोलीचे दार पूर्वेकडे असल्यास पलंग उत्तर-दक्षिण या दिशेत ठेवायला पाहिजे. आणि डोकं दक्षिणेकडे तर पाय उत्तरेकडे असले पाहिजे. अशात कॉम्प्युटर टेबलाजवळच स्टडी टेबल असावं.
- ★ नैर्ऋत्य कोनात मुलांच्या पुस्तकांची व कपड्यांची अलमारी ठेवली पाहिजे.
- ★ मुलांच्या खोलीत सूर्यप्रकाश पर्याप्त येत असल्याची काळजी घ्यावी.
- ★ मुलांच्या खोलीत हिंसक किंवा बटबटीत चित्र लावू नये.
- ★ मुलांच्या खोलीत नैसर्गिक सौंदर्य, पाळीव जनावर किंवा महापुरुषांचे चित्र लावले पाहिजे.
- ★ मुलं लहान असल्यास कार्टून आणि मोठा असल्यास त्याला ज्यात करिअर करायचे आहेत त्यात यशस्वी झालेल्या व्यक्तींचे चित्रे लावणे उत्तम.
- ★ मुलांच्या खोलीतील कोणतीही खिडकी घराच्या इतर खोलीच्या बाजूला उघडणारी नको. याने ते घरातल्या हालचालीने डिस्टर्ब होतात.
- ★ घराची उत्तर दिशा बंद असेल तर कर्ज-बाजारी होण्याचे प्रमाण वाढते आणि घरातील आर्थिक समस्या वाढतात.
- ★ नवीन घर घेताना वास्तुशास्त्रानुसार घर आहे की नाही हे पाहून घर विकत घ्यावे म्हणजे घरामध्ये सुख-समृद्धी आणि उत्तम आरोग्य राहते.
- ★ नवीन घर घेताना घराचा दरवाजा उत्तर किंवा पूर्व दिशेला असावा म्हणजे घराच्या दरवाजातून बाहेर बघताना उत्तर किंवा पूर्व दिशा असावी.
- ★ नवीन घर घेताना दक्षिण, पश्चिम, नैर्ऋत्य आणि आग्नेय या दिशांतून येणारे दरवाजे टाळावेत.
- ★ भाग्योदयासाठी घराच्या हॉलमध्ये बांबू-ट्री म्हणजेच लकी ट्री ठेवावा.
- ★ घरामध्ये नकारात्मक शक्ती प्रवेश करू नये आणि घरामध्ये शुभ ऊर्जा भक्कम रहावी यासाठी मुख्य दरवाजाला लाकडी उंबरा बसविणे महत्त्वाचे आहे.
- ★ घराच्या मुख्य दरवाजावरती वाळलेली फुले, पाने, सुकलेली तोरणे काढून टाकावीत. म्हणजे घरामध्ये शुभ उर्जा प्रवेश करण्यास कोणताही अडथळा निर्माण होत नाहीत.
- ★ घरातील सर्व खोल्यांमधील घड्याळे ही उत्तर किंवा पूर्व भिंतींवर लावावीत म्हणजे घड्याळाकडे बघताना आपले तोंड पूर्व व उत्तर या शुभ दिशांना होते.
- ★ घरातील सर्व खोल्यांमधील कॅलेंडर्स ही पूर्व किंवा उत्तर भिंतींवर लावावीत म्हणजे कॅलेंडरकडे बघताना आपले तोंड शुभ दिशांना होते.
- ★ कोणतेही काम करताना आपले तोंड उत्तर किंवा पूर्व दिशेला असावे म्हणजे आपले काम वेळेत आणि

विनाअडथळा पार पडते.

★ झोपताना कधीही दक्षिणेला पाय करून झोपू नये. त्यामुळे आजारपण वाढते आणि माणूस कर्ज बाजारी होतो.
★ घराच्या ईशान्य दिशेला वजन ठेवू नये. ईशान्य दिशा ही नेहमी हलकी आणि मोकळी ठेवावी म्हणजेच घरामध्ये शांतता राहते.
★ सुख-समृद्धीसाठी घराच्या मुख्य दरवाजासमोर बालाजीचा फोटो लावावा.
★ बेडरूममध्ये देवघर किंवा देवाची मूर्ती, फोटो असू नये.
★ लाल, काळा, मरून हे तीन रंग घरामध्ये जास्त वापरू नयेत. यामुळे घरामध्ये सुख-समृद्धीदायक आयुष्यासाठी अडचणी येऊ शकतात.
★ झोपताना बेड स्विच बोर्डपाशी येऊ देऊ नये. त्यामुळे निद्रानाशाचा अडथळा येऊ शकतो.
★ घरामध्ये नकारात्मक शक्ती प्रवेश करू नये म्हणून मुख्य दरवाजाजवळ तुळस असणे आवश्यक आहे.
★ दरवाजाच्या चौकटीवर आतून बाहेरून विघ्नहर्त्याची म्हणजेच गणपतीची टाईल्स लावणे आवश्यक आहे.
★ घराच्या प्रत्येक रूममध्ये खडे मिठाचा बाऊल ठेवावा.
★ आठवड्यातून एकदा खडे मिठाच्या पाण्याने फरशी पुसणे यामुळे घरामध्ये सुखसमृद्धी राहते.
★ मुलांची शैक्षणिक प्रगती चांगली होण्यासाठी त्यांना पूर्वेला डोके आणि पश्चिमेला पाय करून झोपवावे.
★ मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी पूर्वेला तोंड करून अभ्यासाला बसवावे.
★ लहान मुलांना घराच्या नैर्ऋत्य दिशेमध्ये झोपवू नये. त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येऊ शकतात.
★ घरामध्ये पैसा, संपत्ती, ऐश्वर्य टिकवून ठेवण्यासाठी घराच्या नैर्ऋत्य दिशेमध्ये तिजोरी किंवा पैशाचे कपाट ठेवावे.
★ घरामध्ये शैक्षणिक, आर्थिक प्रगती व्हावी यासाठी भडक रंगाचे कपडे वापरणे टाळावे.
★ ईशान्य दिशेला वास्तुदोष असेल तर मुलांच्या शिक्षणावर आणि आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतात.
★ नवीन घर बांधताना किंवा विकत घेताना घराचा आकार आयताकृती किंवा चौकोनी असावा.
★ मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी सरस्वतीचे प्रज्ञावर्धन स्तोत्र आणि गणपती अथर्वशीर्ष मुलांनी रोज म्हणावे.
★ उत्तम वैवाहिक आयुष्यासाठी नवरा-बायकोने दोन जोडलेल्या बेडवर झोपू नये.
★ नवीन घर घेताना पहिल्या व शेवटच्या मजल्यावरचे घर विकत घेणे टाळावे.
★ आरोग्यदायी जीवनासाठी घरामध्ये पिवळा, काळा, लाल हे रंग कोठेही येऊ देऊ नये.
★ घर बांधताना यशस्वी जीवनासाठी नैर्ऋत्य दिशेला बोअरिंग, विहीर, पाण्याची टाकी बांधू नये.
★ दक्षिणेला पाय करून झोपू नये. कारण आरोग्य, पैसा यांची हानी होते व मानसिक ताण येतो.
★ घराच्या मुख्य दरवाजाजवळ उतरता किंवा चढता जिना असेल तर अनेक वाईट घटनांना सामोरे जावे लागते.
★ घराच्या मुख्य दरवाजासमोर लिफ्ट असेल तर घरामध्ये आर्थिक, शारीरिक व मानसिक हानी होते.
★ हिंस्त्र पशु-पक्ष्यांची, जंगली जनावरांची तोंडे घरामध्ये लावू नयेत.
★ घरात किंवा घराच्या बाहेर काटेरी वनस्पती ठेवू नयेत.
★ उत्तम प्रगती हवी असेल तर काळ्या शाईचे पेन वापरू नये.
★ उत्तम प्रगतीसाठी तांब्याची अंगठी करंगळीशेजारच्या बोटामध्ये म्हणजेच अनामिकेमध्ये धारण करावी.
★ कोणतेही काम करताना प्रत्येक गोष्टीला हो म्हणावे. नकारात्मक बोलणे टाळावे.

# काव्यसृष्टी

## माझीया माहेरची वास्तु

जिथे गेले माझे बालपण
चार भिंतींत लाभले शिक्षण
विपत्ती येता मिळाले संरक्षण
माझीया माहेरची मज येते आठवण।।

मात्यापित्याची माया, घराचा पाया
झरोक्यातील कवडशासन वृद्धांची माया
लाभले मज जेथे संस्कार - वळण
माझीया माहेरची मज येते आठवण।।

झोपतांना रंगे भेंड्यांची मैफल
कधी मनी दाटे वादाची सल
शांती लाभते जेथे संपता वणवण
माझीया माहेरची मज येते आठवण।।

देव्हाऱ्याजवळी म्हणतां शुभंकरोती
सुखविती नयन नयना समईतील वाती
आनंदाने साजरे केले सण
माझीया माहेरची मज येते आठवण।।

अंगणात प्रभाती सडा संमार्जन
त्यावरी सुबक रांगोळी रेखाटन
परसदारी वाढती निल हिरवे धन
माझीया माहेरची मज येते आठवण।।


घेऊनिया आठवणीची शिदोरी
रमले मी माझ्या संसारी
मानते उन्मनी मी वास्तुऋण
माझीया माहेरची मज नित्य स्मरण।।

- ज्योती वैद्य शेटे




## माझी वास्तु

येई येई रवीकिरणा
माझीया घरात।
प्रकाशाची आरोग्याची
कर बरसात।।
समाधानाचा पाया
माझीया घराला।
सुखाचे तोरण
लाविते दाराला।।
समृद्धिच्या विटांनी
बांधील्या भिंती।
मनोमनीच्या प्रेमाने
जपू या नाती।।
परंपरेने पुजिते
मनोभावे ही वास्तु।
शांत होऊनिया
वास्तु म्हणते तथास्तु।।



- ज्योती वैद्य शेटे



## संमोहन

मनमोहन हे नव्या घराचे विरते आता
संमोहन ते जुन्या घराचे स्मरते आता
अवकाशाच्या निळाईचे छत डोक्यावर ते
आपुलकीची जमीन साधी स्मरते आता
प्राजक्ताच्या रांगोळीचे मनःपूर्त अंगण
शेणसड्याची सरसर शिंपण स्मरते आता
भांडणासवे भातुकलीची गंमत न्यारी
धुळाक्षरासह पाठांतर ते स्मरते आता
माळ्यावरचा बागुलबुवा झोपाळ्यावर गाणी
विहिरीमधले पाणी काढणे स्मरते आता
भिंतीवरील नाजुक नक्षी मी रेखिली
किती कौतुके चित्रकलेची स्मरते आता
गजाननाचा तो कोनाडा सोनपाऊले गौराईची
देव्हाऱ्याशी विसावलेली मूर्ती आईची स्मरते आता
अतिथ्याचे स्वयंपाकघर सुविचारासह फळा शिक्षकी
शिकवणीतले शब्द इंग्रजी स्मरते आता
अंगणातले वृंदावन वर सांजवात थरथरती
दूरदूरच्या माहेराला नव्या घरातून स्मरते आता

**- वृन्दा भांबुरे**

## मैफिल

काहीतरी केलं पाहिजे
ज्यानं उमेद वाढली पाहिजे।
महिना दोन महिन्यांनी
मैफल छान जमली पाहिजे।
अंगत नको पंगत नको
फक्त चहा कॉफी जमली पाहिजे।
खूर्चीवर नाहीतर सतरंजीवर
मैफल मस्त भरली पाहिजे।
घराला घरपण द्यायला
घरात माणंस आली पाहिजे।
आपल्या उंबऱ्याला सुद्धा
इतरांचे पाय लागले पाहिजे।
सगळ्यांच भलं होईल
असं पसायदान पाहिजे।
सुखी माणसाचा सदरा
शोधून कुठे मिळत नाही,
मैफिलितच सुख आहे
हे सांगून कळत नाही।।

**- किरण बेन्नुरवार**

# आता कसं जायाचं बस-स्टॉपला ?

घर आवरलं, सामान बी भरलं,
आत्ता धावायचं बस पकडायला,
इकडं बी खड्डा न् तिकडं बी खड्डा,
छोटा खड्डा अन् मोठा खड्डा
अंत नाही खड्ड्यांच्या गंडमाळ ला!
कसं बरं जायाचं बसस्टॉपला?
राया, आत्ता कसं जायाचं बसस्टॉपला?
खड्ड्यात पाऊल टाकू कशी?
बेडूक उड्या मी घेऊ कशी?
अलीकडं रिक्षा अन् पलीकड टॅक्सी,
रस्ताच दिसना पाऊल टेकायला! धनी, कसं कसं ...
घसरता तोल सावरताना
हात ह्यांचा हाती मी धरताना
पोलिसदादा खवळे, म्हणे दिवसा ढवळ्या भलते चाळे!
लाजनं जीव माझा अर्धा झाला! धनी, कसं कसं ...
टी.एम.टी. गेली भर्रदिशी
चिखलाशी नक्षी उमटवी सर्रदिशी
हातात बॅगा अन् साटीचा बोंगा,
काहीच जमना सावरायला! धनी, कसं कसं...
धडपडत एकदाचा स्टॉप गाठला
रांगेतले हसले बघून अवतारायला
व्याह्याघरचं लग्न अन् - चिखलाचं विघ्न,
झाला तेवढा तमाशा पुरं झाला!
नको बाई जायाचं लग्नाला,
धनी, परतूया घरच्या वाटंला!!



- शकुंतला बी. चौधरी



# चिमुकली वास्तु

उत्तरेस तो, वृक्ष आंब्याचा
वाहे पश्चिमे, कडचा वारा
दहा दिशांनी, स्वर्ग वाटावा,
असे माझा वाडा चिमुकला ।।धृ।।
सुंदर कक्षांनी सजलेला,
आजुबाजूच्या भिंतीवर बसलेला,
विस्तीर्ण खिडक्या दारे असलेला,
हा माझा वाडा चिमुकला
हास्य मुखाने सुर्य उगवतो
प्रसन्नता मज, उत्साही करतो,
भिंती वरीत, छान छान ती,
चित्रे काढून हळूच हसवितो,
दुपार खुलवितो, पश्चिमेची हवा पुरवितो,
दुपार होता भुक लागते,
दिवस भरते, स्वप्न पाहतो,
संध्याकाळही खुलवित बसते,
दूर नदी पाहून मन हरते,
वाट लांब गेलेली स्मरते,
लांबदुरचे गुलमोहर ते,
माझी हौशीची ही वास्तु,
विलोभनी मौजेची वाटे
तयात राहणे भाग्य ही माझे
मनास अति मौजेतून नेते

- भालचंद्र काळे

# पाककृती

## पौष्टिक रवा इडली



**साहित्य :** रवा, दही, पाणी, गाजर, पालक, सिमला मिरची, कोबी, फ्लावर, मीठ, ड्रायफ्रुट्स, सॉस इ.

**कृती :** प्रथम रवा कोरडा भाजून घेणे. नंतर तो गार करणे. व त्यात १ चमचा दहीघालून फेटून घेणे. व पाणी घालून मिश्रण सारखे करणे. व ते मिश्रण १ ते १/२ तास भिजत ठेवणे. न्नंतर त्यात किसलेले गाजर,पालक, सिमलामिरचीचे काप, कोबी, व फ्लावरचे तुकडे करुन मिश्रण नीट मिक्स करणे. त्यात आपल्या आवडीप्रमाणे मीठ घालणे. व थोडा सोडा घालणे. व ड्रायफ्रुट्स घालून ढवळणे. व ते पीठ स्दल् मध्ये किंवा इडली पात्रात भरणे. व नेहमीप्रमाणे २० मिनिटे ते वाफवून घेणै. व गार झाल्यावर इडल्या काढून घेणे. सॉसबरोबर किंवा चटणी बरोबर खावे. यात कुठेच तेलाचा, तुपाचा वापर नाही त्यामुळे ते शरीराला अत्यंत चांगले आहे. शक्यतो वृध्द माणसांना पचायला व चावायला सोपे. भाज्या असल्यामुळे ते पूर्ण आहारही होऊ शकते. जेवणात त्याचा इल्त्सर्ीत मधून आधार घेतो.

**- अनुराधा जोशी**

## बटाटा पोळी



**साहित्य :** २ पोळ्या, १ उकडलेला बटाटा, लाल तिखट, मीठ, जिरे-धने पावडर, तेल.

**कृती :** बटाट्यामध्ये आवडीनुसार लाल तिखट, मीठ, भाजलेली जिरे धने पावडर घालावी. हे मिश्रण नीट मळून एकजीव करावे. तयार झालेले हे मिश्रण पोळीच्या अर्ध्या भागात करंजीप्रमाणे भरून उरलेल्या अर्ध्या पोळीने तो भाग बंद करावा. आता तव्यावर मंद आचेवर हे दोन्ही भाग ठेवावेत. बाजूने चमच्याने किंचित तेल घालावे. उलथण्याने ही पोळी हळुवारपणे दाबत राहावी. दोन्ही बाजू लालसर झाल्या की पोळ्या खाली काढाव्यात. पोळीचा वरचा भाग उलथण्याने उघडावा. एकदम वाफेचा लोट येईल. तो जाऊ द्यावा. पोळी थोडी निवली की परत वरचा भाग लावून फ्रँकीप्रमाणे खावे.

**- ओमनी फीचर्स**

## सुरळीच्या पाटवड्या



**साहित्य :** १ मोठी वाटी डाळीचे पीठ (बेसन), १ मोठी वाटी आंबट ताक, १ मोठी वाटी पाणी, तिखट, मीठ, हळद, हिंग

**फोडणी व कांदा :** खोबऱ्याचे सारण, १/२ वाटी ओले खोबरे, १ मूठ बारीक चिरलेली कोथिंबीर, १ मोठा बारीक चिरलेला कांदा, १ बारीक चिरून हिरवी मिरची, मीठ, थोडी साखर, थोडे लाल तिखट, १ पळी तेलाची फोडणी (थंड करुन घालावी)

**पाककृती :** जाड बुडाच्या पातेल्यात डाळीचे पीठ, ताक, पाणी, तिखट, मीठ, हिंग, हळद घालून मिश्रण सारखे करावे. गुठळी राहू देऊ नये. नंतर हे पातेले गॅसवर ठेवून मिश्रण डावेने ढवळत राहावे. खाली लागू देऊ नये. मिश्रण दाटसर होत आले की झाकण ठेवून वाफ आणावी. वरील पातेल्यातील १/४ चमचा मिश्रण एका स्टीलच्या थाळीला पसरून लावून पाहावे.

गार झाल्यावर जर ते उचलले तर चटकन निघाले पाहिजे. ही मिश्रण शिजल्याची खूण आहे. जर असे चटकन निघाले नाही तर पुन्हा एक वाफ आणावी. नंतर मंद गॅसवर मिश्रण ठेवून द्यावे. स्टीलची ३-४ ताटे पुसून अगदी कोरडी करावीत. नंतर ताटाच्या आतल्या बाजूला मोठा डावभर मिश्रण घालावे व ताटाला सारवल्यासारखे करावे. हे काम खूप झटपट व कौशल्याने करावे लागते. मिश्रण ताटभर होत आले की हाताला थोडे तेल लावून ताटभर सारवल्यासारखे करावे. नंतर ताट पालथे घालून त्यावर पुन्हा डावभर पीठ घालून सारवावे. असे सर्व करुन घ्यावे. सारणासाठी कांदा चिरावा. सर्व वस्तू एकत्र करुन त्यावर गार फोडणी घालावी. जेवढी ताटे झाली असतील त्याप्रमाणे सारणाचे भाग पाडून एकेका ताटावर सारण पसरवावे. सुरीने कापून अलगद हाताने वड्या गुंडाळाव्यात.

**नवी/सोपी पाककृती**

सांगितलेले साहित्य एकत्र करावे. नंतर हे पातेले साध्या कुकरमध्ये ४० मिनिटे गॅसवर ठेवावे. नंतर डावेने मिश्रण सारखे करावे व ताटावर पसरून वड्या पाडाव्यात.

**- ओमनी फीचर्स**

## लहान मुलांसाठी काही सोपी सूप्स :

### १) टोमॅटो सूप



२ टोमॅटो, १ गाजर, कांद्याची एखादी फोड, १ बेबी बटाटा, २ मिरी दाणे, १ कप पाणी घालून कुकरच्या भांड्यात शिजवून घ्या. गार झाल्यावर मिक्सरमध्ये वाटा. लहान पाव कप दूध घाला. चिमूटभर साखर घाला. मीठ घाला. उकळून प्यायला द्या. थोड्या मोठ्या मुलांना (म्हणजे दीड वर्षापेक्षा जास्त), थोडी साय किंवा किसलेलं थोडंसं चीज घाला. याच पध्दतीनं लाल टोमॅटोऐवजी लाल भोपळा वापरुनही सूप करता येईल.

## २) गाजर सूप



२ गाजरे, २ बेबी बटाटे, १ लहान कांदा, २ मिरी दाणे असं सगळं कुकरच्या भांड्यात घाला. कपभर पाणी घालून शिजवा. गार झाल्यावर मिक्सरमध्ये वाटा. लहान पाव कप दूध घाला. मीठ घाला. उकळून प्यायला द्या. जरा मोठ्या मुलांना वरून थोडं लोणी घाला. याच पध्दतीने गाजराऐवजी कोबी किंवा फ्लॉवर घालूनही सूप करता येईल.

## ३) पालक सूप

अर्धी जुडी किंवा २० पालकाची पाने, १ टोमॅटो, १ बेबी पोटॅटो, कांद्याची मोठी फोड, ३-४ मिरी दाणे हे सगळं कुकरच्या भांड्यात घाला. शिजवून थंड करा आणि मिक्सरमध्ये वाटा. पाव कप दूध घाला. वरून थोडी साय किंवा चीज घाला किंवा किसलेले पनीर घाला.



## ४) चिकन सूप



कपभर चिकनचे सूप पीसेस (दुकानात तयार मिळतात) धुवून घ्या. थोड्याशा लोण्यावर किंवा तेलावर एक कांदा चिरून परता. त्यात ३ मिरी दाणे, २ लवंगा, १ लहान तुकडा दालचिनी घाला. त्यावर चिकनचे तुकडे घाला. मीठ घाला. हव्या असल्यास भाज्या घाला. मंद गॅसवर चिकनचा पूर्ण अर्क उतरेपर्यंत उकळा. नंतर चमच्यानं गरम मसाला काढून टाका. लहान मुलांना देताना चिकनची हाडं काढून द्या. हे सूप याच पध्दतीने आजारी माणसांसाठी तसंच मोठ्या माणसांसाठीही करता येईल.

टोमॅटो वगळता कुठलंही सूप कधीही गाळू नका. कारण त्यातला चोथा निघून जाईल.

**- ओमनी फीचर्स**